जून २०२४/पाने १००/किंमत ₹१०

# लोकराज्य



## राजर्षी छत्रपती शाहू महाराज

## सामाजिक लोकशाहीचा आधारस्तंभ

### शतकोत्तर सुवर्ण जयंती वर्ष

# शिवराज्याभिषेक दिन...



दुर्गराज किल्ले रायगडावर युगप्रवर्तक हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचा ३५१वा शिवराज्याभिषेक दिन सोहळ्यातील विविध कार्यक्रम मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. याप्रसंगी उपमुख्यमंत्री अजित पवार, मंत्री सुधीर मुनगंटीवार, पालकमंत्री उदय सामंत, मंत्री आदिती तटकरे, खासदार सुनील तटकरे, आमदार भरत गोगावले, आमदार महेंद्र थोरवे, आमदार अनिकेत तटकरे, जिल्हाधिकारी किशन जावळे, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड आदी उपस्थित होते.

छत्रपती शिवाजी महाराज समाधीस्थळ येथे दर्शन घेऊन कवड्यांची माळ अर्पण केली. जगदीश्वर मंदिर येथे भेट देऊन दर्शन घेतले. या सोहळ्यात विविध व्याख्यात्यांनी शिवपराक्रमाच्या सादर केलेल्या व्याख्यानांनी वातावरण भारून टाकले होते. सोहळ्याचे मंत्रोच्चारात पालखीतून मिरवणुकीने राजसदरेवर आगमन झाले. मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीला अभिषेक करण्यात आला. नंतर शासकीय मानवंदना देण्यात आली. ढोल-ताशे, शिवप्रेमी पथकांचे विविध कार्यक्रम आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयजयकाराने किल्ले रायगड दुमदुमले.

## लोककल्याणकारी विचारांचा वसा

६

सामाजिक सुधारणांचे प्रणेते, लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांना शतकोत्तर सुवर्ण जयंतीनिमित्त कोटी कोटी प्रणाम. त्यांच्या कार्यकर्तृत्वाला मानाचा मुजरा. छत्रपती शिवाजी महाराज आणि राजर्षी शाहू महाराज यांच्या विचार-कार्यकर्तृत्वावरच आधुनिक आणि बळकट महाराष्ट्राचा भरभक्कम पाया घातला गेला आहे.

## लोककल्याणाचे आदर्श

९

छत्रपती शिवाजी महाराज यांचा लोककल्याणाचा वारसा लाभलेल्या राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी लोककल्याण आणि सामाजिक न्याय या दृष्टीने केलेले कार्य अत्यंत उल्लेखनीय आहे. एका बाजूला सामाजिक सुधारणांचे प्रचंड मोठे कार्य करत असतानाच तळागाळातील शेवटच्या घटकाचा विचार करून पायाभूत विकासकामांवर त्यांनी दिलेला भर हा अलौकिक आणि राज्यकर्त्यांसाठी दिशादर्शक आहे.

## लोकोत्तर राजा

११

सामाजिक न्यायाच्या संकल्पनेचे जनक, रयतेचे राजे, लोकराजा, छत्रपती राजर्षी शाहू महाराजांच्या शतकोत्तर सुवर्ण जयंतीनिमित्त त्यांच्या कार्याला, विचारांना, स्मृतींना सर्वप्रथम कृतज्ञतापूर्वक वंदन! राजर्षी शाहू महाराजांच्या प्रगत, पुरोगामी, सुधारणावादी विचारांवर देशाची दमदार वाटचाल सुरू आहे.

## छत्रपती शाहू महाराज व समकालीन समाजसुधारक

६४

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांना 'राजर्षी' संबोधले जात असे. राजा आणि ऋषी यांच्या वैशिष्ट्यांनी युक्त असे त्यांचे व्यक्तिमत्त्व होते. लोककल्याणाच्या योजना त्यांनी सर्व समाज डोळ्यासमोर ठेवून राबवल्या व या योजना राबवताना सर्वांप्रति उदार अंत:करणाचा भाव हा ऋषीतुल्य गुण त्यांच्यात होता.

## युवकांच्या आकांक्षांची 'सारथी'

७२

मराठा समाजातील विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी स्थापन छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था, पुणे अर्थात 'सारथी' ही खऱ्या अर्थाने मराठा समाजातील युवकांच्या आकाक्षांची सारथी बनली आहे.

## प्रेरणादायी समृद्ध वारसा

८५

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या आठवणींना उजाळा देणाऱ्या वास्तूंपैकी एक महत्त्वपूर्ण वास्तू म्हणजे कोल्हापुरातील न्यू पॅलेस आणि येथील संग्रहालय होय. शाहू महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या त्यांच्या वापरातील अनेक वस्तूंचा संग्रह असणारे शहाजी छत्रपती म्युझियम हे शाहू महाराजांच्या आठवणींना उजाळा देणारे आहे.

# अंतरंग


| | |
|---|---|
| लोककल्याणकारी विचारांचा वसा | ६ |
| लोककल्याणाचे आदर्श | ९ |
| लोकोत्तर राजा | ११ |
| थोर समाजसुधारक | १३ |
| राजर्षी शाहू महाराज आणि स्त्री शिक्षण | १५ |
| स्त्री उद्धाराचे अनमोल कार्य | १६ |
| समतेचे महानायक | १९ |
| थिऑसॉफिकल सोसायटी | २० |
| शाहू महाराज आणि बाबासाहेबांचे ऋणानुबंध | २२ |
| कला-क्रीडांचे युगकर्ते | २६ |
| सुराज्याचे औद्योगिक मॉडेल 'उद्यमनगरी' | २८ |
| शाहू विचारांची शिदोरी! | ३० |
| लोकराजा शाहू | ३२ |
| सार्वत्रिक शिक्षणाचा अध्वर्यू | ३५ |
| शाहू महाराजांची उद्योगनीती | ३८ |
| दुष्काळ निवारणाचे कार्य | ४० |
| कलावंतांचा आधारवड | ४३ |
| विरोधकांची काकगर्जना | ४५ |
| शिवछत्रपतींचा वारसा | ४७ |
| सामाजिक समतेचे शिल्पकार | ५२ |
| वृत्तपत्रांसाठी मोलाचे योगदान | ५४ |
| राजर्षींच्या विचारांची कालसुसंगतता | ५८ |
| प्रेरक प्रसंग | ६१ |
| छत्रपती शाहू महाराज व समकालीन समाजसुधारक | ६४ |
| समाजसुधारणेची भूमिका | ६६ |
| शाहू छत्रपती आणि आर्य समाज | ६८ |
| युवकांच्या आकांक्षांची 'सारथी' | ७२ |
| संशोधन व प्रशिक्षण संस्था | ७५ |
| राजर्षी शाहू महाराज यांचा जीवनपट | ७९ |
| प्रेरणादायी समृद्ध वारसा | ८५ |
| महाराष्ट्राचा अतिरिक्त अर्थसंकल्प २०२४-२५ | ८९-९८ |

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३५०

वर्ष ७५ वे | अंक ६ | जून २०२४

**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,**
**महाराष्ट्र शासन**

**लोकराज्य**

| | |
|---|---|
| मुख्य संपादक | ब्रिजेश सिंह |
| प्रबंध संपादक | हेमराज बागुल |
| | डॉ. राहुल तिडके |
| संपादक | दयानंद कांबळे |
| सहसंपादक | अश्विनी पुजारी |
| | पवन राठोड |
| | गजानन पाटील |
| मुखपृष्ठ | सीमा रनाळकर |
| | सुशिम कांबळे |
| मांडणी, सजावट | शैलेश कदम |
| मुद्रितशोधन | भाग्यश्री पेठकर |
| मुद्रण | मे. क्वार्टरफोल्ड प्रिंटेबिलिटीज, तळोजा एमआयडीसी, नवी मुंबई. |

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
E-mail : lokrajya2011@gmail.com

**ई - लोकराज्य** http://dgipr.maharashtra.gov.in

या अंकात प्रकाशित लेखातील मतांशी
शासन सहमत असेलच असे नाही.

# राज्यातील खरिपाचा आढावा

राज्यातील शेतकरी, नागरिकांना नैसर्गिक आपत्ती, शेती नुकसानभरपाईच्या मदतीचे वाटप जूनपर्यंत पूर्ण करावे, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. शेतकऱ्यांना वेळेवर मदत दिली पाहिजे. क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांसाठी घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी तातडीने करावी, असेही मुख्यमंत्र्यांनी जिल्हा प्रशासनाला निर्देश दिले आहेत. खते, बियाणांचे लिंकेज करणाऱ्या विक्रेत्यांबरोबरच कंपन्यांवरही कडक कारवाई करण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी कृषी विभागाला दिल्या आहेत.

मुंबईतील सह्याद्री अतिथिगृह येथे झालेल्या बैठकीत राज्यातील खरिपाचा आढावा मुख्यमंत्र्यांनी घेतला. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, सहकारमंत्री दिलीप वळसे-पाटील, कृषिमंत्री धनंजय मुंडे, पणनमंत्री अब्दुल सत्तार, ग्रामविकासमंत्री गिरीश महाजन, मृद् व जलसंधारण मंत्री संजय राठोड, मुख्य सचिव डॉ. नितीन करीर, मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव आय. एस. चहल, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे, कृषी विभागाच्या प्रधान सचिव व्ही.राधा, कृषी आयुक्त रावसाहेब भागडे यांच्यासह विविध विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव उपस्थित होते. सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी आणि जिल्हा कृषी अधिकारी दूरदृश्यप्रणालीच्या माध्यमातून उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. शिंदे यावेळी म्हणाले, 'शेतकरी देशाचा कणा आहे. त्यामुळे राज्य शासनाने शेतकऱ्यांच्या समृद्धीसाठी घेतलेल्या निर्णयांची तातडीने अंमलबजावणी करण्यात यावी. राज्य शासन शेतकऱ्याला वाऱ्यावर सोडणार नाही,' असे सांगतानाच 'बांबू लागवड क्षेत्राची वाढ करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे. कृषी विद्यापीठांनी नवीन संशोधनावर भर द्यावा,' असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. ज्या भागात २५ टक्क्यांपेक्षा कमी पाऊस झाला आहे, असे तालुके, जिल्ह्यांवर विशेष लक्ष केंद्रित करण्याच्या सूचनाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिल्या.

'बोगस बियाणे कंपन्यांवर कठोर कारवाई करावी. आपत्ती काळात शेतीच्या नुकसानीच्या पाहणीसाठी सॅटेलाईट तंत्रज्ञानाचा वापर करावा,' असे आवाहन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. कृषी अधिकाऱ्यांनी क्षेत्रीयस्तरावर जाऊन शेतकऱ्यांना मार्गदर्शन करावे. हवामान विभागाने जुलै महिन्यात ला निनामुळे जोरदार पाऊस होण्याचा अंदाज वर्तवला आहे. अशा परिस्थितीत आपत्कालीन यंत्रणा सज्ज करण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावेळी दिल्या आहेत.

खरिपाच्या काळात शेतकऱ्यांना बियाणे, खते व अन्य कृषी निविष्ठांचा तुटवडा भासू नये, यासाठी कृषी विभागाने परिपूर्ण नियोजन केलेले आहे. मात्र साठेबाजी किंवा लिंकिंग होत असल्यास तशी तक्रार शेतकऱ्यांनी व्हॉट्सॲपद्वारे ९८२२४४६६५५ या क्रमांकावर करावी, असे आवाहन कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी बैठकीचे प्रास्ताविक करताना केले.

यंदा खरिपाचे लागवडीखालील अपेक्षित क्षेत्र १४२.३८ लाख हेक्टर राहणार असून, यामध्ये कापूस पिकाखाली ४०.२० लाख हेक्टर, सोयाबीन पिकाखाली ५०.८६ लाख हेक्टर, भात पिकाखाली १५.३० लाख हेक्टर, मका पिकाखाली ९.८० लाख हेक्टर, कडधान्य पिकाखाली १७.७३ लाख हेक्टर क्षेत्र येणार आहे. राज्यात २४.९१ लाख क्विंटल बियाणे उपलब्ध असून १.५० लाख मे. टन युरिया व २५ हजार मे. टन डीएपी खतांचा संरक्षित साठा करण्यात आल्याची माहिती प्रधान सचिव व्ही. राधा यांनी दिली.

# सामाजिक लोकशाहीचा आधारस्तंभ

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे शतकोत्तर सुवर्ण जयंती वर्ष साजरे होत आहे. या निमित्ताने छत्रपती शाहू महाराज यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकणारा अंक आपल्या हाती देताना आनंद होत आहे. या अंकात छत्रपती शाहू महाराज यांच्या शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, कृषी आदी क्षेत्रातील कार्याचे अभ्यासपूर्ण विवेचन अनेक तज्ज्ञ लेखकांनी आपल्या लेखातून केले आहे.

छत्रपती शाहू महाराज यांनी अनेक लोककल्याणकारी जाहीरनामे प्रसिद्ध केले. प्लेगच्या साथीबाबत आणि गोवधबंदी कायदा करून दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या जनावरांसाठी छावणी सुरू केली. त्यांनी रस्त्याच्या कडेस असणाऱ्या सरकारी वृक्षांची जोपासना करणारा कायदाही केला. छत्रपती शाहू महाराज यांनी शैक्षणिक क्षेत्रात मोठे कार्य केले आहे. बहुजन समाज शिकून शहाणा झाल्याशिवाय त्यांचे दारिद्र्य, अज्ञान व अंधश्रद्धा नष्ट होणार नाहीत, हे जाणून त्यांनी शिक्षणाच्या, विशेषतः प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारावर भर दिला. त्यानुसार त्यांनी आपल्या संस्थानात सक्तीच्या मोफत प्राथमिक शिक्षणाचा कायदा केला आणि तो अमलात आणला. प्रत्येक खेड्यात प्राथमिक शाळा सुरू केली. खेड्यापाड्यांतील मुलांना उच्चशिक्षणाची सुविधा मिळावी, म्हणून त्यांनी कोल्हापुरात अनेक वसतिगृहे स्थापन केली.



छत्रपती शाहू महाराज यांनी प्रशासन-यंत्रणेची पुनर्रचना केली. बहुजन समाजातील कर्तबगार व गुणी व्यक्तींना अधिकारावर नेमले. मागासलेल्या जातींत शिक्षणाबद्दल फारशी आस्था नसल्याने व त्याचे कारण शिक्षण घेऊनही सरकारी नोकरी लाभण्याची शक्यता नसल्याने त्यांनी कोल्हापूर संस्थानात ५० टक्के शासकीय नोकऱ्या मागासलेल्या वर्गासाठी राखीव ठेवण्याचा जाहीरनामा काढला. राखीव जागांचे धोरण अमलात आणणारे शाहू महाराज हे पहिले राज्यकर्ते आहेत.

सामाजिक सुधारणांबरोबरच त्यांनी शेतीस व उद्योगधंद्यांस प्रोत्साहन दिले. अनेक कृषी व औद्योगिक प्रदर्शने भरवली. पन्हाळ्यावर चहा, कॉफी, रबर यांच्या लागवडींचे प्रयोग केले. कृषी उत्पादनासाठी शाहूपुरी, जयसिंगपूर यांसारख्या बाजारपेठा वसविल्या. त्यामुळे कोल्हापूर ही गुळाची बाजारपेठ म्हणून देशात प्रसिद्ध पावली. त्यांनी 'शाहू मिल'ची स्थापना करून आधुनिक वस्त्रोद्योगास चालना दिली. त्यांनी बांधलेले राधानगरीचे धरण कृषी क्षेत्रात संस्थानचा कायापालट करणारा उपक्रम ठरला. छत्रपती शाहू महाराज यांनी 'सहकारी संस्थांचा कायदा' करून सहकारी चळवळीची मुहूर्तमेढ रोवली. त्यांनी संगीत, नाट्य, चित्रकला, मल्लविद्या आदी कलांना राजाश्रय देऊन महाराष्ट्रात कलेच्या क्षेत्रात स्पृहणीय कामगिरी केली.

## अतिरिक्त अर्थसंकल्प

शेतकरी, कष्टकरी, विद्यार्थी, युवक, महिला, मागासवर्गीय, आदिवासी, अल्पसंख्याक अशा सर्व घटकांना न्याय आणि शेती, उद्योग, शिक्षण, व्यापार, आरोग्य, पर्यटन अशा विविध क्षेत्रांच्या विकासाला बळ देणारा राज्याच्या एकूण खर्चासाठी ६ लाख १२ हजार २९३ कोटी रुपयांची तरतूद असलेला वर्ष २०२४-२५ चा अतिरिक्त अर्थसंकल्प अर्थमंत्री अजित पवार यांनी विधिमंडळात नुकताच सादर केला.

या अर्थसंकल्पात महाराष्ट्राची गौरवशाली आध्यात्मिक, सांस्कृतिक परंपरा असलेल्या वारकरी बांधवांसाठी 'मुख्यमंत्री वारकरी संप्रदाय महामंडळ' घोषित करण्यात आले. पंढरपूर वारीच्या जागतिक नामांकनासाठी युनेस्कोकडे प्रस्ताव पाठवण्याची घोषणा केली आहे. वारीतल्या मुख्य पालख्यांतील दिंड्यांना प्रतिदिंडी २० हजार रुपयांचे अर्थसाहाय्य; तसेच 'निर्मल वारी'साठी ३६ कोटींचा निधी देण्यात येईल.

२१ ते ६५ वयोगटातील पात्र महिलांना प्रत्येकी दरमहा दीड हजार रुपये देणारी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना; तसेच पिंक ई-रिक्षा योजना, मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना, पुण्यश्लोक अहिल्यादेवी स्टार्टअप योजना, लघुउद्योजक महिलांना १५ लाख कर्जापर्यंतच्या व्याजाचा परतावा योजना जाहीर करण्यात आल्या आहेत.

राज्यातील दहा लाख युवकांना प्रत्यक्ष कामावर प्रशिक्षण आणि दरमहा दहा हजार रुपयांपर्यंत विद्यावेतन देणाऱ्या मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेची घोषणा करण्यात आली. मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजनेंतर्गत ४४ लाख शेतकऱ्यांना मोफत वीजपुरवठा, दूध उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिलिटर पाच रुपये अनुदान जाहीर करण्यात आले.

छत्रपती शाहू महाराज यांच्या विचारांचा वारसा घेऊन राज्य शासन समाजातील सर्व घटकांना बळ देण्यासाठी योजना आखत आहे. आपणास हा अंक निश्चितच आवडेल, असा विश्वास आहे.

**ब्रिजेश सिंह**
(मुख्य संपादक)

**सामाजिक सुधारणांचे प्रणेते, लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांना शतकोत्तर सुवर्ण जयंतीनिमित्त कोटी कोटी प्रणाम. त्यांच्या कार्यकर्तृत्वाला मानाचा मुजरा! छत्रपती शिवाजी महाराज आणि राजर्षी शाहू महाराज यांच्या विचार–कार्यकर्तृत्वावरच आधुनिक आणि बळकट महाराष्ट्राचा भरभक्कम पाया घातला गेला आहे. राजर्षी शाहू महाराज शिवरायांच्या विचारांचे अनुयायी होते. त्यांनी शिवरायांकडून रयतेवर प्रेम करण्याचा, लोककल्याणकारी राजाचा आदर्श घेतला.**

# लोककल्याणकारी विचारांचा वसा

**एकनाथ शिंदे,** मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

राजर्षी शाहू महाराज यांनी हयातभर रयतेची काळजी वाहिली. शिक्षण, आरोग्य, शेती-सिंचन, उद्योग या क्षेत्रांना बळ मिळेल, अशी धोरणे राबवली. अनेक सामाजिक सुधारणांचा पाया घातला. अनिष्ट प्रथांविरोधात कठोर पावले उचलली. त्यांच्या प्रजाहितदक्ष धोरणांचा, सामाजिक सुधारणांचा आजही जगभर अभ्यास केला जातो. ही बाब आपल्या सर्वांसाठी अभिमानास्पदच आहे.



## क्रांतिकारी निर्णय

राजर्षी शाहू महाराजांना आरक्षणाचे जनक म्हटले जाते. त्यांनी महिलांचे शिक्षण, बहुजनांसाठी सामाजिक न्यायाच्या दृष्टीने अनेक क्रांतिकारी निर्णय घेतले. म्हणूनच त्यांना राजांमधील ऋषी म्हणजेच राजर्षी असा किताब दिला आहे. राजर्षी शाहू महाराज यांचे समता-बंधुता तत्त्व घेऊनच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या भारतीय संविधानाची निर्मिती केली आहे. आमचा सामाजिक न्याय विभाग अनुसूचित जाती-जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व आर्थिक मागास अशा सर्वांनाच विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी काम करतो आहे. या सर्व घटकांचा सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि आर्थिक विकास हा आमचा ध्यास आहे.

महाराष्ट्रातील सामाजिक न्यायाच्या क्षेत्राचा पाया छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा जोतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारख्या महान विभूतींनी घातला आहे. आपल्या राज्याने सामाजिक न्यायाच्या क्षेत्रात अनेक महत्त्वपूर्ण पावले टाकली आहेत. सामाजिक न्याय विभागाकडून देण्यात येणाऱ्या पुरस्कारांतील गेल्या चार वर्षांचे पुरस्कारही एकाच वेळी वितरित केले आहेत. सन २०१९-२०, २०२०-२१, २०२१-२२ आणि २०२२-२३ अशा चार वर्षांचे तब्बल ३९३ पुरस्कारांचे वितरण करून आम्ही पुरस्कारांचाही हा अनुशेष भरून काढला आहे. आम्हाला राज्यातील विकासाचा, जनकल्याणाचाही गेल्या काही वर्षांचा अनुशेष भरून काढायचा आहे.

## वसतिगृह चळवळीचे जनक

राजर्षी शाहू महाराज यांनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले होते. शिक्षण तळागाळातल्या वर्गापर्यंत पोहोचावे, यासाठी त्यांनी वसतिगृहांची उभारणी केली. त्यांच्यामुळे देशातील अन्य राज्यांमध्येही वसतिगृहांची चळवळ पोहोचली. शिक्षणापासून दूर राहिलेल्या समाज घटकांच्या शिक्षणाचा मार्ग सुकर झाला. ही सामाजिक परिवर्तनाची मोठी नांदीच मानली जाते. त्यामुळेच राजर्षी शाहू महाराज यांना वसतिगृह चळवळीचे जनक म्हटले जाते, हे आपल्यासाठी गौरवास्पद आहे. महाराष्ट्र शासनानेही राज्यात ४४२ वसतिगृहे, ९० निवासी शाळा; तसेच २,२३८ अनुदानित वसतिगृहे सुरू केली आहेत. यातून दीड लाख विद्यार्थ्यांना निवास, भोजन आणि शिक्षणाची सुविधा

पुरवली जाते आहे. ज्यांना वसतिगृहात प्रवेश मिळत नाही, अशा विद्यार्थ्यांना स्वाधार योजनेतून ४३ ते ६० हजार रुपयांपर्यंत निर्वाह भत्ता दिला जातो आहे. प्री-मॅट्रिक, पोस्ट मॅट्रिक, शिक्षण शुल्क, परीक्षा प्रतिपूर्ती यांसह शिष्यवृत्तीच्या योजनांसाठी २,४६२ कोटींची तरतूद केली आहे.

## शेती आणि सिंचन

राजर्षी शाहू महाराज यांनी उद्यमशीलतेला प्रोत्साहन दिले. शेतीसह, शेतीपूरक अवजारांचे कारखाने, वेगवेगळ्या उद्योगांसाठी पोषक असे वातावरण तयार केले. त्याकाळी अगदी चहा, कॉफी, रबर, मसाल्यांची पिके घेण्याचा प्रयोग त्यांनी राबवला. आम्ही 'मधाचे गाव' ही संकल्पना राबवत आहोत. विशेष म्हणजे ही संकल्पना राजर्षी शाहू महाराज यांना समर्पित अशीच आहे. त्याकाळी मधुमक्षिका पालनाची कोणतीही माहिती, प्रशिक्षण नसतानाही त्यांनी हा प्रयोग राबवला होता. शेतकी अधिकारी आणि सिंचन अधिकारी ही पदेही त्यांनी निर्माण केली. त्यांनी स्वतंत्र असे पाटबंधारे खाते निर्माण केले. यातून त्यांची शेती, सिंचनाविषयीची तळमळ दिसून येते. त्याकाळी संस्थानात 'शेतकी' आणि जोडीला विज्ञान प्रदर्शनांचेही आयोजन केले जात असे. सिंचनासाठी राधानगरी धरणासारखा पहिलाच प्रयोग त्यांनी राबवला, तो यशस्वी केला.



शेती आणि सिंचनासाठीचे राजर्षी शाहू महाराज यांचे प्रयत्न आणि प्रयोग आजही आमच्यासाठी मार्गदर्शक आहेत. त्यासाठीच आम्ही राज्यातील सिंचन प्रकल्पांना मार्गी लावले. अनेक रखडलेल्या प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता दिली. यामुळे राज्यातील लाखो हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. शेतीतही आम्ही नवनवीन प्रयोग राबवतो आहोत. बांबू लागवडीसारखा अभिनव प्रकल्प आखला आहे. राजर्षी शाहू महाराजांनी शेतमालासाठी जाणीवपूर्वक बाजारपेठा उभ्या केल्या. सहकार चळवळीचा पायादेखील राजर्षी शाहू महाराजांनी घातला. त्यांनी सहकारी संस्थांविषयी कायदाही केला होता. नोंदणीसाठी निबंधकाची नेमणूक केली होती. सहकार क्षेत्राला त्यांनी धोरणात्मक असे बळ दिले. त्यासाठी प्रोत्साहन दिले. कोल्हापुरात शाहू छत्रपती मिलसारखी कापड गिरणी सुरू केली. त्याकाळी ऑईल मिल, सॉ मिल, फाऊंड्री फॅक्टरी, इलेक्ट्रिक कंपनी, मोटार ट्रान्सपोर्ट कंपनी अशा संस्था आणि त्यांना मनुष्यबळ पुरवण्यासाठी इंडस्ट्रियल स्कूलही सुरू केले होते. शासन म्हणून आम्हीदेखील सर्वच घटकातील तरुणांना रोजगार-स्वयंरोजगार उपलब्ध होतील, यासाठी प्रयत्नशील आहोत. त्यासाठी लोकशाहीर अण्णा भाऊ साठे, संत रोहिदास चर्मोद्योग विकास, महात्मा फुले मागासवर्ग विकास आणि गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार या महामंडळांना एक हजार कोटी रुपयांच्या भाग भांडवलाची तरतूद केली आहे. आमच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नावीन्यता विभागाने प्रशिक्षण, रोजगार विनिमय, स्टार्टअप-नावीन्यता या माध्यमातून युवकांसाठी उद्योजकता आणि रोजगाराच्या अनेकविध संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. यापुढेही या विभागाच्या माध्यमातून अनेक नावीन्यपूर्ण आणि तरुणांसाठी उपयुक्त ठरतील, असे उपक्रम राबवण्याचे प्रयत्न सुरूच राहणार आहेत.

## संयुक्त स्मारक उभारण्याचा संकल्प

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना त्यांच्या शिक्षणासाठी आणि विदेशातील अनेक गोष्टींत राजर्षी शाहू महाराज यांनी सर्वतोपरी सहकार्य आणि आर्थिक मदतही केली होती. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाला आकार देण्यात, राजर्षी शाहू महाराज यांचेही मोठे योगदान राहिले आहे. ज्या भूमीतून राजर्षी शाहू महाराजांनी सामाजिक परिवर्तनाचा नारा दिला, बहिष्कृत समाजाला स्वाभिमानाची, स्वत्वाची जाणीव करून दिली, त्या भूमीत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या उपस्थितीत देशातील पहिली बहिष्कृत वर्गाची ऐतिहासिक परिषद माणगाव (ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर) येथे २१ व २२ मार्च १९२० साली पार पडली होती. ही परिषद सामाजिक क्रांतिकारी अशीच होती. या परिषदेसाठी राजर्षी शाहू

## सामाजिक न्यायाच्या दिशेने

राजर्षी शाहू महाराज यांच्या सामाजिक न्यायाच्या क्षेत्रातील कार्याचा आमच्यापुढे आदर्श आहे, म्हणून आम्ही दिव्यांगांसाठी स्वतंत्र विभाग सुरू केला आहे. सफाई कामगारांना लाड समितीच्या शिफारशी लागू केल्या आहेत. महात्मा फुले नवीनीकरणीय ऊर्जा व पायाभूत प्रौद्योगिकी-महाप्रित कंपनी स्थापन केली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन-प्रशिक्षण संस्था-बार्टीप्रमाणेच, सारथी, महाज्योती अशा संस्था सक्षमपणे काम करू लागल्या आहेत. त्यांना वेळोवेळी आपण आवश्यक ते सर्व पाठबळ देऊ केले आहे. या संस्थांमधून यु.पी.एस.सी., एम.पी.एस.सी. यांच्यासह, लष्कर भरतीसह बँकिंग, पोलीस भरतीसाठी मार्गदर्शन केले जात आहे. यातून हजारो विद्यार्थ्यांनी प्रशिक्षण घेतले आहे. संशोधक विद्यार्थ्यांना संशोधनासाठी फेलोशिपही दिली जाते आहे. कर्मवीर दादासाहेब सबलीकरण व स्वाभिमान योजनेतून ६,१०० शेतमजुरांना शेतजमीन दिली गेली आहे. अनुसूचित जाती मागासवर्गीय १८ सूतगिरण्यांना ३७२ कोटींचे दीर्घ मुदतीचे कर्ज उपलब्ध करून दिले आहे. रमाई घरकूल योजनेतून पाच वर्षांत साडेचार लाख घरे बांधली गेली आहेत. १ लाख २० हजार घरे प्रगतिपथावर आहेत. २०२३-२४ मध्ये १ लाख ५० हजार घरांचे उद्दिष्ट होते. त्यांचेही काम वेगाने सुरू आहे.

महाराज यांनीच पुढाकार घेतला होता. माणगाव बहिष्कृत परिषद अजरामर आहेच; पण तिचा इतिहास पुढच्या पिढीसमोर ठेवताना माणगाव येथे आकर्षक मुख्य प्रवेशद्वार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या लंडन येथे वास्तव्य असलेल्या घराची - 'लंडन हाऊस'ची प्रतिकृती आणि परिषदेचा इतिहास सांगणारा 'होलोग्राफी शो'; तसेच सुशोभित असे समाज मंदिर साकारले आहे. या लंडन हाऊसच्या प्रतिकृतीच्या निमित्ताने आपण राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या दोघांच्या स्मृतींना अभिवादनच केले आहे. माणगाव येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांचे संयुक्त स्मारक उभारण्याचा संकल्प आहे. या आराखड्यासाठी १९९ कोटी रुपयांची तरतूद केली आहे.

राजर्षी शाहू महाराज यांनी कला क्षेत्रालाही आधार दिला. चित्र, शिल्प, नाट्य-संगीत आणि क्रीडा क्षेत्रातील नैपुण्यालाही त्यांनी



राजाश्रयाबरोबरच लोकाश्रय मिळावा असे धोरण राबवले. राज्यात आपण या सर्वच क्षेत्रांवर लक्ष ठेवून आहोत. कला, क्रीडा आणि सांस्कृतिक अशा सर्वच क्षेत्रांत महाराष्ट्राचे नाव आहे. त्या मागेही आजवरच्या या वाटचालीत राजर्षी शाहू महाराज यांच्यापासून ते त्या-त्या क्षेत्रातील दिग्गजांनी दिलेले योगदान महत्त्वपूर्ण ठरले आहे. या योगदानाची दखल घेऊन, त्यांचा यथोचित मान-सन्मान होईल, अशीच धोरणे आपण राबवली आहेत. या क्षेत्रांना जागतिक स्तरावरील आधुनिक प्रवाह-बदल स्वीकारता यावेत, यासाठी नेहमीच साहाय्य केले आहे.

## पायाभूत सुविधांच्या क्षेत्रात अव्वल

मा. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे कष्टकरी, कामगार आणि वंचितांच्या हक्क-अधिकारांबाबत संवेदनशील आहेत. त्यांनी अशा घटकांसाठी सोलापूरमध्ये एक नवनगरच वसवले आहे. विडी कामगारांपासून ते वीणकरांपर्यंतच्या अनेक गरीब कुटुंबांना हक्काचे घर मिळाले आहे. हेदेखील एक परिवर्तनच आहे. केंद्र आणि राज्य सरकार यांच्या समन्वयातून एकीकडे राज्यातल्या पायाभूत सुविधा, रस्ते पूल बांधण्याला वेग दिला आहे. दुसरीकडे आम्ही सामाजिक क्षेत्रातदेखील महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत.

आपले राज्य पायाभूत सुविधांच्या क्षेत्रात अव्वल आहेच; पण महाराष्ट्र हे सामाजिक न्यायाच्या क्षेत्रात काम करणारे अग्रेसर राज्य आहे. सामाजिक न्याय हा आधुनिक महाराष्ट्राचा भक्कम पाया आहे. हा पाया आणखी भक्कम व्हावा, विकासाच्या प्रवाहात कुणीही वंचित राहू नये, यासाठीच आमचा प्रयत्न आहे. आपल्याला बलशाली आणि सर्वच क्षेत्रात विकसित महाराष्ट्र उभा करायचा आहे. विकास म्हणजे काही फक्त काँक्रिटचे जंगल उभे करणे नाही. दुर्बल घटकांना मदत करणे, त्यांचे जीवन आनंदी कसे होईल हे पाहणे, ही आमची जबाबदारी आहे. केंद्राच्या 'प्रधानमंत्री विश्वकर्मा योजने'तून समाजातील विविध घटकांतील कौशल्यांचे, पारंपरिक कारागिरीचे आणि पर्यायाने त्या समाजाच्या विकासाचे लक्ष्य राहणार आहे. राज्यातील शिक्षण, औद्योगिक, कृषी-सिंचन; तसेच आधुनिक म्हणता येतील अशा माहिती तंत्रज्ञान, वस्त्रोद्योग ते पर्यटन, आरोग्य अशा सर्वच क्षेत्रात महाराष्ट्राने लोकाभिमुख आणि देशाच्या प्रगतीत योगदान राहील, अशी धोरणे आखली आहेत. या क्षेत्रातील गुंतवणूक; तसेच मानव संसाधनाचा विकास या दृष्टीने ठाम अशी पावले टाकली आहेत.

सामाजिक न्यायाच्या क्षेत्रातील महात्मा जोतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी उभे केलेले कार्य पूर्ण विश्वाला मार्गदर्शक असे राहिले आहे. या तीनही महाराष्ट्र सुपुत्रांनी जगाला मानवमुक्तीचा, समानतेचा संदेश दिला. प्रसंगी त्यासाठी संघर्ष केला, लढा उभा केला. या सर्वांनी आपल्याला सामाजिक समता, समरसतेचा वारसा दिला आहे. समता, स्वातंत्र्य, आर्थिक, राजकीय, सामाजिक हक्क, स्त्री-पुरुष समानता, समाजातील सर्व व्यक्तींना शिक्षणाची, विकासाची संधी ही सामाजिक न्यायाची तत्त्वे आहेत आणि हाच आमच्या राज्यकारभाराचा पाया आहे. आपल्याला सामाजिक न्यायाचा आणि विचारांचा गौरवशाली वारसा लाभला आहे. आम्ही तो जबाबदारीने स्वीकारला आहे आणि तो तितक्याच ताकदीने पुढे नेणार आहोत, हीच आमची वचनबद्धता आहे.

**शब्दांकन : निशिकांत तोडकर,** मा. मुख्यमंत्री महोदयांचे माहिती अधिकारी

**छत्रपती शिवाजी महाराज यांचा लोककल्याणाचा वारसा लाभलेल्या राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी लोककल्याण आणि सामाजिक न्याय या दृष्टीने केलेले कार्य अत्यंत उल्लेखनीय आहे. एका बाजूला सामाजिक सुधारणांचे प्रचंड मोठे कार्य करत असतानाच तळागाळातील शेवटच्या घटकाचा विचार करून पायाभूत विकासकामांवर त्यांनी दिलेला भर हा अलौकिक आणि राज्यकर्त्यांसाठी दिशादर्शक आहे.**

# लोककल्याणाचे आदर्श

**देवेंद्र फडणवीस,** उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

छत्रपती शिवाजी महाराज यांनी महाराष्ट्र धर्म जागृत केला. गुलामीपासून रयतेची मुक्तता करतानाच एक आदर्श राज्यकारभार कसा असतो, याचा धडा घालून दिला. महाराजांचा हा वारसा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी पुढे नेत महाराष्ट्राच्या सामाजिक परिवर्तनाचा पाया रचला. समाजाला परंपरेच्या जोखडापासून मुक्त करण्याचा विडा उचलतानाच समाज एकसंघ राहावा, याची काळजीही घेतली. सामाजिक सुधारणा घडवण्यासाठी प्रसंगी कायदे, तर प्रसंगी वैचारिक प्रबोधनाचा मार्ग स्वीकारला. त्यामुळे राजर्षी छत्रपती शाहू महाराज हे कृतिशील समाजसुधारक आणि राज्यकर्ते होते. रयतेच्या प्रश्नांची अचूक नाडीपरीक्षा करून त्यावर रामबाण औषध देणारे इतिहासात कमीच राज्यकर्ते झाले आहेत. त्यात राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे नाव अग्रस्थानी घ्यावे लागेल. जन्माधिष्ठित उच्च-नीचतेवर कठोर प्रहार करत असानाच समाजात असंतोष निर्माण होणार नाही, समाज दुभंगणार नाही, सामाजिक वीण कमकुवत होणार नाही, याची दक्षता त्यांनी घेतली.



## धोरणात्मक निर्णय

कर्मठता आणि अनिष्ट प्रथांवर हल्ला करतानाच परंपरांची जपणूकही त्यांनी केली. समाज जागृत करत असतानाच त्याला कृतीची जोड देण्याचे महत्त्वाचे कार्य त्यांनी केले. एक राज्यकर्ता म्हणून रयतेच्या काय अपेक्षा आहेत, याची पूर्ण जाणीव त्यांच्या ठायी होती. त्यामुळेच सामाजिक पुनर्रचनेवर भर देतानाच पायाभूत सुविधांच्या विकासाकडे त्यांनी कानाडोळा केला नाही. किंबहुना त्यावर अधिक भर देत रयतेला सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि कलात्मकदृष्ट्या समृद्ध करण्यावर त्यांनी भर दिला. त्यांनी घेतलेले धोरणात्मक निर्णय लोकाभिमुख व दूरदर्शी होते, त्यांची त्यांनी आक्रमकपणे अंमलबजावणी केली. त्यामुळे राज्यकारभाराचा आदर्श ते उभा करू शकले.

## वंचित-उपेक्षित घटकांना शिक्षण

जातिव्यवस्थेने समाजाला पोखरले आहे आणि त्यातून समाजाला सोडविले पाहिजे, या उद्देशाने राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी सामाजिक सुधारणांना राजाश्रय दिला. समाजसुधारणेचा रस्ता हा शिक्षणातूनच पुढे जातो, हे ओळखून सर्वांना शिक्षणाची दारे खुली केली. वंचित-उपेक्षित घटकांना शिक्षण मिळावे, स्त्रिया शिकल्या तरच सामाजिक सुधारणांना वेग येईल, हे ओळखून मुलींच्या शिक्षणावर विशेष जोर दिला. समाजातील सर्व जाती-धर्मातील मुला-मुलींना शिक्षण घेता यावे, यासाठी विविध समुदायांच्या वसतिगृहांची निर्मिती त्यांनी केली. सामाजिक लढाई ही दीर्घ आहे हे ते ओळखून होते. सामाजिक लढाई आणि शिक्षण यांचा मेळ घालण्याचा त्यांनी केलेला प्रयत्न इतिहासात क्वचितच कोणा राज्यकर्त्याने केला असेल. आर्थिक दुर्बलता हा शिक्षणातील सर्वात मोठा अडथळा असतो. त्यामुळे केवळ शिक्षण शुल्कामुळे कोणाचे शिक्षण थांबू नये, समाजातील होतकरू मुले शिक्षणाच्या प्रवाहात

## रोजगार निर्मिती

काळाच्या पुढे पावले टाकत असताना काळाची नस ओळखण्यात राजर्षी छत्रपती शाहू महाराज चुकले नाहीत. त्यामुळे सहकारात महाराष्ट्र देशात अग्रेसर राहण्यात त्यांनी त्या काळात सुरू केलेल्या सहकारी संस्थांचे महत्त्व खूप मोठे आहे. कौशल्य विकासाचा कार्यक्रम त्यांनी राबवला. प्रत्यक्ष उद्योग क्षेत्रात कापड गिरणी, हातमाग व विणकाम, ऑईल मिल, सॉ मिल, फाऊंड्री, इलेक्ट्रिक कंपनी, मोटार ट्रान्सपोर्ट या उद्योगांना चालना दिली व प्रोत्साहन दिले. आपल्या संस्थानात उद्योग आल्याशिवाय रोजगार निर्मिती आणि त्यातून आर्थिक प्रगती होणार नाही, हे त्यांनी ओळखले होते. या उद्योगांना प्रशिक्षित कामगार लागणार, त्याशिवाय उद्योग टिकणार नाही हेही ते ओळखून होते. उद्योग आपल्या संस्थानात आणि प्रशिक्षित कामगार मात्र बाहेरून आल्यास स्थानिकांना रोजगार मिळणार नाही आणि अर्थचक्र फिरणार नाही, हेही ओळखून त्यांनी तरुणांना प्रशिक्षण मिळावे, याची व्यवस्था केली.

यावीत, यासाठी त्यांनी विद्यार्थ्यांना शुल्क माफी, विद्यावेतन अशा योजना सुरू केल्या. हे करत असताना केवळ आपल्या संस्थानापुरताच त्यांनी विचार केला नाही, तर इतरत्रही शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी त्यांनी हजारो रुपयांच्या देणग्या दिल्या. पुणे, नाशिक, नगर, नागपूर, पंढरपूर, कराची व मुंबईतही हजारो रुपयांच्या देणग्या दिल्या. अवघा समाज शहाणा व्हावा म्हणून, शिकावा आणि गुलामीतून मुक्त व्हावा, हीच भावना त्यामागे होती.

मुलींच्या शिक्षणाला अधिक प्रोत्साहन द्यावे, यासाठी महाराजांनी त्यांच्यासाठी अनेक ठिकाणी स्वतंत्र शाळा काढल्या. शिक्षणासाठी त्यांना प्रवास करून शहरात यावे लागू नये, यासाठी ग्रामीण भागातही मुलींसाठी स्वतंत्र शाळा काढल्या. महाराजांनी सुमारे १०० वर्षांपूर्वी या सर्व गोष्टी केल्या. शाळेतल्या शिक्षकांनी मुलांबरोबरच मुलींच्या शिक्षणाकडे अधिक लक्ष द्यावे, यासाठी एक योजना आखली होती. मुला-मुलींच्या एकत्रित शाळेत पास होणाऱ्या मुलींची संख्या पाहून शिक्षकांना खास बक्षिसे दिली जात असत. महिला शिकली की, कुटुंब शिकते आणि सर्व महिला शिकल्या की, सारा समाजच शहाणा होतो हे तत्त्व महाराजांनी पुरेपूर अंगीकारले होते.

आपल्या संस्थानात सक्तीच्या, मोफत व सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाचा कायदा करून शिक्षणाचे महत्त्व तळागाळापर्यंत पोहोचवण्याचे कार्य केले. एका हातात कायद्याचा दंड आणि दुसऱ्या हातात समाजाला उज्ज्वल भविष्याची दिशा दाखवणारी छडी हे त्यांच्यातील राज्यकर्त्याचे वैशिष्ट्य आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विदेशात शिक्षण घेण्यासाठी जसे बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड यांनी मदत केली, तशीच मदत राजर्षींनीही केली होती.

## अनेक संस्थांच्या माध्यमातून काम

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचा हा वारसा नंतरच्या पिढ्यांनी जपला. सामाजिक न्यायाचे घटनेतील तत्त्व राबवण्यासाठी अनेक सरकारांनी कार्य केले. राज्य शासन अनुसूचित जाती व जमातींच्या आणि इतरही विविध समाजघटकांसाठी हजारो कोटी रुपयांची तरतूद करत आहे. मी मुख्यमंत्री असताना अनुसूचित जाती-जमाती, ओबीसी विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे सुरू करून त्यांच्या उच्च शिक्षणाचा मार्ग सुकर केला. केवळ याच घटकांतील नव्हे, तर सारथीसारखी संस्था सुरू करून मराठा समाजातील तरुणांसाठी बंद झालेले दरवाजे उघडण्याचे काम केले. आज सारथी संस्था नवीन आहे; पण अतिशय मोठे काम त्या माध्यमातून होते आहे. पुढच्या दहा वर्षांत ही संस्था मराठा समाजासाठी एक मोठा आधारवड ठरेल, यात शंका नाही. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून सुद्धा मोठे काम उभे राहिले, जे आजही सुरू आहे.

याशिवाय सामाजिक न्याय विभाग त्यांच्या कर्मचाऱ्यांच्या कल्याणार्थ, नागरी उन्मुख प्रशासकीय गतिमानता उपक्रम हाती घेत आहेत. प्रशासकीय सुधारणांतर्गत प्रशासकीय गतिमानता, कर्मचारी कौशल्य विकास, कर्मचारी दिन संकल्पना यांसारखे उपक्रम; तसेच विद्यार्थी व समाजहितासाठी समान संधी केंद्र, संवाद उपक्रम, समता पर्व, सामाजिक न्याय पर्व, फुले वाडा शैक्षणिक योजना, जात पडताळणीसाठी मंडणगड पॅटर्न यांसारखे उपक्रम राबवण्यात येत आहेत. सामाजिक सुधारणा करतानाच समाज एकांगी होणार नाही, त्याच्या सर्व अंगांचा विकास होईल, त्यातून कलाकार, खेळाडू, उद्योगी निर्माण होतील, यासाठी त्यांनी विशेषत्वाने प्रयत्न केले. शेतीच्या विकासासाठी पाण्याचे महत्त्व ओळखून धरणे बांधली. शाहू महाराज यांचा हाच वारसा पुढे आम्ही चालवत आहोत. आज जलयुक्त शिवार योजनेतून लाखो एकर शेतीला सिंचन उपलब्ध झाले आहे. भूगर्भातील पाणी पातळी वाढली आहे. प्रत्येक काळात कामाची पद्धत वेगळी असली तरी मूलतत्त्व तेच असते.

## आत्मनिर्भर आणि समृद्ध

कोल्हापूर हे कलानगरी आणि मल्लांसाठी प्रसिद्ध होतेच. कोल्हापूरची ही ओळख अधिक ठळक करण्यासाठी मल्लांना आणि कलाकारांना राजाश्रय दिला; परंतु कोल्हापूरची उद्योगनगरी ही नवी ओळख निर्माण केली. त्यातून कोल्हापूर आत्मनिर्भर आणि समृद्ध होत गेले. 'राज्यकर्त्याने रयतेच्या आकांक्षा पूर्ण करताना तिला प्रबोधनाच्या वाटेवर घेऊन जायला हवे,' असे कृतिशील मत राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी व्यक्त केले. समाजाला वळण लावताना कटुता येणार नाही, समाज एकसंघ राहील, याची काळजी त्यांनी सातत्याने घेतली. शिक्षणाशिवाय शोषण थांबणार नाही, हे ओळखून सर्वांसाठी शिक्षणाची दारे खुली केली.

आज समृद्धी महामार्ग, अटल सेतू, मेट्रो प्रकल्प राबवून राज्यातील पायाभूत सुविधा अधिक मजबूत करण्यात येत आहेत. आज देशात महाराष्ट्र गुंतवणुकीत प्रथम आहे; परंतु तो कायम राहावा, यासाठी सातत्याने प्रयत्न करणे गरजेचे असते. उद्योगांना पूरक वातावरण निर्माण करून त्यातून उद्योगवाढ करावी लागते. राज्य शासन तोच वारसा जपत आहे.

**शब्दांकन : प्रवीण कुलकर्णी,**
मा. उपमुख्यमंत्री महोदयांचे सहायक जनसंपर्क अधिकारी

**सामाजिक न्यायाच्या संकल्पनेचे जनक, रयतेचे राजे, लोकराजा, राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या शतकोत्तर सुवर्ण जयंतीनिमित्त त्यांच्या कार्याला, विचारांना, स्मृतींना सर्वप्रथम कृतज्ञतापूर्वक वंदन! राजर्षी शाहू महाराजांच्या प्रगत, पुरोगामी, सुधारणावादी विचारांवर देशाची दमदार वाटचाल सुरू आहे. 'शिव-शाहू-फुले-आंबेडकर' या विचारांवरच पुरोगामी महाराष्ट्र देशात आपले वेगळेपण टिकवून आहे, तोच महाराष्ट्राच्या प्रगतीचा पाया आहे.**

# लोकोत्तर राजा

**अजित पवार,** उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

छत्रपती शिवाजी महाराजांची लोककल्याणकारी राज्याची संकल्पना, त्यांच्या विचारांचा, कार्याचा कृतिशील वारसा खऱ्या अर्थाने पुढे नेण्याचे काम छत्रपती शाहू महाराजांनी सक्षमपणे केले. राजर्षी शाहू महाराजांचे कार्य प्रत्येक राज्यकर्त्यासाठी, सरकारसाठी मार्गदर्शक आहे. शाहू महाराज खऱ्या अर्थाने लोकोत्तर राजे होते. लोकांनी त्यांच्या कामासाठी सरकारच्या दारात येण्याची गरज नाही. सरकारच लोकांच्या दारात जाईल, हा विचार शाहू महाराजांनी त्यांच्या संस्थानात अमलात आणला. त्याच विचारांवर राज्य सरकार काम करत आहे. त्यामुळे 'शासन आपल्या दारी'सारख्या लोककल्याणकारी अभियानाची अंमलबजावणी राज्यात प्रभावीपणे सुरू आहे.

## जातिभेद निर्मूलनाचे कार्य

छत्रपती राजर्षी शाहू महाराज हे अवघ्या २० वर्षांचे असताना कोल्हापूर संस्थानचे राजे झाले. महात्मा जोतिराव फुले यांच्या मानवतावादी कार्याचा त्यांच्यावर फार मोठा प्रभाव होता. त्याच विचारांवर त्यांनी सामाजिक सुधारणांचे काम आपल्या संस्थानात सुरू केले. शिक्षणातील ठरावीक वर्गाची मक्तेदारी मोडित काढून वंचित, बहुजन समाजातल्या लोकांना शिक्षण देण्यासाठी महाराजांनी विशेष प्रयत्न केले. त्यासाठी करवीर संस्थानात शिक्षण संस्थांचे जाळे त्यांनी उभे केले. त्यांना सरकारी अनुदाने दिली. शिक्षणाच्या माध्यमातून त्यांनी जातिप्रथा, जातिभेद निर्मूलनाचे कार्य केले. राजर्षी शाहू महाराज यांनी आपल्या राज्यात अनेक वसतिगृहे सुरू केली. ज्या समाजात आपण वाढलो, त्या समाजाची काळजी करणे योग्यच आहे. त्या समाजाच्या पलीकडेसुद्धा मोठा समाज आहे. त्याची सेवा आपण केली पाहिजे. त्यामुळे जातीचा अभिमान मर्यादित असावा, हा विचार शाहू महाराजांनी त्या काळी अत्यंत ठामपणे मांडला. बहुजन बांधवांना शिक्षण मिळाल्याशिवाय त्यांचा विकास शक्य नाही, हे लक्षात आल्यानंतर त्यांनी शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली केली. त्याचाच एक भाग म्हणून त्यांच्या संस्थानात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले. मुलांना शाळेत न पाठवणाऱ्या पालकांना आर्थिक दंडाची तरतूद केली.



## ललित कलांना प्रोत्साहन

राजर्षी शाहू महाराजांनी संगीत, नाट्य, चित्रपट, चित्रकला अशा ललित कलांना सातत्याने प्रोत्साहन दिले. देशातील विविध संगीत घराण्यांच्या गायकांची जडण-घडण करवीरनगरीत झाली. राजर्षी शाहू महाराजांच्या प्रेरणेने, प्रोत्साहनाने, राजाश्रयाने शास्त्रीय संगीताच्या क्षेत्रात अनेक महान कलावंत करवीर संस्थानात उदयाला आले. शाहू महाराजांनी शास्त्रीय संगीताबरोबरच भजन, शाहिरी, जलसे या कलांनासुद्धा राजाश्रय दिला. त्याचबरोबर चित्रकलेच्या क्षेत्रात कोल्हापूरने जी उत्तुंग भरारी घेतली आहे, तिचा पाया शाहू महाराजांनीच घातला. त्यांच्या कारकिर्दीतच नाट्यकलेलासुद्धा वैभवाचे दिवस आले.

## कुस्तीला राजाश्रय

कोल्हापूरला मल्लविद्येची पंढरी, कुस्तीचे माहेरघर बनवण्याचे श्रेय राजर्षी शाहू महाराजांना जाते. त्यांनी तालमीच्या स्थापनेला व वाढीला प्रोत्साहन दिले. गुणवंत मल्ल हेरून त्यांच्या तालमीची व खुराकाची व्यवस्था त्यांनी केली. 'खासबाग'सारख्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या मैदानाची उभारणी करून अखिल भारतीय पातळीवर गाजलेल्या मल्लांना कोल्हापूरला आमंत्रित केले. पंजाब, दिल्ली आणि उत्तर भारतातील मल्ल कोल्हापूरकडे येऊ लागले. कोल्हापूर हे त्या काळात भारतातील मल्लविद्येचे विद्यापीठ बनले.

चार महिन्यांपूर्वी कोल्हापूर दौऱ्यावर असताना मी गंगावेस तालमीला भेट दिली होती. त्यावेळी मल्लांच्या आणि तालमींच्या समस्या जाणून घेतल्या. छत्रपती शाहू महाराजांनी कुस्तीला राजाश्रय दिला. अनेक तालमी बांधल्या. यातून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाचे मल्ल घडले आहेत. हीच परंपरा कायम राहण्यासाठी तालमींमध्ये वस्ताद व मल्लांना सर्व सुविधा असणाऱ्या तालीम बनवणे आवश्यक आहे, यासाठी देशभरातील चांगल्यातल्या चांगल्या तालमीचा अभ्यास करून त्या धर्तीवर कोल्हापुरातील तालमींचा विकास करण्यात येईल, यासाठी विविध वास्तुविशारद यांच्याकडून सर्व सोयी-सुविधांचा समावेश असणारे आराखडे मागवून घेण्यात येतील. यातील सर्वोत्कृष्ट आराखडा मंजूर करून त्यानुसार या तालमीचा विकास करण्यात येईल.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी बांधलेल्या तालमीचा वारसा कायम ठेवून गंगावेस तालीम देशातील दर्जेदार तालीम बनवणार आहे, यासाठी सर्वसमावेशक आराखडा तयार करण्याच्या सूचना दिल्या आहेत. राज्यातील तालमींना नवसंजीवनी देण्यासाठी अर्थमंत्री म्हणून मी विशेष निधी देणार आहे.

## उद्योगांचे जाळे

पहिल्या महायुद्धाच्या काळात पोलादाची टंचाई निर्माण झाल्याने शेतकऱ्यांसाठी उपयुक्त ठरणाऱ्या लोखंडी नांगरांच्या उत्पादनावर विपरीत परिणाम झाला. ही गोष्ट ओळखून लोखंडी नांगरांची निर्मिती करणाऱ्या किर्लोस्कर कंपनीला आपल्या राज्यातील विनावापर पडून असणाऱ्या लोखंडी तोफा शाहू महाराजांनी दिल्या. त्यामुळे खऱ्या अर्थाने लोखंडी नांगरांची निर्मिती पुन्हा पूर्ववत होऊ शकली. शेतकऱ्यांच्या मुलांनी शेतकरी व्हावे किंवा सैन्यात जावे, ही त्याकाळची रूढ परंपरा होती. शेतकऱ्यांच्या मुलांनीसुद्धा उद्योग, व्यापार क्षेत्रात यशस्वी व्हावे, त्यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी करवीर संस्थानात औद्योगिक प्रशिक्षण संस्था उभारल्या. शिरोळसारख्या भागात उद्योगांचे जाळे निर्माण केले. जयसिंगपूरला स्वतंत्र बाजारपेठ वसवली.

## सामाजिक क्षेत्राला दिशा

पायाभूत सुविधांची उभारणी करतानाच राजर्षी शाहू महाराजांनी समाजात प्रगत, पुरोगामी, सुधारणावादी विचारांची रूजुवात केली. त्यासाठी त्यांनी विचारांना कृतीची जोड दिली. त्यामुळे गंगाराम कांबळेसारख्या मागासवर्गीय बांधवाला नुसती चहाची टपरी काढून देऊन ते थांबले नाहीत, तर त्याच्या टपरीवर दररोज चहा प्यायला जाण्याची दूरदृष्टी त्यांनी दाखवली. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयी राजर्षी शाहू महाराजांना विशेष आस्था व प्रेम होते. आपल्या राज्यातला युवक बुद्धीच्या जोरावर परदेशात उच्च शिक्षण घेतो, याचे राजर्षी शाहू महाराजांना कौतुक होते. त्यामुळेच त्यांनी डॉ. बाबासाहेबांना शिक्षणासाठी सढळ हाताने आर्थिक मदत केली, त्यांना कायम प्रोत्साहन दिले. राजर्षी शाहू महाराजांचे व डॉ. बाबासाहेबांचे नाते व्यवहारी नव्हते, त्याला आपुलकीची आणि प्रेमाची किनार होती.

या स्नेहातून कोल्हापूर जिल्ह्यात झालेल्या बहुजनांच्या देशातल्या पहिल्या ऐतिहासिक 'माणगाव परिषदे'ला उपस्थित राहण्यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी डॉ. बाबासाहेबांना विशेष निमंत्रण दिले होते. त्यांच्या अध्यक्षतेखाली आणि महाराजांच्या प्रमुख उपस्थितीत ही ऐतिहासिक परिषद झाली होती. वंचित समाजाच्या उद्धारासाठी डॉ. बाबासाहेबांच्या रूपाने तुम्हीच तुमचा पुढारी शोधल्याचे त्या ऐतिहासिक परिषदेत जाहीर करून राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेबांच्या नेतृत्वावर सर्वप्रथम शिक्कामोर्तब केले. या ऐतिहासिक 'माणगाव परिषदे'च्या १८ वर्षे आधी १९०२ मध्येच राजर्षी शाहू महाराजांनी करवीर संस्थानात मागासवर्गीयांसाठी नोकऱ्यांमध्ये ५० टक्के आरक्षण लागू केले होते. सामाजिक न्यायाच्या या क्रांतिकारी विचारानेच पुढच्या काळात सामाजिक क्षेत्रात देशाला योग्य दिशा मिळाली.

राजर्षी शाहू महाराज हे रयतेची काळजी घेणारे, विकासाची दूरदृष्टी असलेले लोकोत्तर राजे होते. ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या लोककल्याणाच्या विचारांचे कृतिशील वारसदार आहेत. राजर्षी शाहू महाराजांचे विचारच देशाला प्रगतिपथावर घेऊन जाऊ शकतात, हा विश्वास आहे. या लोकोत्तर राजाच्या शतकोत्तर सुवर्ण जयंतीनिमित्त मानाचा मुजरा...

## शेतीसाठी मूलभूत सुधारणा

'शेतीचा उद्धार म्हणजे शेतकऱ्यांचा उद्धार आणि पर्यायाने देशाचा उद्धार' याच सूत्रावर राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या करवीर संस्थानात शेतीसाठी मूलभूत सुधारणा केल्या. त्याला जोड म्हणून उद्योगधंदे सुरू केले. या उद्योगधंद्यांना सहकाराची क्रांतिकारी जोड दिली. त्याच सहकार क्षेत्रावर आजचा प्रगत महाराष्ट्र उभा आहे. निसर्गाच्या दुष्टचक्रातून शेतकऱ्यांची सुटका व्हावी, म्हणून त्यांनी करवीर संस्थानात 'स्वतंत्र पाटबंधारे धोरण' जाहीर केले. संस्थानात स्वतंत्रपणे 'इरिगेशन ऑफिसर'ची नियुक्ती केली. यावरच न थांबता स्वयंचलित दरवाजे असणारे राधानगरीसारखे मोठे धरण त्यांनी करवीर संस्थानात बांधले. राजर्षी शाहू महाराजांच्या संकल्पनेतून विकसित झालेल्या कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांनी, नंतरच्या काळात जलसंधारणाच्या क्षेत्रात क्रांती केली.

**शब्दांकन : संग्राम इंगळे,**
मा. उपमुख्यमंत्री महोदयांचे जनसंपर्क अधिकारी.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज हे महाराष्ट्रातील करवीर तथा कोल्हापूर संस्थानचे प्रागतिक अधिपती आणि थोर समाजसुधारक. प्राथमिक शिक्षण, जातिभेद–निवारण, अस्पृश्यता–निवारण इ. सुधारणांचे पुरस्कर्ते. त्यांचा जन्म २६ जून १८७४ रोजी कागलच्या जहागीरदार घाटगे घराण्यात जयसिंगराव आणि राधाबाई या दाम्पत्याच्या पोटी झाला. त्यांचे पूर्वाश्रमीचे नाव यशवंतराव. चौथ्या शिवाजींच्या अकाली निधनानंतर ते कोल्हापूरच्या गादीवर दत्तक गेले. (१७ मार्च १८८४)

# थोर समाजसुधारक

**डॉ. जयसिंगराव पवार**

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे राजकोट व धारवाड येथे शिक्षण झाले. सर फ्रेझर व रघुनाथराव सबनीस यांसारखे गुरू त्यांना मिळाले. विद्यार्थिदशेत त्यांनी इंग्रजी, संस्कृत, इतिहास, राज्यशास्त्र इत्यादी विषयांचा अभ्यास केला. त्यांना राज्याधिकार (२ एप्रिल १८९४) प्राप्त झाला. तत्पूर्वी बडोद्याच्या गुणाजीराव खानविलकर यांच्या लक्ष्मीबाई या कन्येबरोबर त्यांचा विवाह झाला (१८९१). त्यांना राजाराम व शिवाजी हे दोन मुलगे आणि राधाबाई (आक्कासाहेब) व आऊबाई या दोन कन्या झाल्या.

## अनेक संकटांवर धैर्याने मात

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी प्रशासन-यंत्रणेची पुनर्रचना करून भास्करराव जाधव, दाजीराव विचारे, आ. ब. लठ्ठे यांसारख्या बहुजन समाजातील कर्तबगार व गुणी व्यक्तींना अधिकारावर नेमण्यास सुरुवात केली. १८९७-९८ साली प्रथम दुष्काळ व नंतर प्लेग अशी संकटे कोसळली. तरुण शाहू महाराजांनी धैर्याने त्यांवर मात केली. १९०२ साली सातव्या एडवर्डच्या राज्यारोहणानिमित्त त्यांनी युरोपचा दौरा केला. तेथील भौतिक प्रगतीचा मोठा प्रभाव त्यांच्यावर पडला; त्यामुळे त्यांचे अनुभवविश्व समृद्ध झाले.



## वेदोक्त प्रकरण

१८९९ साली कोल्हापुरात वेदोक्त प्रकरणाचा स्फोट झाला. कोल्हापुरातील ब्रह्मवर्गाने शाहू महाराजांचे क्षत्रियत्व नाकारून त्यांना शूद्र म्हटले आणि त्यांना वेदमंत्रांचा अधिकार नाकारला. यातून वेदोक्ताच्या संघर्षाचे पडसाद सर्व महाराष्ट्रभर उमटले. लोकमान्य टिळकांनी ब्रह्मवर्गाची बाजू घेतल्याने प्रकरण ईरेस पेटले. शाहू महाराजांनी वेदोक्ताचा अधिकार नाकारणाऱ्या राजोपाध्यायांची व शंकराचार्यांची वतने जप्त केली. ब्रह्मवर्गाने हे प्रकरण व्हाइसरॉयपर्यंत नेले; पण शेवटी शाहू महाराजांचीच सरशी झाली. कोल्हापुरातील ब्रह्मवर्गास त्यांच्याशी समेट करावा लागला, पण महाराष्ट्रातील ब्रह्मवर्ग शेवटपर्यंत त्यांच्या विरोधातच राहिला. कुलकर्णी-वतन बरखास्ती, सत्यशोधक जलशांना शाहू महाराजांचा पाठिंबा या बाबींमुळे तर हा विरोध वाढतच गेला.

## धार्मिक व सामाजिक क्षेत्रांत अभिनव प्रयोग

वेदोक्त प्रकरणातील अनुभवावरून, भिक्षुकशाहीच्या जाळ्यातून मुक्त झाल्याशिवाय उच्चवर्णीयांची धार्मिक व सामाजिक मक्तेदारी नष्ट होणार नाही, अशी शाहू महाराजांची धारणा झाली होती. परिणामी ते महात्मा फुले यांच्या सत्यशोधक विचारसरणीकडे आकृष्ट झाले. त्यांनी उघडपणे त्यांचे अनुयायित्व स्वीकारले नसले, तरी सत्यशोधक तत्त्वांना त्यांचा पाठिंबा होता. त्यांच्या प्रोत्साहनामुळे महाराष्ट्रात सत्यशोधक समाजाचे पुनरुज्जीवन झाले. पारंपरिक भिक्षुकशाहीच्या वर्चस्वाला शह देण्यासाठी त्यांनी कोल्हापुरात ब्राह्मणेतर पुरोहितांची निर्मिती करण्यासाठी ‘श्री शिवाजी वैदिक स्कूल’ची स्थापना केली आणि मराठ्यांसाठी स्वतंत्र ‘क्षात्रजगद्‌गुरू’ पद निर्माण करून त्यावर सदाशिवराव पाटील या उच्चविद्याविभूषित तरुणास नेमले (१९२०). धार्मिक व सामाजिक क्षेत्रांत हा एक अभिनव प्रयोग होता.

शाहू महाराजांनी आर्य समाज व थिऑसॉफिकल सोसायटी या संस्थांनाही आश्रय दिला. वेदांवरील श्रद्धा व जातिभेदाला विरोध, या आर्य समाजाच्या तत्त्वांमुळे त्यांनी स्वतःला ‘आर्य समाजी’ म्हणून घोषित केले. तथापि त्याच्या ते आहारी गेले नाहीत. आर्य समाजाच्या गुरुकुलाची स्थापना झाली. पुढे राजाराम कॉलेज आर्य समाजाकडे चालवण्यासाठी दिले गेले.

बहुजन समाज शिकून शहाणा झाल्याशिवाय त्यांचे दारिद्र्य, अज्ञान व

अंधश्रद्धा नष्ट होणार नाहीत, हे जाणून शाहू महाराजांनी शिक्षणाच्या, विशेषतः प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारावर भर दिला. त्यानुसार त्यांनी आपल्या संस्थानात सक्तीच्या मोफत प्राथमिक शिक्षणाचा कायदा केला आणि तो १९१७ ला अमलात आणला. प्रत्येक खेड्यात प्राथमिक शाळा सुरू केल्या. प्राथमिक शिक्षणावर या संस्थानात होणारा खर्च मोठा होता.

खेड्यापाड्यांतील मुलांना उच्च शिक्षणाची सुविधा मिळावी, म्हणून शाहू महाराजांनी कोल्हापुरात मराठा, जैन, लिंगायत, मुस्लीम, सुतार, नाभिक, बहुजन जातिजमातींसाठी वसतिगृहे स्थापन केली. शिवाय नाशिक, पुणे, नगर, नागपूरसह अन्य ठिकाणी त्यांच्या प्रेरणेने व साहाय्याने अनेक वसतिगृहे सुरू झाली. त्यांच्या या उपक्रमामुळे महाराष्ट्रातील अनेक पिढ्या शिकून तयार झाल्या.

## राखीव जागांचे धोरण

मागासलेल्या जातीत शिक्षणाबद्दल फारशी आस्था नसल्याने व त्याचे कारण शिक्षण घेऊनही सरकारी नोकरी लाभण्याची शक्यता नसल्याने शाहू महाराजांनी २६ जुलै १९०२ रोजी कोल्हापूर संस्थानातील ५० टक्के शासकीय नोकऱ्या मागासलेल्या वर्गासाठी राखीव ठेवल्याचा जाहीरनामा काढला. राखीव जागांचे धोरण अमलात आणणारे शाहू महाराज हे हिंदुस्थानातील पहिले राज्यकर्ते ठरले. वर्णभेदाचे उच्चाटन हे शाहू महाराजांनी आपले जीवितकर्तव्य मानले. संस्थानातील शाळा, पाणवठे, विहिरी, दवाखाने, कचेऱ्या इ. सार्वजनिक ठिकाणी वर्णवाद पाळण्यास त्यांनी कायद्याने प्रतिबंध केला. त्यासाठी १९१८-१९ या काळात अनेक वटहुकूम जारी केले. त्यांनी बहुजनांना सरकारी नोकरीत घेतले. समाजातील तलाठ्यासारख्या प्रतिष्ठेच्या जागा दिल्या. त्यांच्यापैकी अनेकांना माहूत, हूलस्वार, पोलीस, स्वत:चे मोटारचालक म्हणून नेमले. महार-वतन खालसा करून वेठबिगारीतून आणि गुन्हेगार मानल्या गेलेल्या जातींची 'हजेरी' पद्धतीतून मुक्तता केली. फासेपारधी, कोरवी, माकडवाले यांसारख्या भटक्या व विमुक्त जातींना जवळ करून त्यांचे जीवन स्थिर केले. त्यांना आपले रक्षक म्हणून नेमले. १९१८ साली खेड्यापाड्यांतील बलुतेदारांनाही त्यांच्या बलुतेपद्धतीतून मुक्त करून त्यांना समाजातील सर्व उद्योगधंदे खुले केले. १९२० साली जोगिणी व देवदासी प्रथेस प्रतिबंध करणारा कायदा जारी केला.

याच १९१९ सालाच्या सुमारास शाहू महाराजांची डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी भेट झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'मूकनायक' या वृत्तपत्रास व पुढे त्यांच्या इंग्लंडमधील उच्चशिक्षणास त्यांनी अर्थसाहाय्य केले. माणगाव व नागपूर येथील अस्पृश्यता निवारण परिषदांमध्ये बाबासाहेबांबरोबर सहभागी होऊन बहुजनांना त्यांचा 'खरा पुढारी' मिळाल्याबद्दल शाहू महाराजांनी त्यांचा गौरव केला.

अस्पृश्यतेबरोबरच जातिभेदाशी शाहू महाराजांनी अखेरपर्यंत संघर्ष केला. आंतरजातीय विवाह हा जातिभेदावर रामबाण उपाय म्हणून १९१८ साली त्यांनी आंतरजातीय विवाहास कायदेशीर मान्यता दिली. स्वतः पुढाकार घेऊन अनेक आंतरजातीय (धनगर-मराठा) विवाह घडवून आणले. तसेच बालविवाहास प्रतिबंध करून नोंदणी विवाहाचा कायदा जारी केला. घटस्फोटास व विधवा पुनर्विवाहास कायदेशीर मान्यता दिली. कुटुंबात होणाऱ्या शारीरिक व मानसिक छळांपासून स्त्रीला संरक्षण देणारा कायदाही त्यांनी मंजूर केला. मागासलेल्या वर्गांतील मुलींना व स्त्रियांना मोफत शिक्षणाची सुविधा निर्माण केली.

## कृषी आणि औद्योगिक क्षेत्रांची पायाभरणी

सामाजिक सुधारणांबरोबरच शाहू महाराजांनी शेतीस व उद्योगधंद्यांस प्रोत्साहन दिले. अनेक कृषी व औद्योगिक प्रदर्शने भरवली. पन्हाळ्यावर चहा, कॉफी, रबर यांच्या लागवडींचे प्रयोग केले. कृषी उत्पादनासाठी शाहूपुरी, जयसिंगपूर यांसारख्या बाजारपेठा वसवल्या. त्यामुळे कोल्हापूर ही गुळाची बाजारपेठ म्हणून देशात प्रसिद्ध पावली. शाहू महाराजांनी कोल्हापुरात कारखानदारीचा पाया रचला. 'शाहू मिल' ची स्थापना करून आधुनिक वस्त्रोद्योगास त्यांनी चालना दिली. त्यांनी बांधलेले राधानगरीचे धरण कृषी क्षेत्रात संस्थानचा कायापालट करणारा उपक्रम ठरला. संस्थानी मुलखातील हे सर्वांत मोठे धरण बांधून त्यांनी आपले संस्थान सुजलाम्-सुफलाम् केले. शाहू महाराजांनी १९१३ मध्ये 'सहकारी संस्थांचा कायदा' करून सहकारी चळवळीची मुहूर्तमेढ रोवली.

## कलाकार व खेळाडूंना राजाश्रय

शाहू महाराजांनी संगीत, नाट्य, चित्रकला, मल्लविद्या आदी कलांना राजाश्रय देऊन महाराष्ट्रात कलेच्या क्षेत्रात स्पृहणीय कामगिरी केली. अल्लादियाखाँ, हैदरबक्षखाँ, भूर्जीखाँ, सुरश्री केसरबाई, गानचंद्रिका अंजनीबाई मालपेकर अशा अनेक गायक-गायिकांनी शाहू महाराजांच्या आश्रयाने अखिल भारतीय कीर्ती संपादन केली. त्यांनी अनेक नाटक कंपन्यांना व गुणी कलावंतांना आश्रय दिला. बालगंधर्व व संगीतसूर्य केशवराव भोसले हे थोर कलावंत शाहू महाराजांनीच महाराष्ट्राला दिले. संगीत व नाट्यकलेच्या जोपासनेसाठी त्यांनी कोल्हापुरात भव्य पॅलेस थिएटर अर्थात केशवराव भोसले नाट्यगृह बांधले. त्याच्या शेजारीच खुल्या नाट्यगृहाचीही सोय केली. शाहू महाराजांच्या दरबारात आबालाल रेहमानसारखा महान चित्रकार कलावंत होऊन गेला. बाबूराव पेंटर, दत्तोबा दळवी प्रभृती चित्रकारांना त्यांचे प्रोत्साहन मिळाले. मल्लविद्येच्या प्रांतात शाहू महाराजांनी संस्थानासह सर्व देशातील मल्लांना उदार आश्रय दिला. रोमच्या आखाड्याच्या धर्तीवर कोल्हापुरात कुस्तीचे मैदान बांधले. त्यांच्या कारकिर्दीत कोल्हापूर ही 'मल्लविद्येची पंढरी' बनली. खुद्द शाहू महाराज हे मल्लांचे मल्ल म्हणून प्रसिद्ध होते. याशिवाय त्यांनी कोल्हापुरात साठमारी हा हत्तीचा खेळ सुरू केला. शिकार तर त्यांचा आवडीचा छंद होता. पट्टीचे शिकारी म्हणून त्यांचा लौकिक होता.

शाहू महाराजांच्या सामाजिक कार्याचा गौरव म्हणून १९१९ मध्ये कानपूर येथे कुर्मी क्षत्रिय सभेने त्यांना 'राजर्षी' पदवी बहाल केली. त्यांच्या कार्यामुळे वंचित, बहुजनांचा उद्धारक, रयतेचा राजा म्हणून त्यांची प्रतिमा जनसामान्यात निर्माण झाली. या राजाने अज्ञानी बहुजन समाजाला जागृत करण्याचे व्रत अखेरपर्यंत सांभाळले. अखेरच्या दिवसांमध्ये १९१८ साली द्वितीय चिरंजीव शिवाजी यांच्या अपघाती निधनाने ते खचून गेले, तशातच मधुमेहाने ते ग्रासले होते. अखेर ६ मे १९२२ रोजी मुंबई येथे हृदयविकाराने त्यांचे निधन झाले. त्यांच्यानंतर त्यांचे पुत्र राजाराम महाराज कोल्हापूरच्या गादीवर आले.

संदर्भ : मराठी विश्वकोश

**स्त्रियांच्या जीवनात क्रांती घडवून आणण्यासाठी सामाजिक परिवर्तनाची आवश्यकता आहे, हे राजर्षी शाहू महाराजांनी आधीच ओळखले होते. स्त्रीला माणूस म्हणून जगता यावे, यासाठी महाराजांनी स्त्री उद्धाराचे पाच कायदे केले. शाहू महाराजांनी मुलींना प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाबरोबरच उच्च शिक्षण देण्याकडेही लक्ष दिले.**

# राजर्षी शाहू महाराज आणि स्त्री शिक्षण

**डॉ. प्रमिला जरग**

शेतकरी, कामगार, व्यापारी, विद्यार्थी, कलावंत, कुस्तीपटू अशा समाजातील प्रत्येक घटकासाठी राजर्षी शाहू महाराजांनी उत्तम व्यवस्था उभारल्या आहेत. शाहू महाराजांनी समाजातील स्त्री वर्गाच्या कुप्रथा आणि वाईट चालीरितींविरुद्ध कठोर कायदे केले.

## स्त्री शिक्षणाला प्रोत्साहन

स्त्रियांच्या शिक्षणाची मुहूर्तमेढ महात्मा जोतिराव आणि सावित्रीबाई फुले यांनी रोवली होती. स्त्री शिक्षणाच्या बाबतीत शाहू महाराजांची भूमिका अत्यंत पुरोगामी स्वरूपाची होती. एका भाषणात त्यांनी असे उद्‌गार काढले की, 'स्त्री जर शिक्षित झाली, तर कुटुंबाच्या आणि मुलाबाळांच्या संगोपनामध्ये हातभार लागल्याशिवाय राहणार नाही.'

स्त्रियांच्या शिक्षणाची व्याप्ती वाढावी, यासाठी महाराजांनी ग्रामीण भागात मुलींसाठी स्वतंत्र शाळा काढल्या. त्यांचे शुल्क माफ केले. हुशार मुलींसाठी पाच शिष्यवृत्ती ठेवल्या, उच्च शिक्षणासाठी साहाय्य केले. स्त्रीचे शिक्षण तिचे समाजातील स्थान उंचावण्यासाठी आणि प्रसंगी अर्थार्जनासाठी उपयोगी पडावे, अशी राजर्षी शाहू महाराजांची धारणा होती. चूल आणि मूल हेच केवळ स्त्रीचे कार्यक्षेत्र आहे असे मानण्याचा तो काळ होता, अशा काळात त्यांनी रखमाबाई केळवकर यांना स्त्री शिक्षणाधिकारी हे उच्च पद दिले. त्यांच्या कन्या कृष्णाबाई केळवकर यांना उच्च वैद्यकीय शिक्षण देऊन सरकारी दवाखान्यात स्त्रियांसाठी वेगळा विभाग निर्माण करून त्याच्या प्रमुख पदावर नेमले, अशा रितीने केवळ गृहशास्त्र आणि बालसंगोपन ही स्त्री शिक्षणाची तत्कालीन मर्यादा ओलांडून त्यांना वैद्यकीय क्षेत्रासारखी अनेक क्षेत्रे उपलब्ध करून दिली. इतकेच नव्हे तर राष्ट्रीय महासभेच्या अधिवेशनात करवीरच्या प्रतिनिधी म्हणून कृष्णाबाई यांच्यासह अन्य दोन विद्वान महिलांना पाठवून राजकीय व सामाजिक क्षेत्रात भाग घेण्याची संधी प्राप्त करून दिली. महाराजांनी आपल्या कुटुंबापासूनच स्त्री शिक्षणाला प्रोत्साहन दिले. वयाच्या अवघ्या अकराव्या वर्षी विधवा झालेल्या आपल्या सूनबाई इंदुमतीदेवी यांना शिक्षित केले. इंदुमतीदेवी यांनीही पुढे ललिताविहार ही संस्था उभी केली. संस्थेच्या माध्यमातून गृहिणी महाविद्यालय आणि मुलींसाठी औद्योगिक कलाभवनाची कोल्हापूरमध्ये स्थापना केली.

## स्त्री उद्धाराचे पाच कायदे

स्त्रियांच्या सामाजिक समस्यांविषयी शाहू महाराजांना जाण होती, परंतु या विषयात केवळ प्रबोधन करणे पुरेसे नाही, त्यासाठी कायद्याचा धाक असण्याचीही गरज आहे, असे त्यांचे मत होते. त्यांनी अमलात आणलेल्या पाच कायद्यांमध्ये प्रामुख्याने:-

**विधवा पुनर्विवाह कायदा -** त्याकाळी बालवयात लग्न होत होते. पतीचे निधन झाल्यास बालविधवांचे जगणे अतिशय कष्टाचे आणि असुरक्षित होत असे. १९१७ साली हा कायदा करून महाराजांनी मोठे क्रांतिकारी पाऊल उचललेले होते.

**आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाह कायदा -** विवाहविषयक रूढी परंपरा टाळून आंतरधर्मीय विवाहांचा पुरस्कार करणारे बिल विठ्ठलभाई पटेल यांनी कायदेमंडळात मांडले. या बिलाला शाहू महाराजांनी पाठिंबा दिला. आपल्या संस्थानात असा आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाह कायदा केला. स्वतः धनगर मराठा विवाहाला जातीने उपस्थित राहून त्यास कृतिशील समर्थन दिले.

**जोगत्या मुरळी प्रतिबंधक कायदा -** पूर्वी देवाच्या नावाने मुलामुलींना वाहणे ही अत्यंत घृणास्पद पद्धत होती. त्यातून अनेक प्रकारे शोषण केले जात होते. ही प्रथा नष्ट करण्यासाठी केलेला हा कायदा मोडणाऱ्यांना जबर शिक्षेची तरतूद केली.

**घटस्फोट किंवा काडीमोड कायदा -** जातपंचायतमधील पंचांच्या मनमानीला आळा घालणारा, स्त्रियांची अवहेलना टाळू पाहणाऱ्यांना हा कायदा केल्याने चाप बसला. या कायद्याचे वैशिष्ट्य असे की, नवऱ्याला महारोग यासारखा काही गंभीर आजार असला किंवा तो नपुंसक असला किंवा दोन वर्षांपेक्षा अधिक काळ शरीरसंबंध करत नसेल तर पत्नीला स्वतः घटस्फोट मागण्याचा अधिकार आहे, असे कायद्यात म्हटले आहे.

**बालविवाह प्रतिबंधक कायदा -** लग्नाच्या वेळी मुलीचे वय १४ वर्षे आणि मुलाचे १८ वर्षे असणे आवश्यक आहे, असा कायदा कोल्हापूर इलाख्याच्या १९१९ सालच्या गॅझेटियरमध्ये प्रसिद्ध करण्यात आला. इतकेच नव्हे तर १८ वर्षे पूर्ण केलेल्या मुलीला स्वतःच्या इच्छेनुसार जोडीदार निवडण्याचे दिलेले स्वातंत्र्य ही या कायद्यातील महत्त्वाची तरतूद होती. शिमग्यासारख्या सणात कधी मनोरंजन म्हणून तर कधी पुरुषी अहंकारातून महिलांची अप्रतिष्ठा होईल असे वर्तन केले जात असे. स्त्रीच्या स्वाभिमानाला ठेच पोहोचणाऱ्या अशा पद्धती त्यांनी हुकूम काढून बंद केल्या. समाजात स्त्रियांची होणारी अवहेलना, त्यांचे होणारे अपमान, यामुळे होणारा त्रास याला जरब बसावी, त्यांच्या छळवणुकीला प्रतिबंध व्हावा, स्त्री पुरुष समानतेच्या विचारांना चालना मिळावी, यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी केलेले हे कायदे म्हणजे काळाच्या कितीतरी आधी स्त्रियांसाठी उचललेले क्रांतिकारी पाऊल म्हणावे लागेल.

(सामाजिक कार्यकर्त्या, कोल्हापूर)

**राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे स्त्रीविषयक कार्य सर्वश्रुत व्हावे, यासाठी राज्य शासनाने हाती घेतलेला हा उपक्रम सर्वांना नक्कीच मोलाचा ठरणारा आहे. शाहू महाराजांनी स्त्री स्वातंत्र्यासाठी केलेले कायदे, सुधारणा आणि सद्य:स्थितीबाबतची माहिती या लेखाच्या माध्यमातून देण्याचा प्रयत्न केला आहे.**

# स्त्री उद्धाराचे अनमोल कार्य

**डॉ. मंजुश्री पवार**

खरेतर आपल्या देशाला अनेक मौलिक विचारांची परंपरा लाभलेली आहे. अनेक महामानव, महापुरुषांनी आपले तत्त्वज्ञान, विचारांनी आपला समाज, देश घडवत नेलेला आहे. एका पोथीनिष्ठ समाजापासून ते एका उदात्त मानवी जीवनाकडे आपली वाटचाल सुरू झाली. आधुनिक महाराष्ट्राची ज्या काळात जडणघडण झाली तो शाहू-फुले-आंबेडकर यांचा कालखंड होता. त्यांच्या विचारांनी आणि अनुयायांनी महाराष्ट्राला पुरोगामीत्वाचा वारसा दिला आणि अनेक सुधारक निर्माण झाले. यामध्ये राजर्षी शाहू महाराज यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल.

## शाहू महाराजांचे विचार सर्वदूर पोहोचवण्याचा प्रयत्न

शाहू महाराजांचे वेगळेपण असे की, राजा असूनही समाज क्रांतिकारक बनलेला आगळावेगळा राजा आणि आपल्या राजदंडाचा वापर समाजातील प्रत्येक घटकाला उन्नत करण्यासाठी वापरणारा असा हा राजा महाराष्ट्रामध्ये होऊन गेला; परंतु शाहू महाराजांचे कार्य हे जितक्या वेगाने समाजापर्यंत पोहोचायला पाहिजे होते, ते तितके पोहोचलेले नाही.

महाराष्ट्राला लाभलेल्या पुरोगामी विचारांच्या या समाजसुधारकांमध्ये शाहू महाराजांचे वेगळेपण हे सरंजामी व्यवस्थेमध्ये एक राजा, शासक म्हणून राहून शोषित वर्गासाठी आपले आयुष्य पणाला लावणारे राजे असे होते. शोषित वर्गासाठी सर्वस्व पणाला लावणारा केवळ महाराष्ट्रातीलच नव्हे, तर भारतातील हा एकमेव राजा आहे.

## सामाजिक परिवर्तनाचा लढा

महात्मा फुलेंनी महाराष्ट्रामध्ये समतेची, ज्ञानाची बीजे पेरली. त्यांनी शूद्रांना, स्त्रियांना या गुलामी, अज्ञानाच्या अंधकारातून बाहेर काढले आणि त्यांना एक ज्ञानाचा नवा प्रकाश दाखवला. त्यांनी सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून एक आगळीवेगळी नव्या आचारविचारांची पर्यायी संस्कृती उभी केली. महात्मा फुले यांची ही परंपरा खंडित न होता राजर्षी शाहूंच्या कार्यातून प्रवाहित होत राहिली. त्यात शाहू महाराजांच्या काळामध्ये एका नवीन स्वातंत्र्य चळवळीचा प्रवाह येऊन मिसळलेला होता. त्यामुळे शाहू महाराजांच्या समोर ब्रिटिश सत्तेचे आणखीन एक दिव्य उभे राहिले होते. त्यामुळे ब्रिटिशांच्या मांडलिकत्वाची लक्ष्मणरेषा पार न करता शाहू महाराज या सामाजिक परिवर्तनाच्या लढ्यामध्ये उतरलेले होते.

## समाजोन्नतीसाठी राजदंडाचा वापर

महात्मा फुले यांच्यानंतर शाहू महाराजांपर्यंतच्या काळामध्ये अनेक सुधारक, सामाजिक कार्यकर्ते निर्माण झाले. शोषक आणि शोषित या दोन्ही वर्गातील मूल्यनिष्ठा बाळगणारे बुद्धिवादी असे अनेक सुधारक निर्माण होत गेले; परंतु त्यांचे कार्य समाजाच्या वरच्या थराला स्पर्श करणारे झाले. शाहू महाराजांच्या काळामध्ये समाजाच्या सर्व थरांना स्पर्श करणारे असे समांतर कार्य त्यांनी केले. आपले छत्रपतीपद, राजपद आणि राजदंड हा समाजाला उन्नत करण्यासाठी खर्ची घालणाऱ्या शाहू महाराजांच्या कार्याचे अनेक पैलू आहेत.



## शाहू महाराजांचा मानवमुक्तीचा ध्वज

शाहू महाराजांनी वंचित, बहुजन समाजासाठी किंवा स्त्रियांसाठी केलेले कार्य हे समाजाला उन्नत करण्यासाठीचे एक मानवमुक्तीचे कार्य होते. शाहू महाराजांच्या जीवितकार्याचे वर्णन हे म्हणजे मानवमुक्तीचे कार्य होय. ही मुक्ती वर्णवर्चस्ववाद, गुलामगिरी, अज्ञान आणि

संकुचिततेपासूनची मुक्ती होती. अशा प्रकारच्या मुक्तीचा ध्वज घेऊन समाजाच्या एकसंधतेसाठी, समाजाची एक व्यापक एकसंधता, समतेची जाणीव घेऊन शाहू महाराज उभे राहिले होते. त्यातूनच त्यांनी स्त्रीमुक्तीचा ध्वज आपल्या हातामध्ये घेतला.

## स्त्रीमुक्तीचा उदारमतवादी दृष्टिकोन

शाहू महाराजांनी स्त्रियांसाठी दोन पातळ्यांवर काम केले. त्यात पहिले स्त्रीला शिक्षित करणे आणि दुसरे स्त्रीला माणूस म्हणून जगण्यासाठी कायद्याचे दिलेले संरक्षण त्यासाठी केलेले कार्य होय. शाहू महाराजांच्या स्त्रीउद्धाराच्या कार्याकडे लक्ष वेधत असताना २०व्या शतकातील स्त्रीमुक्ती ही शाहू महाराजांच्या काळामध्ये नव्हती. स्त्रीउद्धार आणि स्त्रीमुक्ती यामध्ये फरक आहे, हे आपण जाणतोच; परंतु भारतासारख्या देशामध्ये जिथे स्त्रीदास्य सनातन आहे. तिथे धर्म, परंपरांचा पगडा प्रचंड आहे. अशा देशामध्ये जिथे राज्यकर्त्या वर्गापासून ते सर्वसामान्यांपर्यंत, इतिहास लेखकांपासून ते पुरोहित वर्गापर्यंत कोणीही लिंगभावात्मक श्रेष्ठत्वातून मुक्त नाही, अशा देशामध्ये स्त्री उद्धार ही स्त्रीमुक्तीकडे जाण्याची पहिली पायरी असते. तो एक मार्ग किंवा प्रवेशद्वार असते. त्यामुळे भारतात १९ व्या शतकामध्ये शाहू महाराजांनी जो स्त्रीउद्धार केला आहे, तो पुढच्या शतकामध्ये झालेल्या स्त्रीमुक्तीचे प्रवेशद्वार होते. शाहू महाराजांच्या या स्त्रीउद्धाराच्या कार्याकडे बघत असताना स्त्रीमुक्तीचे जागतिक पातळीवरचे चार निकष जसे उदारमतवादी स्त्रीवाद, मार्क्सवादी स्त्रीवाद, जहाल स्त्रीवाद आणि समाजवादी या चार निकषांमध्ये शाहू महाराजांचे कार्य हे उदारमतवादी दृष्टिकोनामध्ये बसते.

भारताच्या स्तरावर तीन कालखंड पडतात आणि या तीन कालखंडांमधील पहिला कालखंड हा पुरुष सुधारकांनी केलेल्या स्त्री दास्य विमोचनाचा होता. दुसरा कालखंड हा स्त्री स्वातंत्र्याचा कालखंड आणि तिसरा स्त्री जागृतीचा कालखंड होता. शाहू महाराजांचे कार्य हे पहिल्या कालखंडामध्ये पुरुष सुधारकांनी केलेल्या स्त्री दास्य विमोचनाच्या कालखंडामध्ये बसते. यातून शाहू महाराज जागतिक स्त्रीमुक्ती, स्त्रीवादाच्या चौकटीमध्येसुद्धा कुठे बसतात, हे लक्षात येते.

## स्त्री शिक्षण सुधारणावादी कारभाराचा भाग

१९व्या शतकामध्ये अनेकांनी अशाप्रकारे स्त्री उद्धाराचे कार्य करण्याचा प्रयत्न केला; पण त्यामध्येसुद्धा शाहू महाराज हे राज्यकर्त्या, शोषक वर्गातले होते; परंतु त्यांना शिवछत्रपतींच्या सिंहासनाचे अधिष्ठान लाभले होते. त्यामुळे प्रजाहितदक्षता आणि अन्यायाविरुद्धची बंडखोरी ही त्यांच्या रक्तातच होती. त्यातूनच त्यांनी सर्व समाजातल्या सर्व शोषित घटकांच्या उद्धाराचे कार्य हातामध्ये घेतले, त्यामध्ये स्त्रीवर्ग होता. शाहू महाराजांना स्त्री उद्धारक म्हणून पाहताना महाराष्ट्र आणि भारतातली एक उतरंड लक्षात घेतली, तर शाहू महाराज हे ज्या बहुजन समाजाला वर्णवर्चस्ववादापासून मुक्त करू इच्छित होते, त्या समाजाची काय अवस्था होती, याकडे लक्ष दिले पाहिजे. ही उतरंड म्हणजेच भारतातील जो उच्चवर्ग होता, तो वर्ग इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त, स्वतंत्र होऊ इच्छित होता; पण आपल्याच समाजातल्या वंचित, बहुजन समाजाला मात्र वर्णवर्चस्वाच्या शृंखलेतून मुक्त करू इच्छित नव्हता. जो बहुजन समाज हा अभिजन, उच्च वर्गाच्या वर्णवर्चस्ववादाच्या गुलामीतून स्वतःला मुक्त करून घेऊ इच्छित होता, तो आपल्या घरातल्या स्त्री वर्गाला मात्र गुलामीत, टाचेखाली ठेवत होता. अशा प्रकारची उतरंड समाजामध्ये निर्माण झालेली होती. ही उतरंड खंडित करून तिला आळा घालायचा असेल, तर स्त्रियांना शिक्षण दिले पाहिजे, हे शाहू महाराजांच्या लक्षात आले आणि स्त्री शिक्षण हा त्यांच्या सुधारणावादी कारभाराचा महत्त्वाचा भाग बनला.

## स्त्रियांच्या प्राथमिक शिक्षणावर भर

शाहू महाराजांनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे करणारा कायदा केलेला होता हे सर्वश्रुत आहे. या प्राथमिक शिक्षणावर शाहू महाराजांनी त्या काळामध्ये स्वतःच्या खजिन्यातील एक लाख रुपये खर्च केलेले होते. ज्यामध्ये स्त्री शिक्षण अंतर्भूत होते. त्या काळी ब्रिटिश सरकार हे महाराष्ट्र, कर्नाटक, सिंध आणि गुजरात या प्रदेशासाठी एक लाखसुद्धा खर्च करत नव्हते. त्या काळामध्ये शाहू महाराज कोल्हापूर संस्थानसाठी एक लाख रुपये खर्च करत होते आणि त्याच्यामध्ये स्त्री शिक्षणावर वेगळा खर्च करत होते.

शाहू महाराजांनी १९१७ ला जेव्हा प्राथमिक शिक्षण किंवा स्त्री शिक्षण याच्यावर भर द्यायला सुरुवात केली, त्या वेळी राज्यामध्ये २४ शाळा होत्या आणि विद्यार्थ्यांची संख्या ही १२९६ होती. महाराजांच्या या कार्याचा परिणाम झाला आणि १९२१ ला २४ शाळांच्या ४२० शाळा निर्माण झाल्या. त्यात २२ हजार विद्यार्थी शिकू लागले. १९१७ला जेव्हा शिक्षणावर महाराजांनी एक लाख रुपये खर्च करायला सुरुवात केली होती, ते नंतरच्या काळामध्ये तीन लाख रुपये खर्च करू लागले. या सगळ्या खर्चाचा परिणाम हा स्त्री शिक्षणावर सकारात्मक पद्धतीने झालेला दिसून येतो.

## मुलींच्या शैक्षणिक प्रगतीसाठी अभिनव उपक्रम

महाराजांनी केवळ शहरी भागामध्येच नव्हे, तर डोंगरी, मागासलेल्या आणि ग्रामीण भागामध्ये मुलींच्या शाळा काढल्या. जेव्हा त्यांच्या हे लक्षात आले की, उच्चवर्णीय, क्षत्रिय मराठा समाज आणि बाकीचा समाज हा बहुजन समाजाला जवळ बसवून घेत नाही, तेव्हा त्यांनी चांभार आणि ढोर मुलींसाठी वेगळ्या शाळा काढल्या. एवढेच नव्हे, तर मुलींच्या शिक्षणामध्ये प्रगती व्हावी म्हणून अभिनव उपक्रम त्यांनी राबवले. त्या मधला एक उपक्रम म्हणजे मुलींची संख्या वाढली आणि मुलींची प्रगती झाली, तर त्यांच्या शिक्षकाला बक्षीस देण्याची प्रथा सुरू केली. असे अभिनव उपक्रम स्त्री शिक्षणाबद्दल महाराजांनी राबवले.

## प्रौढ स्त्रियांच्या शिक्षणासाठी वटहुकूम

१९१९ साली शाहू महाराजांनी प्रौढ स्त्रियांच्या शिक्षणाकडेही लक्ष देत खास हुकूम काढून मागासवर्गातील प्रौढ स्त्रियांना शिक्षण घेण्याची इच्छा आहे, अशा स्त्रियांची राहण्या खाण्याची सगळी सोय राजवाड्यामार्फत मोफत केली होती.

## स्त्रियांचा राजकीय सहभाग

कालांतराने स्त्रियांना केवळ शिक्षणच नव्हे, तर त्यांचा राजकीय सहभाग देखील वाढला पाहिजे, हेही महाराजांच्या लक्षात आले. १८९५ ला पुण्यामध्ये राष्ट्रीय काँग्रेसचे अधिवेशन भरले होते, त्या अधिवेशनासाठी

## मुलींच्या उच्च शिक्षणासाठी धोरण

शाहू महाराजांनी त्यांच्या कन्या आक्कासाहेबांच्या विवाहाच्या निमित्ताने राज्यामध्ये आणि राज्याबाहेर हुशार मुलींसाठी अनेक शिष्यवृत्त्या सुरू केल्या. अशाप्रकारे शाहू महाराजांचे स्त्री शिक्षणासाठी प्रयत्न सुरू होते. ते सुरू असताना शाहू महाराजांनी कोल्हापूरमध्ये मुलींच्या उच्च शिक्षणासाठी प्रयत्न केले. कोल्हापूरमधील फिमेल ट्रेनिंग स्कूलच्या प्रमुख युरोपियन स्त्री मिस लिटल या होत्या. त्या सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांच्या जागी दुसरी युरोपियन स्त्री नेमणे सहज शक्य होते; पण शाहू महाराजांनी मिस लिटल यांच्या जागी रखमाबाई केळवकर या अत्यंत हुशार आणि बुद्धिमान अशा स्त्रीची नेमणूक केली. त्यानंतर अल्बर्ट मेमोरिअल हॉस्पिटल काढून त्यात स्त्रियांच्या स्वतंत्र विभागाचे प्रमुखपद त्यांना दिले. रखमाबाईंची कन्या कृष्णाबाई केळवकर यांना वैद्यकीय शिक्षणासाठी महाराजांनी मुंबईच्या ग्रँट मेडिकल कॉलेजमध्ये पाठवले. पुढे महाराजांनी कृष्णाबाईंना वैद्यकीय क्षेत्रातील उच्च शिक्षण घेण्यासाठी इंग्लंडला पाठवले. स्त्रियांनी केवळ प्राथमिक शिक्षण घेऊन थांबून चालणार नाही, तर त्यांनी उच्च शिक्षण घेतले पाहिजे हे शाहू महाराजांचे धोरण होते. त्यामध्ये स्त्रीला सर्वांगांनी समृद्ध करता येईल, हा शाहू महाराजांचा विचार होता.

अनेक सत्यशोधक कार्यकर्ते, शिकलेली लोक असताना शाहू महाराजांनी दोन स्त्रियांना प्रतिनिधी म्हणून पाठवले. त्यात कृष्णाबाई केळवकर आणि द्वारकाबाई केळवकर होत्या. या दोन स्त्रियांना शाहू महाराजांनी राजकीय सहभागासाठी पाठवले ही उल्लेखनीय गोष्ट आहे.



## योद्धा सुधारक

शाहू महाराजांच्या स्त्री उद्धाराचा परिघ हा त्यांची सून राणी इंदुमती यांच्या उल्लेखाशिवाय पूर्ण होत नाही. जेव्हा राणी इंदुमती या अकराव्या वर्षी विधवा झाल्या. वैधव्य आल्यानंतर त्यांना खूप दुषणे दिली गेली. त्यावेळी शाहू महाराजांसारखे पोलादी मनाचे सासरे आणि सुधारक हे इंदुमतींच्या पाठीशी उभे राहिले. त्यांनी राणी इंदुमतींना शिक्षण द्यायचे ठरवले आणि त्यांच्या शिक्षणाची सोय सोनतळीला केली. त्यांच्याबरोबर मराठा सरदार घराण्यातल्या मुली ठेवू शकले असते; परंतु त्या न ठेवता शाहू महाराजांनी सोनतळीला राणी इंदुमती यांच्याबरोबर चार वेगवेगळ्या जातीतील मुली ठेवल्या. जेणेकरून त्यांच्यावर समतेचा संस्कार होईल. समाजामधील सर्व थरातील मुलींबरोबर त्यांचा संपर्क येईल ही काळजी शाहू महाराजांनी घेतली. त्यामध्ये ख्रिश्चन मुलगीसुद्धा होती. राणी इंदुमतींना केवळ पुस्तकी ज्ञान नव्हे, तर जीवनामध्ये निर्माण होणाऱ्या संघर्षाला तोंड देता येईल, अशा प्रकारचे सगळे शिक्षण इंदुमतीला देण्याचा प्रयत्न शाहू महाराजांनी केला. राणी इंदुमतींना डॉक्टर करण्याचा महाराजांचा विचार होता, त्यासाठी महाराजांनी दिल्लीला जाऊन तेथील ग्रॅण्ड झनाना मेडिकल कॉलेजमध्ये इंदुमतींचा प्रवेश घेतला होता; पण महाराजांचे अकाली निधन झाल्यामुळे त्यांचे हे स्वप्न अपुरे राहिले. आपल्या छोट्याशा सुनेवर महाराज कशा प्रकारचे संस्कार करत होते, हे आपल्याला त्यांनी ११ वर्षांच्या इंदुमतीला लिहिलेल्या पत्रावरून लक्षात येते. त्या पत्रात शाहू महाराज इंदुमतींना लिहितात की, ‘घोड्यावर बसताना अगर गाडीत बसताना दंगा करून कोणाला काढू नकोस. जेवतेवेळी सर्व मुलींना बरोबर घेऊन जेवत जा, सर्व मुलींनी चहा घेतल्यावर तू चहा घेत जा, जेवतेवेळी सर्व मुलींचा समाचार घेत जा आणि सर्व मुली नोकरचाकर तुझ्यावर प्रेम करतील अशा रितीने वागत जा,’ हे महाराजांचे प्रेमळ पित्याचे उद्‌गार आहेत. पुढे ते म्हणतात, ‘शिक्षणामुळे तुझी बुद्धी जसजशी विकसित होईल, तसतसे तुझे विचार अधिक उदात्त होतील, म्हणून अभ्यासाची हेळसांड करू नको. तुला सुशिक्षित विदुषी करावे, अशी माझी फार इच्छा आहे,’ हे शाहू महाराजांचे उद्‌गार आहेत. यावरून इंदुमतींचे आयुष्य हे महाराजांच्या स्त्रीविषयक सुधारणा करण्यासाठी एक प्रयोगशाळा होती. त्यांना स्त्रियांबाबतीत ज्या सुधारणा करायच्या होत्या त्याचा प्रयोग इंदुमतीच्या रूपाने आपल्या घराण्यातूनच करण्याचा प्रयत्न केला. म्हणून शाहू महाराजांना योद्धा सुधारक असे म्हटले पाहिजे.

अशा प्रकारे शिक्षणाचे वंगण घातल्याशिवाय स्त्री जीवनाची, स्त्री परिवर्तनाची चाके फिरणार नाहीत, याची जाणीव महात्मा फुले यांच्याप्रमाणे शाहू महाराजांनाही होती. त्यानंतर त्यांनी जे पाऊल उचलले ते स्त्री स्वातंत्र्य, स्त्री मुक्तीकडे जाणारे होते; परंतु ज्या शाहू महाराजांच्या महाराष्ट्रामध्ये महाराजांनी स्त्रियांच्या शिक्षणासाठी, सर्व जाती धर्मातील मुलींसाठी प्रयत्न केले.

अशा प्रकारे शाहू महाराजांच्या स्त्रीविषयक कार्यामध्ये उत्क्रांती झालेली दिसून येते. त्यांनी आणखी एक कायदा देवदासी, जोगिणी, मुरळी, भावीण या स्त्री वर्गातील सगळ्यात उपेक्षित वर्गासाठी १९२० साली केला आणि ही प्रथा बंद केली. या कायद्याच्या माध्यमातून देवदासी, मुरळी, भावीण या समाजातील स्त्रियांमधील उपेक्षित घटकाला त्यांच्या जनक घराण्यामधील वाटा महाराजांनी मिळवून दिला. स्त्रीच्या कर्तृत्वाला, जगण्याला मर्यादा, शृंखला पडत होत्या, त्या शृंखला तोडण्याचे शाहू महाराजांचे धोरण होते. स्त्रीच्या जीवनाला उदात्त, उन्नत कसे करता येईल, याकडे शाहू महाराजांनी विशेष लक्ष दिले होते.

(लेखिका इतिहास संशोधक आहेत.)

**सर्व जाती धर्मांच्या मावळ्यांना संघटित करून न्याय, समतेचे स्वराज्य उभे करणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज यांचा उज्ज्वल वारसा, करवीर संस्थानचे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी मोठ्या नेटाने पुढे चालवला. महाराष्ट्राच्या सामाजिक परिवर्तनाच्या लढ्यात शाहू महाराज यांचे मोठे योगदान राहिले आहे.**

# समतेचे महानायक

**प्रा. संतोष देवराये**

राजर्षी शाहू महाराज यांनी आपल्या संस्थानात अनेक दूरगामी स्वरूपाचे निर्णय घेतले. २६ जुलै १९०२ ला त्यांनी मागासलेल्या जातिसमूहांना ५० टक्के आरक्षण देण्याचा क्रांतिकारी निर्णय घेतला. उपेक्षित, वंचित अशा बहुजन समाजाला, पुढारलेल्या समाजाच्या बरोबरीने आणावयाचे असेल, तर त्यासाठी त्यांना आरक्षण द्यावेच लागेल, अशी कणखर भूमिका त्यांनी घेतली. या आरक्षणात तत्कालीन मराठा जातिसमूहालाही सामावून घेतले. यावेळी वर्णवर्चस्ववाद्यांनी आरक्षणाला तीव्र विरोध केला. तत्कालीन नेते म.गो. रानडे, गो.कृ. गोखले, अभ्यंकर, प्रा.गोविंद विजापूरकर आदींनी शाहू महाराज यांच्या आरक्षणाच्या निर्णयाला कडाडून विरोध केला. काहींनी इंग्रज सरकारकडे शाहू महाराज यांची तक्रारही केली; पण शाहू महाराज यांनी त्यांचा विरोध मोडून काढून आरक्षणाचा निर्णय कायम ठेवला. म्हणूनच तर त्यांना 'आरक्षणाचे जनक' म्हटले जाते.

## कृतीतून समता प्रस्थापित

शाहू महाराज यांनी १९१९ ला एक वटहुकूम काढून अस्पृश्यता ही कायद्याने नष्ट केली. अस्पृश्य तरुणांना वकिलांच्या सनदा दिल्या. काहींना तलाठी बनवले. गणपत पवार, लक्ष्मण मिस्त्री या वंचितांना शिवणयंत्र घेऊन दिली. स्वतःचे आणि स्वतःच्या कुटुंबीयांचे कपडे त्यांच्याकडून शिवून घेतले. गंगाराम कांबळे या तत्कालीन मागास समाजातील व्यक्तीला हॉटेल टाकून दिले. शाहू महाराज आपल्या ताफ्यासह नियमित त्यांच्या हॉटेलवर चहा पिण्यासाठी जात असत. गंगाराम कांबळे हेही शाहू महाराजांचे ऋण विसरले नाही. पुढे हेच गंगारामजी कांबळे सत्यशोधक समाजाचे मोठे नेते झाले. शाहू महाराजांच्या निधनानंतर त्यांनी आपल्या बांधवांना घेऊन कोल्हापुरात शाहू महाराज यांचे पहिले स्मारक उभे केले. जेव्हा लक्ष्मण मोरे या मातंगाच्या मुलाला संस्कृत शिकण्याची तीव्र इच्छा होती; पण गुरुजींनी नकार दिला. ही गोष्ट जेव्हा शाहू महाराज यांना कळली, तेव्हा त्यांनी लक्ष्मण मोरेला स्वतःच्या गाडीतून शाळेत नेले. मास्तरला तंबी दिली. पुढे लक्ष्मण मोरे यांनी एम. ए. ही पदव्युत्तर पदवी संस्कृत विषयात संपादित केली. ते भारतीय संसदेचे दोन वेळा खासदार झाले.

## महिलांचा उद्धार

१९१८ ला त्यांनी महार वतन खालसा करून त्यांना सामाजिक व धार्मिक गुलामगिरीतून मुक्त केले. वेठबिगारी बंद केली. महिलांच्या उद्धारासाठी त्यांनी क्रांतिकारी निर्णय घेतले. जुलै १९१७ ला विधवा पुनर्विवाहाचा कायदा करून विधवांच्या जीवनात आशेचा नवा किरण दाखवला. मुलाचे विवाहाचे वय १८ आणि मुलीचे १४ वर्ष झाल्याखेरीज त्यांचा विवाह करता येणार नाही, असा धाडसी निर्णय घेऊन बालविवाहावर बंदी घातली. देवदासीसारख्या अमानुष प्रथेला प्रतिबंध केला. १२ जुलै १९१९ ला आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाहाचा कायदा केला. असे कायदे करून शाहू महाराज यांनी महिलांचा उद्धारच केला असे म्हणावे लागेल.

## शिक्षणाच्या सोयी-सुविधा

बहुजन समाजातील तरुणांच्या शिक्षणाची सोय व्हावी, यासाठी त्यांनी वसतिगृहे उभारली. १८ एप्रिल १९०१ ला व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंगची स्थापना केली. पुढे मुस्लीम, लिंगायत, शिंपी, कोळी यासह विविध जातीतील मुलांसाठी वसतिगृहे उभारली. शाहू महाराज हेच वसतिगृह चळवळीचे जनक होते. वडगावचे पांडुरंग पाटील, भास्करराव जाधव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदी अभ्यासू, विद्वान व्यक्तिमत्त्वांना उच्च शिक्षणासाठी मदत केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जेव्हा उच्च शिक्षणासाठी लंडनला गेले, तेव्हा शाहू महाराज यांनी त्यांना अर्थसाहाय्य केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'मूकनायक' या पाक्षिकालाही मोठी मदत दिली, शिवाय त्यांना सोनतळी कॅम्पवर बोलावून त्यांचा भव्य सत्कारही केला. 'सत्कारात घातलेल्या कोल्हापुरी फेट्याचा मी आजन्म मान राखीन,' अशी नम्र भावना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सत्कारप्रसंगी व्यक्त केली होती.

१९२० च्या माणगाव परिषदेत शाहू महाराज डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल म्हणतात, 'भीमराव एक दिवस साऱ्या हिंदुस्थानचे पुढारी होतील, अशी माझी मनोदेवता मला सांगते आहे.' शाहू महाराजांचे हे भाकीत पुढे खरे ठरले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरदेखील आपल्या अनुयायांना आवर्जून सांगतात की, 'शाहू महाराज यांची जयंती सणासारखी साजरी करा.' यातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे संबंध किती मैत्रीपूर्ण होते, हे आपल्या लक्षात येते. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या अनेक कार्यातून ते एक समतेचे महानायकच होते, हे आपण स्वीकारलेच पाहिजे.

**(लेखक क्रीडा व शिक्षण समिती जि. प. नांदेडचे सदस्य आहेत.)**

**थिऑसॉफीची विचारप्रणाली सर्व धर्मांबद्दल आदरभाव बाळगणारी होती व सर्व धर्मांच्या तत्त्वांचा मेळ घालणारी होती. अशा प्रकारच्या विचारप्रणालीकडे राजर्षी छत्रपती शाहू महाराज ओढले जाणे स्वाभाविक होते; पण ते थिऑसॉफिस्ट झाले नाहीत. त्यांनी थिऑसॉफिकल सोसायटीचे सदस्यत्व स्वीकारले नाही. कारण त्यांचे व्यक्तिमत्त्व आणि विचार स्वयंप्रेरित व स्वयंप्रकाशित होते. राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांवर कमी जास्त प्रमाणात सत्यशोधक समाज, आर्य समाज, ब्राह्मो समाज, प्रार्थना समाज, थिऑसॉफिकल सोसायटी व अमेरिकन ख्रिस्ती मिशनरी यांच्या तत्त्वांचा प्रभाव होता.**

# थिऑसॉफिकल सोसायटी

**प्रा. अवनीश पाटील**

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी सत्यशोधक समाज आणि आर्य समाजाला मदत केली होती, हे सर्वश्रुत आहे. शाहू महाराजांचे थिऑसॉफिकल सोसायटीच्या सदस्यांबरोबरदेखील अतिशय जिव्हाळ्याचे संबंध होते. महाराज थिऑसॉफिकल सोसायटीचे सदस्य झाले नसले, तरी त्यांना सोसायटीचे विचार आणि नेत्यांबद्दल नितांत आदर होता. १९१५ साली जागतिक थिऑसॉफिकल सोसायटीच्या अध्यक्ष डॉ. ॲनी बेझंट आणि डॉ. जी. एस. अरुंडेल यांच्याशी शाहू महाराजांचा परिचय झाला. राजर्षी शाहू महाराजांनी थिऑसॉफिकल सोसायटीला दिलेल्या प्रोत्साहनामुळे ॲनी बेझंट, श्री. जे. कृष्णमूर्ती, डॉ. अरुंडेल, सौ. रुक्मिणीदेवी, डॉ. जिनरासदास यांच्यासारख्या विख्यात थिऑसॉफिस्ट व्यक्तींचा कोल्हापूर संस्थानाशी संबंध आला.

## थिऑसॉफीच्या विचारप्रणालीची ओळख

राजर्षी शाहू महाराजांची थिऑसॉफीच्या विचारप्रणालीशी ओळख श्री. वा. द. तोफखाने यांनी करून दिली. तोफखाने यांचे वडील दत्तूअण्णा तोफखाने हे कोल्हापूर संस्थानात खासगी कारभारी म्हणून सेवेत असल्यामुळे त्यांचे शाहू महाराजांशी जवळचे संबंध होते. तोफखाने हे १९१३ सालच्या अखेरीस अभियांत्रिकीचे शिक्षण पूर्ण करून पुण्याहून कोल्हापूरला परत आले होते. त्यांचे मेहुणे शंकरराव खांडेकर हे थिऑसॉफिकल सोसायटीचे सदस्य होते. त्यांच्याकडील जे. कृष्णमूर्ती यांनी लिहिलेले 'ॲट द फिट ऑफ द मास्टर' हे इंग्रजी पुस्तक तोफखान्यांच्या वाचनात आले. पुस्तक वाचून ते भारावून गेले. थिऑसॉफीचे मुख्य केंद्र असलेल्या मद्रास प्रांतात अड्यार येथे असलेल्या थिऑसॉफिकल सोसायटीच्या मुख्यालयात गेले. त्यांनी थिऑसॉफिकल सोसायटीचे सदस्यत्व स्वीकारले. काही काळ त्यांनी ॲनी बेझंट यांचे पर्सनल सेक्रेटरी म्हणून देखील काम केले. तोफखाने हे ॲनी बेझंट आणि अरुंडेल यांना गुरू मानत असत.

## दातृत्वाची जाणीव

१९१५ साली तोफखानेंनी थिऑसॉफीच्या मराठी शाखेचा फेडरेशन (मेळावा) कोल्हापूरला आयोजित केला होता. त्याच्या अध्यक्ष म्हणून ॲनी बेझंट कोल्हापूरला आल्या होत्या. त्यांच्याबरोबर अनेक थोर आणि विद्वान मंडळी होती. या फेडरेशनसाठी जागा, इमारतीपासून सर्व प्रकारची मदत राजर्षी शाहू महाराजांनी केली. बावडा येथील महाराजांच्या बंगल्यात ॲनी बेझंट आणि त्यांच्या सहकाऱ्यांची राहण्याची सोय केली. या समारंभामुळे मुंबईच्या थिऑसॉफिस्ट लोकांना शाहू महाराजांच्या दातृत्वाची जाणीव झाली. पुढे तोफखानेंनी १९२५, १९३९ आणि १९४६ या वर्षांमध्ये थिऑसॉफिकल सोसायटीची अधिवेशने कोल्हापूरमध्ये आयोजित केली होती.



थिऑसॉफिकल फेडरेशनचे आयोजन करताना तोफखाने आणि शाहू महाराजांचा स्नेह खूप वाढला होता. १९१६ साली जेव्हा ते अड्यारवरून कोल्हापूरला आले, तेव्हा शाहू महाराजांनी त्यांना थांबवून घेतले. महाराजांनी

ॲनी बेझंट आणि तोफखाने यांना कोल्हापुरातच कार्य करण्यास विनंती केली. त्यांच्या विनंतीचा मान राखून बेझंट यांनी तोफखाने यांना महाराजांचे कार्य व थिऑसॉफीचेही कार्य कोल्हापूरलाच करावे असा आदेश दिला. १९१८ साली तोफखाने यांनी शिक्षणकार्याला हात घातला. त्यांनी कोल्हापुरात विद्यापीठ आणि तपोवन संस्था स्थापन केली. याबरोबर आपले थिऑसॉफीचे कार्यदेखील सुरू ठेवले, त्यासाठी त्यांनी श्रीकृष्ण थिऑसॉफिकल लॉजची स्थापना कोल्हापूरमध्ये केली होती. प्रार्थना, ध्यानधारणा, थिऑसॉफिकल चर्चा, थोर थिऑसॉफिस्टांच्या भेटी असे विविध कार्यक्रम तोफखाने यांनी कोल्हापुरात राबवले. या संस्थांच्या उभारणी आणि विकासासाठी तोफखानेंना राजर्षी शाहू महाराजांनी पाहिजे ती मदत केली होती.

राजर्षी शाहू महाराज आणि प्रसिद्ध थिऑसॉफिस्ट डॉ. जी. एस. अरुंडेल यांचे निकटचे संबंध होते. ३० मे १९२० रोजी नागपूर येथे दिलेल्या एका भाषणात महाराजांनी माझे मित्र मिस्टर अरुंडेल असा उल्लेख केला आहे. अरुंडेल यांनी कोल्हापूरमध्ये येऊन महालक्ष्मी मंदिरामध्ये थिऑसॉफी विषयावर तीन भाषणे दिली होती. शाहू महाराजांनी थिऑसॉफीवर दीर्घ चर्चा केली होती. त्यांची चर्चा इतकी रंगली की, अरुंडेल यांना वाटू लागले. महाराज थिऑसॉफिस्ट होण्याची शक्यता आहे. जॉर्ज अरुंडेल यांनी रुक्मिणी देवी नावाच्या एका ब्राह्मण युवतीशी विवाह केला होता. एका इंग्रजाने हिंदुस्थानी स्त्रीशी विवाह केल्यामुळे सर्वत्र खळबळ उडाली होती. अरुंडेल आणि त्यांच्या पत्नीला सनातन धर्मवादी लोकांच्या टीकेला तोंड द्यावे लागले. राजर्षी शाहू महाराजांनी मात्र या पाश्चिमात्य पुरुष आणि भारतीय स्त्रीच्या विवाहाला जाहीर पाठिंबा दिला. शाहू महाराज यांनी ४ एप्रिल १९२० रोजी पत्र लिहून अरुंडेल यांना त्यांचा पाठिंबा कळविला होता. त्यांनी लिहिले होते, 'मी कोणत्याही जातीचा माणूस नाही आणि मी अशा गोष्टींना नक्कीच पाठिंबा देईन.'

## सोसायटीला भरघोस मदत

१९२० च्या सरतेशेवटी शाहू महाराज मद्रासचे गव्हर्नर म्हणून नेमणूक झालेले लॉर्ड विलिंग्डन यांची भेट घेण्यासाठी मद्रासला गेले. या भेटीदरम्यान महाराजांनी अड्यार येथील थिऑसॉफिकल सोसायटीच्या अनेक केंद्रांना भेटी दिल्या. ॲनी बेझंट यांनी त्यांना सर्व थिऑसॉफीचे कार्यक्षेत्र दाखवले व त्याबद्दल विस्तृत माहिती सांगितली. अड्यारमधील वास्तव्याने त्यांना सर्वस्वी भारावून टाकले, असे महाराजांनी तोफखानेंना सांगितले होते. मद्रासवरून परतल्यावर महाराजांनी श्रीकृष्ण थिऑसॉफिकल लॉजला ब्रह्मेश्वर मंदिराजवळ मध्यवस्तीत आठ एकर जागा देणगी म्हणून दिली. या दरम्यान तोफखाने यांना लिहिलेल्या पत्रात शाहू महाराजांनी म्हटले होते की, 'आपण कोल्हापूरमध्ये थिऑसॉफिकल सोसायटी सुरू करायला पाहिजे. त्यासाठी मी ब्रह्मेश्वर बागेची निवड केली आहे. मला जरी थिऑसॉफीबद्दल खात्री पटली नसली, तरी परांजपे, करमरकर आणि तेलंग यांच्यासारखे कर्तृत्ववान आणि उच्चशिक्षित व्यक्ती त्यांचे सदस्य आहेत. मी जरी थिऑसॉफिस्ट नसलो तरी मला येथे थिऑसॉफिकल सोसायटी सुरू करायची आहे.' जमीन दान देताना महाराजांनी थिऑसॉफिकल सोसायटीवर काही अटी घातल्या होत्या.- १) सोसायटी कोल्हापूर दरबाराला निष्ठावंत राहील. २) जागेचा उपयोग थिऑसॉफिकल सोसायटीच्या कार्यासाठीच केला जाईल. ३) जर सोसायटीने शाळा इत्यादी सार्वजनिक कल्याणाचे कार्य हाती घेतले, तर त्याला मदत करण्यात येईल. याशिवाय २९ एप्रिल १९२१ रोजी केलेल्या ठरावानुसार शाहू महाराजांनी तोफखाने यांना थिऑसॉफिकल सोसायटीची इमारत बांधण्यासाठी ३००० रुपये मंजूर केले होते.

शाहू महाराजांनी अड्यार येथील थिऑसॉफी वसाहतीचा नकाशा टिपून आणला होता. त्यांना तेथील थिऑसॉफी वसाहतीप्रमाणेच जयसिंगपूरनजीक कृष्णाकाठी आश्रमसदृश इमारती उभारावयाच्या होत्या. ॲनी बेझंट यांच्यासाठी 'बेझंट कुटीर', अरुंडेल यांच्यासाठी 'रुक्मिणी कुटीर', महाराजांसाठी दोन बंगले व तोफखाने यांच्यासाठी देखील कुटीर बांधण्यासाठी जागा निवडण्यात आली; पण १९२२ साली महाराजांचा मृत्यू झाल्यामुळे महाराजांची ही योजना पुढे जाऊ शकली नाही.

एकंदरीतच राजर्षी शाहू महाराजांनी थिऑसॉफिकल सोसायटीच्या कार्यासाठी सर्व काही मदत केली असल्याचे दिसते. सोसायटीचे नेते ॲनी बेझंट, जी. एस. अरुंडेल आणि वा. द. तोफखाने यांच्याबद्दल महाराजांना प्रचंड आदर, प्रेम व स्नेहभाव होता. त्यांच्या संपर्कातून थिऑसॉफीच्या विचारांचा महाराजांवर प्रभाव पडला. थिऑसॉफीची विचारप्रणाली सर्व धर्मांबद्दल आदरभाव बाळगणारी होती व सर्व धर्मांच्या तत्त्वांचा मेळ घालणारी होती. अशा प्रकारच्या विचारप्रणालीकडे राजर्षी शाहू महाराज ओढले जाणे स्वाभाविक होते; पण ते थिऑसॉफिस्ट झाले नाहीत. त्यांनी थिऑसॉफिकल सोसायटीचे सदस्यत्व स्वीकारले नाही. कारण त्यांचे व्यक्तिमत्त्व, विचार स्वयंप्रेरित व स्वयंप्रकाशित होते. राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांवर कमी जास्त प्रमाणात सत्यशोधक समाज, आर्य समाज, ब्राह्मो समाज, प्रार्थना समाज, थिऑसॉफिकल सोसायटी व अमेरिकन ख्रिस्ती मिशनरी यांच्या तत्त्वांचा प्रभाव होता. प्रत्येकाकडून आपल्याला योग्य वाटेल असा आशय त्यांनी स्वीकारला; पण जिथे त्यांच्या विचारांपासून फारकत होत होती, तिथे मात्र ते दुसऱ्या विचारांकडे वळले. खरे तर राजर्षी शाहू महाराजांनी या सर्वांमधील आशय स्वीकारून त्यामध्ये समन्वय घडवून आपली सामाजिक जीवनदृष्टी विकसित केली.

**संदर्भ ग्रंथ :–**

१. भोसले, एस. एस (संपादक) , क्रांतिसूक्तेः राजर्षी छत्रपती शाहू, तृतीय आवृत्ती, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००६
२. तोफखाने सरस्वती, माझी जीवनगाथा, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, १९८४
३. तोफखाने वा. द, राजर्षी शाहू छत्रपती यांचे अंतरंग, महाराष्ट्र ग्रंथ भांडार, कोल्हापूर, १९६३
४. नाईक तु. ब. , छत्रपती राजर्षी शाहू महाराज, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९७४
५. खणे,बी. डी. राजश्री शाहू छत्रपती ऑफ कोल्हापूर (१८८४ –१९२२) (इंग्रजी), कोल्हापूर, २०२१
६. साळुंखे पी. बी, छत्रपती शाहू– द पिलर ऑफ सोशल डेमोक्रसी (इंग्रजी), गव्हर्मेंट ऑफ महाराष्ट्र, मुंबई, १९९४
७. पाटील अवनीश (अभ्यागत संपादक), समाज प्रबोधन पत्रिका (राजर्षी शाहू विशेषांक), जुलै– सप्टेंबर २०२२, वर्ष ६०, अंक २३९, २०२२

**(लेखक शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे इतिहास विभागाचे प्रमुख आहेत.)**

**राजर्षी छत्रपती शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यातील ऋणानुबंध सर्वश्रुत आहेत. भारताचे सामाजिक जीवन ढवळून काढणाऱ्या या दोन क्रांतिकारक महामानवांच्या परस्पर संबंधांवर अधिक प्रकाश टाकणारा दोघांमधील पत्रव्यवहार हा शाहू महाराजांच्या जीवनावर आधारित विशेषांकांतील या लेखातून विषद करण्याचा प्रयत्न केला आहे.**

# शाहू महाराज आणि बाबासाहेबांचे ऋणानुबंध

**इंद्रजित सावंत**

'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारखा भारतीय घटनेचा शिल्पकार छत्रपती शाहू महाराजांनी भारताला दिला.' असे उद्‌गार मुंबई हायकोर्टाचे न्यायमूर्ती जी. एन. वैद्य यांनी १९७३ साली कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठात झालेल्या शाहू व्याख्यानमालेत काढले होते. न्यायमूर्ती वैद्यांचे हे विधान खूप महत्त्वाचे आहे. कारण सन १९७३ मध्ये राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संबंधांविषयीचे बहुतेक संदर्भ, पत्रव्यवहार हा त्यानंतर उजेडात आला आणि तोपर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याचे महत्त्व लोकांना समजले होते; परंतु राजर्षी शाहू महाराजांच्या चारित्र्याविषयी विषभरल्या खोट्या कथा दंतकथाच जास्त पसरवल्या जात होत्या. अशा काळातील हे विधान ऐतिहासिक ठरले. सन १९७०-८० च्या दशकात पुन्हा एकदा राजर्षी शाहू महाराजांची इतिहास-कागदपत्रे-चरित्रग्रंथ प्रकाशित झाले. यातून त्यांचे चारित्र्यहनन करणाऱ्या दंतकथांचे सत्य आणि प्रेरणादायी शाहूचरित्र जनतेसमोर आले.

## महात्मा फुलेंच्या विचारात शाहू महाराजांची भर

राजर्षी शाहू महाराज यांच्या मृत्युनंतर ५० वर्षे शाहूचरित्र हे साहित्यातूनच लोकांसमोर आले. शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामधील पत्रव्यवहारही प्रसिद्ध झाला आणि डॉ. आंबेडकर यांच्या जडणघडणीमध्ये महाराजांनी दिलेले योगदान अधोरेखित झाले. छत्रपती शाहू महाराजांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाचा लावलेला शोध भारताच्या सामाजिक जीवनात क्रांती करणारा ठरला. महात्मा फुलेंचे विचार शाहू महाराजांनी आपल्या कृतीतून पुढे नेले, त्यात भर घातली आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वतंत्र भारताच्या घटनेत फुले-शाहूंच्या विचारांना कायद्याचे रूप देऊन चिरंतन केले.




## शाहू – आंबेडकर यांचा जिव्हाळा आणि घनिष्ठता

भारताचे सामाजिक जीवन ढवळून काढणाऱ्या दोन क्रांतिकारक महामानवांच्या परस्पर संबंधांवर प्रकाश टाकणारा दोघांमधील पत्रव्यवहार उपलब्ध आहे. 'पत्र' म्हणजे मनाचा आरसा असतो, असे म्हटले जाते आणि सत्य इतिहासाच्या मांडणीमध्ये अस्सल पत्रांना अग्रमानाचे स्थान असते. शाहू-आंबेडकर यांच्यामधील संबंध मुळात दोन अडीच वर्षांचे होते. पण इतक्या कमी वेळातही दोघांमध्ये चांगला जिव्हाळा आणि घनिष्ठता निर्माण झाली होती. याची साक्ष त्यांचा पत्रव्यवहार देतो.


## शाहू महाराजांच्या क्रांतिकारी कामाची सुरुवात

शाहू महाराज आणि डॉ. आंबेडकर यांच्या भेटीअगोदरपासूनच शाहू महाराज बहुजनांच्या उन्नतीसाठी झटत होते. शिवछत्रपतींचा वारसा लाभलेल्या आपल्या राज्यात त्यांनी अनेक कायदेही केले होते. २६ जुलै १९०२ साली सरकारी नोकरीत मागासलेल्या वर्णासाठी ५० टक्के आरक्षणाचा कायदा करून शाहू महाराजांनी आपल्या क्रांतिकारी कामाची सुरुवात केली होती. करवीर राज्यात बहुजनांसाठी सार्वजनिक ठिकाणी मुक्त प्रवेशाचा कायदा करून त्याची कृतिशील अंमलबजावणीही केली होती. गंगाराम कांबळे या वंचित समाजातील माणसाचा चहा महाराज सार्वजनिक ठिकाणी घेऊन अस्पृश्यता निवारणाचा कृतिशील धडाही घालून देत होते. मानव जातीतील अस्पृश्यता नष्ट होण्यासाठी संपूर्ण देशभर चळवळ उभी राहावी आणि त्यासाठी अस्पृश्यातीलच 'नेतृत्व' उभे राहावे, यासाठी महाराज प्रयत्नशील होते. अस्पृश्यता पाळणे हा कायद्याने गुन्हा ठरवावा यासाठीही त्यांचे प्रयत्न सुरू होते.

## 'अस्पृश्य' शब्दाला शाहू महाराजांचा विरोध

दि. ६ सप्टेंबर १९१९ रोजी महाराज हे शिवतरकर मास्तरांना

पत्रात लिहितात की, '*जो दुसऱ्यावरी विश्वासला। त्याचा कार्य भाग बुडाला।। जो आपणच कष्टत गेला तोचि जाण भला।*' अशी माझी मते आहेत. स्वतः मी अगर बडोद्याचे महाराज किंवा हैद्राबादचे निजाम अगर चंदावरकर किंवा शिंदे अशा लोकांची मते घ्यावी; परंतु त्यांना पुढारी मात्र समजू नये. पुढारी सोमवंशीय जातीतीलच असावा. अस्पृश्य हा शब्द मला अगदी आवडत नाही. तो कानात पोलादी जस्त ओतल्यासारखा भाजतो, तरी सर्वत्र सोमवंशीय असे नाव घ्यावे. अस्पृश्य हा शब्द काढून सोमवंशीय शब्द वापरावा अगर मद्रासेत ज्याप्रमाणे पंचम म्हणतात, त्याप्रमाणे इकडे म्हणावे. अस्पृश्य म्हणणाऱ्यास कोर्टात प्रॉसिक्युशन का करू नये? कोणत्याही धर्मात अस्पृश्य हा शब्दच नाही, मग मनुष्य जातीस अस्पृश्य का म्हणावे हेच मला समजत नाही. कुत्रे, मांजर, माकड मात्र अस्पृश्य नाही; मग मनुष्य प्राण्यास अस्पृश्य म्हणण्याचे धाडस कसे होते हे कळत नाही,' असे शाहू महाराज आपल्या पत्रात लिहितात.


10 King Henry's Road
Chalk Farm
London, N.W. 3
20/10/21.

My dear Maharajasaheb,

I do not know how adequately to thank you for the very great kindness you have shown me in sending the remittance of £107 which reached me last week. You have cemented our relations which have ever been of a close, cordial and sincere nature. I hope to receive an equal amount in the near future for as I wrote to your Highness my requirements needed a sum of £200 in all.

I wish your Highness to regard this as a loan for I feel that I feel that I have no right to tap in my behalf a source of benevolence which has ever been so generously running in the interest of the Depressed Classes. I regret that I should have been obliged to divert it to my benefit under the pressure of unavoidable circumstances. But I will make amends when I return if your Highness will permit me.

I hope your Highness has overcome the inevitable shock consequent upon the disclosure of State correspondence. Sir Valentine Chirol sympathizes with you.

Anxious to hear from your Highness I am your Highness's most sincerest friend

B R Ambedkar

शाहू महाराजांची बहुजनांविषयी तळमळ या पत्रातून दिसून येतेच, शिवाय बहुजन समाजाचे नेतृत्त्व करण्यासाठी एका सक्षम पुढाऱ्याची कशी गरज आहे हेही लिहिले आहे. यावरून महाराजांचा बहुजनांच्या नेत्याचा शोध त्यावेळी सुरू होता हेही समजून येते. डॉ. बाबासाहेबांची आणि शाहू महाराजांची ओळख याच साली झाली होती. बहुजन समाजातून एक तरुण उच्चविद्या संपादून डॉक्टरेट झाला याची माहिती मिळताच शाहू महाराज डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा शोध घेत स्वतः बाबासाहेब राहत असणाऱ्या परळच्या चाळीत गेले. याचवेळी महाराजांनी बाबासाहेबांना कोल्हापूर भेटीचे आमंत्रण दिले. कोल्हापूरला डॉ. बाबासाहेबांचे आगमन झाले. त्यावेळी त्यांची मिरवणूक काढली आणि त्यांना एका भव्य समारंभात 'मानाचा' जरीपटका बांधून त्यांचा सत्कारही केला. एवढे करून महाराज थांबले नाहीत, तर डॉ. आंबेडकरांची चळवळ जोमाने सुरू व्हावी, यासाठी त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'मूकनायक' या वार्तापत्रास २५०० रुपयांची भरघोस मदतही दिली.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सार्वजनिक जीवनाची सुरुवात

डॉ. बाबासाहेब आंबेडकर व राजर्षी शाहू महाराजांची भेट झाल्यानंतर लगेचच या सर्व घटना घडत होत्या. या दोन महामानवांमधील जिव्हाळा जेवढा तीव्र होता, तेवढ्याच तीव्रतेने या घटना घडत होत्या. ३१ जानेवारी १९२० रोजी 'मूकनायक' पाक्षिकाचा पहिला अंक प्रसिद्ध झाला आणि २० व २१ मार्च १९२० रोजी कोल्हापूर राज्यातील माणगाव येथे दक्षिण महाराष्ट्र दलित परिषदेचे पहिले अधिवेशन भरवण्यात आले. त्याचे अध्यक्षपद डॉ. आंबेडकरांना देण्यात आले. इतिहासात 'माणगाव परिषद' या नावाने सुप्रसिद्ध असणारी ही परिषद म्हणजे डॉ. आंबेडकरांच्या सार्वजनिक जीवनाची सुरुवात होती.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वावर शिक्कामोर्तब

'माणगाव परिषदे'ला शाहू महाराजही उपस्थित राहिले. त्यांनी केलेले भाषण आजही मार्गदर्शक ठरावे असे प्रभावी होते. या भाषणात महाराज यांनी बहुजनांना उद्देशून 'तुम्ही तुमचा पुढारी शोधून काढलात, त्याबद्दल मी तुमचे अंतःकरणपूर्वक अभिनंदन करतो. माझी खात्री आहे की, डॉ. आंबेडकर तुमचा उद्धार केल्याशिवाय राहणार नाहीत. इतकेच नव्हे तर अशी एकवेळ येईल की, ते सर्व हिंदुस्थानचे पुढारी होतील,' असे काळाच्या कसोटीवर उतरणारे उद्गार महाराज यांनी काढले. डॉ. आंबेडकर यांच्या नेतृत्वावर शाहू महाराज यांनी शिक्कामोर्तब केल्यामुळे डॉ. आंबेडकर यांचा बहुजनांचे नेतृत्व करण्याचा मार्ग सुकर झाला. तसेच त्यांच्या परस्परांमधील ऋणानुबंध घट्ट व अनौपचारिक झाले.

## अखिल भारतीय बहिष्कृत समाजाची परिषद

'अखिल भारतीय बहिष्कृत समाजा'ची परिषद ३० व ३१ मे १९२० रोजी नागपूर येथे भरली होती. या परिषदेचे अध्यक्षपद शाहू महाराजांनी स्वीकारावे, असे सर्व बहुजन पुढाऱ्यांचे म्हणणे होते. यासाठी ग. आ. गवई, केशवराव खंडारे, कालिचरण नंदा गवळी यांच्या शिष्टमंडळाने कोल्हापुरात महाराजांची भेट घेऊन आमंत्रणही दिले होते; पण महाराजांची कन्या आजारी असल्यामुळे व इतर कारणांमुळे महाराजांनी आपली असमर्थता दर्शवली, तेव्हा डॉ. बाबासाहेबांनी महाराजांना लिहिलेले एक पत्र उपलब्ध झाले आहे.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना 'लोकमान्य' उपाधी

शाहू महाराज यांची बहुजन उद्धाराची तळमळ दर्शवणारे आणखीन एक पत्र उपलब्ध आहे. हे पत्र अपूर्णच उपलब्ध आहे. या पत्रात शाहू महाराज डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना 'लोकमान्य' ही उपाधी लावतात ही गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. यात शाहू महाराज डॉ. आंबेडकर यांना लिहितात की, 'रा. लोकमान्य आंबेडकर यांसी सप्रेम लोभाची वृद्धी असावी, विशेष- आज बरेच दिवसांपासून बहुजन लोकांबद्दल आपल्यास विनंती करावी असा विचार होता; परंतु आज पत्राद्वारे लिहीत आहे. आपण पत्र वाचून मनःपूर्वक मदत कराल अशी इच्छा आहे. आजकाल सर्व अस्पृश्य लोकांचा 'स्पिरीट' नाहीसा झाला आहे व त्यातल्या त्यात विशेषतः महार लोकांचा! सेल्फ रिस्पेक्टचा त्यांना स्पर्शदेखील नाही. आपण मनुष्य आहो किंवा पशूहून नीच आहो, याची कल्पना एक फर्लांग अंतरावरून त्यांच्या भोवती फिरते; परंतु त्यांना स्पर्शदेखील हरकत नाही. मग त्यांच्या मनात कोठून येणार? याचे कारण काय? असे विचार करता मला असे वाटते की, एक तर त्यांना विद्यादान देणारा कोणीही नाही. एखादा माईचा पूत जर देण्यास तयार झाला तर ते घेण्यास कबूलही नाहीत. मी शिरोळ मुक्कामी सर्व महार माझे बंगल्यात बोलवले व मोटरीतून माझ्याबरोबर फिरण्यासी नेले; परंतु या विषयी त्यांना कसलेच प्रेम वाटले नाही. मात्र मला म्हणाले, 'नको नको, आम्हाला जवळ बोलवू नका.' जणू काय त्यांना बोलवण्यात मी मोठा अपराधच केला व याचे कारण काय?' असे विचारत महाराजांनी बहुजनांच्या हलाखीच्या जीवनाची स्थिती पत्रातून विषद केली. यातून डॉ. बाबासाहेबांनाही महाराजांच्या कार्याचे महत्त्व पुरेपूर समजले होते.

या पत्रातील डॉ. बाबासाहेबांची शाहू महाराजांविषयी असणारी आत्मीयता दिसून येते. तसेच या पत्रातील अनौपचारिक भाषेमुळे दोघांमध्ये परस्पर अल्पावधीत निर्माण झालेला अनौपचारिकपणा व अधिकाराचा भावही दर्शवते. या ऐतिहासिक पत्रात डॉ. बाबासाहेब म्हणतात, 'आक्कासाहेबांची तब्येत नादुरुस्त आहे, याबद्दल मला अतिशय वाईट वाटत आहे. त्यांना लवकरच आरोग्य प्राप्त होवो अशी सत्ताधीश परमेश्वराशी प्रार्थना आहे. याप्रसंगी त्यांची प्रकृती नादुरुस्त व्हावी म्हणजे आमचे कमनशिबच, घरी अपत्य आजारी असता आपल्यावर सभेस येण्यास गळ घालणे हे कठोरपणाचे लक्षण आहे, असे मला वाटते. पण काय करावे? आक्कासाहेबांप्रमाणे आम्ही आपली लेकरे नव्हेत काय? आपल्याशिवाय आमचा कोणी वाली आहे काय? आणि आम्ही आज किती कालपर्यंत आजारी आहोत हे आपल्याला सांगायला नको. नागपूरच्या परिषदेस हुजूरचे येणे झाले नाही, तर आमचा सर्वनाश होणार यात तीळमात्र शंका नाही. आमचा ह्यू ढासळणार. ही आणीबाणीची वेळ आहे. याप्रसंगी जर आपला आधार व टेकू मिळाला नाही तर काय उपयोग. मला वाटते आमचा परामर्ष यावेळी आपण घेतलाच पाहिजे, नाहीतर आपल्यावर बोल नाही रुसवा राहील. म्हणून माझी सविनय प्रार्थना आहे की, अन्य सर्व गोष्टींकडे कानाडोळा करून सभेचे अध्यक्षस्थान आपण मंडित करून या आपल्या लडिवाळ अस्पृश्य लेकास वर येण्यास हात द्यावा. यावेळी जर आपण त्यांची उपेक्षा केली तर ते कायमचे खाली जातील. मग त्यांना वर काढणे अशक्य होईल.' नागपूरची मंडळी रा. नंदा गवळी, केशवराव गवई वगैरे पुढारी आपल्याला सभेचे अध्यक्षस्थान स्वीकारण्याबद्दल विनंती करण्यास करवीरी आलीच होती व त्यांना आपण होकारांती उत्तर दिल्यामुळे त्यांनी वृत्तपत्रात त्याप्रमाणे प्रसिद्ध केले आहे. आपल्याला आमंत्रण आले नसल्यास हे आमंत्रणच समजून तयार असावे, ही सप्रेम विनंती,' असे डॉ. आंबेडकरांनी महाराजांना लिहिलेल्या पत्रात म्हटले होते.

## नागपूरच्या परिषदेला उपस्थिती

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पत्र मिळताच शाहू महाराज यांनी इंग्रज सरकारची खास परवानगी काढली व ते नागपूरच्या परिषदेत उपस्थित राहिले. या परिषदेला त्यांनी ५,००० रुपयांची देणगीही दिली. शाहू महाराज यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याला मदत तर दिलीच, शिवाय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या 'डिप्रेस्ड क्लास इन्स्टिट्युट' या संस्थेसाठी देणगी गोळा करण्यासाठी देशभर जाणाऱ्या शिष्टमंडळात सामील होण्यासाठी मान्यताही दिली. याविषयी शाहू महाराज यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे, 'आपण जे डेप्युटेशन फंड गोळा करण्याकरिता पाठवणार आहे. त्यात माझे नाव घालण्यास मी आपणास मोठ्या संतोषाने परवानगी देतो. आपण जी काही संस्था सदरहू कामाकरिता स्थापन कराल तिचा व्हाईस प्रेसिडेंट असिस्टंट सेक्रेटरीदेखील होण्यास मी तयार आहे. मला वाटते आपण एक 'ऑल इंडिया डिप्रेस्ड क्लासेस एज्यु. फंड' संस्था स्थापन करून तिच्याकरिता चांगली वजनदार व काम करणारी माणसे कामगार म्हणून निवडावीत आणि या संस्थेच्यावतीने ठिकठिकाणी डेप्युटेशने पाठवत जावी; म्हणजे फंड गोळा करण्यास सोयीचे होईल. मला स्वतःला असिस्टंट सेक्रेटरी होण्याची फार इच्छा आहे व मी हे काम मोठ्या आनंदाने करीन.' डिप्रेस्ड क्लाससाठी आपली पद प्रतिष्ठा सोडून कार्य करण्यासाठी शाहू महाराज यांची तयारी या पत्रातून दिसून येते. भारतातील शेकडो संस्थानिक आपल्या सत्ता संपत्तीचा उपभोग घेत असताना हा रयतेचा राजा मानवतेच्या संस्थापनेसाठी कसा तळमळत होता, हेच या पत्रातून दिसून येते.

## 'मूकनायक'चा विशेषांक

शाहू महाराज यांचे कार्य व त्यांचे जीवनचरित्र शब्दबद्ध करावे, यासाठी 'मूकनायक'चा विशेषांक काढण्याची डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची योजना होती. यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शाहू महाराज यांना एक पत्र लिहिले त्यात ते लिहितात की, 'माणगावच्या व नागपूरच्या सभेत पास झालेल्या ठरावास अनुसरून २६ जूनचा दिवस आपला वाढदिवस म्हणून सर्वत्र साजरा करण्यात येणार आहे. त्याच दिवशी आपल्या आश्रयाखाली निघत असलेल्या

'मूकनायक'चा विशेषांक काढण्याचे नियोजित झाले आहे. त्यात हुजुरांचा फोटो, तसेच आपल्या कारकिर्दीतील उज्ज्वल साग्र रूपरेखा देण्यात येणार आहे. तेव्हा मी स्वतः येऊन अवश्य असलेली माहिती गोळा करण्याचे ठरवले आहे. या उद्देशास्तव मी आज संध्याकाळी कोल्हापूरला येण्याकरिता निघत आहे. मंगळवारी संध्याकाळी पोहोचेन,' असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी पत्रात म्हटले होते. हा 'मूकनायक'चा अंक दुर्दैवाने अजूनपर्यंत उपलब्ध झालेला नाही; पण बाबासाहेबांनी काढलेला हा 'शाहू विशेषांक' त्यांची शाहू महाराज यांच्याप्रति असणारी आत्मीयता स्पष्ट करणारा आहे. हा अंक जरी उपलब्ध नसला, तरी डॉ. बाबासाहेबांनी 'मूकनायक'मध्ये महाराजांच्या टीकाकारांना चांगलेच सडेतोड उत्तरही दिले.

## बहुजन चळवळीसाठी इंग्लंडमधील प्रयत्न

५ जुलै १९२० रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर लंडनला उच्च शिक्षणासाठी रवाना झाले. बाबासाहेबांच्या या परदेश दौऱ्यासाठी शाहू महाराजांनी भरघोस मदत केल्याचे पुरावेही उपलब्ध आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर लंडनमध्ये असताना भारतात शाहू महाराजांचे अस्पृश्योद्धाराचे कार्य जोमाने सुरूच होते. शिवाय शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामधील पत्रव्यवहारही सुरूच होता.

इंग्लंडमधील ब्युरोक्रसींना 'बहुजन चळवळ' समजावून द्यावी, यासाठी डॉ. आंबेडकर यांनी प्रयत्न करावेत, असे शाहू महाराज यांना वाटत होते. त्यासाठी डॉ. आंबेडकर यांनी बहुजन चळवळीची माहिती देणारी एक पुस्तिका लिहावी असे महाराजांचे म्हणणे होते; पण अशी पुस्तिका लिहिली गेल्याची माहिती आजपर्यंत तरी उपलब्ध नाही; पण डॉ. आंबेडकर यांनी शाहू महाराज यांना इंग्लंडहून ३ फेब्रुवारी १९२१ रोजी लिहिलेल्या पत्रातून 'बहुजन चळवळीची बाजू इंग्लिश जनतेसमोर मांडणारा तिचा कुणी खंदा समर्थक नसल्यामुळे या चळवळीविषयी गैरसमज पसरवण्यात त्यांना फावत आहे. मला भेटणाऱ्या प्रत्येक महत्त्वाच्या इंग्लिश व्यक्तीसमोर हिंदुस्थानातील सामाजिक, राजकीय प्रश्नाचे वास्तव मी मांडत आहे.' अशा आशयाचे पत्र डॉ. आंबेडकर यांनी लिहिले. डॉ. आंबेडकर हे एकीकडे इंग्लंडमध्ये 'बहुजन' चळवळीची माहिती तेथील इंग्रज मुत्सद्यांना करून देत होते.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर बहुजनांचा नेता


भारतातील बहुजनांमध्ये डॉ. आंबेडकरांची ओळख त्यांचा नेता म्हणून दृढ व्हावी, यासाठी शाहू महाराज सातत्याने प्रयत्न करत होते. १६ फेब्रुवारी १९२२ रोजी 'अखिल भारतीय अस्पृश्य परिषदेचे तिसरे अधिवेशन' भरले होते. त्याच्या अध्यक्षपदावरून बोलतानाही शाहू महाराजांनी 'तुमचे अध्यक्षपद स्वीकारणे आणि तुमच्यापुढे भाषण करणे हा मान खरोखरीच आंबेडकरांचा आहे. आंबेडकर यांना तुमच्यापैकी आपण एक आहोत असे सांगण्यात अभिमान वाटतो. ते माझ्यापेक्षा जास्त शिकलेले आहेत. यावेळी लंडनमध्ये असल्यामुळे दुर्दैवाने परिषदेस ते उपस्थित राहू शकत नाहीत; पण ते कोठेही असोत, बहुजन वर्गाला जे दुःख होत आहे, त्याची जाणीव त्यांच्या हृदयात सतत टोचत असते, याची मला खात्री आहे,' असा उल्लेख करून आंबेडकरांच्या नेतृत्वावर महाराजांनी शिक्कामोर्तब केला होता.

## 'पिलर ऑफ सोशल डेमोक्रसी'

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना इंग्लंडमधील वास्तव्यात काटकसरीने राहूनही पैसे कमी पडू लागले. तेव्हा शाहू महाराज यांना ४ सप्टेंबर १९२१ ला पत्र लिहून आपली आर्थिक अडचण दूर करावी, म्हणून हक्काने पत्र लिहिले होते. याच पत्रात डॉ. आंबेडकर यांनी शाहू महाराज यांचा 'पिलर ऑफ सोशल डेमोक्रसी' असा उल्लेख केला आहे.

## शाहूपुत्र छत्रपती राजाराम महाराज यांचे ऋणानुबंध

छत्रपती शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामधील असा जिव्हाळ्याचा ऋणानुबंध व भारतातील सामाजिक चळवळ जोमदारपणे चालवण्याचा प्रयत्न सुरू असतानाच ६ मे १९२२ रोजी शाहू महाराजांचे निधन झाले आणि दोघांमधला पत्र व्यवहार थांबला; पण शाहूपुत्र छत्रपती राजाराम महाराजांनी डॉ. आंबेडकर यांच्याशी असलेला ऋणानुबंध जपला. डॉ. आंबेडकर यांना छत्रपतींचे प्रजाजन व्हावे, असे वाटल्यानंतर त्यांनी पन्हाळगडावर जागा मागितली. राजाराम महाराज यांनी डॉ. आंबेडकर यांना पन्हाळगडावर दीड एकर जागा मोफत दिली. कोल्हापुरातून लोकसभेची निवडणूक लढवण्याचा विचार डॉ. आंबेडकर करत होते. डॉ. आंबेडकर यांच्या हयातीतच त्यांचा पहिला पुतळा कोल्हापुरात बसवला गेला. इतके प्रेम शाहूभूमीने डॉ. आंबेडकर यांना दिले आणि छत्रपती शाहू महाराज यांच्या विचारांचा वारसा जागृत ठेवला.


10 King Henry's Rd
Chalk Farm
London N.W.3
6/10/21.

श्री. शाहू छत्रपती करवीर सरकार यांस स.न.
वि. वि.

[illegible]

आपला हितचिंतक
भीमराव आंबेडकर

(लेखक इतिहास संशोधक आहेत.)

**कला, कुस्ती, मल्लविद्या आणि मार्शल आर्ट्स म्हणजेच कोल्हापूर ही राजर्षी शाहू महाराजांची प्रतिमा बनली आहे. अर्थात निजामशाहीतील मालोजी, विठोजी, पुढच्या पिढीतील शहाजी यांनी गावोगाव तालमी बांधायला उत्तेजन दिल्याचे पुरावे आहेत. इराणी मल्लच भारतात सुलतान पदाला पोहोचल्याचे उदाहरण फार्शी बखरीत आहे; परंतु गावची तालीम व यात्रेच्या मैदानातील कुस्ती आंतरराष्ट्रीय बनवण्याचे अपूर्व कार्य भारतात राजर्षी शाहू महाराजांनी केले.**

# कला-क्रीडांचे युगकर्ते



**प्रा. डॉ. आनंद पाटील**

राजर्षी शाहू महाराजांनी मराठ्यांचा इतिहास विश्वसंलग्न केला. याचा उलगडा संजय सुब्रमण्यम या युरोप, अमेरिका व दिल्लीत इतिहास शिकवलेल्या विद्वानाचे विश्वसंलग्न इतिहासावरील तीन इंग्रजी ग्रंथ वाचल्यास लक्षात येते. राजर्षी शाहू महाराजांचे आयरिश शिक्षक फ्रेझर यांचाही सिंहाचा वाटा या कला-क्रीडा विकासाच्या क्रांतिकारी धोरणात आहे. विशेष म्हणजे ब्रिटिशांच्या गुलामगिरीतील हे सुवर्ण युग आहे. त्याचे प्रतिबिंब माडगूळकर बंधूंचे 'मंतरलेले दिवस', 'मल्हारी मार्तंडवाले', दिनकर द. पाटील यांचे 'पाटलाचं पोर', संगीतसूर्य केशव भोसले यांचे गायन, आबालाल रेहमान यांची चित्रकला, माधवराव बागल व प्रबोधनकारांचे लेखन वगैरे संहितांत बघायला मिळते. या युगचैतन्याच्या उत्तराधुनिक काळात पुनर्लेखनासाठीचा अर्थ नव्याने समजून घेतला पाहिजे.


३५ वर्षांपूर्वी खासबाग मैदानात पाहिलेली युवराज पाटील-सादिक अली यांची निकाली कुस्ती मला इटलीतील ब्रिंदीसी बंदरातील एक छोटे मैदान बघताना आठवली. खासबाग मैदान हे त्याची तंतोतंत प्रतिकृती आहे. ग्रीसमध्ये अशाच ऑलिंपिक मैदानात नाट्योत्सव भरत असे. राजर्षी शाहू महाराजांचा युरोपातील प्रवास आणि 'ट्रॅव्हल मेक्स मॅन वाईज' या म्हणीचा उलगडा माझ्या पाटलाची लंडनवारीमध्ये केला आहे. फ्रेंच रोला बार्थचा कुस्ती आणि नाटक हा संरचनावादी निबंध मराठीत आल्यास राजर्षी शाहू महाराजांच्या या क्षेत्रातील युगप्रवर्तक कार्याचे महत्त्व अधोरेखित होईल.

पिराजीराव सरनाईकांचा राजर्षी शाहू महाराजांचा पोवाडा हा महात्मा जोतिराव फुले यांच्या कुळवाडी भूषण या 'शिवाजीचा पवाडा' परंपरेतील मानला जाईल; पण दाजीपूरच्या जंगलातील शिकारीचे तळ्याकाठचे किंवा अरण्यानंद प्रतिष्ठानच्या तरुण कार्यकर्त्यांनी अलीकडे शोधलेली ८० किलोमीटर लांबीची हत्ती अडवायची चर व वळताईच्या डोंगरातील शिकारीची मचाणे आज कालबाह्य ठरतील. पर्यावरण व प्राणी रक्षक या मर्दानी खेळाला विरोध करतील. हा बदललेल्या युगचैतन्याचा महिमा आहे; पण रेस्लड मॉरिसने १९९० मध्ये 'द ॲनिमल कॉन्ट्रॅक्ट'मध्ये लिहिले होते की, खेळातील प्रत्येक बाब शिकारीमधून घेतली आहे. असा एकही खेळ अस्तित्वात नाही की, जो एकतर पाठलाग किंवा लक्षवेध

घेण्यावर आधारित नाही. आदिम शिकार करण्याचे हे दोन मुख्य घटक आहेत.

## पांडुरंग पाटील यांची मिरवणूक

राजर्षी शाहू महाराजांनी कुस्ती, साठमारी, बैलांच्या झुंजी यासारखे खेळ व शिकारीला उत्तेजन दिले. ते जसे कालबाह्य झाले, तसे मॅट्रिकमध्ये मुंबई इलाख्यात पहिला आलेला शाहूवाडी तालुक्यातील वडगावच्या पांडुरंग चिमणाजी पाटील या पोराची कोल्हापुरात हत्तीवरून मिरवणूक काढणारे राजेही स्वातंत्र्यानंतर नाहीत. मात्र, पी. सी. पाटील नावाचा हाच मुलगा भारतातील कृषी महाविद्यालयाचा पहिला प्राचार्य झाला. त्यांचे लंडनमधील इंडिया ऑफिस ग्रंथालयातील इंग्रजी पुस्तक आजही बघायला मिळते.



## कलांचे संवर्धन

कला व क्रीडा क्षेत्राप्रमाणे शिक्षणात कर्मवीर भाऊराव पाटील, सामाजिक चळवळीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशी अनेक नावे राजर्षींच्या प्रेरणेने महापुरुषांच्या यादीत दाखल झाली. संगीत व नाट्यकलेला राजर्षी शाहू महाराजांनी दिलेला राजाश्रय सर्वश्रुत आहे. कोल्हापूरचे राजाराम कॉलेज हे पुणे-मुंबईनंतरचे उच्च शिक्षणाचे दक्षिण महाराष्ट्रातील एकमेव केंद्र होते. त्यासाठी राजर्षींनी दूरदर्शीपणे जमवलेले डॉ. बाळकृष्ण, कवी माधव ज्युलियनसारखे नामवंत लेखक, विद्वान आणि घडवलेले बुद्धिमंत यांनी कोल्हापूरचे सांस्कृतिक जीवन समृद्ध केले. १८व्या शतकात सरफोजी राजे दुसरे यांच्या तंजावरमधील काळातील संगीत व नाट्यकलेचा अतुलनीय बहर आठवतो. सहा मराठी नाटके लिहिणारे सरफोजी राजे हे मराठी नाटकाचे जनक असल्याचे नव्या संशोधनाने सिद्ध झाले आहे. हीच परंपरा बडोदा नरेश सयाजीराव गायकवाड यांनी समृद्ध केली. बडोदा व कोल्हापूर दरबारचा समन्वय या कलांच्या संवर्धनाला वरदान ठरला. संजय सुब्रमण्यम अशा संहिता जगातील साम्राज्यांच्या रचनांशी जोडतो. अनिवासी चिनी तुलनाकार शी मेई-शी त्यांना जग जोडणाऱ्या कमानी म्हणते. एवढ्या विशाल परिप्रेक्ष्यातून या कला व क्रीडा प्रकारांकडे पाहिले पाहिजे.

## नामवंतांची थोर परंपरा

अल्लादिया खाँ साहेब बडोद्याहून केसरबाईंना शिकवायला मुंबईला आले. बॅरिस्टर जयकरांनी त्यांना संगीत गायनातील 'माउंट एव्हरेस्ट'ची उपमा दिली. हैदरबाँनी चंद्रिका लक्ष्मीबाई जाधव यांना गायन संगीताचे धडे दिले. अझमबाई, वामनराव सडोलीकर, गजाननराव जोशी अशी ही जातधर्मनिरपेक्ष यादी मोठी आहे. बालगंधर्वांनी आपल्या नाटक कंपनीला राजर्षी शाहू महाराजांचे नाव दिले होते. गोविंदराव टेंबे यांची शिवराज नाटक मंडळी होती. गानकोकीळ शंकरराव सरनाईक, देवल, गोविंदराव परीट, दिनकरराव ढेरे (कामण्णा), बळवंतराव गोखले अशा अनेक नामवंतांची ही थोर परंपरा होती.

## लोकराजाच्या प्रेरणांचा झरा

राजर्षी शाहू महाराजांच्या ३८ वर्षांच्या काळातील गाजलेले चित्रकार आबालाल रेहमान, दत्तोजी दळवी, माधवराव बागल, बाबुराव पेंटर वगैरे यांनी कोल्हापूरला 'कलापूर' बनवले. चित्रपटसृष्टीचे आद्य माहेरघर हेच होते. बाबुराव पेंढारकर, दीनानाथ मंगेशकर, व्ही शांताराम अशा नामवंत घराण्यांचा उदय इथेच झाला. पहिल्या पिढीतील चित्रपट कलावंत येथेच घडले. गायक, नट, संगीतसूर्य केशवराव भोसले नाट्यगृह ही त्या सुवर्ण युगाची ठेव आहे. जोपर्यंत कोल्हापूर व म्हैसूरचा दसरा साजरा होत राहील तोवर कला व क्रीडांचा हा लोकराजाच्या प्रेरणांचा झरा जिवंत राहील, यात शंका नाही.

(माजी विभागप्रमुख (इंग्रजी) गोवा विद्यापीठ)

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी उद्योग व व्यापार विकासासाठी विशेष प्रयत्न केले आहेत. शाहू महाराजांनी सार्वजनिक, सहकार व संयुक्त अशा चारही क्षेत्रांत उद्योगांची उभारणी करून मिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार करून व्यापाऱ्यांच्या विकासासाठी रस्ते व रेल्वे विकास यासारख्या वाहतूक सुविधा निर्माण केल्या आहेत. तसेच अनेक ठिकाणी बाजारपेठांची निर्मिती केली आहे.

# सुराज्याचे औद्योगिक मॉडेल 'उद्यमनगरी'

**उमेश सूर्यवंशी**

व्यापार संदर्भात शाहू महाराजांनी डिसेंबर १९१७ रोजी खामगाव येथे भरलेल्या अखिल भारतीय शिक्षण परिषदेच्या अध्यक्षपदावरून बोलताना जे विचार व्यक्त केले ते व्यापारवादी विचारवंतांच्या विचारसरणीशी सुसंगत असल्याचे दिसून येतात. 'आम्ही शेतकरी किंवा सैनिकच होऊन राहावे ही स्थिती आम्हाला समाधानकारक नाही. व्यापार धंदे व इतर उच्च प्रतीचे व्यवसाय यात शिरण्याची आम्हास जरुरी आहे. हल्ली आम्ही व्यापार व उदीम यात पडतच नाही. २०व्या शतकाच्या राष्ट्राची उन्नती व्यापार व तत्संबंधीची चळवळ यावर अवलंबून आहे. खरोखर व्यापार हा पाश्चिमात्य राष्ट्रांचा धर्मच बनलेला आहे. येथे धर्म म्हणजे बुद्धियुक्त स्वहित साधणे असे मी समजतो. व्यापार करण्याचे साहस आम्ही केले नाही, तर आमच्या सर्व चळवळी निस्तेज व निरर्थक होतील. व्यापारासंबंधीच्या चळवळीवर माझा पूर्ण विश्वास असल्यामुळे मी माझ्या दोघा मुलांना व आप्तांना व्यापारात घातले आहे. मला सांगण्यास समाधान वाटते की, त्यांनी तो धंदा मोठ्या आनंदाने स्वीकारलेला आहे. एवढेच नाही तर त्यात ते चांगल्या रितीने पुढे येत आहेत.'

लोकराजा शाहू महाराज यांनी साधारणपणे १०७ वर्षांपूर्वी तमाम बहुजनांना व्यापाराचे महत्त्व आणि आगामी युगातील प्रगतीचे रहस्यच व्यापाराच्या निमित्ताने सांगून ठेवले आहे. हे रहस्य सांगताना त्यांनी स्वतःच्या मुलांना अर्थात युवराजांना या व्यापार उदिमात पाठवल्याची नोंद केली आहे.

युवराज राजाराम आणि प्रिन्स शिवाजी यांना त्यांनी शाहूपुरी येथील एका अडत्याच्या दुकानात व्यापार समजून घेण्यासाठी प्रशिक्षण घेण्यासाठी बसवल्याची गोष्ट इथे डोळ्यासमोर येते. एका समृद्ध संस्थानाच्या राजकुमारांनी व्यापार समजून घेण्यासाठी एका अडत्याच्या दुकानावर बसण्याची आजवरच्या भारताच्या इतिहासातील ही बहुधा पहिली आणि शेवटची घटना असावी. कोल्हापूरसारख्या सामान्य संस्थानाला उद्यमनगरी बनवण्याची किमया अथवा चमत्कार शाहू महाराज यांनी करून दाखवला, तो याच दूरदृष्टीपणामुळे आणि निग्रही बाण्यामुळे.



## विविध उद्योगांची पायाभरणी

व्यापार वाढवायचा असेल तर लागते ती बाजारपेठ. शाहू महाराज यांनी आपल्या वडिलांच्या नावे जयसिंगपूर ही व्यापारी पेठ वसवली. आपल्या मुलीच्या नावे वसवलेल्या राधानगरी वसाहतीलाच बाजारपेठेचे स्वरूप आणले. रायबाग या सीमावर्ती भागातील लिंगायत आणि मुस्लीम विणकर यांना सोयीसवलती देऊन आणि उदारहस्ते आर्थिक मदत करून कापड विणण्याचा व्यवसाय नव्या जोमाने सुरू केला. शाहूपुरी नावाची व्यापारपेठ सुरू करून कोल्हापुरी गुळाचा ब्रँड बनवून कोल्हापूरला देशाच्या नकाशावर ठळकपणे आणले. कोणत्याही व्यापारात नवनवीन प्रयोग करत व्यापाराची केंद्रे वाढवत नेली तर भरभराट होत असते हे ठाऊक असणाऱ्या शाहू महाराज यांनी आपल्या संस्थानाला कल्पक उद्योगांची प्रयोगशाळाच बनवले. कोल्हापुरात सुगंधित औषधी तेल उद्योग सुरू झाले, सुती कापड उद्योग सुरू झाले, काष्ठार्कचे उद्योग सुरू झाले, मधुमक्षिका पालनाची सुरुवात भारतात पहिल्यांदा कोल्हापुरात झाली. विशेष म्हणजे हे कल्पक प्रयोग चांगले यशस्वी झाले. मुंबईत भरलेल्या औद्योगिक प्रदर्शनात कोल्हापुरी तेलांना पारितोषिक म्हणून चांदीचे पदक देण्यात आले. काष्ठार्क उद्योगातील

प्रयोगशीलतेला प्रोत्साहन म्हणून म्हैसूरच्या औद्योगिक प्रदर्शनात चांदीचे मेडल बहाल करण्यात आले. मधुमक्षिका पालनातील उद्योग व्यापारी तत्त्वावर सुरू करण्याची प्रयोगशीलता संपूर्ण भारतात पहिल्यांदा दाखवली ती शाहू महाराज यांनीच. कोल्हापूरच्या उद्यमनगरीचा पाया घालताना शाहू महाराज यांनी कोल्हापुरात पहिली ऑईल मिल, पहिली सॉ मिल, पहिली फाऊंड्री, पहिली इलेक्ट्रिक कंपनी, पहिली मोटार ट्रान्सपोर्ट कंपनी असे अनेक उद्योग सुरू केले. कापड उद्योगाच्या क्षेत्रात मोठी उडी घेताना शिरोळ, इचलकरंजी, गडहिंग्लज अशा ठिकाणी जिनिंग फॅक्टरीज सुरू केल्या. विशेष बाब म्हणजे १९०६ साली दि शाहू छत्रपती स्पिनिंग ॲण्ड विव्हिंग मिल्स स्थापन करून सहकारी तत्त्वावरील उद्योगाची पायाभरणी कोल्हापुरात केली. याकरिता स्वतःचे भांडवल दिलेच; शिवाय उद्योगाकरिता आवश्यक अशा जमिनी, पाणी, बाजारपेठ उपलब्ध करून या उद्योगांना नावलौकिक मिळवून दिला. स्थिरस्थावरता दिली. प्रसंगी या उद्योगात चांगली व सुरक्षित प्रगती व्हावी म्हणून लोकांना त्यांच्या कौशल्याची चुणूक दाखवण्यासाठी विविध बक्षिसे देऊन प्रोत्साहित केले. टेक्निकल स्कूलमधील लोहार मास्तरांना अर्थात दत्तो करजगार यांना पहिली फाऊंड्री काढण्यासाठी विशेष सहकार्य केले. लॉजिंगचा व्यवसाय करण्यासाठी विश्वनाथ सावळेकर (सरदारगृह, मुंबई) यांना मदत केली, तर किर्लो स्करसारख्या प्रख्यात कारखान्याला प्रसंगी नांगर तयार करण्यासाठी स्वतःच्या मालकीच्या पोलादी तोफा हसतमुखाने देऊन शाहू महाराज यांनी उद्योगाच्या क्षेत्रात एक नवीन आदर्शच घालून दिला. व्यापारी लहान असो की मोठा, उद्योग करण्यासाठी त्याला कर्ज काढणे भागच असते. अशावेळी अल्पमुदतीची कर्जे सरकारकडून मिळवून देण्यासाठी शाहू महाराज यांनी मोठ्या खटपटी केल्या. ज्या कामगारांच्या जोरावर कोणताही उद्योग उभा राहतो, त्या कामगारांना आधुनिक शिक्षणाची जोड मिळावी आणि उद्योगात सरशी व्हावी, या हेतूने राजाराम इंडस्ट्रियल स्कूल सुरू केले. नवनवीन उद्योगातील प्रशिक्षणासाठी ब्रिटिश अधिकाऱ्यांशी संवाद करून त्यांचा उपयोग करून घेतला.

## शेती क्षेत्रात नावीन्यपूर्ण उपक्रम

औद्योगिक प्रदर्शनाबरोबर शेतीविषयक प्रदर्शने भरवून लोकांना जागृत केले. त्याला आधुनिकतेची जोड देऊन विज्ञान प्रदर्शनेदेखील सुरू केली. आपल्या संस्थानात उपलब्ध असणाऱ्या जागेच्या पोताचा विचार करून आणि प्रयोगशीलतेला वाव देऊन अत्यंत हुन्नरबाजीने चहा, कॉफी, रबराचे मळे तयार केले. पन्हाळी टी नावाचा चहाचा ब्रँड बनवण्याचा अनोखा चमत्कार त्यांनी करून दाखवला. शेती आणि उद्योगाला सर्वात महत्त्वाची बाजू असते ती पाणीपुरवठ्याची. याची एक ऐतिहासिक पेरणी म्हणून राधानगरी धरण ही योजना सुरू केली. भारतातील कोणत्याही संस्थानिकाने धरण बांधण्याचे धाडस केले नव्हते, ते धाडस आणि हिंमत त्यांनी दाखवली. या धरणाच्या पाण्यावरच पुढे कोल्हापुरात या देशातील पहिली हरितक्रांती घडली आणि कोल्हापूर सर्वार्थाने समृद्ध बनले. कोल्हापुरात ही उद्यमशीलता बहरवायची असेल, तर उद्योगासाठी आवश्यक अशी दळणवळणाची प्रक्रिया जलद घडणे जरूरी असते. याकरिता कोल्हापूर संस्थानात चांगले रस्ते बांधले, रेल्वेचा उपयोग जाणून कोल्हापूर शहर मिरज जंक्शनला जोडण्यासाठी शाहू महाराज यांनी जवळपास २३ लाख रुपये खर्च केले. भारतातील कोणत्याही संस्थानिकाला असा बहुजनोपयोगी उद्योग सुचलादेखील नव्हता. त्या काळात शाहूंनी कोल्हापूरला उद्यमनगरी बनवून एक चमत्कार घडवला होता. याचा सुपरिणाम असा झाला की, १८९४ साली जेव्हा शाहू महाराज यांचा राज्यारोहण समारंभ झाला. त्यावेळी केवळ ६ लाख इतक्याच रुपयांची असणारी निर्यात १९२१ साली पाचपटीने वाढून ३० लाख इतकी झाली.

## शाहू मिल

येथे एक महत्त्वाची आठवण होते ती शाहू महाराज यांनी शाहू मिलच्या स्थापनेप्रसंगी काढलेल्या उद्‌गारांची.. ते म्हणाले, ‘कोणत्याही परिस्थितीत हा उद्योग बड्या गिरणी मालकांच्या अथवा धनिकांच्या ताब्यात जाणार नाही, यासाठी कोल्हापूरच्या लोकांनी दक्ष राहिले पाहिजे. या उद्योगात असे यश संपादन केले पाहिजे की, जगाला हे समजून चुकायला हवे की कापड उद्योगात केवळ मुंबईचीच मक्तेदारी यापुढे राहणार नाही. येथे बहुजन समाजाला ज्याच्या सांस्कृतिक वारशाची आठवण करून देऊन विजयादशमी दिवशी जसे विजयाचे सीमोल्लंघन करतो, तसेच व्यापारात आपण केले पाहिजे,’ असे आवाहन शाहू महाराज यांनी केले. कोल्हापूरसारख्या एका छोट्या संस्थानाचे छत्रपती असणारे शाहू महाराज किती विविधांगी आणि व्यापक पातळीवर जाऊन व्यापार आणि बहुजनोद्धाराची वाट बांधत होते याचा अंदाज येतो.

शाहू महाराज यांनी कोल्हापूरला उद्यमनगरी बनवून भारतातील तमाम राज्यकर्त्यांना स्वतंत्र भारताचे औद्योगिक मॉडेल कसे असावे आणि कसे विकसित करावे, याचा वस्तूपाठच घालून दिला होता, असे म्हणावे लागेल. भारताचे पहिले प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू यांनी ‘धरणे हीच आधुनिक राष्ट्राची मंदिरे आहेत,’ अशा आशयाचे विधान केले होते. त्याच्या अगोदरच ५० वर्षांपूर्वी कोल्हापूरमध्ये शाहू महाराज यांनी राधानगरी धरणाची सुरुवात केली होती. भारतातील पहिल्या हरितक्रांतीची सुरुवात १९६० च्या दशकात झाली. तत्पूर्वी ५० वर्षे अगोदर शाहू महाराज यांनी कोल्हापुरात हरितक्रांती घडवून आणली होती. औद्योगिक पंचवार्षिक योजना सुरू होण्याच्या ५० वर्षे अगोदरच शाहू महाराज यांनी कोल्हापूरला उद्यमनगरी बनवून औद्योगिक मॉडेल देशासमोर ठेवले होते. शाहू महाराज यांचे मोठेपण असे की, त्यांनी अत्यंत दूरदृष्टीने विचार केला आणि बहुजनोद्धाराच्या ध्यासाने तो विचार पूर्ण ताकदीने अमलात आणला. आजही देशातील दर माणशी कमाईत कोल्हापूर आपला क्रमांक वरचा राखत आला आहे. त्याचे कारणच मुळी १०० हून अधिक वर्षांपूर्वी या कोल्हापूर संस्थानात राजर्षी छत्रपती शाहू महाराज नावाचा एक भाग्यविधाता मिळाला होता. त्यांनी केलेल्या औद्योगिक विकासाचा सखोल अभ्यास करून राष्ट्रउभारणीत त्याचा उपयोग करावा आणि या दूरदृष्टीच्या लोकराजाचे भारतीय स्तरावरील अद्वितीय स्थान त्यांना लाभावे हेच न्याय्य ठरेल.

(सामाजिक कार्यकर्ते, कोल्हापूर)

यंदा आपण राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे शतकोत्तर सुवर्ण जयंती वर्ष साजरे करत आहोत. या भारतभूच्या हजारो वर्षांच्या इतिहासात लहान मोठी संस्थाने, राज्ये उदयाला आली. यावर अनेक राजांनी राज्य केले. त्यांच्या पराक्रमाच्या, वैभवाच्या, शौर्याच्या, धैर्याच्या कथांनी आपला इतिहास समृद्ध आहे. कालौघात ही राज्ये काळाच्या उदरात लोप पावली. या लाखो राजांच्या इतिहासात केवळ हाताच्या बोटावर मोजण्याइतपतच लोककल्याणकारी राजे होऊन गेले. यामधील मुकुटशिरोमणी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या वंशातील राजर्षी छत्रपती शाहू महाराज हे प्रजाहितदक्ष राजे होते.

# शाहू विचारांची शिदोरी!

डॉ. देविका पाटील

राजर्षी छत्रपती शाहू महाराज म्हणजे सत्य आणि कृतिशीलता यांचे मूर्तिमंत रूपच होय. ते प्रकाश देणारे एक थोर नेते होते. त्यांनी आपणास चिरंतन विचारांची शिदोरी दिली आहे. छत्रपती शाहू महाराजांची शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी जयंती साजरी करत असताना शाहू विचार जपून ते कृतीत आणले पाहिजेत.

शतकानुशतके ज्ञानभांडाराच्या किल्ल्या अभिजन वर्गाने आपल्या कमरेला बांधल्या होत्या. खरेतर समाजाला सज्ञान करणे, हे त्यांचे कर्तव्य होते; पण तसे न करता समाज अज्ञान, अंधकाराच्या कोठडीत खितपत पाडण्याची त्यांनी पराकाष्ठा केली. राजर्षी शाहू महाराज यांच्या मतानुसार या चातुर्वर्ण्याने विभागलेल्या समाजाचा उद्धार करायचा असेल, तर त्या वर्गाचे किंवा वर्णाचे उद्धारक तयार झाले पाहिजेत. हे तयार होण्यासाठी त्यांनी शिक्षण हाच एक खडतर राजमार्ग तयार केला.

## बहुजनांसाठी शिक्षणाची दारे खुली

छत्रपती शाहू महाराज हे शिक्षणाबाबतीत किती आग्रही होते हे त्यांनी वेळोवेळी घेतलेल्या भूमिकांवरून दिसून येते. बहुजन समाजावर जातिव्यवस्था व वर्णव्यवस्थेची पकड आहे, ती त्यांच्या अज्ञानामुळे अधिकाधिक दृढ झाली. उच्चवर्णीयांचा हेवा वा द्वेष करून बहुजन समाजाच्या स्थितीत बदल होणार नाही, तर त्यासाठी त्यांनी प्रथम शिक्षण घेतले पाहिजे, पात्रता वाढवली पाहिजे, तरच समाजातील उच्चपदे त्यांनाही मिळतील आणि त्यांची फसवणूक, दारिद्र्य, सामाजिक विषमता, अस्पृश्यता, अंधश्रद्धा इत्यादी अनेक सामाजिक गुलामगिरी बळकट करणाऱ्या समस्यांतून खऱ्या अर्थाने मुक्तता होऊ शकेल. शिक्षणामुळेच बहुजनांचा उद्धार होऊ शकेल, असा त्यांना आत्मविश्वास होता. त्यांनी बहुजनांसाठी शिक्षणाची दारे खुली केली.

२७ डिसेंबर १९१७ रोजी अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेचे ११वे अधिवेशन खामगाव येथे भरले होते. या परिषदेच्या अध्यक्षपदावरून महाराज म्हणतात, 'शिक्षणानेच आमचा तरणोपाय आहे, असे माझे ठाम मत आहे. शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झाली नाही, असे इतिहास सांगतो. अज्ञानात बुडून गेलेल्या देशात उत्तम मुत्सद्दी व लढवय्ये वीर कधीही निपजणार नाहीत. म्हणून सक्तीच्या व मोफत शिक्षणाची हिंदुस्थानला अत्यंत आवश्यकता आहे. याबाबतीत आमचा गतकाल म्हटला म्हणजे, इतिहासातील एक अंधारी रात्र आहे. फक्त एकाच जातीने विद्येचा मक्ता घेतला होता. मनू आणि त्याच्या मागून झालेल्या शास्त्रकारांनी त्या त्या वेळच्या ध्येयाला अनुसरून निरनिराळ्या जातींच्या व्यवहारास बंधनकारक असे निर्बंध रचले आणि खालच्या कमी जातीच्या लोकांना विद्यामंदिराचे दरवाजे बंद करण्यात आले. त्यांचे स्वतःचे धर्मग्रंथ आणि वेद हेसुद्धा वाचण्याची त्यांना मनाई होती. हिंदू धर्माशिवाय इतर कोणत्याही धर्माने अशा आंधळ्या व दुःखकारक परिणामाबद्दल अग्रेसरत्व मिळवले नाही,' या उद्गारावरून महाराजांची शिक्षणविषयक तळमळ दिसून येते.

शाहू महाराज यांनी संस्थानात शिक्षण सुधारणा, कायदे, वसतिगृहे यांना आर्थिक मदत केली. आपल्या संस्थानाबरोबरच पुणे, नाशिक, नागपूर, कराची, बनारस इत्यादी अनेक ठिकाणच्या शिक्षण संस्थांनाही आर्थिक मदत केली. महाराजांचे शिक्षण क्षेत्रातील कार्य हे महाराष्ट्राची सर्वांगीण प्रगती साधणारी आणि बहुजनांचा उद्धार घडवून आणणारी एक मूलगामी चळवळच ठरली. यातूनच प्रेरणा घेऊन कर्मवीर अण्णांनी रयत शिक्षण संस्था, बापूजींनी विवेकानंद शिक्षण संस्था, पंजाबराव देशमुखांची श्री शिवाजी शिक्षण संस्था अशा शिक्षण संस्थांचे जाळे महाराष्ट्रात विणून शिक्षणाची गंगोत्री खेडोपाडी नेली.

## व्यापार चळवळीची सुरुवात

आम्ही शेतकरी किंवा सैनिकच होऊन राहावे, ही स्थिती आम्हाला समाधानकारक नाही, म्हणून व्यापार धंदे व इतर उच्च प्रतीच्या व्यवसायात आम्हास शिरणे जरूरी आहे. व्यापार आम्ही केले नाही, तर आमच्या सर्व चळवळी निस्तेज व निरर्थक होतील. व्यापारासंबंधीच्या चळवळीवर माझा पूर्ण विश्वास असल्यामुळे मी माझ्या दोघा मुलांना व आप्तांना व्यापारात घातले आहे. शेतकीच्या व्यवसायामध्ये आमच्यातील बहुतेक लोक गुंतले आहेत. त्यातसुद्धा शिक्षणाची आम्हाला जरुरी आहे. शिक्षणाची जरुरी नाही, अशी कोणतीही चळवळ नाही.' शाहू महाराज यांच्या या सुधारक वृत्तीमुळेच कोल्हापूर संस्थानाचा सर्वांगीण विकास झाला. त्यांनी आपल्या लहान व स्वतंत्र संस्थानात केलेले विविध प्रयोग आजही त्यांच्या मृत्युपश्चात शंभर-

सव्वाशे वर्षांनी संपूर्ण भारतवर्षाला मार्गदर्शक ठरलेले आहेत.

## शेतीपूरक उद्योगधंदे

भारत हा शेतीप्रधान देश आहे. या देशाला शेतीपूरक उद्योगधंद्याची जोड दिली पाहिजे. हे शाहू महाराज यांनी शंभर-सव्वाशे वर्षांपूर्वीच ओळखले होते. आजच्या महाराष्ट्राच्या समृद्धीची पायाभरणी शाहू महाराजांच्या कार्यकाळात झाली. पन्हाळगडाच्या डोंगर उतारावर चहा, कॉफी, मसाल्याचे पदार्थ पिकवून कोकणी माणसाला उद्योगधंद्यात उतरवण्याचा त्यांचा प्रयत्न होता. युरोप दौऱ्याच्या वेळी इटलीहून आणलेल्या मधमाशांचा रजपूतवाडी येथे धंद्याच्या दृष्टीने संगोपन करण्याचा त्यांनी दोन वर्षे प्रयत्न केला. इटलीतील शेती धंद्याचा अभ्यास करण्यासाठी कोणीतरी मनुष्य पाठवावा, असे शाहू महाराज यांना वाटत होते; पण त्यांना योग्य मनुष्य मिळाला नाही. राजधानी कोल्हापूर येथे शाहू महाराज यांच्या उद्योगशीलतेचे प्रतीक असणारी श्रीशाहू छत्रपती स्पिनिंग ॲण्ड विव्हिंग मिल संपूर्णपणे स्वदेशी व्यक्तींनी सहकारी तत्त्वावर चालवलेली ही पहिली मोठी कापड गिरणी होती. याचे भव्य बांधकाम व आधुनिक रचना यामुळे ही मिल तत्कालीन भारतात चर्चेचा व औत्सुक्याचा विषय बनला होता. शाहू महाराज यांनी व्यापार वाढीसाठी जवळच एक व्यापारपेठ वसवली होती. शाहूपुरी या व्यापारी पेठेतील भव्य रस्ते, रेल्वे स्टेशन अगदी नजीक निवडलेली जागा, इथे येणाऱ्या व्यापाऱ्यांना दिलेल्या सुविधा यामुळे कोल्हापूरला व्यापार समृद्धता आली. येथील गूळ, शेंगा, कोल्हापुरी चपला व इतर गोष्टींच्या व्यापाराने तत्कालीन बॉम्बे प्रेसिडेन्सीमध्येही अव्वल दर्जा गाठला होता. शिरोळपेठात आपले जनक पिता जयसिंगराव घाटगे यांच्या नावावरून जयसिंगपूर हेही एक नवे व्यापारी शहर शाहू महाराज यांनी वसवले व तेथील व्यापाऱ्यांनाही अनेक सोयीसुविधा पुरवल्या.

## भारतीय सैन्य दल उभारणीत योगदान

पहिल्या महायुद्धात ब्रिटिशांना लढाऊ सैन्याचा तुटवडा पडू लागला. त्यावेळी ब्रिटिशांनी हिंदुस्थानातून सैन्यभरती करण्यास सुरुवात केली. भारतीयांच्या हाती मोठ्या प्रमाणात शस्त्र पडणार होती व त्यांना अत्याधुनिक लष्करी प्रशिक्षण मिळणार होते; पण मराठ्यांची लष्करी परंपरा खंडित होऊन बराच कालावधी गेल्यामुळे नेमणुका कमी होऊ लागल्या. त्यात मराठ्यांच्या शारीरिक ठेवणीमुळे त्यांना लष्करात भरती होण्यास अडचणी येत होत्या. त्यावेळी शाहू महाराजांनी ब्रिटिश सरकारला लिहिले की, 'मराठा हे कमी उंचीचे. शीख आणि पंजाबी लोकांसारखे बलंदड नाहीत. विशेष मोठा आकार हा लढण्यासाठी लाभदायक आहे; पण मराठ्यांची लहान चण आहे. ते ज्या हवामानात आणि ज्या परिस्थितीत जन्मले ती परिस्थिती ते घडण्यास कारणीभूत आहे; पण याच कठीण परिस्थितीने त्यांना काटकता आणि सहनशीलता हे गुण दिले आहेत. म्हणून याच लढवय्या गुणामुळे एकेकाळी सारा हिंदुस्थान याच मराठ्यांनी आपल्या पराक्रमाने जिंकून घेतला होता. आजही मराठ्यांची हिंमत व ताकद कमी झालेली नाही.' असा ठाम सल्ला दिला. शाहू महाराज यांनी केलेल्या प्रयत्नांमुळे मराठ्यांचा सैन्यात जाण्याचा मार्ग मोकळा झाला. भारतीय सैन्य दलाच्या उभारणीतील शाहू महाराज यांचे हे योगदान राष्ट्राच्या दृष्टीने फार महत्त्वाचे होते.

## आधुनिक मूल्यांचा आदर्श

अस्पृश्यांची अस्पृश्यता नष्ट करून त्यांना बरोबरीत बसवण्यासाठी राजर्षी शाहू महाराज यांनी केलेले प्रयत्न एकमेवाद्वितीय होते. रयतेची सामाजिक, आर्थिक परिस्थिती सुधारावी, समाजातील उपेक्षित, वंचित, स्त्री, शेतकरी, कामगार, मजूर हे प्रगतीपासून दूर होते. यांच्या उद्धारासाठी शाहू महाराज यांनी आपल्या संस्थानात अनेक योजना राबवल्या. ब्रिटिश सत्तेविरुद्ध राजकीय संघर्ष करून शक्ती खर्च करण्यापेक्षा महात्मा फुलेंच्या विचारसरणीप्रमाणे समाजप्रबोधन करून समाजसुधारणा करावी, असे शाहू महाराज यांनी ठरवले. त्या काळाचा महिमा असा की, समाजसुधारणा करणाऱ्यांना स्वकीयांचा त्रास सहन करावा लागत होता. समाजसुधारणेला अनुकूल बहुमत नव्हते. अनेक अनिष्ट रूढी, परंपरेचा पगडा बहुजनांवर होता. अंधभक्ती, अंधश्रद्धा, परकीय सरकारची तटस्थ वृत्ती आणि त्यातच या स्वकीय शत्रूंच्या कागाळ्या; पण यामुळे खचून न जाता उलट जास्त ताकदीने छत्रपती शाहू महाराज समाज सुधारण्याच्या मैदानात उतरले. त्याची मुहूर्तमेढ आपल्या संस्थानातच रोवली. महात्मा फुलेंचा सत्यशोधक समाज, स्वामी दयानंद सरस्वतींचा आर्य समाज यांची तत्त्वे स्वीकारून बहुजनांना शिक्षण देऊन डोळस श्रद्धा दिली. बहुजन उपेक्षितांना अज्ञान अंधकारातून बाहेर काढल्याशिवाय समाजाची ताकद वाढणार नाही. सर्व समाजघटकांना सारखाच अधिकार, संधी मिळाल्या पाहिजेत. विशेषतः हजारो वर्ष जो समाजघटक सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक क्षेत्रात उपेक्षित, बहिष्कृत होता, त्यांना जास्तीची सक्रिय सहानुभूती दाखवत मोफत शिक्षण, आर्थिक साहाय्य व याबरोबरच आरक्षण दिले. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या आधुनिक मूल्यांचा रचनात्मक आदर्श त्यांनी समाजासमोर ठेवला.

सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी जी सामाजिक व वैचारिक चळवळ सुरू केली, त्या चळवळीचे अग्रदूत म्हणून आपण महात्मा फुले यांना मानतो. या चळवळीचे पोषक, पालक, तारक हे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनाच मानले पाहिजे. ऐन पंचविशीत वेदोक्त प्रकरणापासून त्यांनी पुरोहितशाहीविरोधी सुरू केलेला लढा आयुष्याच्या अखेरपर्यंत अत्यंत निष्ठापूर्वक लढला. या लढ्याचे ते आघाडीचे वीर होते. त्यांचे आयुष्य म्हणजे वर्णवर्चस्ववादाविरुद्धचे, समाजातील कर्मठ जाती बंधनाविरुद्धचे, सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी केलेले एक बंडच होते. धर्मसुधारणा, जातिभेदाचे निर्मूलन केल्याशिवाय कनिष्ठ वर्गाचे दुःख नाहीसे होणार नाही, हा त्यांनी काढलेला निष्कर्ष होता. बहुजन समाजाच्या विपन्नावस्थेसंबंधी जागृती करणे, त्यांना शिक्षण देणे, आर्थिक सक्षम करणे आणि जातिभेदाच्या उतरंडीतून कायमची मुक्तता करणे, यांसारखे दुसरे परम पवित्र कार्य कोणतेच नाही, अशी त्यांची खात्री होती.

लोकशाही रुजवण्यासाठी समाजप्रबोधनाची कास धरणाऱ्या समाज क्रांतिकारक, नवभारताच्या निर्मितीसाठी बहुजन समाजातील शेकडो समाजनायक निर्माण करणाऱ्या राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांना त्रिवार मुजरा!

**(लेखिका शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील शाहू अध्यासन केंद्राच्या समन्वयक आहेत.)**

महात्मा जोतिराव फुले यांच्यानंतर सामाजिक समता टिकवून ठेवण्याचे कार्य राजर्षी शाहू महाराज यांनी केले आहे. त्यांनी आपल्या विचाराला कृतीची जोड दिली आहे. एक 'लोकनायक राजा' म्हणून त्यांनी दिलेले सामाजिक योगदान सर्वच राज्यकर्ते व येणाऱ्या भावी पिढ्यांना मार्गदर्शक व प्रेरणादायी ठरणारे आहे.

# लोकराजा शाहू

**डॉ. विजय चोरमारे**

महाराष्ट्रातील मोठमोठे पुरोगामी विचारवंत काही वर्षांपूर्वी 'फुले-आंबेडकरांचा' महाराष्ट्र असा उल्लेख करायचे. हीच मंडळी कोल्हापुरात आल्यावर त्यात छत्रपती शाहू महाराज यांचे नाव समाविष्ट करत, म्हणजे कोल्हापूरच्या बाहेर शाहू महाराज यांना फुले-आंबेडकरांच्या बरोबरीने स्थान दिले जात नव्हते. राज्यकर्त्यांचेही यापेक्षा वेगळे काही नव्हते. 'फुले, शाहू, आंबेडकरांचा महाराष्ट्र' असे यशवंतराव चव्हाणांनी रूढ केले असले, तरी शाहू महाराज यांचे नाव प्राधान्याने घेतले जात नसे. महाराष्ट्रातील पुरोगामी विचारवंतांपासून राज्यकर्त्यांपर्यंत बहुतेकांनी शाहू महाराज यांचे नाव ऑप्शनलाच टाकले होते; परंतु नव्वदच्या दशकात कांशीराम-मायावती यांनी उत्तर प्रदेशातील सत्तेत असताना फुले-आंबेडकरांच्या बरोबरीने राजर्षी शाहू महाराज यांना स्थान दिले. उत्तर प्रदेशातल्या कुर्मी समाजाला सोबत घेण्यासाठी शाहू महाराज यांच्या नावाचा जयजयकार सुरू केला. त्यानंतर महाराष्ट्राच्या पातळीवरही शाहू महाराज यांचे नाव घ्यायला सुरुवात झाली. विशेषतः छत्रपती शाहू महाराज यांच्या राज्यारोहण शताब्दीनंतर म्हणजे १९९४ नंतर त्यांच्या कार्याचा एकेक पैलू पुढे येऊ लागला. कृ. गो. सूर्यवंशी, पी. बी. साळुंखे, प्रा. डॉ. विलास संगवे, डॉ. जयसिंगराव पवार, डॉ. रमेश जाधव आदी शाहू अभ्यासकांनी राजर्षी शाहू महाराज यांच्या कार्याचे समकालीनत्व मांडायला सुरुवात केली. प्रा. एन. डी. पाटील यांच्यासारखे विचारवंत शाहू महाराज यांच्या कार्याची थोरवी सांगू लागले. माजी आमदार बाबूराव धारवाडे यांच्या पाठपुराव्याने महाराष्ट्राच्या विधानभवनासमोर राजर्षी शाहू महाराज यांचा पुतळा उभा राहिला. मनोहर जोशी लोकसभेचे सभापती असताना त्यांनी पुढाकार घेतला आणि लोकसभेच्या आवारातही शाहू महाराज यांचा पुतळा उभा राहिला. रयत शिक्षण संस्था, स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, भारती विद्यापीठ, मराठा शिक्षण प्रसारक मंडळ यांसारख्या बहुजनांच्या शिक्षण संस्थांनी शाहू महाराज यांच्या कार्याची उजळणी



सुरू ठेवली. या सगळ्यांच्या प्रयत्नांतून फुले-आंबेडकरांबरोबर शाहूंचे नाव रूढ झाले.

१०० वर्षांपूर्वी छत्रपती शाहू महाराज यांनी ज्या दूरदृष्टीने निर्णय घेतले. त्याच्या जवळपास पोहोचण्याची राज्यकर्त्यांची धडपड असायला हवी. मानवी जीवनाच्या विकासाचे असे एकही क्षेत्र नाही, ज्यासाठी महाराजांनी काम केले नाही. उस्ताद अल्लादिया खाँ साहेबांना त्यांनी कोल्हापूरला आणले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे उपेक्षितांचे नेते असल्याचे त्यांनीच माणगावच्या परिषदेत जाहीर केले. राधानगरी धरण बांधून सिंचनाची सोय केली. कुस्तीला प्रोत्साहन दिले. कोल्हापुरात प्रत्येक जातीसाठी स्वतंत्र वसतिगृहे सुरू करून उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात क्रांतिकारक कार्य केले. फासेपारध्यांच्या पुनर्वसनासाठी त्यांनी राबवलेली बांधकाम योजना राज्यकर्त्यांना नेहमीच मार्गदर्शक ठरणारी आहे. हे सगळे करीत असताना समाजातील विशिष्ट वर्गाशी त्यांना मोठा संघर्ष करावा लागला. संघर्ष करतानाही त्यांनी विकासाची वाट आणि तळागाळातील घटकांप्रति असलेली बांधिलकी याचा कधी विसर पडू दिला नाही. प्रस्थापितांनी त्यांच्या बदनामीच्या कहाण्या रचल्या, परंतु नव्या पिढीतल्या इतिहास संशोधकांनी त्या कहाण्या म्हणजे हितसंबंध दुखावलेल्या मंडळींनी रचलेली कुभांडे असल्याचे सप्रमाण सिद्ध केले आहे.

## कृतिशील विचारवंत

जातिभेदांच्या निवारणाचा महत्त्वाचा मार्ग म्हणून रोटी-बेटी व्यवहाराचा उल्लेख आजही केला जातो. काही प्रमाणात सोवळेकरी आजही असले, तरी रोटीबंदी ही अस्पृश्यता निवारणाशी संबंधित असलेली संकल्पना बऱ्यापैकी कालबाह्य झाली आहे. बेटीबंदीच्या निर्बंधाचा विळखा मात्र आजही कायम आहे. अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे दिवंगत कार्याध्यक्ष डॉ. नरेंद्र दाभोळकर यांनी सुरू केलेली आंतरजातीय आणि आंतरधर्मीय विवाहांची चळवळ त्याचीच साक्ष देते. महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीही आंतरजातीय विवाहांचा जोरदार पुरस्कार केला होता. त्याच्याही खूप आधी म्हणजे आजपासून शंभरेक वर्षांपूर्वी राजर्षी शाहू महाराज यांनी आंतरजातीय विवाहाचा पुरस्कार केला होता.

शाहूराजे हे कृतिशील विचारवंत होते. त्यांनी केवळ भाषणे आणि कायदा करून विषय सोडून दिला नाही. त्याची सुरुवात स्वतःच्या घरापासून केली. आपली चुलतबहीण चंद्रप्रभाबाई यांचा विवाह इंदूरच्या तुकोजीराव होळकरांचे पुत्र यशवंतराव यांच्याशी निश्चित केला. मराठ्यातील उच्चकुलीन घराण्यांनी धनगर समाजाशी वैवाहिक संबंध निर्माण करण्याची ही घटना दुर्मीळ आणि तत्कालीन समाजाला पचनी पडणारी नव्हती. कुटुंबापासूनच त्याची सुरुवात होती, परंतु हे संबंध जोडण्याची तयारी व्हावी म्हणून शाहू महाराज यांनी करवीरच्या शंकराचार्यांकडून, 'मराठे व धनगर मूलतः एकच आहेत' असा अभिप्राय मिळवला. कोल्हापूर-इंदूर या दोन संस्थानांमध्ये मराठा-धनगर यांच्यातील १०० आंतरजातीय विवाह करण्याची योजना त्यांनी आखली होती. त्यानुसार २५ विवाह पार पडले. राजर्षी शाहू महाराज यांच्या अकाली निधनामुळे हे कार्य पुढे गेले नाही.

आजही समाज जी गोष्ट सहज मान्य करू शकत नाही, ती १०० वर्षांपूर्वी त्यांनी कृतीत आणून दाखवली होती. शाहू महाराज यांच्या दूरदृष्टीच्या अशा अनेक गोष्टी सांगता येतात. ज्या त्यांनी १०० वर्षांपूर्वी कृतीत आणल्या; त्यांचा स्पर्श झाला नाही, असे जीवनाचे एकही क्षेत्र आढळत नाही. कोल्हापूरसारख्या छोट्या संस्थानाच्या या राजाने आपल्या डोंगराएवढ्या कार्याने महाराष्ट्राला आणि देशाला दिशा दिली.

## मोफत प्राथमिक शिक्षण आणि सक्तीचा कायदा

विद्येविना मती गेलेल्या समाजाला शिक्षणाशिवाय तरणोपाय नसल्याचे लक्षात आल्यावर शाहू महाराजांनी प्राथमिक शिक्षणासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले. सर्व जाती-जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहांची स्थापना केली. शाहू महाराज यांनी २८ वर्षांत १८ वसतिगृहांची स्थापना करून कोल्हापूरला 'मदर ऑफ होस्टेल' अशी ओळख मिळवून दिली. संस्थानात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करण्यासाठी राजर्षी शाहू महाराज यांनी १९१३ मध्ये बंधू पिराजीराव घाटगे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली. भास्करराव जाधव, म. ग. डोंगरे, अण्णासाहेब लठ्ठे, वाय. के. दिलवर, डॉ. एच. एन. घाटगे या सदस्यांची नियुक्ती करून शिफारशी मागवून घेतल्या. २४ जुलै १९१७ रोजी त्यांनी प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करण्याच्या योजनेचा हुकूम काढला. त्यात म्हटले आहे की, 'येत्या गणेश चतुर्थीपासून करवीर इलाख्यातील सर्व शाळांत मोफत व सक्तीचे शिक्षण अमलात आणण्याचा उपक्रम होण्याचा आहे.' सर्व प्राथमिक शाळांतून शुल्कमाफी करण्यात आली आहे, असा आदेशही २५ जुलै १९१७ रोजी काढला. प्रत्येक गावात एक शाळा, यानुसार काम सुरू केले. गावातील चावडी, धर्मशाळा, मंदिरात शाळा सुरू करण्याचा आदेश काढला. ज्या गावात चावडी नाही, तेथे तुळजाभवानीचे मंदिर बांधून तेथेच शाळा व चावडी बांधण्याचा आदेश काढला.

मोफत प्राथमिक शिक्षण आणि सक्तीचा कायदा प्रसिद्ध करताना त्यांनी काढलेल्या आदेशात म्हटले की, 'प्रत्येक गावातील पालकांनी ३० दिवसांत मुलांची नावे कळवावीत. नावे न कळवणाऱ्या पालकांना समन्स बजावण्यात येईल. जो विद्यार्थी शाळेत येणार नाही, त्याच्या पालकास दिवसाला एक रुपये दंड ठोठावला जाईल.'

मोफत आणि सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाच्या या कायद्याबरोबरच स्त्री शिक्षणाच्या प्रोत्साहनाची धोरणे, वसतिगृहांची चळवळ त्यांच्या शिक्षणविषयक दृष्टिकोनाची साक्ष देतात. विधवा पुनर्विवाह कायदा, घटस्फोटाचा व वारसाचा कायदा, देवदासी प्रतिबंधक कायदा,

### आरक्षण धोरणाचे शिल्पकार

शाहू महाराज यांनी घेतलेला आरक्षणाचा निर्णयही जगाच्या पाठीवर असा पहिला क्रांतिकारी निर्णय ठरतो. मागासवर्गासाठी नोकऱ्यांमधील ५० टक्के जागा आरक्षित ठेवण्याचा निर्णय त्यांनी १९०२ मध्ये घेतला होता. या निर्णयामुळे शाहू महाराज यांचे शत्रू वाढले आणि ते अधिक संघटित व आक्रमक झाले. लोकमान्य टिळकांसारख्या नेत्यांनी त्यावेळी हा निर्णय म्हणजे त्यांच्या बुद्धिभ्रंशाचे लक्षण असल्याची टीका केली.

स्त्री अत्याचार प्रतिबंधक कायदा असे स्त्रियांना संरक्षण देणारे अनेक कायदे त्यांनी केले.

## भविष्याचा अचूक वेध घेणारे शाहू महाराज

महाराष्ट्र सरकारने १९७२च्या दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर आणलेल्या रोजगार हमी योजनेचे अमाप कौतुक होते. याच योजनेतून भारत सरकारची महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना आकारास आली; परंतु महाराष्ट्र सरकारची रोजगार हमी योजना हीच मुळी शाहू महाराज यांनी १८९६-९७ आणि १८९९-१९०० मधील दुष्काळात आपल्या संस्थानामध्ये राबवलेल्या उपाययोजनांवर आधारलेली आहे. दुष्काळात त्यांनी स्वतंत्र दुष्काळ निवारण खाते निर्माण करून त्यावर भास्करराव जाधव यांच्यासारख्या कर्तबगार अधिकाऱ्याची नियुक्ती केली होती. तालुक्याच्या ठिकाणी दुष्काळ निवारण कार्यालये स्थापन केली होती.


रयतेत सामील होत कुस्त्या पाहताना राजर्षी छत्रपती शाहू महाराज.

मुंबई परिसरात दुष्काळामुळे हजारो लोक तडफडून मरत असताना कोल्हापूर संस्थानात एकही भूकबळी पडला नव्हता. कारण शाहू महाराज यांनी दुष्काळात दिव्यांग, वृद्ध आणि निराधार लोकांसाठी ठिकठिकाणी नऊ आश्रम काढले होते. त्यामध्ये ५० हजारांवर लोकांची सोय करून त्यांचे जीव वाचवले. म्हैसूर राज्यातून धान्य मागवून गावागावांमध्ये धान्याची दुकाने काढली. धान्य घेण्यासाठी लोकांच्या हाती पैसे यावे म्हणून रस्त्यांची, विहिरींची, तलावांची कामे काढली. सरकारची जंगले आणि कुरणे लोकांच्या गुराढोरांसाठी खुली केली. मजुरीवर काम करणाऱ्या महिलांच्या तान्ह्या मुलांसाठी कामाच्या ठिकाणी पाळणाघरे उभी केली.

## ब्रिटिश राजवटीकडून छत्रपती शिवाजी महाराजांचा गुणगौरव

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी १९ नोव्हेंबर १९२१ रोजी प्रिन्स ऑफ वेल्सला पुण्यात आणून त्यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकाचा पायाभरणी समारंभ घडवून आणला होता. मराठा सैनिकांनी पहिल्या महायुद्धात लढता लढता जे हौतात्म्य पत्करले त्याचे स्मारक म्हणून शनिवारवाड्यासमोर स्मृतिस्तंभ उभारण्यासाठी प्रिन्स ऑफ वेल्स आले होते. प्रिन्स ऑफ वेल्स येत असल्याची संधी साधून शाहू महाराज यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याची कल्पना पुढे आणली. त्यामागेही शाहू महाराज यांची दूरदृष्टी होती. महाराष्ट्राचा मानबिंदू असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकाचा पायाभरणी समारंभ ब्रिटिश साम्राज्याचा वारसदार प्रिन्स ऑफ वेल्स यांच्या हस्ते होऊन त्यांच्या तोंडून छत्रपती शिवाजी महाराज यांचा गौरव व्हावा आणि तो देशोदेशी पोहोचावा, अशी शाहू महाराज यांची धारणा होती. ऑल इंडिया शिवाजी मेमोरिअल सोसायटीची स्थापना त्याचवेळी झाली. मराठी मुलांना लष्करी शिक्षण मिळावे, या उद्देशाने ती स्थापन झाली. शाहू महाराज यांनी ब्रिटिश राजवटीकडून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्याचा गौरव करून घेतला होता.

लोकमान्य टिळकांशी महाराजांचा सुमारे २० वर्षे संघर्ष चालला. दोन्ही बाजूंनी मित्रप्रेमापोटी हा संघर्ष केला गेला. ताईमहाराज प्रकरणी लोकमान्य टिळकांनी आपले परममित्र वासुदेव हरी ऊर्फ बाबा महाराज पंडित यांना दिलेल्या वचनासाठी संघर्ष केला. त्याचवेळी शाहू महाराजांनीही राजगुरू रघुपती पंडित ऊर्फ पंडित महाराज यांच्यासाठी संघर्ष केला. या संपूर्ण प्रकरणाचे मूळ वेदोक्त प्रकरणात होते, हेही तितकेच खरे होते. लोकमान्य टिळक हे स्वातंत्र्य संग्रामात देशाचे नेतृत्व करत होते आणि त्यामुळे राजर्षी शाहू महाराज यांच्या मनात त्यांच्याबद्दल नितांत आदर होता. त्यांच्यातला संघर्ष होता तो सामाजिक मुद्द्यांसंदर्भातील, तोही वैचारिक पातळीवरचा. टिळकांच्या मृत्यूची वार्ता राजर्षी शाहू महाराजांना कळली, त्या वेळी ते जेवणाच्या ताटावर बसले होते. वार्ता ऐकून त्यांना खूप दुःख झाले. पुढ्यातील जेवणाचे ताट बाजूला सारून ते उपाशीपोटी राहिले. टिळकांच्या मृत्युनंतर संघर्ष संपला, तरी इतिहासाच्या पानांतून तो अधूनमधून डोके वर काढत राहिला. अनेक सामाजिक प्रश्नांच्या निमित्ताने त्याला उजळणी मिळत राहिली. काळाच्या पुढे असलेल्या माणसांचे महत्त्व लक्षात यायला समाजही तेवढा प्रगल्भ बनावा लागतो. आरक्षणासह अस्पृश्यता निर्मूलनापासून आंतरजातीय विवाहापर्यंत राजर्षी शाहू महाराज यांनी घेतलेले निर्णय आजच्या समाजाला दिशा देणारे आहेत, यावरून शाहू महाराजांचे द्रष्टेपण अधोरेखित होते.

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

**भारतीय शिक्षणाचे जनक महात्मा जोतिराव फुले यांचा वारसा पुढे नेणारे राजर्षी छत्रपती शाहू महाराज हे आपल्या काळाच्या अनेक शतके पुढचा विचार करणारे होते. शिक्षणाचे महत्त्व ओळखत त्यांनी ऐतद्देशीयांच्या प्रगतीसाठी आणि भारतासारख्या भौगोलिक आणि सांस्कृतिक वैविध्य असणाऱ्या; पण जाती-धर्मांच्या आधारावर विभागलेल्या देशात शिक्षणाच्या एकात्मतेसाठी आणि प्रगतीसाठी शिक्षण हे सर्वात महत्त्वाचे साधन मानले.**

# सार्वत्रिक शिक्षणाचा अध्वर्यू

**डॉ. रोहित कसबे**

कोल्हापूरला प्लेगची साथ असल्याने राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचा पन्हाळ्यावर मुक्काम पडलेला, गडावर प्लेगचा फैलाव होऊ नये, म्हणून मुक्कामाच्या अगोदर काही अंतरावर क्वारंटाईन उभारलेले. अचानक महाराज क्वारंटाईनमध्ये प्रवेश करतात आणि सरूडच्या पाटलाचा मुलगा आला, तर त्याला एक मिनीटभरही खोळंबून ठेवू नका, असे अधिकाऱ्यांना बजावतात. १८९९ साली मॅट्रिक पास झालेल्या या मुलाला आणण्यासाठी घोडेस्वारासोबत त्या मुलासाठी दुसरे एक घोडेही पाठवतात. आपल्या प्रजेच्या शिक्षणासाठी दक्ष असणारा हा राजा त्या विद्यार्थ्याला आपल्याला भेटायला अडचण येऊ नये, म्हणून राजशिष्टाचार बाजूला ठेवत गडाच्या प्रवेशद्वारापर्यंत येतो. त्याचे आदरातिथ्य करत त्याच्याशी चर्चा करून त्याच्या समस्या ऐकून घेतो. हा विद्यार्थी म्हणजे रावबहाद्दुर पी.सी. पाटील. त्या दिवशी जी चर्चा झाली, त्यात बहुजन समाजातील मुलांना शिक्षणासाठी कोणत्या समस्या येतात, हे जाणूनच सर्व जातींच्या विद्यार्थ्यांसाठी मराठा बोर्डिंगची संकल्पना उदयाला आली.



## मराठा शिक्षण परिषद

डॉ. जयसिंगराव पवार यांनी संपादित केलेल्या राजर्षी शाहू पंचखंडात्मक स्मारक ग्रंथात आलेल्या उल्लेखाप्रमाणे अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेचे ११वे अधिवेशन खामगाव येथे २७ डिसेंबर १९१७ रोजी आयोजित करण्यात आले होते. या अधिवेशनाच्या अध्यक्षीय भाषणात राजर्षी शाहू महाराज म्हणतात, 'शिक्षणानेच आमचा तरणोपाय आहे, असे माझे ठाम मत आहे. शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झाली नाही, असे इतिहास सांगतो. अज्ञानात बुडून गेलेल्या देशात उत्तम मुत्सद्दी व लढवय्ये वीर कधीही निपजणार नाहीत. म्हणूनच सक्तीचे व मोफत शिक्षणाची हिंदुस्थानला अत्यंत आवश्यकता आहे. या बाबतीत आमचा गतकाल म्हटला म्हणजे इतिहासातील एक अंधारी रात्र आहे.'

भारतात शेती आणि सैन्य या बाबी अत्यंत महत्त्वाच्या आहेत हे नमूद करत राजर्षी शाहू महाराज याच खामगाव परिषदेच्या भाषणात पुढे म्हणतात, 'हल्लीच्या काळी शेतकी इतकी पद्धतशीर झाली आहे की, ज्याला त्यात यश मिळवावयाचे आहे, त्याला त्या विषयावरील पुस्तके वाचता आली पाहिजेत व समजली पाहिजेत. सांप्रतच्या महायुद्धात पारे लोकांनी आपल्या इतिहासप्रसिद्ध रणवीरांची कीर्ती ठेवली आहे. त्याचप्रमाणे आपल्या राज्यकर्त्याविषयी राजनिष्ठा दाखविली आहे. जरी आमची लोकसंख्या मोठी आहे. तरी आमच्या दुर्बलतेमुळे या राक्षसी लढाईत साम्राज्याच्या कामी द्रव्यबळ, मनुष्यबळ व सैन्यबळ यांची मदत करण्याचा झटून प्रयत्न केला पाहिजे. अर्वाचीन युद्ध पद्धतीत शिक्षणाची अत्यंत जरुरी आहे. प्रत्येक सैनिकास संग्रामशास्त्रावरील पुस्तके वाचता आली पाहिजेत, या ठिकाणीसुद्धा शिक्षणाचा प्रश्न आपल्यापुढे येतो. जर मराठे लोकांना

शिक्षण मिळेल, तर ते खात्रीने अधिक चांगले योद्धे होतील. हल्लीच्या लढाईच्या दिवसांत, तोफखान्यावरील लोक उत्तम गणिती असले पाहिजेत. म्हणून हीच गोष्ट पुन:पुन्हा सांगावी लागते आणि सर्व स्थितीचा विचार करता एकच तत्त्व निघते. ते हे की, प्रत्येक मराठा चांगला सुशिक्षित झाला पाहिजे. हल्लीच्या लढाईने आपणास साम्राज्याची सेवा करण्याची सुसंधी आणून दिली आहे. अशी संधी



पूर्वी कधीच आली नव्हती व पुढे कदाचित येणार नाही. अर्थातच अशा प्रसंगी आपल्या सरकारला मदत करणे हे सर्व जातींच्या व पंथांच्या लोकांचे कर्तव्य आहे, असे मी समजतो आणि याप्रसंगी त्यांनी पुढे येऊन पूर्वाचिंत क्षात्रतेजाच्या परंपरेला शोभेल, असे वर्तन केले पाहिजे. यावेळी जर आम्ही कर्तव्यपराङ्मुख झालो, तर त्याबद्दल आम्हाला नेहमी शोक करावा लागेल...' असे विचार शाहू महाराजांनी मांडले होते.

## सक्तीच्या शिक्षणाचा कायदा

शिक्षणाबद्दल शाहू महाराजांची मते स्पष्ट होती. माणसाला माणूस म्हणून जगण्यासाठी समाजात जाती-धर्माच्या नावाने भेदाभेदाचा रोग समूळ नष्ट केला पाहिजे, हा रोग नष्ट करण्याचे महत्त्वाचे साधन शिक्षण हेच आहे. बहुजन समाजाच्या प्रगतीसाठी शिक्षणाशिवाय पर्याय नाही, असेच राजर्षी शाहू महाराज यांना वाटत होते. त्या काळात बहुजन समाजातील लोकांमध्ये शिक्षणाचे प्रमाण अत्यल्पच होते. महाराजांचा राज्यारोहण समारंभ २ एप्रिल १८९४ मध्ये झाला. त्यांनी जुलै १९१७ रोजी प्रसिद्ध केलेल्या जाहीरनाम्यात त्यावर्षी गणेश चतुर्थीपासून म्हणजे ३० सप्टेंबर १९१७ पासून करवीर इलाख्यात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करण्यात येत असल्याचे जाहीर केले. २१ सप्टेबर १९१७ रोजी 'सक्तीच्या शिक्षणाचा कायदा' प्रसिद्ध करण्यात आला. या कायद्याचा उद्देश स्पष्ट करताना त्यात 'करवीर इलाख्यातील आमच्या सर्व प्रजाजनांना लिहिता-वाचता येऊन आपली स्थिती ओळखून सुधारण्यास समर्थ व्हावे.' असे सांगण्यात आले होते.

स्वतंत्र भारतात शिक्षण अधिकार कायदा २००९ मध्ये लागू झालेला आहे. यात महाराजांची दूरदृष्टी दिसतेच; पण त्याचबरोबर प्रजाजनांबद्दल असणारी आस्था व प्रेम जाणवते. या योजनेसाठी एक लाख रुपयांची तरतूद करण्यात आली होती. यातील ८० हजार रुपये दरबार खजिन्यातून, तर २० हजार रुपये देवस्थान फंडातून खर्च होणार होते. त्या काळात मुंबई इलाखा ज्यात आजच्या काळातील महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक आणि पाकिस्तानातील सिंध प्रांत यांचा समावेश होत असे. त्याची शिक्षणासाठीची तरतूद एक लाख रुपये होती.

या योजनेत ५०० ते १००० लोकसंख्या असलेल्या प्रत्येक गावात प्राथमिक शाळा स्थापन करण्यात आली. ज्या छोट्या गावांमध्ये शाळांसाठी इमारती उपलब्ध होणार नाहीत तेथील चावडी, देवळे, धर्मशाळा आदी इमारतींमध्ये शाळा सुरू केल्या. ज्या गावांमध्ये अशा इमारती उपलब्ध झाल्या नाहीत, तेथे देवस्थान निधीमधून तुळजाभवानीचे मंदिर बांधावे व त्या मंदिराच्या एका सोप्यात शाळा आणि एका सोप्यात गाव चावडी ठेवावी, अशी तरतूद करण्यात आली होती. काही ठिकाणी शाळेसाठी इमारती नव्याने बांधण्यात आल्या. वर्षभरात ९६ नव्या शाळा सुरू झाल्या. चिखली येथील अशा एका शाळेचे उद्घाटन ४ मार्च १९१८ रोजी राजर्षी शाहू महाराज यांच्या हस्ते झाले. सन १९१७-१८ या वर्षी सुरू झालेल्या योजनेंतर्गत २७ शाळा व त्यात १२९६ मुले होती. १९२१-२२ सालापर्यंत त्यात वाढ होऊन शाळांची संख्या ४२०, तर विद्यार्थी संख्या २२,००७ पर्यंत पोहोचली. ही योजना केवळ कागदावर राहू नये, त्याची नीट अंमलबजावणी व्हावी, म्हणून या योजनेचे वेगळे खाते तयार करण्यात आले. 'डायरेक्टर' आणि 'एज्युकेशनल इन्स्पेक्टर' या अधिकाऱ्यांची नेमणूक केली गेली. संस्थानातील मामलेदारापासून ते थेट संबंधित

### स्त्री शिक्षण

महात्मा जोतिराव फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रेरणेने आणि प्रयत्नातून महाराष्ट्रात १८४८ सालीच स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली गेली होती. कोल्हापूर संस्थानात फिमेल ट्रेनिंग स्कूल कार्यरत होते. महाराजांच्या शासनकाळात स्त्री शिक्षणासाठी विशेष प्रयत्न केले गेले. महाराजांच्या कार्यकाळात भूदरगड भागात मुलींच्या शाळा स्थापन करण्यात आल्या होत्या, या शिवाय संस्थानात मुला-मुलींच्या (कोएड) शाळा होत्या. मुलींना शाळेत पाठवण्यासाठी उत्तेजन मिळावे, यासाठी मुलांच्या शाळेत उत्तीर्ण होणाऱ्या मुलींच्या संख्येनुसार संबंधित शिक्षकाला 'बक्षिशी' दिली जात असे.


मागासलेल्या जातीतील शिक्षण घेण्याची इच्छा असणाऱ्या प्रौढ स्त्रियांसाठी राहण्या-जेवणाची मोफत सोय व्हावी, यासाठी महाराजांनी १९१९ साली खास हुकूम काढल्याची नोंददेखील आढळते. हुशार मुलींना पुढचे शिक्षण घेता यावे, यासाठी अनेक शिष्यवृत्त्या होत्या. रखमाबाई केळवकर या शिक्षिकेने महाराजांच्या या उपक्रमात मोलाचे कार्य पार पाडले. पुढे रखमाबाई केळवकर यांच्या कन्या कृष्णाबाई यांना वैद्यकीय शिक्षणासाठी मुंबईच्या ग्रँट मेडिकल कॉलेजमध्ये पाठवून त्यांना डॉक्टर बनवले. त्यानंतर त्या कोल्हापूरच्या एडवर्ड मेमोरियल हॉस्पिटलमध्ये वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी बनल्या.

गावाच्या पाटलांपर्यंत सर्व घटकांना यात सहभागी करण्यात आले. गावागावांतील जनतेने या शाळांमध्ये मुले पाठवावीत, यासाठी त्यांना प्रोत्साहन देण्याचे, प्रसंगी जे लोक मुलांना पाठवणार नाहीत, त्यांना दंड करणे, दरमहा शाळा तपासणी करून त्याचा रिपोर्ट पाठवायची जबाबदारी मामलेदार-महालकरी यांची होती, तर गावच्या पाटलाने दिवसातून एकदा शाळा तपासणी करून उपस्थित विद्यार्थ्यांच्या आकड्यांची नोंद 'व्हिजिट बुकात' करायची होती.

केवळ सक्ती करून शिक्षणाची गोडी निर्माण होणार नाही, याची जाणीव राजर्षींना होती, शेतीवर अवलंबून असणाऱ्या समाजातल्या मुलांना दिवसभर शेतात काम करावे लागते, त्यांना शेतीबरोबरच शिक्षणाची सोय व्हावी, या हेतूने शेतकऱ्यांच्या मुलांनी सकाळी किंवा संध्याकाळी दोन तासांकरिता शाळेत येण्याची सवलत देण्यात आली होती.

## उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती

शाहू महाराजांनी उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती आणि देणग्यांच्या स्वरूपात अर्थसाहाय्य केले. यात प्रामुख्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव सर्वश्रुत आहे. याशिवाय पुढे समाजसुधारक म्हणून प्रसिद्ध झालेले भाई माधवराव बागल यांना जे.जे. स्कूल ऑफ आर्ट्सच्या शिक्षणासाठी साहाय्य केलेले होते. कोल्हापूर संस्थानाबाहेरील अनेक विद्यार्थ्यांना आणि संस्थांना महाराजांनी भरीव मदत केल्याची उदाहरणे आहेत. यात पुण्याच्या डेक्कन एज्युकेशन सोसायटी, ताराबाई मराठा बोर्डिंग, नाशिक येथील उधोजी मराठा बोर्डिंग आणि सोमवंशीय समाज बोर्डिंग, नागपूरचे चोखामेळा बोर्डिंग आणि बनारस हिंदू युनिव्हर्सिटी या महत्त्वाच्या संस्थांची नावे घेता येतील.



शाहू महाराजांच्या शैक्षणिक धोरणाचा परिणाम म्हणजे त्यांच्या राज्यरोहणाच्या वेळी १८९४ साली १०,८४४ असणारी विद्यार्थी संख्या १९२२ साली २७,८३० झाली होती. त्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांची संख्या २३४ वरून २१६२ वर गेली होती. यात महाविद्यालयीन विद्यार्थांचा समावेश नाही, त्यांची संख्या मोजली तर हा आकडा आखणी पुढे जाईल.

## असेही 'शिक्षण'

शाहू महाराजांनी औपचारिक शिक्षणाच्या संधी अनेकांना दिल्या, त्यासाठी पुरेसे पाठबळ दिले. वंचित समाजातील अनेकांना नोकरीच्या संधी दिल्या; पण त्याचबरोबर त्यांनी माणसातील उपजत गुणांना ओळखत त्या माणसाला आपल्यातल्या छुप्या कौशल्याला प्रकट करायची संधीदेखील दिली. त्यासाठी जाती-धर्माचा कोणताच भेदभाव महाराजांच्या मनात आला नाही.

फासेपारधी समाजातील अनेकांना महाराजांनी आपल्या शिकारखान्यात नोकऱ्या दिल्या, त्यांच्यातल्या काहींना रस्तेबांधणीच्या कामाला तर काहींना तर आपले अंगरक्षक नेमले. याबाबतचा एक किस्सा उद्बोधक आहे, शाहू महाराजांचे बंधु बापूसाहेब महाराज यांना एकदा महाराजांचा तातडीचा निरोप मिळाला, म्हणून त्यांच्या कॅम्पवर भेटायला आले, तेथे पहाऱ्यावर फासेपारधी जमातीतील लोक होते. महाराजांचा त्यांना आदेश होता की, कोणालाही आत सोडायचे नाही, त्यामुळे पहारेकऱ्याने त्यांना आत सोडले नाही. शेवटी बापूसाहेब महाराजांनी रौद्र धारण केल्यावर 'महाराजांचा हुकूम मी मोडणार नाही, तुम्हाला आत जायचं असेल तर ही घ्या बंदूक, घाला मला गोळी आणि खुशाल आत जावा.' असे उत्तर त्या फासेपारधी समाजातील पहारेकऱ्याने दिले. शाहू महाराज हा प्रकार लांबून पाहत होते, ते बाहेर आले आणि बापूसाहेब महाराजांना सोबत घेऊन गेले. या प्रसंगात महाराजांबद्दलची त्या पहारेकऱ्याची निष्ठा दिसतेच; पण आपल्याला सन्मान मिळवून देणाऱ्या या लोकोत्तर राजासाठी प्रसंगी आपल्या जिवाची पर्वा न करणारा एक आदर्श सैनिकही दिसतो आणि जाती-जमाती-धर्माच्या पलीकडे जाऊन माणसातला माणूस बघण्याची महाराजांची 'दिव्यदृष्टी' दिसून येते.

डोंबारी समाजातील लोकांचे उपजत पिंजरे बनवण्याचे कौशल्य ध्यानात घेऊन त्यांना आपल्या शिकार कॅम्पवर कायमचा आसरा दिला. महाराजांच्या शेतात घुसलेला गवा एका दगडात लोळवणार राजपूत समाजातील मंगलसिंग, पंजाबी पैलवानाला अस्मान दाखवणार वड्ड समाजातील इराप्पा पैलवान, कोरव्यांमधला रामू पैलवान, महालक्ष्मी मंदिरात गायनासाठी नेमणूक केलेले उत्साद भुर्जीखाँ, शेतकरी कुटुंबातून वैदिक शिक्षण घेतलेले तरुण. कितीतरी उदाहरणे आहेत ज्यातून समाजाने नाकारलेल्या अनेकांना स्वाभिमानाने जगण्याची महाराजांनी संधी दिली.

राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रयत्नातून अनेक गरीब शिकले. शिक्षणाची पार्श्वभूमी नसणाऱ्या अनेकांना विकासाच्या अनेक संधी मिळाल्या. शेतकरी, भटके-विमुक्त, स्त्रिया, समाजातल्या तळागाळातल्या सर्व घटकांच्या हातात शिक्षणाचे आयुध दिलेच; पण त्याहीपेक्षा या समाजातील लोकांमधील चांगले गुण ओळखून त्यांना आयुष्यात काहीतरी करून दाखवायची संधीदेखील दिली. त्यांना स्वाभिमानाने आणि स्वावलंबनाने जगायला मिळाले. बहुतेकांनी त्या संधीचे सोने करत महाराजांनी टाकलेला विश्वास सार्थ ठरवला.

(लेखक पत्रकारितेचे अभ्यासक आहेत.)

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात शाहूपुरी, कोल्हापूर, शिरोळ, सोनतळी, गडहिंग्लज, राधानगरी, जयसिंगपूर अशा विविध भागात उद्योगांची उभारणी केली होती. तसेच शेतीतून उत्पादित वस्तूंशी संबंधित लघु उद्योगांच्या उभारणीला प्रोत्साहन दिले व मदतही केली. शेतकऱ्यांना शेतीबरोबरच इतर जोडधंदे करण्याची संधी मिळावी यासाठीही त्यांनी प्रयत्न केले. राजर्षी शाहू महाराज यांनी राबवलेल्या आर्थिक धोरणांचे अनेक महत्त्वाचे तात्कालिक आणि दूरगामी परिणाम दिसून येत आहेत.

# शाहू महाराजांची उद्योगनीती

**प्रा. विजय ककडे**

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे कार्यकर्तृत्व केवळ कोल्हापूर संस्थानापुरतेच मर्यादित नाही, तर संपूर्ण देशात त्यांच्या अफाट व दूरदर्शी कार्याचे पडसाद दिसून येतात. सामाजिक विकासाचा दीपस्तंभ, कृषी विकासाची गंगोत्री आणि दारिद्र्य व अज्ञान यांच्या विरोधातील प्रखर योद्धा अशा अनेक पैलूंसोबत त्यांनी उद्योग व्यापार क्षेत्रातही अपूर्व असे योगदान दिले. त्यांनी उद्योग व्यापार वृद्धीसाठी वापरलेली तंत्रे, धोरण आजही तितकीच कालसुसंगत व महत्त्वपूर्ण ठरतात. रयतेच्या राजर्षींनी आपल्या सर्व घटकांना विकासाची सोबत देत, त्याची महाद्वारे उघडत एक नवा विकासविक्रम प्रस्थापित केला, असे इतिहासाच्या अवलोकनातून सिद्ध होते. केवळ २८ वर्षांच्या अल्पावधीच्या कार्यकाळात भविष्यकालीन आर्य समाजाची पायाभरणी केली. शेती, शिक्षण, उद्योग, व्यापार ही सर्व सामाजिक कल्याणाची आयुधे सातत्यपूर्ण वापरावे लागतात. त्याचे धोरणात्मक भान ज्या राष्ट्रांनी स्वीकारले ते आता महासत्ता ठरले आहेत, यातून राजर्षींचा विकासआराखडा किती दूरदर्शीपणाचा होता, हे दिसून येते. सर्वात अधिक वेगवान व सातत्यपूर्ण उत्पन्न आणि रोजगार वाढ ही उद्योग व्यापारात व नावीन्यपूर्ण प्रयोगातून होते हे राजर्षी शाहू महाराज यांनी ओळखून आपल्या कृतीत, धोरणात राबवले. अज्ञान आणि गरिबी यातून आपल्या रयतेला मुक्त करण्यासाठी त्यांनी सामाजिक सुधारणा एका बाजूला, तर दुसऱ्या बाजूला उत्पन्न व रोजगार बहुविध मार्गांनी वाढावा, यासाठी प्रयत्न केले.



## व्यापारी वर्गास प्रोत्साहन

१९०२ मध्ये युरोपचा दौरा त्यांचा खास अर्थाने अभ्यासदौरा ठरला. युरोपची आर्थिक प्रगती ही व्यापार उद्योगातून झाली असल्याचे सूत्र त्यांना सापडले. त्यामुळे त्यांनी आपल्या रयतेने फक्त शेतकरी व सैनिक न राहता उत्तम प्रतीचा व्यापार करणारा एक उद्योजक झाले पाहिजे हा निश्चय प्रत्यक्षात आणण्यासाठी अथक प्रयत्न केले. याचा प्रारंभ त्यांनी गूळ व्यापारास बाजारपेठ देण्यातून केला. कोल्हापूर संस्थानात गूळ चांगल्या प्रतीचा उत्पादन होईल; परंतु त्याची बाजारपेठ मात्र कोकणात राजापूरला होती. राजापुरी गूळ म्हणून प्रसिद्ध होता. राजर्षी शाहू महाराज यांनी ही बाजारपेठ आपल्या संस्थानात विकसित करण्यासाठी शाहूपुरी बाजारपेठ कोल्हापूरमध्येच विकसित केली. कागल, निपाणी येथील व्यापाऱ्यांना आमंत्रित करून राज्यावर येताच दुसऱ्याच वर्षी बाजारपेठ स्थापन केली, यासाठी व्यापारी वर्गास जागा व इतर सवलती देऊन व्यापारपेठ विकसित केली. अल्पावधीतच ५० लाखांचा गूळ व २० लाखांच्या भुईमूग शेंगा विकल्या गेल्या. तंबाखूची बाजारपेठ निपाणीत मोठी होती. आपल्या राज्यात अशी मोठी बाजारपेठ विकसित करण्याच्या उद्देशाने १९१७ मध्ये जयसिंगपूर येथे बाजारपेठ स्थापन केली. उत्तम नगर नियोजनाचा वापर करत विविध बाजारपेठा विकसित करत असतानाच अनेक नावीन्यपूर्ण; तसेच स्थानिक कच्चा माल वापरून तयार करणारे अनेक उद्योग राजर्षी शाहू महाराज यांनी सुरू केले आणि औद्योगिक महाराष्ट्राचा पाया घातला.

## सुगंधी तेल व मधुमक्षिका पालन

राजर्षी शाहू महाराजांना नावीन्यपूर्ण अभिनव संकल्पना आपल्या संस्थानाच्या आर्थिक भरभराटीसाठी कशा वापरता येतील, याचा ध्यास होता. यासाठी प्रथम आपल्या संस्थानात कोणत्या प्रकारची सुगंधी नैसर्गिक संसाधने आहेत याची त्यांनी पाहणी केली. यामध्ये सुगंधी तेल उद्योग, सुती कापड उद्योग, काष्ठार्क उद्योग सुरू केले. उद्योग सुरू करण्यासाठी प्रशिक्षित कुशल मनुष्यबळ लागते, यासाठी महाराजांनी आपली माणसे प्रशिक्षण घेण्यासाठी बाहेर पाठवली; तसेच बाहेरील प्रशिक्षणतज्ज्ञ आपल्या संस्थानात नेमली. जंगल संपत्ती विपुल प्रमाणात उपलब्ध होती. त्यावर कोणते उद्योग विकसित करता येतील याचा अभ्यास करण्यासाठी जपानमधून प्रशिक्षण घेतलेले डी.एस. शाळीग्राम यांची आपल्या संस्थानात इंडस्ट्रियल इन्स्पेक्टर म्हणून नेमणूक केली. यांच्या मार्गदर्शनाखाली प्रायोगिक तत्त्वावर सुगंधी औषधी तेल उद्योग व काष्ठार्क उद्योग सुरू करण्यात आले. मुंबई येथे भरलेल्या औद्योगिक प्रदर्शनात कोल्हापूर संस्थानात तयार झालेल्या तीन सुगंधीत औषधी तेलाचे नमुने पाठवण्यात आले होते. हे तेल इतकी उत्तम दर्जाची होती की त्या प्रदर्शनातील संस्थांना चांदीचे पदक देऊन गौरवण्यात आले. अशा प्रकारचा प्रयोग भारतातील कोणत्याही संस्थानात आजपर्यंत कोणी केला नाही, असे मत उत्पादनाचे परीक्षण करणाऱ्या तज्ज्ञांनी दिले होते. काष्ठार्क उद्योग हा सह्याद्रीच्या जंगलात मिळणाऱ्या झाडांच्या विविध पदार्थांचा वापर करून केला जातो. वनस्पती, लाकडाच्या भट्ट्या लावून लोणारी कोळसा, वेणीगर, डांबर तयार केले जायचे. त्याची गुणवत्ता तपासणीसाठी अमेरिका व जपान या देशातील प्रयोगशाळांकडे पाठवले जायचे. यातून शाहू महाराजांना गुणवत्तेचे किती महत्त्व आहे हे समजते. शेतकऱ्यांना जोडधंदा उपयुक्त ठरावा, यासाठी संस्थानात मधुमक्षिका पालन उद्योग सुरू करण्याचा प्रयत्न राजर्षींच्या कल्पक प्रयोगशीलतेचा उत्तम दाखला ठरतो. विशेष म्हणजे या व्यवसायाची जवळपास कुठेच माहिती नव्हती, त्यासाठी चिटणीस या अधिकाऱ्यास माहिती घेण्यासाठी कलकत्त्यास पाठवले. तरीदेखील महाराजांनी युरोपियन मित्राशी पत्रव्यवहार करून माहिती मिळवण्याचा प्रयत्न केला व शेवटी अनेक प्रयोग करून त्यात यश मिळवलेच.



## शाहू मिलची स्थापना

युरोपच्या दौऱ्यामध्ये राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी उद्योगांतूनच मोठी प्रगती होते हे महत्त्वाचे निरीक्षण केले होते. आपल्या संस्थानात असे मोठे उद्योग स्थापन करायचे हा निश्चय १९०६ साली शाहू छत्रपती मिल्स या कापड गिरणीच्या स्थापनेतून प्रत्यक्षात आणला. २० सप्टेंबर १९०६ रोजी दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर या प्रकल्पाचा प्रारंभ झाला. औद्योगिक प्रगतीचे सीमोल्लंघन करत रोजगार व उत्पादनाचे सोने वाटणारी ही मिल राजर्षींच्या कर्तृत्वाचा, दूरदृष्टीचा कोहिनूर म्हणावा लागेल. यासाठी मोठी जागा, पाणी, तसेच ५० हजारांचे भांडवल उपलब्ध करून दिले. शाहू मिलच्या स्वरूपात व्यापार तंत्रातील कौशल्य ही केवळ मुंबईची मक्तेदारी नाही हे सिद्ध झाले. हा उद्योग बडे गिरणी मालक अथवा धनी यांच्या ताब्यात जाणार नाही, यासाठी कोल्हापूरच्या लोकांनी सावध राहिले पाहिजे. असा सावधगिरीचा इशारा राजर्षींनी दिला होता. यातूनच त्यांचे संपत्ती समान वाटपावर लक्ष होते हे दिसून येते. या उद्योगातून शेकडो लोकांना रोजगार मिळाला व कापड उद्योगाच्या नकाशात कोल्हापूर ठळकपणे नोंदवले गेले.

राजर्षी शाहू महाराजांच्या व्यापक व उद्योगांच्या प्रोत्साहनामुळे शिरोळ, इचलकरंजी, गडहिंग्लज अशा ठिकाणी फॅक्टरीज स्थापन झाल्या. १९१२-१३ मध्ये ऑइल मिल, सॉ मिल, फाऊंड्री, इलेक्ट्रिक कंपनी, ट्रान्सपोर्ट कंपनी असे विविध उद्योग सुरू झाले. अशा उद्योगांना आवश्यक कुशल प्रशिक्षित मनुष्यबळ संस्थानात तयार व्हावे, यासाठी राजाराम इंडस्ट्रियल स्कूल स्थापन करण्यात आले. आधुनिक साधनांची माहिती व प्रसार यासाठी राजाराम इंडस्ट्रियल स्कूलच्या वतीने औद्योगिक प्रदर्शन भरवण्यात आले. संस्थानातील व्यापारी उद्योजक यांना अडचणीच्या प्रसंगी अल्प मुदतीची कर्जे देखील देण्याची व्यवस्था करण्यात आली.

## शाहूंच्या व्यापारी उद्योग धोरणांचा अन्वयार्थ

औद्योगिक प्रगती हेच शाश्वत व दीर्घकालीन प्रगतीचे इंजिन असते हे सूत्र ओळखून राजर्षी शाहू महाराज यांनी आपल्या संस्थांनात जे उद्योग व्यापार वाढीसाठी प्रयत्न केले, ते आजही धोरणकर्त्यांना मार्गदर्शक आहे. महासत्ता म्हणून उदयास आलेली चीनची अर्थव्यवस्था व्यापार-उद्योग धोरणात शाहू महाराजांच्या विचारांची अंमलबजावणी दिसते. भारताचे महासत्ता बनण्याचे स्वप्न पूर्णत्वास न्यायचे असेल तर त्यांचे धोरण हे बहुआयामी होते हे लक्षात येईल. त्यांनी उद्योग-व्यापारांना प्रोत्साहन देताना स्वस्त, भांडवल, जमीन, पाणी, पतपुरवठा यासोबत कुशल कामगार मिळावे, त्यासाठी तंत्रशाळा काढल्या. व्यापक पाहणीच्या आधारे कोणते उद्योग सुरू करता येतील, याचा आराखडा तयार केला व आपले संस्थान औद्योगिक प्रगतीत अग्रेसर व्हावे, यासाठी सर्व बाजूंनी प्रयत्न केले. ही शाहूनीती केवळ महाराष्ट्राचेच नव्हे तर देशाचे औद्योगिक प्रगतीत रूपांतर करू शकेल.

(माजी विभागप्रमुख (अर्थशास्त्र) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर)

**छत्रपती शिवाजी महाराज यांच्या रयतेच्या कल्याणाचे धोरण ब्रिटिश कालखंडात भारतात ज्या संस्थानिकांनी राबवले, त्यामध्ये कोल्हापूरच्या राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे नाव अग्रस्थानी आहे. खरेतर ब्रिटिश कालखंडामध्ये १८९६-९७ साली पडलेल्या भीषण अशा दुष्काळामध्ये भारतभरातील १० लाखांहून अधिक लोक हालहाल होऊन मृत्युमुखी पडले होते; परंतु महाराष्ट्रातील करवीर संस्थानामध्ये मात्र तशी परिस्थिती निर्माण झाली नाही. कारण तेथे राजर्षी शाहू महाराज यांच्यासारखा दूरदृष्टी असलेला, जनतेच्या कल्याणाची आस असलेला राज्यकर्ता सत्तेवर होता.**

# दुष्काळ निवारणाचे कार्य

**प्रा. डॉ. चंद्रकांत चव्हाण**


भारतातील पर्जन्यमान नेहमीच बेभरवशाचे राहिले आहे. त्यामुळे या देशात कधी दुष्काळ तर कधी अतिवृष्टी अशा अनेक घटना इतिहासात आपणास आढळून येतात. अशा नैसर्गिक आपत्तीच्या काळात राजसत्ता जनतेच्या कल्याणाचा विचार करताना आपणाला आढळत नाही. अनेकदा अशा दुष्काळांमध्ये जनता ही अन्न पाण्याविना हालहाल होऊन मेलेली आढळते. मंगळवेढ्याच्या संत दामाजी पंतांचे उदाहरण आपणा सर्वांनाच माहीत आहे. बिदरच्या बादशाहने अशाच पडलेल्या दुष्काळामध्ये जनतेस अन्नधान्य उपलब्ध करून दिले नाही. तेव्हा या विठ्ठलभक्ताने आपल्याकडे असलेल्या गोदामाच्या अधिकाराचा वापर करून ही गोदामे जनतेकरता खुली केली. त्याबद्दल त्यांना बादशाहाकडून शिक्षाही झाली. मध्ययुगातील हे उदाहरण अत्यंत बोलके आहे. हीच परिस्थिती देशातील बहुतांश राज्यांमध्ये होती. छत्रपती शिवाजी महाराजांच्यासारखा जाणता राजा ज्या वेळेला महाराष्ट्रामध्ये निर्माण झाला, तेव्हा त्यांनी जनतेच्या कल्याणाला प्राधान्य दिले. खुद्द छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्मावेळी महाराष्ट्रात प्रचंड मोठा दुष्काळ पडला होता. अनेक माणसे व जनावरे अन्न पाण्याविना तडफडून मेली होती. दुष्काळासारख्या नैसर्गिक संकटांमध्ये आपल्या रयतेच्या जीविताचे रक्षण कसे होईल, याकरिता महाराजांनी प्रयत्न केले.

## दुष्काळी भागात भेट

प्रत्यक्षात १८९४ सालापासूनच राजर्षी शाहू महाराज यांच्या हाती कोल्हापूर संस्थानाची सत्ता आली. शाहू महाराज अवघे २० वर्षांचे होते, तेव्हा कोल्हापूरमध्ये नैसर्गिक आपत्तीने काहूर माजवले. संस्थानातील दुष्काळाच्या बातम्या त्यांच्या कानी येऊ लागल्या. तेव्हा ऐकीव बातम्यांवर न थांबता १८९६ मध्ये शाहू महाराज यांनी गडहिंग्लज, रायबाग, कटकुळ या भागांना भेटी दिल्या. इतकेच नाही तर ज्या भागांमध्ये पाऊस कमी पडतो आणि जिथे अन्नधान्याची वानवा आहे अशा ठिकाणीही भेटी दिल्या.

## प्रशासकीय योजनांची अंमलबजावणी

करवीर संस्थानची परिस्थिती अत्यंत दयनीय बनली होती. अन्नधान्याच्या किमती वाढत होत्या. अशा वेळेला या अन्नधान्यांच्या किमती आटोक्यात कशा राहतील, सामान्य नागरिकाला अन्नधान्य खरेदी कसे करता येईल, याकरिता आपण काय करावे याचा विचार त्यांनी केला. त्यांनी जवळून लोकांची गरिबी पाहिली. अन्न, पाणी नसल्याने निर्माण झालेली दयनीय स्थिती बघितली आणि मग या दुष्काळावर मात करण्यासाठी अनेक प्रकारच्या योजना आखण्याचे धोरण त्यांनी अवलंबले. त्याकरिता त्यांनी प्रशासकीय योजना आखून जनतेला धान्य कमी किमतीत कसे मिळेल, याकरिता मोठ्या प्रमाणावर प्रयत्न केले. अन्नधान्याच्या किमती ज्या व्यापाऱ्यांनी वाढवल्या, त्याच दुकानदारांना, व्यापाऱ्यांना त्यांनी आपलेसे केले. त्यांना विश्वासात घेऊन खरेदी किमतीमध्ये मालाची विक्री करावी, असे आवाहन केले. फायद्याचे प्रमाण कमी ठेवा. प्रसंगी तोट्यामध्ये मालाची विक्री करा आणि जनतेला अन्नधान्य उपलब्ध करून द्या. तुम्हाला जो काही तोटा होईल, तो तोटा संस्थानाकडून भरपाई करून दिला जाईल, असे आश्वासन त्यांनी या व्यापाऱ्यांना, दुकानदारांना दिले. त्यामुळे १८९७ मध्ये प्रचंड वाढलेल्या किमती १८९८ मध्ये मात्र वाढल्या नाहीत. महाराजांच्या प्रेरणेतून कोल्हापूरमध्ये स्वस्त धान्याचे दुकान काढले गेले. अनेक



ठिकाणी ना नफा ना तोटा या तत्त्वावर अन्नधान्य विकले जाऊ लागले. दरबारातून तोटा झालेल्या व्यापाऱ्यांना त्यांचा तोटा भरून काढण्यासाठी पैसे देण्यात येऊ लागले. यामुळे सामान्य मजूर, शेतकरी, शेतमजूर यांना अन्नधान्य उपलब्ध होऊ शकले. शाहू महाराज यांनी व्यापाऱ्यांना बिनव्याजी रकमा देऊन आजूबाजूच्या प्रांतातून अन्नधान्य खरेदी करण्यास सांगितले. काही ठिकाणी व्यापाऱ्यांचे मन वळवून त्यांना स्वस्त भावात धान्य विकण्यास सांगितले. इतकेच नाही, तर १८९६-९७, १८९९-१९०० या वर्षी महाराजांनी खुद्द म्हैसूरच्या राजाला पत्र लिहून धान्याची आयात केली.

## नवीन विहिरी खोदल्या

१८९६-९७ मध्ये पडलेल्या दुष्काळात लोकांना पिण्यास पाणी मिळेनासे झाले. त्यावेळेला त्यांनी नदीच्या गावाजवळ दरबारच्या खर्चाने व लोकांच्या मदतीने नवीन विहिरी खोदण्याचे काम हाती घेतले. विहिरीतील गाळ काढून विहिरी खोलगट करणे किंवा तिचा आकार वाढवणे यासाठी त्यांनी प्रयत्न केले. वडगाव, रूकडी, शिरोळ यांसारख्या ठिकाणी नवीन तलाव बांधण्याच्या व जुने तलाव दुरुस्त करण्याच्या कामाला शाहू महाराजांनी सुरुवात केली.

## पायाभूत सुविधांची निर्मिती

दुष्काळाच्या काळात लोकांच्या हाताला काम मिळेनासे झाले. त्यामुळे उत्पन्न नाही, उत्पन्न नसल्याने अन्नधान्यदेखील त्यांना खरेदी करता येत नव्हते. अशा वेळेला अनेक सार्वजनिक उपयोगाची कामे राजर्षी शाहू महाराजांनी सुरू करून लोकांच्या हाताला काम मिळवून दिले. त्याबरोबरच या सार्वजनिक कामांमुळे भविष्यात संस्थानाच्या प्रगतीस ही कामे उपयुक्त होतील याकडेही लक्ष दिले. दुष्काळाच्या काळात एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी अन्नधान्य पाठवण्यासाठी चांगल्या रस्त्यांची, नदी व ओढ्यावरच्या पुलांची आवश्यकता होती. महाराजांनी दुष्काळाच्या काळात अनेक रस्ते बांधले. निपाणी - दाजीपूर रस्त्यावरचे तीन मोठे पूल दुष्काळाच्या काळातच बांधून घेतले. ब्रिटिशांच्या हद्दीतून जाणाऱ्या रस्त्यांकरिता त्यांची विशेष परवानगी घेतली. अनेक कच्चे व पक्के रस्ते बांधले. पन्हाळा व कळकोट पेट्यात दुष्काळाची तीव्रता ही अधिक होती. म्हणून तेथे मोठ्या प्रमाणावर रस्ते बांधण्याचे काम हे शाहू महाराजांनी हाती घेतलेले आपल्याला दिसून येते.

## दुष्काळ निवारणाची कामे

दुष्काळाच्या काळात दरबारच्या कमी पगार असणाऱ्या कर्मचाऱ्यांना त्यांनी १ नोव्हेंबर १८९६ पासून दुष्काळी भत्ता द्यायला सुरुवात केली. ३१ मे १९०० पर्यंत जवळजवळ १५,२६७ रुपये कोल्हापूर दरबारातून दुष्काळी भत्त्यावर खर्च केले होते. इतकेच नाही तर शिक्षकांनासुद्धा धान्याच्या स्वरूपात दुष्काळी भत्ता शाहू महाराज यांनी दिला.

महाराजांनी दिवाणाच्या ऑफिसमध्येच खास दुष्काळी कचेरी काढली. निरनिराळ्या मामलेदार कचेऱ्यांतही दुष्काळी विभाग महाराजांनी सुरू केले. दुष्काळी कामासाठी लागणाऱ्या सर्व वस्तू, अवजारे त्यांनी मोठ्या प्रमाणावर खरेदी केली. या सर्व कचेऱ्यात विकत घेतलेली अवजारे व उपकरणे यांच्यावर एका वर्षी २६,१६४ रुपये इतका खर्च आलेला होता. यावरून शाहू महाराज दुष्काळ निवारणाच्या कामाबाबत किती गंभीर होते हे आपल्या लक्षात येते.

शाहू महाराज दुष्काळी कामांची देखरेख करत असताना त्यांना लक्षात आले की, अनेक तरुण स्त्री पुरुष हे दुष्काळी कामावर काम करीत आहेत. कामावर येताना ते आपल्या लहान मुलांना सोबत घेऊन येतात. ही लहान मुले झाडाखाली झोपलेली, रडत बसलेली शाहू महाराजांनी पाहिली. त्यांच्या देखरेखीकरिता कोणीही मोठा माणूस नाही हे त्यांनी पाहिले. तेव्हा शाहू महाराजांनी दरबारच्या खर्चाने या लहान-लहान मुलांचा सांभाळ करण्यासाठी आयांची नेमणूक केली. या मुलांना सांभाळण्यासाठी ठिकठिकाणी शेड्स उभे केले. मुलांची होणारी गैरसोय दूर केली.

### काम तसे दाम

शाहू महाराजांनी कटफळ, पन्हाळा, बांबवडा बाजार, भोगाव, गारगोटी, वळीवडा, चिरवडा, गडहिंग्लज व कोल्हापूर या ठिकाणी गरिबांसाठी आश्रम स्थापन केले. ४८,७८५ भुकेल्या लोकांची जेवणाची सोय इथे केली. त्यांना मोफत कपडे, औषधे पुरवली. १८९९-१९०० सालात वडगाव व शिरोळ या ठिकाणी गरिबांसाठी आणखी दोन आश्रम त्यांनी उघडले. म्हातारे, आंधळे, पांगळे, दीनदुबळ्यांसाठी शिधावाटप केंद्रे त्यांनी सुरू केली. दुष्काळी कामे सुरू असताना 'काम तसे दाम' हे धोरण शाहू महाराजांनी अवलंबले. जो जितके काम करेल त्याला तितके दाम मिळेल. कामगारांच्या गटाने जितके काम केले असेल, त्या प्रमाणात त्यांना वेतन देण्यास सुरुवात केली.

## जनावरांसाठी चाऱ्याची सोय

दुष्काळात सर्वाधिक हाल होतात ते मुक्या जनावरांचे. राजर्षी शाहू महाराज यांचे त्याकडेही लक्ष होते. दुभती जनावरे जगली पाहिजेत, हा त्यांचा दृष्टिकोन होता. त्यांनी एक जाहीरनामा काढून असे सांगितले की, 'ज्याला आपली जनावरे पोसण्याचे सामर्थ्य नाही. त्याने ती संस्थानाच्या थट्टीत पाठवावीत. तेथे ती पाळली जातील व जेव्हा मालकाला जरुरी वाटेल तेव्हा त्याने आपली जनावरे परत न्यावीत'. दुष्काळाच्या काळात अन्नधान्याबरोबरच गवताच्या व कडब्यांच्या किमतीत भरमसाठ वाढ झालेली होती. त्यामुळे जनावरे पोसणेदेखील रयतेस शक्य राहिले नव्हते. हाडांचा सापळा झालेली ही जनावरे जिकडे तिकडे त्यांना दिसू लागली. तेव्हा त्यांनी स्वस्त दराने गवत विकण्याची तजवीज केली. इतकेच नव्हे तर, जनावरांकरिता संस्थानाची कुरणे व जंगलेही त्यांनी मोफत उपलब्ध करून दिली. शाहू महाराजांनी दुष्काळाच्या काळात अशी अनेक कामे केली, परंतु हा दुष्काळ शेतकऱ्यांच्या पाचवीला पुजलेला असतो. त्याचे कायमस्वरूपी निवारण कसे होईल व रयत सुखात कशी राहील, याकरिता दीर्घकालीन अशा प्रकारच्या योजना राबवणे आवश्यक आहे, या गोष्टीची जाणीव शाहू महाराजांना झाली.

## सार्वजनिक पाटबंधारे धोरण

१९०२ साली शाहू महाराज इंग्लंडला सातव्या किंग एडवर्डच्या राज्याभिषेकाला गेलेले होते. या दौऱ्यात त्यांनी युरोपातील अनेक राष्ट्रांना भेटी दिल्या. तेथील औद्योगिक प्रगती पाहिली. तेथील नद्यांवरील धरणे, कालव्यातून शेतीला घेतलेले पाणी, त्यांनी व्यापारामध्ये मारलेली भरारी या सगळ्या गोष्टी त्यांनी जवळून पाहिल्या. हे सर्व आपल्या राज्यात का होऊ नये, असे त्यांना वाटत होते आणि म्हणूनच आपल्या राज्यातील रयतेच्या सुखाकरिता व दुष्काळ निवारण हे कायमस्वरूपी व्हावे, याकरिता अनेक दूरगामी धोरणे शाहू महाराजांनी आखली. १९०२ साली शाहू महाराजांनी करवीर संस्थानासाठी अपूर्व असे सार्वजनिक पाटबंधारे धोरण जाहीर केले. त्यासाठी स्वतंत्र पाटबंधारे खाते निर्माण केले. त्यावर इरिगेशन ऑफिसर म्हणून शंकर सीताराम गुप्ते या अधिकाऱ्याची नियुक्ती केली. नव्या जुन्या विहिरी, छोटे-मोठे तलाव, लहान मोठे बंधारे यांच्या नोंदी करून घेऊन त्यांच्या दुरुस्तीची कामे हाती घेण्यात आली.

## राधानगरी धरण प्रकल्प

सह्याद्रीच्या माथ्यावर धो-धो पाऊस पडतो. पावसाळ्यात तिथून उगम पावणाऱ्या नद्या या दुथडी भरून वाहतात; परंतु पावसाळा संपला की, नद्या कोरड्या पडतात आणि लोकांना पिण्यास पाणीही मिळेल की नाही अशी परिस्थिती होती. त्यातच दुष्काळ पडल्यास अत्यंत वाईट परिस्थिती निर्माण होते. म्हणून अशा काळात जनतेस पाणी उपलब्ध व्हावे, यासाठी शाहू महाराज यांनी एक दूरदर्शी योजना आपल्या संस्थानात राबवली. १९०७ साली मिट्टर या इंजिनीयरची नियुक्ती करून महाराजांनी भोगावती व दूधगंगा नदीवरील तलावांचे सर्वेक्षण करून घेतले. त्यातूनच राधानगरी धरण प्रत्यक्षात आले. राधानगरी धरणाच्या प्रत्यक्ष प्रकल्पाची योजना दाजीराव अमृतराव विचारे यांनी १९०९-१९१० साली दरबारापुढे मांडली. राधानगरी धरणाचे गुप्ते, मिट्टर व मुख्यतः राजर्षी शाहू महाराज यांचे बंधू बापूसाहेब यांच्या मार्गदर्शनाखाली या योजनेचे काम चालले. १९०९ साली धरणाचे प्रत्यक्ष बांधकाम सुरू झाले. १९१८ पर्यंत या बांधकामावर १४ लाख रुपये खर्ची पडले होते. शाहू महाराजांच्या काळात सुरू झालेले हे काम पुढे राजाराम महाराजांच्या कालखंडामध्ये पूर्णत्वास गेले. राधानगरी धरणाने कोल्हापूरचा चेहरा-मोहरा बदलला. त्यामुळे शाहू महाराजांना हरितक्रांतीचे जनक असेही म्हटले जाते.

राजर्षी शाहू महाराज यांनी रूकडी, वडगाव, शिरोळ, अतिग्रे, सातवे, जोतिबा हील इत्यादी निरनिराळ्या ठिकाणी लहान मोठे २० हून अधिक तलाव बांधले. नव्याने विहिरी तयार करण्याकडे व जुन्या विहिरी खोल करण्याकडे, त्यातील गाळ काढण्याकडे त्यांनी लक्ष दिले. पक्क्या व कच्च्या विहिरी जितक्या जास्त बांधता येतील तितक्या बांधण्याकडे शाहू महाराज यांनी लक्ष दिले. १९०५-१९०६ या कालावधीत ११,७०० इतकी विहिरींची संख्या होती. ती १९२०-२१ या वर्षापर्यंत १२,८०० इतकी झाली. सन १९१५-१६ च्या अहवालावरून असे दिसते की, नद्यांपासून ३९,७८३ एकर, विहिरींपासून ३९,८४५ एकर आणि तलावांपासून २३२ एकर असे एकूण ७९,८६० एकरांना पाणीपुरवठा होऊ लागला होता.

राजर्षी शाहू महाराज यांनी अनेक ठिकाणी कच्चे रस्ते बांधून पक्के करून घेतले. इतकेच नाही, तर नद्यांवर मोठ-मोठे पूल बांधले. निपाणी दाजीपूर रस्त्यावर तीन पूल बांधून घेतले एका ठिकाणी भरपूर पिकलेले धान्य दुष्काळ पडलेल्या दुसऱ्या भागाकडे वळवणे या रस्त्यांच्या बांधणीमुळे शाहू महाराज यांना शक्य झाले. शाहू महाराजांनी शेती सुधारणेकडे लक्ष दिले. शेतकऱ्यांना विहीर खोदण्यासाठी, बी बियाणे विकत घेण्यासाठी बैल व अवजारे घेण्यासाठी अल्प व्याजाने कर्जे दिली. दुष्काळ जरी निसर्गनिर्मित असला, तरी मानवी प्रयत्नाने त्याचे बऱ्याच अंशी उच्चाटन करता



येते, यावर त्यांचा विश्वास होता. सुधारित शेती पद्धती जर शेतकऱ्यांनी अंगीकारली तर शेतीतून उत्पन्न वाढेल, पाण्याचा पुरेपूर वापर केल्यास आपोआप उत्पादन वाढल्याने दुष्काळाच्या काळात अन्नधान्याचा साठा त्यांच्याकडे उपलब्ध राहील. म्हणून एखाद्या वर्षी दुष्काळ पडला तरी त्याची झळ जनतेला फारशी बसणार नाही. त्याकरिता शेतकऱ्यांनी आधुनिक शेती पद्धतीचा अवलंब करावा म्हणून शाहू महाराज यांनी आधुनिक शेतीची माहिती शेतकऱ्यांना व्हावी, याकरिता शेतीची प्रदर्शने भरवली.

राजर्षी शाहू महाराज यांच्या दूरदर्शी नेतृत्वामुळेच कोल्हापूरचा कायापालट झाला. आजही देशातील दरडोई उत्पन्न अधिक असणारे असे हे शहर आहे. देशात दुष्काळ पडल्यानंतर या दुष्काळाच्या झळा जनतेस भोगाव्या लागतात. त्या आजही कोल्हापुरातील जनतेस तितक्या तीव्रतेने भोगावे लागत नाहीत. शाहू महाराज यांच्या शेतकऱ्यांसाठीच्या दूरगामी योजना या कोल्हापूरला कृषी क्षेत्रात विकासाच्या वाटेवर घेऊन जाणाऱ्या ठरल्या आहेत. शाहू महाराज यांनी कोल्हापूर संस्थानामध्ये केलेल्या उपाययोजना या आजही देशास दुष्काळ निवारणार्थ दिशादर्शक आहेत.

**(लेखक वालचंद कला व विज्ञान महाविद्यालय, सोलापूर येथे प्राध्यापक आहेत.)**

**महाराष्ट्राच्या सांस्कृतिक घडणीमध्ये शाहू महाराजांचे योगदान अग्रणी आहे. साहित्य, कला, संगीत, गायन, वादन, अशी विविध क्षेत्रे राजर्षींच्या व्यक्तिमत्त्वातून पुढे आली आहेत. कलाक्षेत्राला जिवंत आणि लोकाभिमुख करण्यामध्ये शाहू महाराजांचा मोलाचा वाटा आहे. राजर्षी शाहू महाराज हे कलावंत, शाहीर, चित्रकार, यांचे आश्रयदाते व गुणीजनांचे चाहते होते.**

# कलावंतांचा आधारवड

**जयसिंग पाटील**

समाजजीवन रसरशीत व्हायचे असेल, तर कला आणि क्रीडागुणांची जोपासना झाली पाहिजे. उत्तर हिंदुस्थानी संगीतातील गौरीशंकर मानले जाणारे अल्लादिया खाँ यांच्यापासून ते मराठी रंगभूमी गाजविणारे आण्णासाहेब किर्लोस्कर, दत्तोपंत हल्याळकर, गणपतराव जोशी, बालगंधर्व, केशवराव भोसले, चित्रमहर्षी बाबुराव पेंटर, आनंदराव पेंटर, संगीतकार गोविंदराव टेंबे, चित्रतपस्वी आबालाल रहिमान, शाहीर लहरी हैदर ही केवळ शाहूकालीन नावे नव्हेत, तर कोल्हापूर संस्थानच्या इतिहासातील स्वतंत्र प्रकरणे आहेत. चित्रपट अभिनेते बाबुराव पेंढारकर यांच्या 'चित्र आणि चरित्र' या आत्मचरित्रामध्ये शाहू महाराजांनी कोल्हापूरच्या भूमीत केशराचा मळा फुलवला असा गौरव करतात. तो अनेक अर्थांनी सार्थ वाटतो.



## शाहू महाराज आणि अल्लादिया खाँ

१८९५ च्या दरम्यान उत्तर भारतातील अल्लादिया खाँ हे शाहू दरबारी गायक म्हणून राहिले होते. खाँ साहेबांना शाहू महाराजांच्या परिवारात मानाचे स्थान होते. शाहू महाराज आणि अल्लादिया खाँ यांचे नाते हे मैत्रीचे नाते होते. ते कधीच धन्याच्या नात्याने वागायचे नाही. बाळाबाई उर्फ बाकाबाई बांदोडकर या अल्लादियाँच्या शिष्या. त्या कोल्हापूरच्या दरबारात गायिका व नर्तकी होत्या. १९०१ च्या दरम्यान अब्दुल करीम खाँ कोल्हापूरला आले. त्यांचा सहा महिने मुक़ाम होता. या काळात ते गायनाच्या शिकवण्या करीत. गोव्यातल्या केरीहून नऊ वर्षांच्या केसरबाईंना त्यांचे मामा गाणे शिकण्यासाठी म्हणून कोल्हापूरला घेऊन आले. सहा महिने करीम खाँ यांच्याकडे त्या गाणे शिकल्या. ते केसरबाईंचे पहिले गुरू. केसरबाईंना नंतरच्या काळात अल्लादिया यांच्या शिकवणीचा लाभ झाला. १९३८ मध्ये विश्वविख्यात कवी रवींद्रनाथ टागोर यांनी 'सूरश्री' म्हणून ज्यांचा गौरव केला याच त्या केसरबाई केरकर. पंडित भास्करबुवा बखले, मंजीखाँ, सूरश्री केसरबाई केरकर, महाराष्ट्रकोकीळ शंकरराव सरनाईक, मोगुबाई कुर्डीकर ही शिष्यांची नावेच अल्लादिया खाँ गुरू म्हणून काय क्षमतेचे होते, हे सिद्ध करण्यास पुरेशी आहेत. अल्लादिया खाँसाहेबांनी २७ वर्षे कोल्हापूर संस्थानात सेवा केली. नंतर उर्वरित आयुष्यात त्यांनी कुठेही चाकरी केली नाही. १९०५ च्या दरम्यान अंजनीबाई मालपेकर यांचे गायन शाहू महाराजांनी आपल्या राजवाड्यात प्रथम ऐकले. त्यांच्या दैवी तेजाने आणि गायनाने महाराज मंत्रमुग्ध झाले. त्या दिवसापासून महाराज त्यांच्या गायनाचे चाहते बनले.

## नाट्यप्रेमी राजा

शाहू महाराजांच्या संस्थानात सुमारे सहाशेच्यावर कलावंत होते. पहिली नाटक कंपनी नारायणराव कारखानीस यांनी काढली. त्यातूनच नंतर नरहरबुवा सरडे यांनी नरहरबुवा कोल्हापूरकर नाटक मंडळी स्थापन केली. नरहरबुवा हे एक विलक्षण नट होते. तंजावर, काशी, मद्रास, हैद्राबाद अशा ठिकाणी त्यांच्या कंपनीचे प्रयोग व्हायचे. महाराजांना या नटाचा अभिमान होता. १७ मार्च १८८४ ला महाराजांचा दत्तकविधी झाला. त्या वेळी राजाराम कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांनी रोमिओ - ज्युलिएट या नाटकाचा भाषांतरित प्रयोग शशिकला - रत्नपाल नावाने सादर केला होता. नाटक कंपन्यांच्या येण्या-जाण्याचा, राहण्याचा, जेवणाचा सर्व खर्च शाहू दरबारातून होई. एखादे किराणा मालाचे दुकानच या कंपन्यांना लावून दिले जात असे. एका कंपनीला आठवड्याला बदामाचे एक पोते आणि दोन आंबेमोहर तांदळाची पोती दिल्याची दरबारी खात्यात नोंद आहे. यावरून महाराज किती उदारहस्ते नाटक कंपन्याना मदत करत हे दिसून येते. गणपतराव जोशी हे महाराजांचे आवडते नट होते. त्यांचे 'हॅम्लेट' हे नाटक त्याकाळात खूप गाजलेले होते. गणपतराव लांब शेंडी ठेवून हॅम्लेटची भूमिका करायचे. महाराजांनी युक्तीने नाभिकाकडून ही शेंडी कापून टाकली. गणपतराव महाराजांकडे तक्रार घेऊन गेले. तर महाराज म्हणाले, 'आरं गण्या, हॅम्लेट बामनाच्या पोटचा हुता काय.' त्यानंतर गणपतरावांचा हॅम्लेट बोडक्यानेच रंगमंचावर वावरू लागला. हा प्रसंग शाहू महाराजांच्या नाट्यजाणिवेचे, मोकळ्या

मनाचे दर्शन घडवतो.

जनुभाऊ निमकर यांची स्वदेशहितचिंतक ही नाट्यसंस्था. वयाच्या चौथ्या वर्षी केशवराव भोसले या नाट्यसंस्थेत मोठ्या भावासह दाखल झाले. केशवराव भोसले यांच्यावर महाराजांचे विशेष प्रेम होते. १९१६ मध्ये केशवरावांची कंपनी कोल्हापूर मुक्कामी असताना त्यांच्या अनेक नाटकांचे प्रयोग महाराजांनी करवून घेतले. ही नाटके महाराजांना आवडली. या मुक्कामात महाराजांकडून केशवरावांना १० हजार रुपये मिळाले. मानसन्मानही मिळाला. पॅलेस थिएटरच्या मागे 'मृच्छकटिक' या नाटकाचा प्रयोग केशवरावांनी केला. त्याला २५ हजार लोक उपस्थित होते. हा खेळ महाराजांनी मोफत ठेवला होता. १९२१ मध्ये टिळक फंडासाठी केशवराव व बालगंधर्व यांनी संयुक्त 'मानापमान' नाटकाचा प्रयोग केला. त्यानंतर काही दिवसांतच केशवराव भोसले या संगीतसूर्याचा अस्त झाला. पुणे मुक्कामी आजारी असताना महाराज जातीने केशवरावांना भेटायला गेले होते. त्यावरून ते आपल्या आवडीच्या नटावर किती प्रेम करत होते हे दिसून येते. 'कुंजविहारी' हे वरेरकर यांचे गाजलेले नाटक. त्यांनी ते शाहू महाराज यांना अर्पण केले आहे. निमकर यांची स्वदेश हितचिंतक मंडळी या नाटकाचे प्रयोग सादर करत असे. वरेरकर शाहू महाराजांना भेटले, तेव्हा शाहू महाराज म्हणाले होते, 'माझा केशा स्वतः उभा राहिला आहे. त्याला एक नाटक लिहून द्या. केशा म्हणजे तळपती तलवार आहे. ती हाती लागली तर तुम्ही जग जिंकाल.' शाहूराजांचे हे विधान दूरदृष्टीचे ठरले.

दत्तोपंत हल्याळकर हेसुद्धा केशवराव भोसले यांच्यासारखेच गुणी नट होते. शाहू महाराज यांच्या सल्ल्यावरून त्यांनी महालक्ष्मी प्रासादिक नाटक मंडळी या कंपनीची स्थापना केली. १९०८ मध्ये अक्कासाहेब महाराज यांच्या विवाह सोहळ्यानिमित्ताने दत्तोपंतांनी 'शापसंभ्रम' व 'मृच्छकटिक' या नाटकांचे खेळ केले. दत्तोपंतांवर महाराजांचे इतके प्रेम होते की, वाड्यावर पंक्तीभोजनाचा लाभ या नटाला मिळत असे. १९१६ मध्ये दत्तोपंत वारले, तेव्हा अश्रुभरल्या डोळ्यांनी माझा खरा पुंडलिक आज गेला, असे महाराज म्हणाले. बालगंधर्व यांच्या जडणघडणीमध्येही महाराजांचे योगदान आहे. १९१३ मध्ये किर्लोस्करमधून बालगंधर्व बाहेर पडले आणि त्यांनी स्वतःची गंधर्व नाटक मंडळी स्थापन केली. मात्र किर्लोस्कर फुटू नये, यासाठी महाराजांनी खूप प्रयत्न केले. गंधर्व नाटक मंडळीला राजाश्रय देण्याची महाराजांची इच्छा होती. बालगंधर्व यांच्यावर अखेरपर्यंत महाराजांची कृपादृष्टी राहिली होती. १९०२ साली महाराज परदेशात गेले असताना त्यांनी रोम येथील कुस्ती मैदाने आणि नाट्यगृहे पाहिली. त्यातूनच त्यांनी कुस्तीचे खासबाग मैदान, पॅलेस थिएटर हे नाट्यगृह बांधले. १९१३ साली पॅलेस थिएटरचे बांधकाम सुरू झाले. १९१५ साली युवराज राजाराम महाराज यांच्या हस्ते त्याचे उद्घाटन झाले. पॅलेस थिएटर आज संगीतसूर्य केशवराव भोसले नाट्यगृह या नावाने ओळखले जाते.

## चित्रपटकलेचा आश्रयदाता

रंगभूमीवर नेपथ्याच्या क्षेत्रात आनंदराव आणि बाबुराव पेंटर यांनी अनेक प्रयोग केले. त्यांचे पडदे इतके जिवंत वाटत की, रंगभूमीवर पात्राने प्रवेश करण्याअगोदर पडद्याला टाळ्या पडत असत. या पेंटरबंधूंनी सिनेमाच्या क्षेत्रात पाऊल टाकले. डेक्कन सिनेमा आणि महाराष्ट्र सिनेमा या चित्रपट थिएटरच्या माध्यमातून लोकांना सिनेमाचा नाद लावला. त्याही पुढे जाऊन बाबुराव पेंटर यांनी कॅमेरा तयार करून सैरंध्री चित्रपट तयार केला. तेथून पुढे भारतीय चित्रपटाच्या इतिहासात कोल्हापूरच्या सिनेमाने सोनेरी पान लिहिले. १९९० पर्यंत कोल्हापूरच्या भूमीने अनेक कलावंत, अभिनेते तयार केले. बाबुराव पेंटर यांचे शिष्य व्ही शांताराम, विष्णुपंत दामले, एस. फत्तेलाल यानी प्रभात फिल्म कंपनीच्या माध्यमातून अनेक लोकप्रिय चित्रपट निर्माण केले. प्रभातची स्थापना कोल्हापूरमध्ये झाली. १९३२ च्या दरम्यान बाबुराव पेंटर यांची महाराष्ट्र फिल्म कंपनी बंद पडली. या फिल्म कंपनीला शिवाजी थिएटरची जागा शाहू महाराजांनी दिली होती. नंतरच्या काळात कोल्हापूर सिनेटोन (जयप्रभा स्टुडिओ) आणि शालिनी सिनेटोन हे दोन स्टुडियो कोल्हापूर संस्थानच्या मदतीने कार्यरत राहिले. भालजी पेंढारकर, मा. विनायक, अनंत माने, गोविंद कुलकर्णी यांच्यासारखे दिग्दर्शक, चंद्रकांत, सूर्यकांत, अरुण सरनाईक यांच्यासारखे अभिनेते कोल्हापूरच्या मातीत तयार झाले. लता मंगेशकर, आशा भोसले यांचे बालपण, चित्रपट गायनाचा श्रीगणेशा कोल्हापूरच्या मातीतच झाला. या सगळ्या इतिहासामागे शाहू महाराज यांचे कलाप्रेमच कारणीभूत असल्याचे दिसते.

### शाहू महाराजांचे शाहिरी प्रेम

शाहू महाराजांनी आपल्या संस्थानातील शाहीर विठ्ठल बिराजे डोणे, शाहीर रामचंद्र नरहर माळी, शाहीर लहरी हैदर, जंगली मुजावर, शाहीर ईश्वरा माळी अशा अनेक शाहिरांना उदार आश्रय दिलेला होता. शाहू महाराजांचा सत्यशोधकी जलसेवाले, तमासगीर, लोककलावंत यांच्याकडेही ओढा होता. यातल्या अनेक कलावंतांना दरबारात बोलावून महाराजांनी त्यांचे कौतुक केले. महाराजांच्या सोनतळी कॅम्पवर अनेक जलसे व तमाशे आयोजित केले जात. महाराज बिदागी देऊन त्यांचा गौरव करत होते. खेड्यापाड्यातील बहुजन समाजाला जागे करण्याचे काम सत्यशोधक जलशांनी केले. शाहू महाराजांच्या कार्याला हे सत्यशोधक जलसे पूरक होते. धार्मिक रूढीतला फोलपणा, लग्नकार्यातील अनावश्यक खर्च अशा अनेक विषयांवर प्रहसनपर भाष्य करणारे हे जलसे होते. महात्मा फुले यांच्या सत्यशोधक समाजाच्या विचारांचा आधार या जलशांना होता. शाहू महाराजांनी त्याला आर्थिक मदत दिली, प्रोत्साहन दिले. त्यामुळे कलेच्या माध्यमातून विचारांची चळवळ गावखेड्यात रुजण्यास मदत झाली.

(**आधारभूत संदर्भ –** राजर्षी शाहू गौरव ग्रंथ – संपादक – डॉ. रमेश जाधव या ग्रंथातील लेख १) कलाप्रेमी राजा – महेश केळुसकर, २) नाट्यप्रेमी राजा – बाबूराव देशपांडे, ३ ) राजर्षी आणि शाहीर, तमासगीर व कवी – डॉ. सूर्यकांत खांडेकर )

**(लेखक नाटककार, कादंबरीकार आहेत.)**

# विरोधकांची काकगर्जना

*(हा लेख 'मूकनायक' ३१ जुलै १९२० च्या अंकातून घेण्यात आलेला आहे.)*

गेल्या अंकात आम्ही आमच्या राजकीय हक्कस्वातंत्र्यावर टपून बसलेल्या बोकेसंन्याशांची ओळख करून दिली. तशीच आजही एका व्यक्तीची - मताची - नाइलाजास्तव ओळख करून देणे भाग पडत आहे, याबद्दल दिलगिरी वाटते. कारण पाश्चात्त्य शिक्षणाच्या प्रभावाने या विसाव्या शतकात सुधारणेच्या मनूत - या देशांतील काही पुढारलेल्या लोकांकडून सामाजिक बाबतींत आम्हास आज ज्या काही थोड्या बहुत सवलती मिळत आहेत, त्याबद्दल काही धूर्त कावळ्यांकडून व्यर्थ गलबला केला जात आहे. म्हणून त्याविषयी थोडासा खुलासा करणे जरूर आहे.

साधारणपणे दररोजच्या व्यवहारात एखाद्या कुटुंबातील चार मुलांची आई जेव्हा आपल्या मुलांस काही खाऊ देते, तेव्हा तिची ती सर्व मुले एकसारखी अगर समशक्तींचीही असत नाहीत. त्यांच्यापैकी जी काही थोडी जाणती असतात, तीच तो सर्व खाऊ पटकावून बसतात. कारण जी अगदीच लहान व अशक्त असतात, त्यांना त्या खाऊची किंमत अगर चवही माहीत नसते; किंवा तो खाऊ अगर तशीच दुसरी काही चीज आहे, याचीसुद्धा त्यांना कल्पना होत नाही; पण काही दिवस लोटल्यावर एके काळी लहान असलेली ती बालके जेव्हा खेळू रांगू लागतात, त्यावेळी त्यांचे ते कौतुक पाहत असलेली त्यांची माता जेव्हा त्यास खाऊ देते, तेव्हा ती खेळणारी, रांगणारी बालकेही आपल्या वडील बंधू अगर भगिनीचे अनुकरण करावयास धावतात. म्हणजे तीही तो खाऊ मिळवून आपल्या तोंडात घालण्याचा प्रयत्न करतात; परंतु आपली लहान भावंडे आपल्या बरोबरीने खाऊ खाण्यासारखी होईपर्यंत सर्वच खाऊ पटकावणाऱ्या खादाड अशा मुलांस त्या आपल्या लहान भावंडांनी केलेल्या आपल्या योग्य हिश्शाची अपेक्षा सहजी आवडत नाही; परंतु तीच जेव्हा का त्याच्या अंगावर जाऊन आपला योग्य व रास्त मिळकतीचा हक्क जबरदस्तीने उचलण्याची खटपट करतात, तेव्हा ते वडील मूल आपल्या लहान भावंडांस त्यांचा हिस्सा न देता उलट आपणच बोंब मारत आईभोवती धिंगाणा घालते, तेव्हा आपल्या त्या वडील मुलाच्या निरर्थक धिंगाण्याला जुमानून आपल्या लहान अर्भकांची हेळसांड करणे कोणाही मातेला उचित आहे काय? नाही. मग आजपर्यंत या देशात धार्मिक व सामाजिक जीवनांनी गलेलठ्ठ बनलेल्या एकाच विवक्षित समाजाने आजपर्यंत अज्ञानदशेत लोळत राहिलेल्या नव्हे; तर मुद्दाम ठेवले गेलेल्या समाजाने डोके थोडेसे वर काढताच काय म्हणून ओरड करावी? कदाचित पायाखालचा दगड निसटल्यावर आपणाला त्याच निसटलेल्या दगडाच्या जागेचा आश्रय करावा लागणार, म्हणून त्या खालच्या दगडाने निसटून न जाता तेथल्या तेथेच यांचा जुलमी भार वाहत राहावे, अशी त्या वरच्या दगडाची इच्छा असते. त्याप्रमाणे या भूदेवांना (?) वाटत असावे यात नवल नाही; पण इतर समाजांमध्ये आपल्याप्रमाणेच आत्मा आहे किंवा त्यांच्या ठिकाणी परमेश्वरांश आहे, याची त्यांना कल्पनासुद्धा राहू नये? अशा या निमकहराम प्राण्यांना सर्वांभूती वास करणाऱ्या व ज्याचे इतर प्राणीही घटकावयव आहेत, अशा परमेश्वराचा विसर पडून ते त्यांच्या डोक्यावर पाय देण्यास मागेपुढे पाहत नाहीत! परंतु हे पापाचे घडे कोठपर्यंत टिकाव धरणार? जोपर्यंत इतर समाज गाढ निद्रेत आहे, तोपर्यंतच. सुविख्यात डॉ. सर जगदीशचंद्र बोस यांनी वनस्पतीमध्ये जीव आहे, त्यांना आत्मा आहे इतकेच नव्हे, तर त्यांना मानवाप्रमाणे सुखदुःखाची भावनाही आहे, हे सप्रयोग सिद्ध करून दाखवून सर्व जगताला आश्चर्यचकित करून सोडले आहे; पण आम्हा अस्पृश्य वर्गांना कुत्र्या-मांजरापेक्षाही हीन समजले गेलेल्या मानवामध्ये आत्मा आहे किंवा नाही; आम्हाला त्यांच्याप्रमाणे सुखदुःखाची भावना आहे किंवा नाही, याची विचारपूस करणे वर्णश्रेष्ठ म्हणवणाऱ्या आमच्या ब्राह्मणबंधूंपैकी एकालाही वाटले नाही किंवा वाटून जगाला तसे सांगण्याचे धैर्य झाले नाही? पण त्यांना धैर्य तरी कसे होणार? कारण धैर्याने काम करण्याला निधड्या छातीचाच मनुष्य असावा लागतो. अर्थात जो खरा क्षत्रिय तोच या कामाचा अधिकारी! त्याला अनुसरूनच क्षत्रियकुलावतंस शाहू छत्रपतीने आपल्या आत्मतेजरूपी परिसाच्या स्पर्शाने अनेक शतकांपासून लोष्टवत् पडलेल्या नव्हे, उच्चवर्णीय म्हणवणाऱ्यांकडून ठेवलेल्या अस्पृश्य वर्गास जागृत करून त्यांच्या ठायी असलेल्या आत्म्याचे व सुखदुःख भावनेचे प्रदर्शन खऱ्या अंतःकरणपूर्वक कळकळीने जगापुढे मांडून त्यांच्यात स्वाभिमानाची ज्योत प्रकाशित केली; परंतु 'आत्मवत् सर्वभूतेषु यः पश्यति स पंडितः।' या तत्त्वाचा उपदेश करणाऱ्या आमच्या ब्राह्मणबंधूंकडून आमच्या उन्नतीची चळवळ म्हणून पाडण्यास्तव छत्रपतींच्या काही वटहुकमांवर, पर्यायाने त्यांच्या राजकीय धोरणावर, ब्रह्मवृंदाकडून जी कुत्सित टीका केली जात आहे, याबद्दल कोणाही ब्राह्मणेतर अगर बहिष्कृत वर्गांतील जाणत्या व्यक्तीस उद्वेग झाल्यावाचून राहणार नाही आणि म्हणूनच डळमळीत असलेल्या आपल्या स्वजातिवर्चस्वाबद्दल विद्याविलासासारख्या क्षुल्लक पत्राने काढलेल्या प्रलापाबद्दल लिहून त्याला निरर्थक किंमत दिल्यासारखे होत आहे.

सदर पत्राने गेल्या १६ तारखेच्या ब्राह्मण-ब्राह्मणेतर या आपल्या अग्रलेखात ब्राह्मणेतर व बहिष्कृत वर्ग यांना चिडवणाऱ्या अशा खोडसाळ विधानांची परमावधीच केली आहे, ते म्हणते, 'ब्रिटिश सरकार परधर्मी; परंतु तेसुद्धा सत्तेच्या जोरावर आर्यांच्या सामाजिक बंधनात ढवळाढवळ न करता स्वस्थ राहते. श्रीमन्महाराज छत्रपती हे स्वतः आर्य क्षत्रिय मराठे असून, लोकमताचा व पूर्वापार रूढींचा विचार न करता केवळ सत्तेच्या जोरावर सामाजिक सुधारणा घडवून आणण्याच्या नावावर आपापसात दुही माजवण्याचा प्रयत्न करू पाहत आहेत; पण हा त्यांचा प्रयत्न केव्हाही कायमचा सिद्धीस जाणे शक्य नाही. हा सामाजिक प्रश्न असल्याने कायद्याच्या जोरावर पूर्वापार चालत आलेला जातिभेद मोडला जाणार नाही, त्यास कायद्याची अगर सत्तीची जरूर नाही.., यासाठी श्रीमन्महाराजांनी या वादात पुढाकार न घेता हा वाद काळावर दृष्टी ठेवून मतस्वातंत्र्यावर सोडून देणेच जास्त श्रेयस्कर आहे. इतकेच नव्हे, या वादापासून महाराज सरकारांनी व इतर अधिकाऱ्यांनी अलिप्त राहणेच इष्ट आहे.' का, आहे की, नाही ब्राह्मणी हातचलाखी? महाराजांवर समाजात दुही माजवण्याचा निंद्य आरोप लावणे हीच का त्यांची राजनिष्ठा? सतीचा कायदा, विधवा

विवाहाचा कायदा वगैरे कायदे परधर्मी ब्रिटिश सरकारने पास केल्यास विद्याविलासकारांस चालतात. कारण अलीकडच्या महर्गतेमुळे ब्राह्मण्यापासून दुरावत चाललेल्या त्यांच्या जातभाईत आज शेकडो नव्हे हजारो धटिंगण लग्नाशिवाय फिरत असतात. शिवाय ब्रह्मदेवाच्या मुखातून जन्मणाऱ्या (?) या झोटिंगास या कलियुगात (?) विवाहाची पंचाईत पडू लागली. ती अनायासेच या विधवाविवाहाच्या कायद्याने नाहीशी केली. म्हणून ब्रिटिश सरकार निदान या तरी बाबतीत त्यांना वंद्य आहे, हे त्यास कबूल आहे. दुसरे वेदोक्त प्रकरणाच्या वेळी महाराज शूद्र (?) आहेत असे म्हणणाऱ्यांस त्याच महाराजांचा काटेरी लगाम लागताच एकीकडे श्रीमन्महाराज छत्रपती हे स्वतः आर्य क्षत्रिय मराठे आहेत, असे शब्द बाहेर पडतात आणि दुसरीकडे त्यांनी सामाजिक बाबतींत पुढाकार घेऊ नये, हा साळसूदपणाचा सल्ला देण्यात येतो. याचा मतलब काय? तर महाराज आर्य क्षत्रिय या विशेषणाला भुरळतील; आणि आपली सामाजिक चळवळ बंद करतील; परंतु या सोवळेशाहीवर विश्वास ठेवणारे महाराज नव्हेत, हे त्यांनी पक्के लक्षात ठेवावे. त्याचप्रमाणे पुणे म्युनिसिपालिटीतील मुलामुलींच्या सक्तीच्या शिक्षणाच्या बाबतीतही तुमचे जहाल ब्राह्मणांचे मतस्वातंत्र्यावरील प्रेम जगजाहीर झाले आहे. तेव्हा मतस्वातंत्र्याच्या पोकळ गप्पा कोण ऐकणार? त्याने सर्व ब्राह्मणेतर व बहिष्कृत वर्गास खडबडून जागे केले आहे. ब्राह्मणेतरांनी आपले वर्तन सरळ व वृत्ती शांत ठेवून आपणास काय पाहिजे असेल, त्याची उघड मागणी करावी. केवळ दंडेलीने आपला कार्यभाग त्यास प्रथम साध्य करून घेता येईल; परंतु अशा वाममार्गांनी साध्य झालेली गोष्ट चिरकाल न टिकता, कायमचा द्वेष.. मात्र उत्पन्न केला जाईल; परंतु तो उद्या टिकेल की नाही याचा विचार ब्राह्मणेतरांनी केला पाहिजे. कारण भर देणारे लोक आज तुम्हास उचलून धरतील, परंतु कायमची गाठ आहे तुमच्या समाजबंधूंशी! अशी धमकी देणाऱ्या सोहळ्याला भीक घालणारे ब्राह्मणेतर व बहिष्कृत आज जिवंत नाहीत, हे विद्याविलासकर्त्यास कळावयास पाहिजे होते. पेशवाईकाळात महारांच्या गळ्यात मडकी बांधणे, हे तुमची बिनदंडेली शांत (?) वृत्ती बहिष्कृतवर्ग विसरला नाही! तो जर विसरता तर तुमच्या या धमकीला भिऊन जाता आणि तुमच्या जवळ मागणी करता; पण भिक्षुकाजवळ मागणी कोणी करावी? आमच्याजवळ उघड मागणी करा, म्हणण्याचा अधिकार यांना कसा पोहोचतो? आमच्या नैसर्गिक हक्कांचे हे कोण मालिक? तुमच्याजवळ आम्ही दीनवाणेपणाने मागणी काय म्हणून करावी? ते मागण्याचे दिवस गेले, नव्हे तुम्हीच घालविले असता, आमच्याजवळ मागणी करा या पोकळ आढ्यतेला कोण विचारतो? 'ब्राह्मणेतरांच्या दुकानावर ती अमक्या जातीची म्हणून पाट्या लावल्या नसल्यामुळे त्यात वाटेल तो जातो व तेथे वाटेल ते खातो. हा फसवणुकीचा मार्ग आहे. अशा फसवणुकीच्या मार्गाने जातिभेद मोडणे हा मनाचा कोतेपणा आहे.' बरोबर आहे. कारण ब्राह्मणेतर कुठे इतके निर्लज्ज झाले आहेत? त्यांना कोठे पूर्वापार रूढींचे (?) प्रेम आहे? आज पूर्वापार रूढीला धरून चालणारे काय ते एक पळीपंचपात्रधारकच आणि म्हणूनच त्यांच्या पूर्वापार पिढीला धरून (?) चालवलेल्या कपबशा धुण्याच्या दुकानांतील काही गिऱ्हाईके कमी होऊन दोन पैसे कमाईस चाट बसत चालली असेल; तरीपण त्याची वजाबाकी जोडे बुटांच्या दुकानात ते भरून काढतातच! आणि हीच त्यांची पूर्वापार रूढीला (?) धरून चालण्याची रीत? एरव्ही ग्रँट रोडवरील बोहऱ्याच्या दुकानात, अगदी चोरून, लपून, अभक्ष्य भक्ष करत बसणाऱ्या किंवा कोटांतील सायप्रस ब्रदर्सच्या दुकानात काटासुरी चालवणाऱ्या अगर पुणे लष्करांतील इराण्याच्या दुकानांत देशी व परदेशी मदिरेच्या कोकेशाही भक्तास त्यांनी त्यास राजरोसपणे तसे करण्यास सल्ला दिला असता. हा त्यांच्या मनाचा कोतेपणा नव्हे काय? बिझाट, अरूंडेल, बॅपटिस्टा वगैरेंशी सहभोजने चालतात. इतकेच नाही, तर विलायतेतील साहेब लोकांनी बुटाने तुडवलेल्या पावाचे तुकडे व इतर पदार्थ यथेच्छ भक्षण करून, परत आल्यावर गोमय भक्षण करणाऱ्यांच्या मनाचा मात्र धीटपणा! यालाच म्हणतात नीतिधैर्य!! 'आज कित्येक वर्षे चालत आलेल्या रूढी तुम्ही पायाखाली तुडवीत आहात, याचा विचार करा. पंढरपूर येथे श्रीविठोबास अस्पृश्याशिवाय वाटेल त्याने शिवण्याचा प्रघात आहे; परंतु तो कोल्हापुरास नाही. श्रीमहालक्ष्मी कोल्हापूरच्या ब्राह्मणांचीच नाही. तिच्या दर्शनास परठिकाणाहून नेहमी हजारो लोक येत असून, आपापल्या पद्धतीने वाटेल त्या जातीचे लोक दर्शन घेऊन जात आहेत. त्या सर्वांस तुमची ही सब गोलंकाराची पद्धत पसंत पडेल की काय याचा विचार करा. मुसलमानांच्या मशिदीत, जैनांच्या बस्तीत, अगर लिंगायतांच्या देवालयांत, मराठे, बहुजन वगैरे लोक जाण्याची इच्छा धरत नाहीत; मग श्रीमहालक्ष्मीच्या मंदिरात जाऊन तिला स्पर्श करण्याची तेवढी इच्छा तुम्ही का धरावी?' का धरू नये? आपणच म्हणता, श्रीमहालक्ष्मी ब्राह्मणांचीच नाही. अर्थात तिच्यावर सर्व हिंदूंचा सारखा हक्क आहे हे तुमच्याच बोलण्यावरून सिद्ध होत नाही काय? मग तुम्हाशिवाय इतरांनी तिला स्पर्श केल्यास काय हरकत आहे? ज्याअर्थी मुसलमानांच्या मशिदी अगर जैनांच्या बस्ती तुम्ही दाखवता, त्याअर्थी तुमच्या या अट्टल लबाडीची परीक्षा आज ब्राह्मणेतर व बहिष्कृत वर्ग करू शकत नाही, असे तुम्हास वाटते काय? वाटत असल्यास तो तुमचा निव्वळ भ्रम आहे! ब्राह्मणेतर हे एकाच धर्माचे अनुयायी असताही ते आपल्या पूज्य दैवताचे दर्शन घेण्याचा प्रयत्न करत असता, तुम्ही त्यांना मुसलमान व जैन या परधर्मीयांच्या देवालयाकडे बोट करता? यावरून तुमच्या कुटिल नीतीची परीक्षा होत आहे. शेवटी, जशी सर जगदीशावर परधर्मीय व परदेशी लोकांकडून टीका झाली, तद्वत छत्रपतींवरही आत्मप्रौढी मिरविणाऱ्या या ब्राह्मणी जहाल कंपूकडून स्वार्थाकरिता प्रतिकाराचा हल्ला झाला व अजून होतही आहे; परंतु सर जगदीश यांनी आत्मबलाने नुकतेच इंग्लंडच्या लोकांचे वनस्पतीशास्त्रीय शोधांत जसे गर्वहरण केले, तद्वतच मूठभर लोकांच्या या निरर्थक काकगर्जनेस न जुमानता छत्रपतींनी आपल्या सत्य व न्यायी चळवळीपासून रतीभरही ढळू नये, अशी आमची त्यांना अत्यंत नम्रतापूर्वक विनंती आहे. ती ते मान्य करतील, अशी सबळ आशा धरून तूर्त हा विषय पुरा करितो.

*(शाहू महाराजांच्या सक्रिय पाठिंब्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुरू केलेल्या 'मूकनायक' या वृत्तपत्रातील हा दुर्मीळ लेख आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महाराजांवर लिहिलेला हा एकमेव उपलब्ध लेख असल्याने शाहू चरित्र साधनांच्या दृष्टीने त्याचे मोल मोठे आहे.)*

महाराष्ट्र पारतंत्र्याच्या अंधकारात खितपत पडलेला असताना छत्रपती शिवाजी महाराज यांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली आणि येथील प्रजेसाठी लोककल्याणकारी राज्याची निर्मिती केली. 'स्व'त्वाच्या आधारे राज्य निर्माण करून सुशासनाचा आदर्श महाराजांनी घालून दिला. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सुशासनाचे अनुकरण राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी केले. प्रजेवर पुत्रवत प्रेम आणि मातृहृदयाने काळजी घेण्याचा शिवछत्रपतींचा वारसा त्यांनी समर्थपणे चालवला होता.

# शिवछत्रपतींचा वारसा

**रवींद्र गणेश सासमकर**

बलाढ्य मुघल साम्राज्याला आव्हान देणारा हिंदू वीराग्रणी म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांकडे अवघा उत्तर भारत पाहत होता. कविराज भूषण हे महाराजांना 'हिंदूपद पातशहा' म्हणतो. कोल्हापूर गादीनेदेखील हिंदूपद पातशाहीची परंपरा चालवली होती.

१८९४ साली राजर्षी शाहू महाराज जेव्हा राज्यावर आले, तेव्हा लोकमान्य टिळकांनी 'केसरी'त लेख लिहून त्यांचे अभिनंदन केले होते. लेखाच्या शेवटी टिळकांनी लिहिले होते. हिंदुत्त्वाचा योग्य



अभिमान बाळगून त्याच्या अभ्युदयाकरिता निष्काम बुद्धीने आपला देह झिजविणे हे कोल्हापूरकर महाराजांचे कुलव्रत आहे व ते पाळण्यास श्रीमंत छत्रपती शाहू महाराज यांस ईश्वर सुबुद्धी, धैर्य आणि दीर्घायुष्य देवो व महाराजांस त्याप्रमाणे यशप्राप्ती होऊन त्यांचा सदैव उत्कर्ष होवो, अशी आजच्या मंगलप्रसंगी प्रार्थना करून हा स्वल्प अभिनंदनपर लेख येथेच संपवतो.' अशाप्रकारे शाहू महाराज हिंदुत्वाचा अभिमान बाळगणारे राजे होते. करवीर छत्रपती आपल्या कोटावर जरिकामात विणलेले मानचिन्ह वापरत असत. त्यावर स्पष्टपणे 'हिंदूपद पातशाह' अशी अक्षरे होती. (संदर्भ - राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, डॉ. जयसिंगराव पवार, पान क्र. ११३३)

हिंदुत्व या देशाची जीवनपद्धती असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने देखील म्हटले आहे. विशिष्ट उपासनापद्धती किंवा उपास्यदेवता मान्य केल्यावरच माणसाला मुक्ती किंवा स्वर्ग मिळेल अशी संकुचित भूमिका हिंदुत्वाची नाही किंवा हिंदुत्व अन्य उपासनापद्धतींचे अस्तित्वही नाकारत नाही. आज जगभर असहिष्णूतेमुळे हिंसाचाराचे थैमान सुरू असताना भारताचे वेगळेपण दिसून येते. छत्रपती शिवाजी महाराजांपासून राजर्षी शाहू महाराजापर्यंतच्या लोकोत्तर महापुरुषांनी आचरणात आणलेली हिंदुत्व ही वैश्विक आणि व्यापक संकल्पना आहे. त्यामुळे आपल्या देशात विविध उपासनापद्धतींचे आणि नास्तिक लोकदेखील गुण्यागोविंदाने राहू शकले. राज्यकारभार करताना हीच व्यापक भूमिका छत्रपती शाहू महाराजांची होती. त्यामुळे त्यांचे 'हिंदूपद पातशाह' हे बिरुद सार्थ ठरते.

## सामाजिक न्यायासाठी संघर्ष

छत्रपती शिवाजी महाराजांनी ज्याप्रमाणे उपेक्षित, वंचित समाजाला हिंदवी स्वराज्याच्या कार्यात सहभागी करून घेतले आणि त्यांना सामाजिक प्रतिष्ठा मिळवून दिली. आधुनिक संदर्भात राजर्षी शाहू महाराज यांनी त्यासाठी अधिक व्यापक प्रयत्न केला. शिक्षणाच्या माध्यमातून त्यांनी आपल्या संस्थानातील उपेक्षित, वंचित समाज घटकांचा उद्धार केला.

राजर्षी शाहू महाराजांनी १८९४ साली करवीर संस्थानचा कारभार हाती घेतला, तेव्हा राज्यभर फिरून लोकांची परिस्थिती व त्यांची दुःखे जाणून घेतली. सामान्य जनतेच्या भावना ओळखून त्यांचे दुःखनिवारण करण्याचे काम त्यांनी आयुष्यभर केले. समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा आणि अस्पृश्यता हे तीन कलंक मिटवल्याशिवाय

आपल्या रयतेच्या विकासाच्या वाटा खुल्या होणार नाहीत, याची खूणगाठ बांधून महाराजांनी कामाला सुरुवात केली. खऱ्या अर्थाने ते सामाजिक न्यायाचे उद्‌गाते होते. सर्व समाज हा समता आणि बंधुत्वाच्या सूत्राने बांधून ठेवण्याचा भारतीय राज्यघटनेचा जो ध्येयवाद आहे, त्याचा प्रारंभ करवीर संस्थानात पूर्वीच झाला होता.

## युगानुकूल परिवर्तन

राजर्षी शाहू स्मारक ग्रंथात म्हटल्याप्रमाणे स्वराज्य संस्थापक शिवाजी महाराजांमध्ये शाहू महाराजांना एक 'समाजसुधारक'ही दिसत होता. जातिपातीची बंधने उद्ध्वस्त करण्यासाठी जेव्हा ते पुढे उत्तरायुष्यात उभे राहिले, तेव्हा त्यांनी शिवछत्रपतींच्या एका धाडसी सामाजिक कृत्याचा दाखला दिलेला दिसून येतो. आपल्या मराठा जातीच्या लोकांना पुढे होऊन जातिनिर्बंध तोडून टाकण्याचे आवाहन करताना ते म्हणतात, 'सुधारणेच्या सर्व चळवळीत पुढाकार घेणे हे उच्चवर्णीयांचे कर्तव्य आहे, जपान देशातील 'सामुराऔं' जातीने, म्हणजे त्या राष्ट्रातील क्षत्रिय वर्णाने, त्यांचे जातिनिर्बंध मोडून टाकण्याच्या बाबतीत पुढाकार घेतला. १७व्या शतकात होऊन गेलेल्या आमच्यातील थोर व पूज्य विभूती छत्रपती शिवाजी महाराज यांनी आपणापुढे ठेवलेले ध्येय आपण आपल्या नजरेपुढे ठेवले पाहिजे व त्यांचे अनुकरण केले पाहिजे. थोरल्या छत्रपती शिवाजी महाराजांनी, जे उदाहरण घालून दिले आहे, त्याकडे त्यांनी (मराठ्यांनी) दुर्लक्ष करू नये.' फलटणच्या निंबाळकर घराण्यापैकी एका पुरुषाने मुसलमानी धर्माची दीक्षा घेऊन एका मुसलमान स्त्रीशी लग्न केले होते. त्या पुरुषास त्या थोर विभूतीने पुन्हा आपल्या जातीत घेतले आणि आपल्या परमपूज्य राजमाता जिजाबाईसाहेब यांच्या संमतीने त्यांनी निंबाळकरांच्या मुलाशी आपल्या स्वतःच्या मुलीचा विवाह करून दिला. (राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ) छत्रपती शिवाजी महाराज यांनी मुसलमान झालेल्या नेताजी पालकर यांना पुन्हा हिंदू धर्मात प्रवेश दिल्याचे उदाहरण प्रसिद्धच आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांनी ज्याप्रमाणे समाजात युगानुकूल सुधारणा केली, त्याप्रमाणे राजर्षी शाहू महाराज यांनीही आपल्या राज्यात सुधारणा करण्याचा यशस्वी प्रयत्न केला. त्यांनी आपल्या राज्यात सर्वांसाठी सक्तीचे मोफत प्राथमिक शिक्षण सुरू केले, तसेच सर्व जातींच्या मुलांना वेदांचे शिक्षण मिळावे आणि संस्कृत शिक्षणाला प्रोत्साहन मिळावे, यासाठी श्री शिवाजी वैदिक विद्यालयाची स्थापना केली. समाजातील जातिभेद, अस्पृश्यता नष्ट होऊन समाज समरस व्हावा यासाठी प्रयत्न करणाऱ्या आर्य समाजाला शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात उदार आश्रय दिला होता. १९१७ साली स्वामी परमानंदांनी कोल्हापूरजवळील केर्ले या गावी प्राथमिक शाळा आणि गुरुकूल स्थापन केले होते, त्या गुरुकुलांतील विद्यार्थ्यांच्या भोजन खर्चासाठी शाहू महाराजांनी ५००० रुपये मंजूर केल्याचे एक पत्र उपलब्ध आहे. पुढे १९१८ साली कोल्हापुरात शाहू महाराजांच्या आदेशाने आर्य समाजाच्या वतीने एक शाळा व त्यासोबत एक 'गुरुकूल' स्थापन करण्यात आले, त्यासाठी जागा व इमारती उपलब्ध करून दिल्या. येथे विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सर्व व्यवस्था मोफत करण्यात आली होती. आर्य समाजाच्या गुरुकुलात तथाकथित वंचितांसह सर्व जातीच्या मुलांना मुक्त प्रवेश होता. शाहू महाराजांनी घडवून आणलेले हे युगानुकूल परिवर्तन होते.

### वैदिक धर्माचे पुनरुज्जीवन

छत्रपती शिवाजी महाराज यांच्याप्रमाणे राजर्षी शाहू महाराजांचीही वेदांवर निष्ठा होती. छत्रपती शिवाजी महाराजांच्या वैदिक धर्माच्या पुनरुज्जीवनाचा वारसा राजर्षी शाहू महाराजांनी पुढे चालवला. शाहू महाराज म्हणतात, 'देशाला जागृत करणारी रामबाण मात्रा वैदिक धर्मच आहे. कारण हिंदुमात्राच्या अंतःकरणात वेदाभिमान वसत आहे व आर्य समाज वेदानुकूल राहण्यातच आपला धर्म समजत आहे. आर्य समाजाचा धर्म जगावर उपकार करण्याचा आहे.'

'सज्जनहो! वैदिक धर्माचे महत्त्व अन्य मतांपेक्षा अधिक आहे हे समजूनच मी या धर्माचा स्वीकार केला आहे.' (राजर्षी छत्रपती शाहु महाराज यांचे भाषण ८ मार्च १९२० संदर्भ - राजर्षी शाहु स्मारक ग्रंथ ,पान क्र - ८४१, द्वितीय आवृत्ती संपादक - डॉ. जयसिंगराव पवार)

शाहू महाराज म्हणाले की, 'मी राजाराम कॉलेज, हायस्कूल, गुरुकूल, अनाथालय, सरदार बोर्डिंग या संस्था आर्यप्रतिनिधी सभेकडे सोपवल्या. आर्य समाजाचे शिक्षक आणि विचारवंत माझा उद्देश सफल करतील, म्हणून त्यांच्याकडे मी या संस्था सोपवल्याचे त्यांनी सांगितले. जमलेल्या प्रतिनिधी आणि प्रमुख सूत्रधारांनी अशाच प्रकारच्या शिक्षण संस्था महाराष्ट्रात स्थापन कराव्यात अशी इच्छा त्यांनी व्यक्त केली. एवढेच नाही, तर माझे त्यास सर्वतोपरी साहाय्य राहील, असे आश्वासनही त्यांनी दिले. वैदिक धर्माचा प्रसार करण्याचा उपदेश करून ते म्हणाले की, 'जर अशा प्रयत्नांनी वैदिक धर्माचा प्रसार झाला नाही तर तो दोष तुमच्यावर व आर्यप्रतिनिधी सभेवर येईल.' पुढे बोलताना त्यांनी एके दिवशी वैदिक धर्म हा जगाचा धर्म बनेल, असा आशावादही व्यक्त केला होता.

शिवाजी वैदिक विद्यालयाच्या अहवालात म्हटल्याप्रमाणे आज आपण कितपत उन्नतीच्या मार्गावर आहोत, हे आपणास भूतकाळाच्या सूक्ष्म सिंहावलोकनाने सहज दिसून येईल. पाश्चात्त्य राष्ट्रांची भरभराट जितक्या जोमाने व लवकर झाली, तितकी आमच्या हिंदुस्थानची का झाली नाही? हा प्रश्न साहजिकच उद्‌भवतो; याचे खरे कारण असे की, या देशांतील हिंदूधर्मीय म्हणविणाऱ्या लोकांस आपल्या वेदप्रणित धर्माची स्मृती न राहता, त्यांच्यात रूढीधर्म प्रचलित झाला व त्या योगे त्यांची सामाजिक स्थिती ऐक्याची राहिली नाही. आपल्या राष्ट्राच्या अवनतीचे हे खरे कारण राजर्षी शाहू महाराजांच्या पूर्ण लक्षात आले होते.

## रयतेचा राजा

छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याच्या रूपात रयतेसाठी एक आदर्श राज्य निर्माण केले. शेतकऱ्यांना बैलजोडी, शेतीची मशागत करण्यासाठी अवजारे सरकारातून दिली जाई. कर्जही दिले जात असे, या कर्जावर व्याज आकारले जात नसे. हे कर्ज फेडण्याची शेतकऱ्यांची जशी कुवत असेल त्याप्रमाणे परतफेड करून घेतली जात असे. या कर्जाला 'तगाई' म्हणत. छत्रपती शिवाजी महाराजांनी तलाव खोदले, धरणे बांधून जलव्यवस्थापन केले, रस्त्यांची निर्मिती केली. छत्रपती शिवाजी महाराजांनी ५ सप्टेंबर १६७६ रोजी प्रभावळीचा सुभेदार रामाजी अनंत यास लिहिलेले पत्र म्हणजे शिवकालीन प्रशासनाचा आत्मा आहे. महाराजांनी या पत्रात प्रजेला दोनवेळा खायला अन्न देण्याची सूचना रामाजीस केली होती.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या लोककल्याणकारी राज्याचा वारसा राजर्षी शाहू महाराज यांना लाभला होता. शिवशाहीप्रमाणे करवीर



संस्थानात शाहू महाराजांनी लोककल्याणकारी कामे केली. शाहू महाराजांनी कोल्हापूरच्या सर्वांगीण विकासाकडे लक्ष दिले. शेतकरी जगला पाहिजे हे ध्येय त्यांनी उराशी बाळगत शेतकऱ्यांना कर्जे उपलब्ध करून दिले. त्याशिवाय शेतीला आणि जनतेला पाण्याची कमतरता राहू नये म्हणून त्यांनी राधानगरी धरणाची उभारणी केली. शाहू महाराजांनी 'शाहू छत्रपती स्पिनिंग ॲण्ड विव्हिंग मिल', शाहूपुरी व्यापारपेठ, शेतकरी सहकारी संस्था, शेतकी तंत्रज्ञानाच्या संशोधनासाठी ॲग्रिकल्चरल इन्स्टिट्यूट इत्यादी संस्था कोल्हापुरात स्थापन केल्या.

## गोहत्या बंदीचा कायदा

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्यात गोरक्षण केले जात असे. दिल्लीचा कारभार करणाऱ्या महादजी शिंदे यांनी त्याकाळी मुघल बादशाहाला गोहत्या बंदीचे फर्मान काढायला सांगितले होते. आजही भारतासारख्या कृषी-उद्योगप्रधान राष्ट्रात पशुधनाचे महत्त्व ओळखून भारतीय संविधानाच्या (कलम ४८) मार्गदर्शक तत्त्वात राज्याने गोवंशहत्येस प्रतिबंध करावा असे म्हटले आहे. राजर्षी शाहू महाराज यांनीही आपल्या राज्यात गोहत्या बंदीचा हुकूम जारी केला होता. त्या हुकुमात म्हटले होते, 'करवीर इलाख्यात यापुढे केव्हाही व कोठेही कसायास गाई विकण्याच्या नाहीत, तशा कोणी विकलेल्या समजून आल्यास विकणारा इसम जबर दंडास पात्र होईल. माणून हुनूर आज्ञा तारीख २४ माहे ऑगस्ट सन १९१९ ची झाल्या आधारे आपल्यास असे कळवण्यात येते की, आपण आपले स्थळसीमेतील गावगन्नानिहाय सदरप्रमाणे तजवीज राहण्यास हुकूम देऊन हुकुमाची प्रसिद्धी दवंडी पिटवून करण्यात यावी.'

## शिवराय असे स्फूर्तिदाता

छत्रपती शिवाजी महाराज हे आपल्या राष्ट्राचे आराध्यदैवत आणि प्रेरणास्थान आहेत. शिवाजी ही तीन अक्षरे म्हणजे आपल्या समाजाचा जणू संजीवनीमंत्र आहे. याच तीन अक्षरांनी आम्हाला अहद् तंजावर ते तहद् पेशावर श्रींचे राज्य निर्माण करण्याची प्रेरणा दिली. आम्ही पारतंत्र्यात असताना त्याविरुद्ध लढा देण्याचे बळ आम्हाला याच तीन अक्षरांनी दिले. स्वातंत्र्यलढ्यातील अनेक क्रांतिकारक, महानायकांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरित्रातून देशासाठी आणि समाजासाठी लढण्याची ऊर्जा मिळाली.

शिवरायांविषयी शाहू महाराजांना विलक्षण आदर होता. त्यांनी सिंधुदुर्ग किल्ल्यातील शिवरायांच्या मंदिराचा जीर्णोद्धार केला आणि पन्हाळा किल्ल्यावर शिवरायांचे मंदिर उभारले. शिवछत्रपतींविषयी त्यांच्या मनात इतकी श्रद्धा होती की, कोल्हापुरात खरेशास्त्रींनी लिहिलेल्या 'शिवसंभव' नाटकात शिवजन्माचा प्रसंग सादर होताच सर्व भान विसरून शाहू महाराज स्टेजवर गेले आणि त्या 'बाल शिवबा'स त्यांनी मुजरा केला!

शिवरायांविषयी शाहू महाराजांना वाटणारा आदर हा केवळ भावनिक नव्हता, तर त्या महान युगपुरुषाचे युगानुकूल आचरण करण्याचा भावदेखील त्यामागे होता.

राजर्षी शाहू महाराज यांच्या जीवनाचे अनेक पैलू आहेत. त्यांचे संपूर्ण जीवन म्हणजे सामाजिक लढ्याचे रणांगण होते. थोरल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्याप्रमाणे त्यांना स्वकीयांशीही संघर्ष करावा लागला आणि त्यात ते यशस्वी झाले. शिवशाही आणि शाहू महाराजांचा काळ यात मोठा फरक होता, पण शिवशाहीने घालून दिलेल्या स्वधर्मपालन, लोककल्याण, युगानुकूल सुधारणा आणि पुरोगामीत्वाच्या परंपरेचे निर्वहन त्यांनी अव्याहतपणे केले. त्यांचा आदर्श घेऊन आपण वाटचाल केली पाहिजे. आपला धर्म आणि संस्कृतीचा अभिमान कायम ठेवत धर्माला ग्लानी आणणाऱ्या व सामाजिक ऐक्य तोडणाऱ्या अनिष्ट रूढी, अंधश्रद्धा यांचा आपण त्याग केला पाहिजे. आगामी काळात भारताला एक बलशाली राष्ट्र बनवण्याच्या दृष्टीने शाहू महाराजांचे विचार आणि कार्य आपल्यासाठी दीपस्तंभ आहे.

(लेखक इतिहास अभ्यासक असून महाराष्ट्र शासनाच्या छत्रपती शिवाजी महाराज चरित्र साधने आणि प्रकाशन समितीचे विशेष निमंत्रित सदस्य आहेत; तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे राज्यपालनियुक्त सिनेट सदस्य आहेत.)



राजर्षी शाहू महाराज वय वर्षे ११.



राजर्षी शाहू महाराज यांच्या दत्तकविधान सोहळ्यावेळी काढलेले छायाचित्र.



धारवाड मुक्कामातील शाहू महाराजांचे छायाचित्र.
बापूसाहेब महाराज बाजूला बसलेले, काकासाहेब घाटगे उभे.











राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे
राज्यारोहण समारंभाचे छायाचित्र.





राजर्षी शाहू महाराज यांच्या मराठी (मोडी लिपी) व इंग्रजी स्वाक्षरी.



**राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी आपल्या राज्यात सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी राज्यातील सर्वांना समान संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला होता. त्याचाच एक भाग म्हणजे बहुजनांकरिता शाळा, वसतिगृहे सुरु करून बहुजनांच्या उद्धारासाठीचे पहिले पाऊल कोल्हापूर संस्थानात शाहू महाराज यांच्या कार्याने पडले. त्यांनी बहुजनांना समान संधी मिळावी, म्हणून वेगवेगळे अध्यादेश काढून त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी केली.**

# सामाजिक समतेचे शिल्पकार

**डॉ. अविनाश फुलझेले**

राजर्षी शाहू महाराज यांनी बहुजन वर्गाला स्वावलंबनाच्या पायावर उभे राहता यावे, म्हणून शाळा व वसतिगृह उभारून त्यांना समानतेची वागणूक देण्याकरिता पुढाकार घेतला. एवढेच नव्हे तर त्यांच्यात वैचारिक जागृती व्हावी, म्हणून त्यांच्या सभा, परिषदांमध्ये सहभागी झाले. त्यांच्या या कार्यामुळे बहुजनांच्या चळवळीला मोठे पाठबळ मिळाले. त्यांच्या या कार्यामुळे बहुजन समाजाने त्यांना देवाची उपमा दिली. त्यांनी सामाजिक विषमता नष्ट करण्यासाठी चालवलेले प्रयत्न व वैचारिक जागृतीच्या दृष्टीने त्यांनी बहुजनांसाठी केलेल्या कार्याचा आढावा घेण्याचा प्रयत्न या लेखाद्वारे करण्यात आला आहे.

## सामाजिक विषमता नष्ट करण्याचे कार्य

राजर्षी शाहू महाराज यांनी हिंदू समाजातील पारंपरिक वर्णव्यवस्थेला आव्हान देऊन समतेवर आधारित नवा समाज निर्माण करण्यासाठी स्वतःला झोकून दिले. जातिभेद नष्ट करणे आणि विविध सामाजिक वर्गांमधील अडथळे दूर करणे हे त्यांचे ध्येय होते. शाहू महाराजांनी बहुजनांशी गैरवर्तन करण्यास मनाई करणारा आदेश जारी केला. त्यांनी सार्वजनिक ठिकाणे बहुजनांसाठी उपलब्ध करून दिली आणि त्यांना नळ, विहिरी, तलाव, रुग्णालये, शाळा आणि कार्यालये या सार्वजनिक सुविधांचा वापर करण्याची परवानगी देऊन समान अधिकार दिले. त्यांचा असा विश्वास होता की, विशेषाधिकारप्राप्त उच्च जातीचे त्यांचे वारसा हक्क सोडून देणे आणि अत्याचारित कनिष्ठ जातींना आधार देणे हे कर्तव्य आहे. बहुजन मुलांना सरकारी शाळांमध्ये प्रवेश द्यावा आणि केवळ त्यांच्यासाठी स्वतंत्र शाळा बंद केल्या पाहिजेत, असा आदेशही त्यांनी दिला. याव्यतिरिक्त, त्यांनी विविध जाती आणि धर्मातील मुलांना कोणताही भेदभाव न करता समावेश करण्याची वकिली केली. शाहू महाराज सामाजिक समता वाढवण्यासाठी बहुजनांना धार्मिक शिक्षण देण्यासाठी कटिबद्ध होते. त्यांनी बहुजन विद्यार्थ्यांसाठी उपनयन विधी समारंभ आयोजित केला होता, जो परंपरागतपणे उच्च जातींसाठी राखीव होता, त्यांचा दर्जा उंचावण्याकरिता त्यांच्या कृतीने ब्राह्मणवादाच्या पायाला आव्हान दिले, त्यामुळे पुण्यातील काही ब्राह्मणांचा विरोध झाला. शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात चालवलेल्या या कार्याचा परिणाम ब्राह्मणशाहीवर होणे अपरिहार्य होते. त्यामुळे पुण्यातील काही ब्राह्मणांनी शाहू महाराजांबद्दल ब्रिटिशांकडे तक्रार करून त्यांच्यावर राजकीय दडपण आणण्याचा प्रयत्न केला होता. त्यावेळी शाहू महाराज म्हणाले होते की, 'बहुजन समाजाची सेवा करत असता, जर मला राज्यत्याग करावा लागला तर त्याची मला मुळीच पर्वा नाही. सर्वांगीण परिस्थितीने गांजलेल्या समाजाची दुःखे नष्ट करण्यासाठी माझ्यात रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत मी अहोरात्र प्रयत्न करत राहीन,' असे त्यांनी विरोधकांना व त्यावेळच्या इंग्रजांना स्पष्टपणे बजावले होते. शाहू महाराजांनी एक प्रकारची सामाजिक समतेची चळवळ उभी केली. हिंदू समाजात प्रचलित असलेल्या हानिकारक रूढी आणि परंपरा सुधारण्याच्या गरजेवर भर देत त्यांनी सामाजिक समतेसाठी चळवळीचे नेतृत्व केले.

## वैचारिक जागृतीचे कार्य

राजर्षी शाहू महाराज यांनी आपल्या प्रांतातील बहुजनांना शिक्षण आणि रोजगाराच्या समान संधी उपलब्ध करून देण्यासाठी महत्त्वपूर्ण प्रयत्न केले. त्यांच्या ऐतिहासिक कार्याबद्दल बहुजन समाज अत्यंत कृतज्ञ होता. एक उल्लेखनीय उदाहरण म्हणजे बस्तवाडपेटा रायबाग परिसरातील करवीरच्या महार जहागीरदारांनी २७ जुलै १९२१ रोजी महार वारसा हक्कासाठी अर्ज सादर केला. त्यांच्या अर्जात त्यांनी बहुजनांच्या उत्थानासाठी शाहू महाराजांच्या प्रयत्नांवर प्रकाश टाकला, असे नमूद केले की, श्रीमंत महाराज छत्रपतींनी आम्हास ऊर्जितावस्थेमध्ये आणावे आणि आमची सुधारणा करावी म्हणून अनेक मार्गांनी प्रयत्न चालवले आहेत. आमच्यासाठी बोर्डिंग काढली, विद्यामंदिरे खुली केली, कित्येकांना नोकऱ्या दिल्या आणि काहींचा वकिलीसारख्या उच्च धंद्यातही प्रवेश करविला आणि जातीवाद बाजूला ठेवून सरकारने आम्हास मुलाप्रमाणे ममतेने वागवले, याबद्दल आमचा समाज महाराजांना देवाप्रमाणे पूज्य मानत आहे आणि या कार्याबद्दल पिढ्यानुपिढ्या हा समाज हुजूर चरणाचा ऋणी राहील, यावरून शाहू महाराजांप्रति असलेली कृतज्ञता लक्षात येते.

शाहू महाराजांचा असा विश्वास होता की, जातिवादावर मात करण्यासाठी मुख्य प्रवाहातील आणि खालच्या जातीतील लोकांनी एकत्र काम केले पाहिजे. समाजातून जातिवाद दूर करण्यासाठी आंतरजातीय संबंधांना प्रोत्साहन दिले पाहिजे आणि आंतरजातीय विवाहातील कायदेशीर अडथळे दूर केले पाहिजेत, अशी भूमिका त्यांनी मांडली. याव्यतिरिक्त त्यांनी मे १९२० मध्ये अखिल भारतीय मागासवर्गीय परिषदेचे अध्यक्षपद भूषवले, जिथे त्यांनी यावर जोर दिला

की, देशाची प्रगती जातिवादाच्या निर्मूलनावर अवलंबून आहे.

दिल्ली येथे भरलेल्या तिसऱ्या बहिष्कृत भारत परिषदेत राजर्षी शाहू महाराज आपल्या भाषणात म्हणाले होते की, ‘आपणामध्ये आज जी जागृती झाली आहे, जे नवजीवन उत्पन्न झाले आहे, त्या सर्वांचे कारण ब्रिटिश साम्राज्याचा उदय होय. ही गोष्ट केव्हाही विसरता कामा नये. त्याचबरोबर कोणत्याही देशाचे राजकीय भवितव्य त्यातील लोकांच्या चांगल्या चारित्र्यावर अवलंबून असते. करिता आपण सर्वांनी आपले शील सुधारण्याचा प्रयत्न करून आपणामध्ये आपणास दिलेल्या हक्काचा उपयोग करण्याची योग्यता आहे, असे आपल्या वर्तनाने दाखविले पाहिजे.’ असे जागृतीचे विचार त्यांनी बहुजनांपर्यंत यशस्वीपणे पोहोचवले होते. त्यांनी बहुजनांकरिता एवढे भरीव कार्य केले तरी त्यांनी कधीही स्वतःला बहुजनांचा पुढारी म्हणून मिरवले नाही, तर त्यांनी नेहमी बहुजनांचा सेवक म्हणून काम केले, याबाबत नागपूर येथील अखिल भारतीय बहिष्कृत परिषदेच्या वेळी छत्रपती शाहू महाराज म्हणाले होते की, ‘तुमच्यावर जर काही प्रसंग आला तर माझा सर्व राज्यकारभार युवराजांच्या स्वाधीन करून मी तुमच्या सेवेला हजर राहीन,’ असे स्पष्ट केले.

शाहू महाराजांना नेहमी असे वाटायचे की, बहुजनांच्या चळवळीला इतरांच्या नेतृत्वापेक्षा बहुजनातील नेतृत्व जर उभे राहिले, तर त्यांच्या मुक्तीचा मार्ग जास्त प्रशस्त होईल, असेच शाहू महाराजांना गवईंना लिहिलेल्या पत्रातून सूचित करावयाचे होते. या पत्रात शाहू महाराज म्हणतात की, ‘तुम्ही चळवळ करताना आपले पुढारीपण दुसऱ्या जातींना सहसा देऊ नये. आपल्याच जातीतील विश्वासू आणि योग्य पुढारी नेमावा. नाहीतर अन्य जातीचे पुढारी तुम्हा लोकांना लांडगे होऊन खात जातील.’ म्हणूनच शाहू महाराजांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या माणगाव परिषदेत त्यांनी डॉ. आंबेडकरांच्या रूपाने बहुजनांना पुढारी मिळाला असे जाहीर केले. यानंतर इतर पुढाऱ्यांचे महत्त्व कमी होत जाऊन बहुजन समाज डॉ. आंबेडकरांच्या पाठीमागे भक्कमपणे उभा राहिला. पुढे डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वात बहुजनांची मानव मुक्तीची चळवळ उभी राहिली.

महात्मा फुले यांची सत्यशोधक चळवळ शाहू महाराज पुढे घेऊन गेले. त्यांनी आपल्या सत्तेचा उपयोग करून समाजातील विषमता घालवण्याचे विधायक काम केले. लोकांच्या परिस्थितीत बदल घडवून, त्यांना प्रगतीच्या उच्च मार्गावर आणून माणुसकीची जाणीव करून देणे हेच युगपुरुषाच्या कार्याचे मुख्य अंग असते, त्या दृष्टीने विचार करता छत्रपती शाहू महाराज हे युगपुरुष होऊन गेले. जातिभेद निवारणासारख्या बिकट प्रश्नाला शाहू महाराजांनी ज्या काळात चालना दिली, तो काळ आजच्यासारखा पुढे गेलेला नव्हता. हेच ‘केसरी’ वर्तमानपत्रात लिहिलेल्या शाहू महाराजांच्या मृत्यूलेखातून दिसून येते. केसरीकर यात म्हणतात की, ‘धर्मशास्त्र, राजकारणशास्त्र, समाजशास्त्र या तिन्हींमध्ये वक्र बुद्धीचा नांगर खोल घालून सत्तेच्या बळावर शाहू महाराजांइतकी हल्लीच्या काळात दुसऱ्या कोणीही विचारी जमीन उलतीपालथी केली नसेल. त्यांनी केलेल्या मेहनत-मशागतीने कोणत्या प्रकारचे पीक आले, हे लोकांना दिसतच आहे.’ असा उपरोधक टोला केसरीकरांनी लावला होता, तर प्रबोधनकार ठाकरेंनी छत्रपती शाहू महाराजांच्या कार्याकडे वेगवेगळे समाज गट कसे बघतात, हे दाखवण्याचा प्रयत्न केला होता. यासंबंधी प्रबोधनकार असे म्हणतात की, चित्पावनांना ते वैऱ्याप्रमाणे दिसत. देशस्थांना धार्मिक क्षेत्रातल्या बंडखोरांप्रमाणे भासत, मुंबई व हिंदुस्थान सरकारला ते प्यारे दोस्त, ब्राह्मणेतरांना ते मायबाप वाटत, तर बहुजनांना ते खास परमेश्वराचे अवतार भासत असत. यावरून शाहूंच्या कार्याकडे बघण्याचा दृष्टिकोन स्पष्ट होतो, तर ६ मे १९२२ रोजी छत्रपती शाहू महाराजांच्या निधनानंतर नागपुरातील ‘बहिष्कृत भारत’ वृत्तपत्रातून शाहू महाराजास दिलेल्या श्रद्धांजलीत लिहिले की, तो आमचा अब्राहम लिंकन, प्रेमाच्या वृक्षाला द्वेषाचे फळ येत नाही हे सिद्ध करून दाखवणारा, तो आमचा कल्पवृक्ष, जातिभेदाचा डाग पुसून हिंदूचे मुख उजळ करणारा, तो आमचा भगवान शाहू छत्रपती... असा उल्लेख केला, तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी, ‘शाहू छत्रपतींनी समाजातील विषमता नष्ट करण्याचा आटोकाट प्रयत्न केला व ब्राह्मणांचा बालेकिल्ला ढासळून टाकला.’ असा उल्लेख केला. या अभ्यासावरून असे दिसून येते की, छत्रपती शाहू महाराजांनी बहुजनांच्या प्रगतीची सदैव काळजी केली. त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक व वैचारिक जागृतीचे फार मोठे कार्य केले. शाहू महाराजांचे हे कार्य निश्चितच भावी पिढीला प्रेरणा देणारे आहे.

**संदर्भ :–**


१. खरात शंकरराव, ‘डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतर,’ (मराठी) श्री लेखन वाचन भांडार, ठोकळ भवन, पुणे, १९६६,

२. प्रबोधन पाक्षिक, (मराठी) मुंबई, १ जून १९२२, वर्ष १, अंक १६, श्री. वसंत मून यांचे खासगी संग्रहालय, नागपूर.

३. गोरे गोविंद, लिमये शिरुभाऊ, ‘महाराष्ट्रातील दलित–शोध आणि बोध,’ (मराठी) सहाध्ययन प्रकाशन, मुंबई, १९७३.

४. बागल खंडेराव माधव (संपा.), ‘सत्यशोधक हीरक महोत्सव ग्रंथ,’ (मराठी) हिरक महोत्सव ग्रंथ समिती, १९३३.

५. पवार जयसिंगराव (संपा), ‘राजश्री शाहू स्मारक ग्रंथ,’ (मराठी) महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, २००१.

६. गरुड साप्ताहिक, कोल्हापूर, गुरुवार, १३ मे १९५४, वर्ष २८, अंक २०, श्री. वसंत मून यांचे खासगी संग्रहालय, नागपूर.

७. बंदसोडे रामचंद्र हरी, ‘अस्पृश्यांची दिशाभूल,’ (मराठी) प्रकाशक गिरिजाशंकर मारुती शिवदास, मुंबई, १९३०.

८. बहिष्कृत भारत पाक्षिक, (मराठी) मुंबई, शुक्रवार, ४ नोव्हेंबर १९२७, वर्ष १, अंक १४ –१५ –१६, श्री. वसंत मून यांचा खासगी संग्रहालय, नागपूर.

९. मूकनायक पाक्षिक, (मराठी) मुंबई, शनिवार, ५ जून १९२०, वर्ष १, अंक

१०. बहिष्कृत भारत पाक्षिक, (मराठी) नागपूर, शनिवार, ३ जुन १९२२, पृ. ४. हे पाक्षिक गणेश आकाजी गवई यांनी डॉ. आंबेडकरांपूर्वी नागपूरवरून सुरू केले होते. पुढे याच नावाचे पाक्षिक डॉ. आंबेडकरांनी १९२७ साली मुंबईतून सुरू केले. श्री. वसंत मून यांचे खासगी संग्रहालय, नागपूर.

११. शेंडे ना.रा., ‘विदर्भातील एक थोर दलित पुढारी ग. आ. गवई: व्यक्ती आणि कार्य,’(मराठी) प्रकाशक प्रभाकर पांडुरंग भटकर, अमरावती, १९६३.

१२. मून वसंत (संपा.), ‘डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे,’ खंड १८, भाग २, (मराठी) डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन, मुंबई, २००२.



**(लेखक राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चेअर व विचारधारा विभागाचे प्राध्यापक व विभागप्रमुख आहेत.)**


महाराष्ट्राच्या पत्रकारितेची वर्गवारी करायची झाल्यास मुख्यतः चार भागांत तिचे वर्गीकरण करता येते. पत्रकारितेचा पहिला प्रवाह स्वातंत्र्यचळवळीतून आकाराला आला. सामाजिक सुधारणांचा आग्रह धरणारा दुसरा एक प्रवाह याच दरम्यान कार्यरत होता. तिसऱ्या प्रवाहात सत्यशोधक पत्रकारितेने आपला वेगळा ठसा उमटवला आहे, तर मराठी पत्रकारितेत दलित पत्रकारिता हा चौथा; परंतु तितकाच महत्त्वपूर्ण टप्पा राहिला आहे. या प्रत्येक टप्प्यावर राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे मोलाचे योगदान आहे.

# वृत्तपत्रांसाठी मोलाचे योगदान

**डॉ. शिवाजी जाधव**

विशेषतः सत्यशोधक आणि दलित पत्रकारितेला राजर्षींनी प्रचंड आर्थिक, नैतिक आणि कृतिशील बळ दिले. सत्यशोधक पत्रकारितेच्या मौलिकतेकडे अभ्यासकांचे काहीसे दुर्लक्ष झाले असले, तरी राजर्षी शाहू यांचे सत्यशोधक पत्रकारितेतील योगदान अतुलनीय आहे. महात्मा फुले यांच्या प्रेरणेतून सुरू झालेला सत्यशोधक पत्रकारितेचा प्रवास शेतकरी, कष्टकरी, महिला; तसेच बहुजनांच्या आकांक्षा प्रतिबिंबित करणारा ठरला. हा प्रवाह खळाळता ठेवण्यासाठी राजर्षी शाहू महाराज यांनी जाणीवपूर्वक मेहनत घेतली होती.

महात्मा फुले यांची सत्यशोधक चळवळ ही केवळ हिंदू समाजातील जातिव्यवस्था आणि पुरोहितशाही यांच्या अहंकारी वर्चस्वाविरुद्ध दिलेली झुंज नव्हती, तर अवघा बहुजन समाज शिक्षण, धर्म, अर्थनीती, साहित्य अशा सर्वच बाजूंनी सामर्थ्यवान व्हावा, यासाठीचा तो बहुजनमुक्तीचा व्यापक लढा होता. बहुजन समाजाचे वृत्तपत्र असावे हा विचार प्रथम महात्मा फुले यांनी मांडला. त्यांचेच सहकारी कृष्णराव भालेकर यांनी फुले यांच्या कल्पनेला मूर्तरूप दिले. भालेकर यांनी 'दीनबंधू' हे ब्राह्मणेतरांचे पहिले वृत्तपत्र सुरू केले. या वृत्तपत्रातून सातत्याने सत्यशोधक विचारांचा प्रसार करण्यात येत होता. महात्मा फुले यांच्या समाजसुधारणेच्या कार्यालयावर पुण्यातील काही वर्तमानपत्रे टीका करत होती. या टीकेला प्रत्युत्तर देण्यासाठी बहुजनवादी वृत्तपत्राची गरज होती. एका अर्थाने 'दीनबंधू'ने ही गरज पूर्णत्त्वास आणली.


195/S-21

for the Fasli year 1330 Calendar year 1920-21

सन १३३० फसली व इसवी सन १९२०-२१


FINANCIAL SECRETARY TO H. H. THE MAHARAJA OF KOLHAPUR

| Date of final order / निकाल तारीख | Final order / निकाल हुकूम |
|---|---|
| 28-9-21 | भगवा झेंडा संपादक मि॰ दत्तात्रय यशवंत कुरणे यांना कागदा करितां पाचशें रुपये देणगी खातें-खर्च घालून आदा करावेत. 500 |

## वृत्तपत्रे सुरू करण्यासाठी पुढाकार

महात्मा फुले यांच्यावर उच्चवर्णीय वृत्तपत्रांनी जशी टीकेची झोड उठविली होती; तशीच टीका राजर्षी शाहू महाराज यांच्यावरही होत होती. पुण्यातील वृत्तपत्रे या कामी आघाडीवर होती. विशेषतः शाहू महाराजांनी सामाजिक सुधारणांना गती दिल्यानंतर ते वृत्तपत्रांच्या टीकेचे धनी बनले होते. फुले यांच्याप्रमाणेच राजर्षींनी बहुजन समाजातील तरुणांनी वृत्तपत्रे सुरू करावीत, असा विचार मांडला होता. अधिकाधिक वर्तमानपत्रे निघावीत; ती ठरावीक उच्चभ्रूंच्या हातची खास शस्त्रे म्हणून न राहता सर्वसामान्यांसाठीही उपलब्ध व्हावीत, अशी भूमिका राजर्षी शाहू महाराज यांनी घेतली. आपल्या अनेक दलितोद्धारक चळवळींबरोबरच त्यांनी वर्तमानपत्रांची चळवळही मोठ्या उमेदीने चालवली. वृत्तपत्रांची म्हणजेच पर्यायाने छापील शब्दांची ताकद आणि त्याचा जनमानसांवर होणारा परिणाम याची शाहू महाराजांना कल्पना होती. म्हणून त्यांनी वृत्तपत्रे सुरू करण्यासाठी पुढाकार घेतला. राजर्षी शाहू महाराज यांनी अनेक क्रांतिकारी निर्णय घेतले. या निर्णयांचे जसे स्वागत झाले, तशीच त्यांच्यावर टीकाही खूप झाली. टीका करण्यात मुख्यत्वेकरून वृत्तपत्रे आघाडीवर होती. २६ जुलै १९०२ रोजी शाहू महाराज यांनी आपल्या संस्थानात मागासलेल्या जातींसाठी नोकरीत ५० टक्के जागा

राखून ठेवल्याचा आदेश काढल्यानंतर उच्चवर्णीयांतून तीव्र संताप व्यक्त झाला. समाजाच्या आर्थिक क्षेत्रात पूर्ण वर्चस्व असलेल्या सवर्ण वर्गाविरुद्ध राजर्षींनी आवाज उठवला. वेदोक्त प्रकरण हे उच्चवर्णीयांना निमित्त झाले. या प्रकरणावरून उच्चवर्णीय वृत्तपत्रांनी शाहू महाराजांना घेरले. वेदोक्त प्रकरणानंतर पुण्यातून 'केसरी', तर कोल्हापुरात विष्णू विजापूरकरांचे 'समर्थ' आणि शंकरशास्त्री गोखले यांचे 'विद्याविलास' ही वृत्तपत्रे शाहू छत्रपतींच्यावर टीकेची झोड उठवत; परंतु शाहू छत्रपतींच्या बाजूने त्यांचे समर्थन करणारी प्रभावी वृत्तपत्रे त्यावेळी महाराष्ट्रात अस्तित्वात नव्हती. परिणामी राजर्षी शाहू महाराज यांच्या सामाजिक कामाची हेटाळणी करण्यासाठी वृत्तपत्रांचा गैरवापर झाला. त्यांच्या कार्याला कमी लेखण्याचे काम विरोधी वृत्तपत्रांनी केले. लोकमान्य टिळकांचा 'केसरी' या कामी सर्वात पुढे होता. याशिवाय कोल्हापुरात राजाराम कॉलेजचे तेव्हाचे संस्कृतचे प्रा. विष्णू गोविंद विजापूरकर यांनीही महाराजांच्या विरोधात भूमिका घेतली होती.


१८-६-२०

रा. श्रीपतराव शिंदे यांना प्रेसकरितां एक हजार रुपयाचा १०००
चेक देणगी खाते खर्च लिहून देणेत यावा.
G.R. Shinthawe
6-7-20

3-७-20

प्रा. विजापूरकरांनी 'ग्रंथमाला', 'समर्थ', 'विश्ववृत्त' आणि 'आक्रोश' अशा काही नियतकालिकांचे संपादन केले. या सर्व वृत्तपत्रांतून त्यांनी कोल्हापूर दरबारावर टीका केली. विशेष म्हणजे, ही वृत्तपत्रे सुरू करण्यासाठी प्रा. विजापूरकरांना राजर्षी शाहू महाराज यांनीच अर्थसाहाय्य केले होते. राजर्षी शाहू यांच्या राज्याभिषेकाचा मुहूर्त हेरून प्रा. विजापूरकर यांनी आपले पहिले मासिक 'ग्रंथमाला' हे नियतकालिक सुरू केले. राज्याभिषेकाच्या निमित्ताने एखादे नियतकालिक सुरू होत असेल, तर समाजोपयोगी चांगले कार्य होणार आहे; या विचाराने राजर्षी शाहू महाराज यांनी या प्रसंगी प्रा. विजापूरकरांच्या विनंतीनुसार त्यांच्या 'ग्रंथमाला' मासिकास भरपूर साहाय्य मंजूर केले. त्यास प्रतिवर्षी ५०० रुपये देण्याचा खास हुकूम महाराजांनी काढल्याची नोंद आहे. शाहू महाराजांनी हा निधी लोककल्याणाची जबाबदारी वृत्तपत्राने उचलावी म्हणून दिला होता. याशिवाय दरबारची छपाईची कामेही प्रा. विजापूरकरांच्या छापखान्यास मिळत होती. कोल्हापूर दरबारचा पाठिंबा मिळत गेल्याने प्रा. विजापूरकरांना एकाहून अधिक नियतकालिके सुरू करता आली. राजर्षी शाहू महाराज यांच्याकडून पैसे घेऊन विजापूरकर हे सातत्याने राजर्षींवरच टीका करत. एवढेच नव्हे, तर दरबारावर कुत्सित टीका करण्यासाठी प्रा. विजापूरकर काही विशेषांक काढत असत. कित्येकदा त्याचे अंक आठवड्यातून दोन-दोन वेळा प्रकाशित होत असत. शाहू महाराज आणि दरबाराने घेतलेल्या निर्णयावर टीका करणे, असा एककलमी कार्यक्रम या वृत्तपत्रांनी राबवला होता. तरीही राजर्षींनी त्यांना दिलेला निधी बंद केला नाही किंवा वृत्तपत्रावर कारवाई करून आपल्यावर होणारी टीका थांबवली नाही. या बाबी राजर्षी शाहू महाराज सहज बंद करू शकले असते. मात्र त्यांनी वृत्तपत्रस्वातंत्र्याची आब राखली. म्हणूनच राजर्षी शाहू महाराज 'लोकराजा' आहेत.

## पत्रकारितेचे प्रशिक्षण देण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न

वेदोक्त प्रकरणात प्रा. विजापूरकरांनी उघड-उघड उच्चवर्णीयांची बाजू वृत्तपत्राद्वारे उचलून धरली होती. 'ग्रंथमाले'च्या एका अंकात त्यांनी राजर्षींवर टीका केल्यानंतर या वादात पुढे लोकमान्य टिळक, वाईचे भाऊशास्त्री लेले आणि वि. का. राजवाडे यांनी उडी घेतली, तर दुसऱ्या बाजूला राजारामशास्त्री भागवत, भारताचार्य चिं. वि. वैद्य, महादेवशास्त्री दिवेकर, महादेव गणेश डोंगरे, भास्करराव जाधव यांनी शाहू महाराजांची बाजू उचलून धरली. 'वेदोक्ताचे खूळ' या नावाने 'केसरी'च्या २२ आणि २९ ऑक्टोबर १९०१ च्या अंकात दोन स्वतंत्र अग्रलेख लिहून उच्चवर्णीयांची बाजू उचलून धरली होती. पुढे हळूहळू वेदोक्ताचा संघर्ष अधिक तीव्र होत गेला. राजर्षी शाहू यांच्या बाजूने उभ्या राहणाऱ्या वृत्तपत्रांची गरज तीव्रतेने भासू लागली. यातून राजर्षी शाहू महाराजांनी बहुजनांतील सुशिक्षित तरुण शोधून त्यांना पत्रकारितेत घेऊन येण्याचे प्रयत्न जोमाने सुरू केले.


राजर्षींनी केवळ दरबार आणि खासगी सेवेतच नाही, तर समाजाच्या सर्वच क्षेत्रात बहुजन समाजातील होतकरू, हुशार तरुणांना संधी देण्याची भूमिका घेतली. वृत्तपत्राच्या क्षेत्रातही त्यांनी अशी तरुण मुले हेरून त्यांच्यावर पत्रकारितेचे संस्कार केले. बहुजन समाजातील या मुलांना पत्रकारितेचे प्रशिक्षण देण्यासाठी त्यांनी जाणीवपूर्वक पुढाकार घेतला. पुण्यासह सर्व ठिकाणच्या वृत्तपत्रांतून छत्रपती शाहू महाराजांविरुद्ध होणाऱ्या प्रचाराला प्रत्युत्तर देण्यासाठी कोल्हापुरातील अनेक ब्राह्मणेतर सुशिक्षित तरुण शाहू महाराजांच्या प्रेरणेने नियतकालिके काढण्यास पुढे सरसावले. ब. कृ. पिसाळ यांचे 'विश्वबंधू' हे १९११ साली निघालेले पत्र अशाच प्रयत्नांचे फळ होते. पिसाळ यांच्यासारख्या अनेक तरुणांना राजर्षींनी पत्रकारितेत जाण्यासाठी प्रोत्साहन दिले. राजर्षींची प्रेरणा आणि सहकार्यातून पुढे अनेक सुशिक्षित तरुण वृत्तपत्र क्षेत्रात उतरले.

## बहुजन समाजातील तरुणांना प्रशिक्षण

महात्मा फुले यांच्या मृत्यूनंतर काहीशा निस्तेज बनलेल्या सत्यशोधक समाजाला राजर्षी शाहू महाराजांनी ऊर्जितावस्था दिली. कोल्हापुरात सत्यशोधक समाज स्थापन करण्याचा प्रस्ताव ११ जानेवारी १९११ रोजी मांडण्यात आला होता. भास्करराव जाधव यांची अध्यक्ष तर अण्णासाहेब लट्ठे यांची उपाध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली होती. या समाजाला राजर्षींनी मोफत जागा दिली होती. सत्यशोधक समाजाचे कार्य लोकांपर्यंत पोहोचावे, यासाठी वृत्तपत्रांची गरज होती आणि राजर्षींच्या पुढाकारातून ही गरज पुढे पूर्णत्वास आली. कोल्हापुरात सुरू झालेल्या 'विजयी मराठा' या साप्ताहिकाचे संपादक भुजंग कृष्णाजी गायकवाड यांना राजर्षी शाहू महाराज यांनी पत्रकारिता प्रशिक्षणासाठी मोठे साहाय्य केले होते. मुंबईच्या 'इंदुप्रकाश' या

दैनिकाच्या कचेरीत स्वत: शाहू महाराज भुजंग गायकवाड यांना घेऊन गेले. 'इंदुप्रकाश'चे संपादक न. र. फाटक यांच्याकडे गायकवाड यांना सुपूर्द करून राजर्षींनी त्यांना वृत्तपत्र चालवण्याचे प्रशिक्षण देण्यास सांगितले होते. 'इंदुप्रकाश' हे वृत्तपत्र पुरोगामी, समाजसुधारक वृत्तीचे होते. न्यायमूर्ती रानडे, नारायणराव चंदावरकर यांनी ते चालवल्यामुळे राजर्षी शाहू महाराज यांनी भुजंग यांना पत्रकारितेचे धडे देण्यासाठी या वृत्तपत्राची निवड केली होती. भुजंग गायकवाड यांचे पत्रकारितेचे शिक्षण न. र. फाटक यांच्या हाताखाली पूर्ण झाले आणि या शिदोरीवर या युवकाने कोल्हापुरात 'विजयी मराठा'हे साप्ताहिक नावारूपास आणले. सुधारणावादी, पुरोगामी संपादकांच्या हाताखाली बहुजन समाजातील तरुणांना प्रशिक्षण देण्याचा राजर्षी शाहू महाराज यांचा हेतूच खूप काही सांगून जातो.

राजर्षी शाहू यांच्या प्रेरणेने पुढे अनेक ठिकाणी वृत्तपत्रे सुरू झाली. ब्राह्मणेतर चळवळीला राजर्षींचा सक्रिय पाठिंबा होता. या चळवळीतून अनेक संपादक समोर आले. ब्राह्मणेत्तर चळवळीच्या इतिहासात दिनकरराव जवळकर, केशवराव जेधे आदी नावे सुप्रसिद्ध आहेत. दिनकररावांनी लेखणी व वाणीद्वारे ब्राह्मणेतर चळवळीत चैतन्य आणले. दिनकररावांना घडवण्यात राजर्षी शाहू महाराज यांचे योगदान खूप मोठे होते. दिनकरराव जवळकर यांनी लिहिलेल्या 'प्रणय-प्रभाव' या नाटकामुळे समाजातील उच्च वर्ग संतप्त झाला होता. यामध्ये संमतीवयाच्या कायद्याला विरोध करणाऱ्या पुढाऱ्यांवर जवळकरांनी खरमरीत टीका केली होती. त्यामुळे जवळकरांच्या मागे सरकारी ससेमिरा लागला होता. जवळकर अधून-मधून 'विजयी मराठा'मध्ये लिहीत होते. शाहू महाराजांनी त्यांना कोल्हापुरात आणले. जवळकरांनी कोल्हापुरात 'तरुण मराठा' हे वृत्तपत्र सुरू केले. शनिवारपेठेत टाऊन हॉल बागेच्या पश्चिम बाजूस जवळकरांचा प्रेस होता. शाहू महाराजांच्या निधनानंतर जवळकरांनी कोल्हापूर सोडले. जवळकर यांना पत्रकारिता करण्यासाठी शाहू महाराजांनी मोठी मदत केली होती. पुढे जवळकरांनी मुंबईत 'कैवारी' आणि 'तेज' या वृत्तपत्रांचे संपादन करून ती वृत्तपत्रे गाजवली.


208|5-60 28

for the Fasli year 132 . Calendar year 191 .

सन १३३ फसली व इसवी सन १९१

| Date of final order. निकाल तारीख. | Final order. निकाल हुकूम. | | |
|---|---|---|---|
| | | | |
| | 21.12.20 | | |

## वृत्तपत्रांसाठी प्रोत्साहन

राजर्षी शाहू महाराजांचा प्रभाव पडलेला कालखंड १९०१ ते १९२२ असा आहे. या कालखंडात अनेक वृत्तपत्रे निघाली, ती बहुतेक शाहू महाराजांच्या प्रोत्साहनानेच. 'ज्ञानसागर' हे वृत्तपत्र कोल्हापुरात अधूनमधून थोडा विराम घेत प्रदीर्घ काळ चालू राहिले. त्याच्या पाठोपाठ 'विद्याविलास' हे साप्ताहिक दिसून येते. त्यानंतर 'हॉस्पिटल असिस्टंट', 'विजयी मराठा', 'विश्वबंधू', 'धर्मविचार', 'राजारामियन', 'चंद्रोदय', 'प्रगती जिनविजय', 'जैन बोधक', 'आचार्य ॲन्ड धर्मविचार', 'फिलॉसॉफी ॲण्ड रिलिजन', 'तरुण मराठा', 'गरिबांचा कैवारी', 'आर्य भानू', 'भगवा झेंडा', 'शिवणकला', 'शाहू विजयी मराठा', 'हंटर', 'कर्मवीर' ही अनेक विषयांना वाहिलेली बहुधा साप्ताहिके, पाक्षिके समाजातील अनेकविध घटकांनी चालवली. त्यांना राजर्षींचे प्रोत्साहन, आर्थिक साहाय्य मिळाले. ही वृत्तपत्रे राजकीय, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, औद्योगिक, कृषी आदी विषय हाताळत होती. यामुळेच कोल्हापूरच्या वृत्तपत्रसृष्टीच्या प्रारंभीच्या २० वर्षांच्या काळात वैविध्यपूर्ण विकास झालेला दिसतो.

कोल्हापुरात सत्यशोधक चळवळ रुजावी, यासाठी राजर्षी शाहू यांनी खूप प्रयत्न केले. या चळवळीला पूरक असणारी वृत्तपत्रे आणि ग्रंथनिर्मिती व्हावी, यासाठीही ते झटले. कोल्हापुरातील सत्यशोधक चळवळीचा वेग वाढावा म्हणून विठ्ठल बाबूराव डोणे, बाबूराव यादव, भास्करराव जाधव, शाहीर लहरी हैदर, दिनकरराव जवळकर आदी कार्यकर्त्यांना संस्थानाच्या नोकरीत माफी देणे, चळवळीसाठी आर्थिक मदत करणे किंवा ब्राह्मणेतर पत्रके-नियतकालिके सुरू करण्यास सक्रिय प्रोत्साहन देणे अशी अनेक प्रकारची मदत राजर्षी शाहू यांनी केलेली आढळून येते. श्रीपतराव शिंदे यांच्या 'विजयी मराठा' या वृत्तपत्राने शाहू महाराज यांनी सत्यशोधक समाजाचे काम समर्थपणे पुढे नेल्याचे सुरुवातीपासूनच नोंदवले आहे. एवढेच नव्हे, तर शाहू महाराज हेच महात्मा फुले यांचे खरे वारसदार आहेत, असेही या वृत्तपत्राने 'महात्मा फुले आणि सत्यशोधक समाजाची ज्युबली' या अग्रलेखात म्हटले आहे.

## राजर्षी शाहू महाराजांचा उचित गौरव

वेदोक्त प्रकरणात अनेक वृत्तपत्रांनी राजर्षी शाहू यांच्यावर विषारी टीका केली. कोल्हापूर, पुण्याबरोबरच

नाशिकची वृत्तपत्रेही राजर्षी शाहू महाराजांवर टीका करत होती. नाशिकमधून प्रसिद्ध होणाऱ्या 'नाशिकवृत्त' या वृत्तपत्रात 'झोटिंगाबाद' नावाची कादंबरी कोल्हापूर संस्थानच्या तथाकथित गैरकारभारावर प्रकाश टाकण्यासाठी क्रमशः प्रसिद्ध केली जात होती. मात्र, राजर्षी शाहू महाराज यांची बाजू मांडणारी वृत्तपत्रे त्या काळात नसल्याने त्यांच्याबाबत समाजात गैरसमज पसरत राहिला. १९१७ पर्यंत मुकुंदराव पाटील यांचे 'दीनमित्र' हे वृत्तपत्र ब्राह्मणेतरांच्या बाजूने एकाकी झुंज देत होते. १९१९ च्या जुलैमध्ये पुण्यात वालचंद कोठारी यांच्या संपादनाखाली 'जागरूक' आणि बडोद्यामध्ये ऑक्टोबर महिन्यात भगवंतराव पाळेकरांचे 'जागृती' ही दोन ब्राह्मणेतरांची वृत्तपत्रे सुरू झाली. केवळ ही तीन वृत्तपत्रे ब्राह्मणेतर चळवळीवर टीकेचा भडिमार करणाऱ्या उच्चजातीय वृत्तपत्रांना तोंड देण्यास असमर्थ ठरत होती, हे लक्षात घेऊनच शाहू छत्रपतींनी १९१७ ते १९२२ या कालखंडात जाणीवपूर्वक अनेक ब्राह्मणेतर पत्रकांना सक्रिय पाठिंबा दिलेला दिसून येतो. त्यामध्ये मुकुंदराव पाटील यांचा 'दीनमित्र', आण्णासाहेब लठ्ठे यांचे 'डेक्कन रयत', वालचंद कोठारी यांचे 'जागरूक', श्रीपतराव शिंदे यांचा 'विजयी मराठा', बाबुराव यादव यांचे 'गरिबांचा कैवारी', बळवंत बाळकृष्ण पिसाळ यांचे 'विश्वबंधू', दत्ताजीराव कुरणे यांचा 'भगवा झेंडा', प्रबोधनकार ठाकरे यांचे 'प्रबोधन', शामराव देसाई यांचे 'राष्ट्रवीर', दत्तात्रय भिकाजी रणदिवे यांचे 'संजीवन', गणेश आकाजी गवई यांचा 'बहिष्कृत भारत' आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे 'मूकनायक' आदी वृत्तपत्र-नियतकालिकांचा समावेश करावा लागेल.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'मूकनायक' या वृत्तपत्रासाठीही शाहू महाराज यांनी आर्थिक मदत केली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर वृत्तपत्र सुरू करणार असल्याची माहिती शाहू महाराज यांच्या कानावर आली होती. म्हणून महाराजांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना वृत्तपत्र सुरू करण्यासाठी २५०० रुपयांची भरघोस मदत केली होती. पुढे ४ नोव्हेंबर १९२७ च्या 'बहिष्कृत भारत'च्या अंकात राजर्षी शाहू महाराजांचा उचित गौरव करण्यात आला होता. राजर्षी शाहू महाराजांनी बहुजन समाजासाठी केलेल्या कार्याचा ऊहापोह करून, 'याबद्दल आमचा समाज हुजुरांस देवाप्रमाणे पूज्य मानत आहे आणि या औदार्याबद्दल पिढ्यान्‌पिढ्या हा समाज हुजूरचरणांचा ऋणी राहील', असा कृतज्ञभाव व्यक्त करण्यात आला होता.

सत्यशोधक आणि ब्राह्मणेतर चळवळीची सैद्धांतिक बैठक पक्की व्हावी, यासाठी शाहू महाराजांनी खूप प्रयत्न केले. ब्राह्मणेतर चळवळीला समर्थ वैचारिक बैठक लाभावी म्हणून प्रबोधनकार ठाकरे, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, गुरुवर्य कृष्णाजी अर्जुन केळुसकर, भास्करराव जाधव, हरिभाऊ चव्हाण, महादेव गणेश डोंगरे, दिनकरराव जवळकर असे खंदे लेखक हाताशी धरून शाहू छत्रपती त्यांना लिखाणासाठी सक्रिय पाठिंबा देत होते. त्यामधूनच डोंगरे यांचे 'श्रीसिवान्त विजय', केळुसकरांचे साक्षेपी 'शिवचरित्र', मुकुंदराव पाटील यांचे 'कुलकर्णी लीलामृत', भास्करराव जाधव आणि हरिभाऊ चव्हाण यांचे 'घरचा पुरोहित' यांसारखे महत्त्वाचे ग्रंथ निर्माण झाले. विचारांचा मुकाबला विचारांनीच केला पाहिजे, ही शाहू महाराजांची धारणा होती. म्हणून आपल्या कार्यावर वृत्तपत्रातून होणाऱ्या टीकेला त्यांनी बहुजनांच्या वृत्तपत्रातूनच उत्तर दिले. कोल्हापुरात संस्थानी काळात वृत्तपत्रांची चळवळ निर्माण करण्याचे खूप मौलिक कार्य शाहू महाराजांनी केले. शाहू महाराजांनी अनेक संपादक तयार केले. या अर्थाने राजर्षी शाहू संपादक तयार करणारी फॅक्टरी होते. शाहूंच्या या कार्यामुळे कोल्हापूरच्या पत्रकारितेला पुरोगामी वारसा लाभला आहे.

कोल्हापूरच्या इतिहासात राजर्षींनी पेरलेला पुरोगामी विचार आजही येथील पत्रकारिता जोपासत आहे. मराठी पत्रकारितेला बहुजन चेहरा देण्याचे, एका विशिष्ट जातसमूहाकडून बहुजनांकडे पत्रकारितेचे विकेंद्रीकरण करण्याचे आणि शेतकरी, कष्टकरी, महिला, उपेक्षित, वंचित समूहघटकांचे प्रश्न पत्रकारितेच्या केंद्रस्थानी आणण्याचे महत्त्वाचे कार्य केल्याचे निर्विवाद श्रेयही राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांना द्यावे लागेल.

**संदर्भ :-**


१. गव्हाणे सुधीर, स्वतंत्र भारत की मराठी पत्रकारिता : मराठी मिट्टी के खुशबू की पत्रकारिता, माध्यम संशोधन पत्रिका, २९ फेब्रूवारी २०१६, जनसंज्ञापन आणि पत्रकारिता विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, पृष्ठ ६

२. फडके य. दि. (सं), महात्मा फुले समग्र वाङ्मय, १९९१, पृष्ठ १९५

३. कित्ता, पृष्ठ १८२

४. हिवराळे सुखराम, लोकपत्रकार डॉ. आंबेडकर, प्रचार प्रकाशन, कोल्हापूर, पृष्ठ १७

५. पवार जयसिंगराव, जाधव रमेश : निवडक विजयी मराठा, विजयी मराठा प्रकाशन, मार्च १९९३, पृष्ठ १५

६. तेलवेकर आनंदराव, कोल्हापूरची वृत्तपत्रसृष्टी, 'पुढारी'कार ग. गो. जाधव गौरवग्रंथ, अमृतमहोत्सव प्रकाशन, १९८२, पृष्ठ १०८

७. पवार जयसिंगराव, जाधव रमेश : उपरोक्त, पृष्ठ १६

८. तेलवेकर आनंदराव, उपरोक्त, पृष्ठ १०८

९. जाधव रमेश, कोल्हापुरातील सामाजिक चळवळी, (चैतन्य-प्रबोधनात्मक लेखसंग्रह : संपादक- प्रा. जे. के. पवार), श्री शंकरराव नाथाजी नलवडे गौरव समिती, सप्टेंबर २०११, पृष्ठ २९

१०. लेले रा. के., मराठी वृत्तपत्रांचा इतिहास, १९८४, पृष्ठ ६३१

११. तेलवेकर आनंदराव, उपरोक्त, पृष्ठ ११५

१२. चव्हाण रा. ना., कार्य नेतृत्व करणारे, 'पुढारी'कार ग. गो. जाधव गौरवग्रंथ, अमृतमहोत्सव प्रकाशन, १९८२, पृष्ठ २१३

१३. आढाव बाबा, सामुदायिक 'पुढारी'पण, 'पुढारी'कार ग. गो. जाधव गौरवग्रंथ, अमृतमहोत्सव प्रकाशन, १९८२, पृष्ठ २०६

१४. तेलवेकर आनंदराव, उपरोक्त, पृष्ठ ११७

१५. जाधव रमेश, राजर्षी शाहू छत्रपती, नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया, २०१३, पृष्ठ ४७

१६. कित्ता, पृष्ठ ५२-५३

१७. कित्ता, पृष्ठ ६९

१८. कित्ता, पृष्ठ ७०


(राजर्षी शाहू महाराज यांनी वृत्तपत्रांना केलेल्या आर्थिक मदतीच्या नोंदवह्या त्यांच्या हस्ताक्षरासह. सौजन्य : कोल्हापूर पुरालेखागार विभाग)


**(लेखक शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील एम. ए. मास कम्युनिकेशन विभागाचे समन्वयक आहेत.)**

**राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी समता, न्याय आणि बंधुत्वाच्या तत्त्वांवर आधारित समाजाची कल्पना केली. शिक्षण ही सामाजिक प्रगतीची गुरुकिल्ली आहे आणि त्यात सर्व लोकांना समान प्रवेश मिळाला पाहिजे, असे त्यांचे मत होते.**

# राजर्षींच्या विचारांची कालसुसंगतता

**डॉ. रवींद्र शोभणे**

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, राजकीय इतिहासात अनेक समाजसुधारक होऊन गेले आहेत. त्यामध्ये छत्रपती शिवाजी महाराज आणि राजर्षी शाहू महाराज यांच्या नावांचा उल्लेख प्रामुख्याने करावा लागतो. छत्रपती शिवाजी महाराजांनी विपरीत परिस्थितीत स्वराज्याची स्थापना करून महाराष्ट्राला स्वभान देण्याचे काम केले, तर त्याच परंपरेतील राजर्षी शाहू महाराजांनी भारत पारतंत्र्यात असताना महाराष्ट्रात सामाजिक आणि राजकीय परिवर्तनाची मोठी चळवळ सुरू केली. या दोन्ही महापुरुषांचा सामाजिक चळवळीमध्ये महत्त्वाचा वाटा आहे.

## शिक्षणाविषयीची तळमळ

महाराष्ट्राला मोठी प्रबोधनपरंपरा लाभली आहे. भारतीय पातळीवर गौतम बुद्ध, चार्वाक, इथपासून ते महाराष्ट्राच्या बाबतीत बोलायचे झाले तर महात्मा जोतिराव फुले, लोकहितवादी गोपाल हरी देशमुख, न्या. महादेव गोविंद रानडे, भांडारकर, तेलंग, गोपाल गणेश आगरकर या वाटेने ही परंपरा वृद्धिंगत होताना दिसते. या परंपरेच्या मध्यावर राजर्षी शाहू महाराजांचा कालखंड येतो. टिळक युगाचा अस्त, गांधी युगाचा प्रारंभ आणि इंग्रजी सत्तेची आक्रसलेली वज्रमूठ अशा काळात महाराष्ट्रीयांना सामाजिक पातळ्यांवर भावनिक आधार आणि जगण्याच्या स्वच्छ वाटा दाखवणारे व्यक्तिमत्त्व म्हणून राजर्षी शाहू महाराजांचा कार्यकाळ, व्यक्तिमत्त्व आणि राजकीय कारकिर्द महत्त्वाची ठरते.

शाहू महाराज उच्चविद्याविभूषित होते. त्यांचे उच्च शिक्षण फ्रेझर या ज्ञानी गुरूंच्या मार्गदर्शनाखाली झाले. भारतीय विद्यापीठांमध्ये विविध विद्या प्रतिष्ठानांना भेटी देऊन तेथील बहुविध ज्ञानसाधनांचा स्वीकार करून महाराजांनी आपले व्यक्तिमत्त्व अधिक संपन्न करण्याचा प्रयत्न केला. प्लेटोच्या तत्त्वज्ञ राजा या संकल्पनेतील राजा कसा असावा, याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणून आपल्याला राजर्षी शाहू महाराज यांच्याकडे पाहावे लागेल.



## सर्वांसाठी शिक्षणाची दारे खुली

राजर्षी शाहू महाराज ज्या काळात वावरत होते तो काळ महाराष्ट्रातील वैदिक परंपरेचा, धर्माच्या अवडंबराचा आणि ब्राह्मणी वर्चस्वाच्या भरभराटीचा काळ होता. १८१८ साली पेशवाईचा अस्त झाला असला, तरी पेशवाईचा पीळ तत्सम समाजात अधिक पीळदारपणे सामाजिक स्तरांवर जाणवत होता. केवळ उच्चवर्णीयांना ज्ञानसाधनेचा आणि ज्ञानार्जनाचा हक्क आहे, हा समज सर्वत्र स्थिरावला होता. हा समज बाजूला सारून नव्या अभ्याससाधनांच्या, ज्ञानसाधनांच्या माध्यमातून जगाला नव्या ज्ञानाची, विज्ञाननिष्ठ विचारांची आणि मानवी स्वभावाची जाणीव करून देणारा हा काळ म्हणून समजून घ्यावा लागेल. महात्मा फुलेंनी शैक्षणिक आणि सामाजिक बंडखोरी करून या पूर्व समाजाला प्रचंड धक्के दिले. ज्ञानार्जनाचा मक्ता आणि निकड ही सर्वसामान्य माणसाची आहे हे पहिल्यांदा यातून स्पष्ट झाले. सर्वसामान्य माणसाचा सर्वांगीण विकास व्हायचा असेल, तर धर्मशास्त्रांच्या आणि तत्सम अभ्याससाधनांच्या अध्ययनाने तो होणे अशक्य आहे हे या काळात स्पष्ट झाले. त्याचाच परिणाम म्हणून या काळात इंग्रजांनी भारतात शिक्षणाची दारे उघडून लॉर्ड मेकॉलेच्या शिक्षण पद्धतीद्वारे कारकून निर्माण करण्याचे धोरण अवलंबले होते. या काळात याही शिक्षणाचा खरा लाभ घेणारी मंडळी ही चातुर्वर्ण्यातील उच्चवर्णीयच होती. व्यावहारिक फायद्यासाठी वैदिक आणि पारंपरिक ज्ञान आता बाजूला सारून या नव्या शिक्षणाला सामोरे जाणे आपल्या भल्यासाठी आहे, ही खूणगाठ त्यांनी आपल्या मनाशी बांधून ठेवली होती. अशाप्रकारे या उच्चवर्गाला आपण शिक्षित केले, कारकून म्हणून इंग्रजी सत्तेत रुजू करून घेतले की, यांच्या खाली असलेल्या इतर स्तरांतील समाजाला या शिक्षणाचा फायदा आपोआपच होईल, हे शिक्षण वरून खाली झिरपत जाईल, हा झिरपणीचा सिद्धान्त लॉर्ड मेकॉलेच्या शिक्षणविषक धोरणात अनुस्यूत होता. त्यासाठी त्यांनी काही ग्रंथांचे अनुवादही करवून घेतले होते. पण झिरपणीच्या सिद्धान्ताला महात्मा फुलेंनी उधळून लावले. शिक्षण हे वरून खाली झिरपत येण्यापेक्षा खालून वर जायला हवे, हे सामाजिक न्यायाशी आणि विशाल मानवतावादाशी नाते सांगणारे आहे, हा विचार महात्मा फुलेंनी मांडला आणि त्याच विचारांची कास धरत राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात शिक्षणाची दारे सर्वसामान्यांसाठी उघडी करून दिली.



महात्मा जोतिराव फुले यांच्या विचारांचा मोठा प्रभाव राजर्षी शाहू महाराजांवर होता. महाराष्ट्रात आणि भारतातही कित्येक वर्षांपासून विद्येच्या क्षेत्रात ब्राह्मण वर्गाची मक्तेदारी सुरू होती. त्यांनी धर्माच्या आणि समाजाच्या वरिष्ठ स्थानांवर अधिकार प्रस्थापित करून त्याद्वारे शूद्रातिशूद्रांवर लादलेली गुलामगिरी, भट-पुरोहितांकडून सर्वसामान्यांची होणारी लुबाडणूक, सरकारी खात्यात प्राप्त केलेल्या अधिकारांचा वापर करून सर्वसामान्यांची करण्यात येणारी पिळवणूक या सगळ्यांविरुद्ध महाराष्ट्रात पहिल्यांदा महात्मा जोतिराव फुले यांनी बंड पुकारले आणि त्यासाठी त्यांनी १८७३ साली 'सत्यशोधक समाज' या संघटनेची स्थापना केली. या समाजातील सगळे एकाच देवाची लेकरे आहेत. त्यामुळे त्या देवाच्या आराधनेसाठी, भक्तीसाठी कुणाही भटा-ब्राह्मणांची गरज नाही, हा विचार त्यांनी या संघटनेद्वारे मांडला. समाजात स्वातंत्र्य, समता, बंधुता, या तत्त्वत्रयींची प्रतिष्ठापना करणारा 'सार्वजनिक सत्यधर्म' या महत्त्वपूर्ण ग्रंथाचीही निर्मिती केली. महात्मा फुलेंचा हा विचार आणि हा ग्रंथ जन्माला आल्यानंतर एक वर्षाने राजर्षी शाहू महाराजांचा जन्म होतो, हेही महत्त्वाचे आहे.

## विज्ञाननिष्ठ शिक्षणाचा मार्ग

भारतीय समाजाला शिक्षणापासून दूर ठेवण्याचे कारस्थान अनेक शतकांपासून सुरू होते. धर्मविषयक ज्ञानाच्या, तत्त्वज्ञानाच्या प्राप्तीपासून अधिकारापासून तर त्यांना लांब ठेवले होते. त्यांच्या दृष्टीने देवभाषा म्हणून ज्या भाषेवर शिक्कामोर्तब झाले होते, त्या संस्कृत भाषेच्या जवळपासही या त्रैवर्णिकांतील कुठल्याही घटकाला जाता येत नव्हते. त्यामुळे ज्ञानप्राप्तीचा, विज्ञाननिष्ठ शिक्षणाचा मार्ग पहिल्यांदा सर्वसामान्यांसाठी मोकळा झाला, तो लॉर्ड मेकॉलेंनी निर्माण केलेल्या शिक्षण व्यवस्थेमुळे. या शिक्षणाचा लाभ जरी सर्वप्रथम ब्राह्मण वर्गानेच घेतला. या व्यवस्थेच्या संकल्पनेत झिरपण्याचे तत्त्व निहित असले तरी शिक्षणाची दारे त्यांनी सर्वांसाठी उघडी करून दिली हे महत्त्वाचे. या शिक्षणामुळे इतर वर्णातील सर्वसामान्य माणूस शिक्षित होतो, ही गोष्ट या वर्गाला पसंत पडणारी नव्हतीच. पण इंग्रजांच्या या सर्वव्यापी धोरणाविरुद्ध त्यांना काही बोलताही येत नव्हते.

## 'राजर्षी' पदवी बहाल

राजर्षी शाहू महाराजांनी इंग्रजी शिक्षणाचा, शासकीय पातळ्यांवरून केलेल्या सुधारणांचा स्वीकार केला आणि आग्रहाने राबवण्याची खबरदारी घेतली. कारण त्यांचे शिक्षण, अभ्यास आणि त्याद्वारे झालेल्या त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची उभारणी यामागे गोखले, सबनीस, फ्रेझर इत्यादींचे श्रेय मोठे होते. ते स्वतः उच्चविद्याविभूषित होते. इंग्रजी साहित्य, सामाजिक शास्त्रे, तत्त्वज्ञान अशा अनेक विषयांचा त्यांचा दांडगा अभ्यास होता. वरकरणी रांगडा, मराठमोळा वाटणारा

हा द्रष्टा अनेक विषयांवर अस्खलित इंग्रजी भाषेत बोलायचा, आपले विचार मांडायचा तेव्हा त्यांच्यातला विचक्षक अभ्यासक जाणवायचा. म्हणूनच महाराष्ट्रात बहुजनवर्गाला शिक्षण मिळाले पाहिजे, शिक्षणाने समाज प्रगत व्हावा, हीच त्यांची तळमळ होती. त्या अर्थाने खरोखरच



राजा प्लेटोच्या संकल्पनेतील तत्त्वज्ञ होता. १९१९ साली अखिल भारतीय कुर्मी क्षत्रिय समाजाकडून कानपूरच्या परिषदेत शाहू महाराजांचा 'राजर्षी' पदवी बहाल करून मोठा गौरव केला. आधुनिक इतिहासात आणि समाजात या गौरवाला पात्र ठरणारे व्यक्तिमत्त्व म्हणून फक्त शाहू महाराजांचाच विचार केला गेला हेही महाराष्ट्राच्या दृष्टीने गौरवास्पद आहे.

## महापुरुषांच्या विचारांचा वारसा

धर्म, शिक्षण आणि श्रद्धा-अंधश्रद्धा इत्यादींसंदर्भात विचार करायचा तर आजचा समाज आणि आजची तरुण पिढी या संदर्भात कुठे आहे? किंवा आपला समाज कुठे आहे? असे प्रश्न जेव्हा आपल्याला पडतात, तेव्हा आपण अधिकाधिक अंतर्मुख होऊ लागतो. प्रत्येक काळातल्या समाजपुरुषाच्या, विचारवंताच्या दृष्टीसमोर त्यांच्या विचारांचा, कार्याचा वसा चालवण्यासाठी त्यांचे उत्तराधिकारी म्हणून तरुण पिढी असते. या तरुण पिढीची ऊर्जा ही वाहत्या पाण्यासारखी असते. ती योग्य दिशेने प्रवाहित होणे तेवढेच गरजेचे असते आणि या ऊर्जेला सत्त्व पुरवण्याचे काम इतिहासातील समाजपुरुष करतात, हेही तेवढेच महत्त्वाचे ठरते.

## लोकोत्तर पुरुष

भारताला इंग्रजांच्या पारतंत्र्यातून सोडवणारे क्रांतिकारक, राष्ट्रपुरुषांच्या कार्याची दखल इतिहासात अधिक ठळकपणे घेतलेली आहे. समाजातील रूढी, प्रथा, परंपरा, माणुसकीला काळिमा फासणाऱ्या, माणूस म्हणून जगण्याचा अधिकार हिरावून घेणाऱ्या समाजाविरुद्ध, संकल्पनांविरुद्ध आयुष्यभर झगडणाऱ्या आणि आपल्या हयातीत समाजाकडून सतत द्वेषाची, विरोधाची वागणूक मिळणाऱ्या समाजसुधारकांना आपण राष्ट्रपुरुष किंवा देशाला घडवणारे म्हणून अग्रक्रम देणेही तेवढेच महत्त्वाचे ठरते. सामाजिक पातळ्यांवर ही माणसे आयुष्यभर संघर्ष करत होती. म्हणूनच आधी राजकीय स्वातंत्र्य की, सामाजिक सुधारणा असा संघर्ष उभा राहिलेला दिसून येतो. या संघर्षात महात्मा जोतिराव फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्थान अधिक मोठे आहे. हे निर्विवादपणे मान्य करावे लागते. या तिघांचीही वैचारिक आणि सामाजिक भूमिका आणि लक्ष्य एकच होते. काळाच्या वेगेवेगळ्या टप्प्यांवर या महापुरुषांच्या विचारांची आणि सामाजिक सुधारणांची गंगा सातत्याने वाहत होती. त्यांचा विचार केवळ महाराष्ट्रापुरता मर्यादित नव्हता, तर त्यांच्या विचारांचा प्रभाव अखिल भारतात मोठ्या वेगाने उमटत गेला. कारण या विचारांमागील भूमिका ही राष्ट्रीय स्वरूपाची होती. त्याचा पुरावा म्हणून शाहू महाराजांच्याच भाषणाचा उल्लेख या ठिकाणी करावा लागेल. नागपूरच्या बहिष्कृत समाजाच्या परिषदेत त्यांनी विचार मांडले होते ते असे - आम्ही सर्व हिंदी आहोत, बंधू आहोत. हिंदी प्रजाजन कोणत्याही वर्णाचे, धर्माचे असोत, सर्व हिंदी आहेत. व्यक्तीच्या दृष्टीने धर्माची बाब महत्त्वाची असेल; पण राष्ट्रीय बाबतीत ते केव्हाही आड येता कामा नये. हा विचार आजच्या सामाजिक आणि धार्मिक परिस्थितीच्या संदर्भात किती व्यापक आणि कालदर्शी होता याची प्रचिती येते.

फ्रेझर यांनी शाहू महाराज यांना सुशिक्षित, व्युत्पन्न करण्यासाठी घेतलेले परिश्रम आणि त्या परिश्रमांना आलेली फळे त्यांनी आपल्या हयातीत पाहिली; पण त्यांचे दुर्दैव असे की, आपल्या या विद्यार्थ्याची अंतिम घटकाही त्यांना पाहावी लागली. आपल्या विद्यार्थ्याने सजगपणे केलेले सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक कार्य, सुधारणा या बावनकशी आणि काळाच्या कितीतरी पुढे आहेत, याविषयी त्यांना जाणीव होती. म्हणूनच शाहू महाराजांच्या निधनानंतर दोन वर्षांनी त्यांनी केलेले विधान अधिक बोलके आहे. ते म्हणतात, 'राजर्षी शाहू महाराज काळाच्या इतके जवळ होते की, त्यांच्या कामाचे योग्य मूल्यमापन आपल्याला करता येणे शक्य नाही; मात्र भारतातील कोणताही इतिहासकार शाहू महाराजांच्या जीवनकार्याकडे दुर्लक्ष करू शकणार नाही, एवढे मात्र खात्रीने सांगता येते. संबंधित संघर्षातील कडवटपणा जेव्हा कालांतराने नाहीसा झालेला असेल तेव्हा प्रत्येक स्तरावरील भारतीय नागरिक 'एक लोकोत्तर पुरुष' म्हणून शाहू महाराजांची स्मृती अभिमानाने आपल्या मनात जतन करून ठेवील, यात शंका वाटत नाही.'

**संदर्भ ग्रंथ :**
१. राजर्षी शाहू छत्रपती : जीवन व कार्य : डॉ. जयसिंगराव पवार
प्रकाशक : महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई. (२००९)
२. महाराष्ट्राची लोकयात्रा: डॉ. सदानंद मोरे
प्रकाशक : सकाळ मिडिया प्रा.लि. पुणे (२०२२)

**(लेखक ज्येष्ठ साहित्यिक असून अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष आहेत.)**

**कोल्हापूर परिसरात आजही राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जीवनातील कथा, प्रसंग सांगितले जातात. महाराज एकीकडे राजर्षी असले, तरी काकणभर अधिक ते लोकराजा होते, हे या कथांमधून आपल्याला दिसून येते. शाहू महाराज यांचे काही निवडक प्रेरक प्रसंग आपण येथे वाचू या.**

# प्रेरक प्रसंग


**डॉ. रमा दत्तात्रय गर्गे**

श्रीमंत छत्रपती शाहू महाराजांना 'राजर्षी' ही पदवी दिली जाते. राजर्षी म्हणजे राजऋषी. यापूर्वी ही पदवी सीतामाईचे पिता राजा जनक यांना दिली गेली आहे. काय आहे या पदवीचे गमक? याचा अर्थ असा आहे की, 'जो राजा आपल्या राजगादीकडे केवळ कर्तव्य भावनेने पाहतो आणि तेथील उपभोग घेताना त्यांचा मनातून त्याने त्याग केलेला असतो असा ऋषीसमान राजा म्हणजे राजर्षी होय!'

शाहू महाराज हे एक वादळी व्यक्तिमत्त्व होते. एकाच वेळी त्यांनी सामाजिक क्रांती आणि धार्मिक क्रांती या दोन्ही पातळ्यांवर जीवनभर लढा दिला. तसेच इंग्रजांच्या कारकिर्दीमध्ये असलेले हे संस्थान! महाराजांनी ब्रिटिशांशी मैत्रीचे संबंध ठेवून रयतेच्या विकासासाठी अनेक कार्ये केली. तसेच देशभक्तांना पण सर्वतोपरी सहकार्य केले. एकाच आयुष्यात विविध प्रकारचे कार्य करून जाणारी ही व्यक्ती हे एक अद्‌भुतच आहे असे म्हणावे लागते!

## जीव महत्त्वाचा की जात?

त्र्यम्बोली देवी हे कोल्हापूरकरांचे अंबाबाईइतकेच महत्त्वाचे श्रद्धास्थान! या देवीच्या यात्रेत, उत्सवात छत्रपती घराण्याचा खास मान असतो. ही देवी वसली आहे त्या टेकडीला टेंबलाईची टेकडी असे म्हटले जाते. राजघराण्यातील व्यक्तीच्या उपस्थितीत दरवर्षी येथे कुष्मांड पंचमी साजरी केली जाते. असे हे महत्त्वाचे देवस्थान! एका श्रावणात शुक्रवारी शाहू महाराज आपल्या घोडागाडीतून काही सेवकांना घेऊन टेंबलाईच्या टेकडीवर देवीच्या दर्शनासाठी निघाले होते. महाराज निघाल्याचे समजले की, रस्त्यावर लोक आपल्या राजाला मुजरा करण्यासाठी येत असत. पहाटेची वेळ होती, रस्त्यावर लोक जमा झाले होते. महाराजांची घोडागाडी पायथ्याशी आली, एकदम थांबली! महाराज बघतात तो काय समोरून एक उधळलेली बैलगाडी तुफान वेगाने खाली येत होती. बैल वाऱ्याच्या वेगाने खाली धावत होते आणि गाडीवानाला आवरत नव्हते. सगळे भीतीयुक्त आश्चर्याने श्वास रोखून स्तब्ध उभे होते! तितक्यात एक लहान मुलगा काय सुरू आहे हे बघण्यासाठी पुढे सरसावला आणि त्याचवेळी बैलगाडी अगदी जवळ येऊ घातली, ते दृश्य बघताच महाराजांनी क्षणार्धात घोडागाडीतून उडी टाकली आणि त्या लेकराला त्यांनी उचलले! त्याच क्षणी कुणीतरी ओरडले, 'महाराज त्याला शिवू नगासा. त्यो *** चा पोरगा हाये.' महाराजांनी ते शब्द न ऐकल्यासारखे करून आधी त्या मुलाला गाडीसमोरून वाचवले. पायथ्याशी आलेली गाडी कशीबशी एका झाडावर आदळून थांबली.



समोर प्रत्यक्ष महाराज, त्यांच्या पोटाशी थोडक्यात वाचलेला तो पोरगा हे पाहून गाडीवान भ्यायला आणि त्याने महाराजांच्या पायांवर लोळण घेतली. महाराजांनी त्याची पाठ थोपटून त्याला अभय दिले. नंतर समोरच्या गर्दीकडे बघत महाराज म्हणाले, 'कोण सांगत होतं या पोराला शिवू नका म्हणून?'

सगळे गप्प उभे राहिले. महाराज म्हणाले, 'अरे समोर यमदूत येत असताना लेकराला वाचवायचे की त्याची जात बघायची? समाजातली सगळी मुलं ही आपलीच आहेत असे मानून राहा. माणसं आहात की सैतान? या जागी तुमचं मूल पण असू शकलं असतं. जीव महत्त्वाचा की जात?'

नंतर महाराजांनी त्या मुलाला आपल्यासोबत गाडीत घेतले, त्याच्या सोबतच्या लोकांना सांगितले की, 'तुम्ही टेकडीवर या, आज तुमचा पोरगा आमच्यासोबत देवीचे

दर्शन घेणार! त्याचं आयुष्य वाढलं, त्यासाठी देवीच्या पायांवर घालतो त्याला.' असे होते महाराज! प्रजेला खरोखरच स्वतःच्या अपत्याप्रमाणे जपणारे!'

## बळीराजा महत्त्वाचा, तोफा नव्हेत!

१९१० च्या सुमारास सांगली जिल्ह्यात लक्ष्मणराव किर्लोस्कर यांनी किर्लोस्करवाडी वसवली. त्याकाळी कारखान्यात लोखंडी नांगर आणि कडबा कुट्टीयंत्र तयार होत असत. शाहू महाराजांचा किर्लोस्करांवर विशेष लोभ होता. एक म्हणजे मराठी माणसांना उद्योगाला लावले तेही इंग्रजी आमदानीत म्हणून आणि दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे किर्लोस्करवाडीत अस्पृश्यता पालनास सक्त मनाई होती! लक्ष्मणरावांचे पुतणे शंकरराव किर्लोस्कर, जे साहित्यक्षेत्रात 'शंवाकि' म्हणून ओळखले जातात, ते या कारखान्याचा जाहिरात विभाग बघत व आपले नियतकालिकदेखील प्रकाशित करत असत.

पहिल्या महायुद्धानंतर कारखाना बंद पडतो की काय अशी परिस्थिती निर्माण झाली. कारण लोखंड, पक्के रंग इत्यादी कच्चा पक्का माल इंग्लंडहून घेणे बंधनकारक होते आणि युद्धानंतर आयात निर्यात मंदावली. लोखंड नाही म्हणजे मजुरांना काम नाही आणि नंतर शेतकऱ्यांची अडचण होणार. आधीच महायुद्ध झालेले, त्यात शेतीची कामे अडली तर धान्याचा तुटवडा होणार. थोडे दिवस भंगार गोळा करून कारखाना चालवला. पक्का रंग विलायतेतून येत असे तो मिळत नव्हता म्हणून सोनकाव (गेरू) तेलात कालवून रंग दिला. पण पुन्हा कच्च्या मालाची चणचण वाटू लागली. यावर उपाय शोधताना शंकरराव किर्लोस्करांना एक कल्पना सुचली. ती त्यांनी आपले स्नेही, टेक्निकल स्कुलचे सुप्रिटेंडेंट काटे यांना सांगितली. कल्पना उद्योजक म्हणून चांगली होती; पण त्यातून भावना दुखावल्या तर काय हाही प्रश्न होता. त्यासाठी कुणीतरी मोठे माणूस सोबतीला असावे म्हणून बापूसाहेब महाराज कागलकर यांच्याकडे दोघेजण गेले, त्यांनाही कल्पना पटली आणि त्यांनी शाहू महाराजांकडे येण्याचे कबूल केले.

तिघे जण शाहू महाराजांच्या समोर उभे राहिले. शंकरराव किर्लोस्करांचा कारखाना बंद पडत आला आहे, नांगराअभावी शेतीची कामे खोळंबणार आहेत, धान्यतुटवडा, कच्च्या मालाची अडचण असे सगळे सांगितले. 'मग यात आमची काय मदत हवी आहे, असे शाहू महाराज यांनी विचारले. त्यावर सगळा धीर गोळा करून कागलकर महाराज म्हणाले, 'अभय असावे महाराज, तर बोलतो.' महाराजांनी हसून अभय दिले आणि मोकळेपणाने बोला म्हटले. त्यावर संस्थानातील किल्ल्यांवर खूप लोखंडी तोफा, चिलखते आदी साठलेले आहे, ते जर नांगर तयार करण्यासाठी मिळाले तर मजूर आणि शेतकरी दोघेही तगतील.' महाराजांनी काही क्षण विचार केला, आणि ते म्हणाले, 'ही किर्लोस्कर मंडळी चांगली माणसे आहेत. मजूर आणि शेतकऱ्यांना महायुद्धाच्या काळात आपणच जगवले पाहिजे. नमुन्याच्या काही तोफा प्रत्येक जागी ठेवून बाकीच्या नांगरासाठी अवश्य घ्या. त्याची संस्थानाला दमडीही नको. फक्त नांगर स्वस्त द्या आणि मजुरांना सतत काम मिळत राहील, असे पाहा!' किर्लोस्कर, काटे आणि कागलकर महाराज तिघांच्याही मनावरचे ओझे उतरले.

संस्थानाचा अभिमान, स्वाभिमान, पुरातन काळापासूनच्या वस्तू असलं काहीही मनात न आणता लोकराजाने लोकांना उदारपणे तोफा दिल्या. तोफांचे नांगर हे युद्धाकडून बुद्धाकडे जाणेच जणू होते!

## गीतारहस्याचे 'रहस्य'

छत्रपती शाहू महाराज आणि लोकमान्य टिळक यांचे परस्पर विरोधात खटले सुरू होते. त्यांच्यातील वैचारिक मतभेद सगळ्यांना माहीत होते. याच काळात १९१४ साली, मंडाले तुरुंगातून परत आलेल्या टिळकांची भेट घ्यायला शाहू महाराज गायकवाड वाड्यात आले. आता हे दोघे कसे भेटतात, कसे बोलतात याविषयी सगळेजण औत्सुक्याने पाहत होते. दोघे जुने मित्र भेटावेत तसे आदराने भेटले. परस्परांच्या प्रकृतीची चौकशी, औषधे इत्यादींवर बोलणे झाले. त्यानंतर टिळक महाराजांना म्हणाले, 'माझे एक काम तुम्ही करावे अशी विंनती आहे. मी मंडालेच्या तुरुंगात असताना भगवद्गीतेवर काही लेखन केले आहे.

मुंबई सरकारला त्याचे मूळ हस्तलिखित पाहायचे आहे. ते आपण स्वहस्ते न्यावे व मला परत आणून द्यावे.' महाराजांनी सुहास्यवदनाने लोकमान्यांची विनंती मान्य केली. टिळकांनी महाराजांकडे मोठ्या विश्वासाने गीतारहस्याचे मूळ हस्तलिखित दिले. गीतारहस्य घेऊन शाहू महाराज गेले, तसे गायकवाड वाड्यातील सोबतचे लोक अस्वस्थ झाले. चाचरत एकजण लोकमान्यांना विचारता झाला, 'ते हस्तलिखित सुरक्षित राहील का? त्यांचा आणि आपला कोर्टात खटला सुरू आहे ना? त्यात लॉर्ड विलिंग्डन आणि त्यांचे मित्रत्वाचे संबंध आहेत. आपल्यापैकी कुणीतरी घेऊन गेले असते हस्तलिखित.' त्यावर टिळकांनी मोठ्या विश्वासाने सांगितले, 'काळजी करू नये. शाहू महाराज आणि माझ्यात व्यावहारिक वाद आहेत खरे; पण माझा गीतारहस्याबाबत स्वतःइतकाच त्यांच्यावर विश्वास आहे. त्या हस्तलिखिताचे मोल ते जाणतात!'

काही दिवसांतच महाराजांनी मुंबई सरकारकडे हस्तलिखित दिले. सरकारने ते तपासून शाहू महाराजांकडे परत केले आणि महाराजांनी ते टिळकांपर्यंत पोहोचवले. लोकमान्य टिळकांच्या निधनानंतर 'शाहू महाराजांनी त्यांचे माझे मत जुळत नसले, तरी त्यांची देशभक्ती निष्कलंक होती' असे उद्गार काढले. आजारपणाच्या काळात टिळकांच्या पुत्राला आमच्याकडे त्यांची विश्रांतीची व्यवस्था करतो, हवापालट करण्यासाठी येथे घेऊन यावे, असेही कळवले होते. असे उमद्या मनाचे होते शाहू महाराज आणि त्यांच्या मनाच्या या चांगुलपणावर लोकमान्यांचा विश्वासही होता.

## अनोखे उपाहारगृह

राजर्षी शाहू महाराजांच्या पदरी अनेक नोकर असत. त्यांतील काही तथाकथित वंचित समाजातील असायचे. कोल्हापूर सरकारचे टपाल ने आण करणे, मोटारगाडी चालवणे, पहारा देणे अशा कामांसाठी त्यांना नेमलेले असायचे. स्वतः महाराज कधीही त्यांच्या जातीचा उल्लेख करत नसत, नावाने हाक देत व अनेकदा हे लोक अन्य ठिकाणाहून आल्यामुळे नेमकी जात लोकांना ठाऊक नसे. त्या त्या गणवेशात ही मंडळी मोठ्या झोकात वावरायची. यातलाच एक होता गंगाराम!

गंगारामने कोल्हापुरामध्ये एक उपाहारगृह थाटले. त्याच्याकडे लोक यायला लागले. पदार्थ उत्तम होते. चहा दर्जेदार होता; पण येणाऱ्या ग्राहकांना हा गंगाराम वंचित आहे हे माहीत नव्हते. आपल्या देशात काहीही लपून राहील, पण जात कशी लपणार? दुकानात काम करणाऱ्या गंगारामच्या नातेवाईक मंडळींकडून लोकांना गंगाराम कांबळीची जात कळली. मग काय विचारता? 'याने तुमच्याशी धोका केला, आमचापण धर्म बुडवला,' असा टाहो फोडत लोकांनी दरबारात तक्रार केली. त्यानंतर, 'मी अमुक दिवशी येतो व बघतो,' असे महाराजांनी सांगितले. लोक उपाहारगृहाच्या बाहेर थांबले. आता शाहू महाराज याला काय शिक्षा सुनावणार हे जाणून घेण्यासाठी ती गर्दी उत्सुक होती. गंगारामच्या दुकानाबाहेर शाहू महाराज व इतर खाशा मंडळींच्या घोडागाड्या येऊन दाखल झाल्या. महाराज उतरले, उपाहारगृहातील बाकावर जाऊन बसले आणि म्हणाले, 'गंगाराम मला एक चहा दे, आणि या सोबतच्या मंडळींना पण विचार काय हवे ते, आणि लगेच दे..'

गंगारामच्या शरीरात नव्याने उत्साह संचारला. त्याने महाराजांना मुजरा केला आणि 'जी महाराज' म्हणाला! स्वतः महाराजांनी तेथील चहापाणी घेतले, जातपात कसली आडवी येतेय मग... आणि नंतर ते उपाहारगृह मोठ्या जोमात चालू लागले.



## आली माझ्या घरी ही दिवाळी

दिवाळीचे दिवस होते. सगळीकडे आनंदाचे वातावरण होते. घरोघरी फराळाच्या पदार्थांचे सुगंध येत होते. जिकडेतिकडे आनंदीआनंद होता. महाराज पण अत्यंत प्रसन्न होते. खाशा सरदारांकडून फराळाचे डबे राजवाड्यात येत होते. परतीची ताटे भरून जात होती. जणू काही सगळ्या संस्थानाने उटणे लावून, नूतन वस्त्रे लेवून दिवाळी साजरी करायचे ठरवले आहे असे वातावरण होते. महाराज नेहमीप्रमाणे गाडीतून देवदर्शन आदी करून परतत होते, उतरताना त्यांनी पाहिले की, एक लहान मुलगा झाडाआड दडून त्यांना पाहत आहे. त्याचे कपडे जुने होते आणि चेहऱ्यावर हसू नव्हते हे महाराजांनी टिपले. त्यांनी चालकाला त्या मुलाला घेऊन येण्यास फर्मावले व स्वतः राजवाड्यात गेले.

चालकाने त्या घाबरलेल्या मुलाला हाताला धरून आणले होते, त्याच्यामागे वाड्यावरील एक रखवालदार खाली मान घालून उभा होता. चालकाला जावयास सांगून महाराजांनी मुलाच्या हातातील पिशवी घेतली आणि विचारले, 'काय रे, मला बघून लपत का होता? काय आहे पिशवीत?' त्यावर तो रखवालदार पुढे सरसावला, मुजरा केला आणि म्हणाला, 'माफी करावी महाराज, घरधनीनीने जेवायचा डबा पाठवलाय, लेकराला दरबाराचे काही माहिती नाही, म्हणून घाबरून लपला होता.' त्यावर महाराज बोलले, 'तू जा आपल्या कामाला, मी बोलतो याच्याशी.' हळूहळू मुलाशी गोड बोलून महाराजांनी सगळे जाणून घेतले. डबा उघडून पाहिला. जोंधळ्याच्या जाड भाकरी, ठेचा आणि झुणका ते पाहून महाराजांचे डोळे पाणावले! दिवाळीच्या दिवशी वाड्यावरील सेवकाच्या घरची ही स्थिती! त्यांनी लगेचच वाड्यावरील सेविकेला आज्ञा केली, या लेकराला न्हाऊमाखू घालून नवे कपडे व फराळाचे द्या. झाला प्रकार राणीसाहेबांना समजला. त्यांनी त्या रखवालदाराच्या घरी साडीचोळी आणि गोडाधोडाचा फराळ तर पाठवलाच; पण काम करणाऱ्या प्रत्येक सेवेकऱ्याच्या घरीही फराळ पोहोचेल असे जातीने पाहिले. त्या वर्षीपासून राजवाड्यातून फराळ व दिवाळीचे साहित्य देण्याचा प्रघातच पडला!

## आंबोळीचे शेत

मडीलगे बुद्रुक हे एक कोल्हापूर जिल्ह्यातील लहानसे गाव. तिथे एक शेत 'आंबोळीचे शेत', या नावाने ओळखले जाते. येथील शेतमजूर स्त्रीने महाराज भुकेलेले असताना स्वतःजवळच्या आंबोळ्या आणि लसणीच्या चटणीचा गोळा त्यांना खावयास दिला! त्याचे उपकार स्मरून महाराजांनी या भगिनीला सहा एकर जमीन इनाम दिली.

## खरी स्पर्धा

शाहू महाराज यांनी संस्थानाच्या कारभारात सर्वप्रथम आरक्षणाची सोय सुरू केली. जेव्हा महाराजांना विचारायचे की, 'महाराज आपण आरक्षण का देता?' तेव्हा ते म्हणत की, 'काही घोडे हे प्रकृतीने उत्तम असतील आणि काही घोडे हे कमजोर असतील तर त्यांना देण्याच्या खुराकामध्ये आपण फरक करतोच ना! जेव्हा हे सगळे एका सरळ रेषेत येतील, तेव्हा त्यांच्यात खरी स्पर्धा सुरू होईल. पण तोपर्यंत ज्याच्या त्याच्या आवश्यकतेनुसार खुराक द्यावाच लागणार,' असे चपखल उत्तर देऊन महाराज समोरच्याला गप्प करत असत.

## मोटारीतून कष्टाच्या शेण्या

एका वृद्धेकडून दया आली म्हणून वाळलेल्या शेण्यांचा हारा महाराजांनी विकत घेतला, पण मोटारीत जागा नव्हती म्हणून रस्त्याच्या कडेला त्या शेण्या टाकून तू जा. असे सांगितले! तर ती वृद्धा म्हणाली, 'मी विकल्यात त्या शेण्या तुम्ही नेणार नसला तर हे घ्या पैसे परत.' त्यावर राजेपणाचा अहंकार आडवा येऊ न देता महाराज व इतर सर्वजण चालत निघाले आणि मोटारीतून कष्टाच्या शेण्या वाड्यावर पोहोचल्या. नंतर मोटार पुन्हा चालत निघालेल्या राजांना व दरबारी लोकांना घ्यायला आली. असे हे शाहू महाराज!

(सदस्य, सांस्कृतिक धोरण पुनर्विलोकन समिती, महाराष्ट्र राज्य)

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांना 'राजर्षी' संबोधले जात असे. राजा आणि ऋषी यांच्या वैशिष्ट्यांनी युक्त असे त्यांचे व्यक्तिमत्त्व होते. लोककल्याणाच्या योजना त्यांनी सर्व समाज डोळ्यासमोर ठेवून राबवल्या व या योजना राबवताना सर्वांप्रति उदार अंत:करणाचा भाव हा ऋषीतुल्य गुण त्यांच्यात होता. या लेखात राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या कालावधीतील काही महत्त्वाच्या व्यक्तींशी त्यांच्या असलेल्या संबंधांची थोडक्यात माहिती घेतली आहे.

# छत्रपती शाहू महाराज व समकालीन समाजसुधारक

**प्रा. रमेश नथु महाजन**

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी आपल्या ४८ वर्षांच्या संघर्षमय जीवनकाळात मौलिक कार्य उभे केले आहे. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे समकालीन समाजसुधारकांबरोबर मैत्रीपूर्ण संबंध होते.

## डॉ.आंबेडकर आणि शाहू महाराज

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक त्यातील प्रमुख व्यक्तिमत्त्व आहे. माणगाव येथील परिषदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच बहुजनांचे नेते आहेत, असे त्यांनी घोषित केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वावर ठाम विश्वास व्यक्त करून छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या द्रष्टेपणाचा परिचय दिला. तसेच वेळोवेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना योग्य ते सहकार्यदेखील केले. सामाजिक गुलामगिरीतून वंचितांना मुक्त करण्यासाठी आपल्या संस्थानात त्यांनी महत्त्वपूर्ण कायदे केले. वंचित समाजाच्या सहभागाशिवाय सामाजिक लोकशाही अशक्य आहे, अशी त्यांची धारणा होती. दक्षिण भारतातल्या वंचित समाजाच्या उत्थानासाठी काम करणाऱ्या नेत्यांशी त्यांचे आपुलकीचे संबंध होते. आपल्या संस्थानात बहुजनांसाठी त्यांनी शैक्षणिक सुविधा निर्माण केल्या. सत्यशोधक समाज व आर्य समाज यांसारख्या चळवळींना त्यांनी सक्रिय पाठिंबा दिला. या चळवळी तत्कालीन समाजात सामाजिक व धार्मिक लोकशाही प्रस्थापित होण्यासाठी कार्य करत होत्या. नोकऱ्यांमध्ये आरक्षणाची तरतूद करून त्यांनी बहुजन समाजातील होतकरू तरुणांना संधी दिली. त्यासाठी त्यांना मोठा संघर्ष करावा लागला. बहुजन समाजाच्या प्रबोधनासाठी चालणाऱ्या नियतकालिकांना त्यांनी आर्थिक सहकार्य केले. समाजाविषयी आंतरिक जिव्हाळा हा त्यांचा विशेष गुण होता. संत तुकारामांच्या भाषेत सांगायचे झाले तर, 'बुडते हे जन न देखवे डोळा, म्हणूनी कळवळा येत असे' असा त्यांचा स्वभाव होता.

## लोकमान्य टिळक आणि शाहू महाराज

भारतीय असंतोषाचे जनक लोकमान्य टिळक यांच्याशी छत्रपती शाहू महाराजांचा दीर्घकाळ संबंध आला. १८९४ साली महाराजांना राज्याधिकार प्राप्त झाले, त्यावेळी लोकमान्य टिळकांनी 'केसरी'मध्ये अग्रलेख लिहिला, 'करवीर क्षेत्री कपिलाषष्ठीचा योग' असे त्या अग्रलेखाचे शीर्षक होते. ताई महाराज व वेदोक्त प्रकरणात लोकमान्य टिळक व छत्रपती शाहू महाराज यांच्यातील संबंध खूपच ताणले गेले. तरीदेखील आंतरिक जिव्हाळा कायम राहिला. लोकमान्यांच्या शेवटच्या आजारात त्यांच्या प्रकृतीची वार्ता वेळोवेळी मिळावी, यासाठी ते दक्ष असत. वेदोक्त प्रकरणात लोकमान्य टिळकांची भूमिका सनातनींची बाजू घेणारी होती हे महाराष्ट्राच्या सामाजिक क्षेत्राचे दुर्दैव होय; कारण त्याचे दीर्घ पडसाद महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनावर पडले. ताईमहाराज प्रकरणात लोकमान्यांच्या विरोधात छत्रपती शाहू महाराजांनी भूमिका घेतली, त्यासाठी छत्रपतींवर ब्रिटिशांचे दडपण होते, असे सुप्रसिद्ध चरित्रकार धनंजय कीर लिहितात. चिरोल खटल्यात एक गुप्त पत्रक



लोकमान्य टिळकांकडे पोहोचवून शाहू महाराजांनी मदत केली. हे अतिशय जोखमीचे काम त्याकाळात त्यांनी पार पाडले. लोकमान्य टिळकांनी लिहिलेल्या गीता रहस्याची एक प्रत ब्रिटिशांना हवी होती. ती आणण्याची जबाबदारी छत्रपती शाहू महाराजांवर सोपवली होती. महाराजांचा निरोप येताच लोकमान्यांनी गीतारहस्याची एक प्रत तत्काळ पाठवून दिली. 'मी महाराजांच्या शब्दांचा अनादर करू शकत नाही' असे उद्‌गार त्यावेळी लोकमान्यांनी काढले. लोकमान्यांच्या दु:खद निधनानंतर गायकवाड वाड्यात छत्रपतींनी सांत्वनाची वस्त्रे पाठवली. या दोन महापुरुषांमध्ये काही बाबतीत तीव्र वाद असले, तरी एकमेकांविषयी अत्यंत जिव्हाळा व आदराची भावना होती.

## समकालीन समाजसुधारक आणि शाहू महाराज

महात्मा गांधी, ॲनी बेझंट व स्वामी श्रद्धानंद यांच्याविषयी छत्रपती शाहू महाराजांना अतिशय आदर होता. या सर्व महानुभावांविषयी त्यांच्या मनात अत्यंत पूज्य बुद्धी होती. परम आदर असतानाच हीदेखील माणसेच आहेत याचे त्यांना भान होते. त्यांच्या हातूनदेखील चुका होऊ शकतात, याची त्यांना जाणीव असे. कोल्हापूर संस्थानात छत्रपती शाहू महाराजांनी केलेल्या सामाजिक कार्यांवर अभिप्राय देताना महात्मा गांधींनी असे म्हटले होते की, 'हे एक प्रकारे नि:स्वार्थी भावनेने चाललेले असे अद्वितीय मिशनरी कार्यच आहे.' ब्रिटिशांचा अंमल असल्यामुळे त्यांच्यावर काही बंधने होती; पण देशाच्या स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या सर्व देशभक्तांविषयी त्यांच्या मनात पराकोटीचा आदर होता. मुजफ्फर बॉम्ब खटल्यात बाबू अरविंद घोष यांना अटक झाली; त्यांच्या साहाय्यासाठी महाराजांनी गुप्तपणे पाच हजार रुपयांची मदत केली. हे त्याकाळात किती जोखमीचे काम होते याची कल्पनाच न केलेली बरी. न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे, ना. गोपाळकृष्ण गोखले व समाजसुधारक गोपाळ गणेश आगरकर यांच्याशी शाहू महाराज यांच्याबरोबर वेळोवेळी चर्चा झाल्या.

बहुजन समाजाच्या प्रबोधनासाठी चालवलेल्या 'विजयी मराठा', 'दीनमित्र', 'विश्वबंधू', 'गरिबांचे कैवारी' या वर्तमानपत्रांच्या मागे छत्रपती शाहू महाराजांनी आपले आर्थिक व नैतिक बळ उभे केले. क्षात्र जगद्‌गुरू प्रकरणात या वर्तमानपत्रांनी केलेल्या टीकेचे त्यांना वैषम्य वाटले नाही. ज्यांना आपण मदत केली त्यांनी आपली री ओढली पाहिजे, असे छत्रपती शाहू महाराजांना कधीही वाटले नाही. त्या काळातील प्रखर वक्ते, लेखक प्रबोधनकार ठाकरे यांचेदेखील छत्रपती शाहू महाराजांशी घनिष्ठ संबंध होते. त्यांनी लिहिलेल्या 'भिक्षुकशाहीचे बंड' या ग्रंथामागे महाराजांचीच प्रेरणा होती. त्यांची व प्रबोधनकार ठाकरेंची अनेक वेळा चर्चा होत असे. या चर्चेदरम्यान छत्रपती शाहू महाराजांची कुशाग्र बुद्धी व अनेक विषयांचे संदर्भासहित असलेले ज्ञान हे प्रबोधकारानांदेखील चकित करत असे. रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांना महाराजांचा जवळून सहवास लाभला. शिक्षण क्षेत्रात कर्मवीरांनी पुढे जी अद्वितीय कामगिरी केली. त्याचा संस्कार त्यांना महाराजांच्या सहवासातच मिळाला. कर्मवीरांनी आपल्या साताऱ्याच्या वसतिगृहाला 'छत्रपती शाहू बोर्डिंग' असे नाव दिले. हा त्याचाच परिणाम होता. डांबर प्रकरणात संस्थानच्या पोलिसांनी भाऊराव पाटलांचा अनन्वित छळ केला. वास्तविक ते निरपराध होते; परंतु छत्रपती शाहू महाराज यांच्याविषयी असलेल्या आत्यंतिक आदरामुळे भाऊरावांनी कधीही महाराजांविषयी अनुद्गार काढले नाहीत.

१९१९ साली अखिल भारतीय कुर्मी क्षत्रिय समाजाकडून कानपूरच्या परिषदेत छत्रपती शाहू महाराज यांना 'राजर्षी' ही पदवी दिली. त्याकाळातील कला, क्रीडा, नाटक अशा सर्व क्षेत्रातील लोकांना शाहू महाराजांनी लोकाश्रय दिला. ते स्वत: मल्ल होते व त्यांना मल्लविद्येची आवड होती. आजही कोल्हापूर आणि मल्लविद्या हे अतूट नाते आहे. 'हिंद-केसरी' व 'महाराष्ट्र-केसरी' ही पदके मिळवणारे अनेक मल्ल याच भूमीतील आहेत. बहुजन समाजाबरोबरच भटके विमुक्त समाजासाठी काम करणारा हा महापुरुष होता. ते



केवळ पुस्तकी पंडित नव्हते, तर सामाजिक भान असणारे व्यवहारचतुर राजकारणी होते. ब्रिटिशांसारख्या चाणाक्ष राज्यकर्त्यांनादेखील हुलकावणी देऊन त्यांनी अनेक प्रकारे देशभक्त व क्रांतिकारकांना मदत केली. समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी त्यांनी प्रयत्न केले. 'कल्याणकारी राज्य' ही संकल्पना प्रत्यक्षात उतरवण्यासाठी ते आयुष्यभर झटले. कोल्हापूरमध्ये सर्व समाजाच्या विद्यार्थ्यांसाठी त्यांनी वसतिगृहे सुरू केली. त्यांच्या जवळच्या स्नेह्याने त्यांना म्हटले की, 'तुम्ही फक्त मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे सुरू करा;' त्यावेळी छत्रपती शाहू उद्‌गारले, 'असे केले तर मला मराठ्यांचा राजा म्हणतील; पण रयतेचा राजा म्हणणार नाहीत,' हे उद्‌गार त्यांच्या विशाल हृदयाची साक्ष देतात.

छत्रपती शाहू महाराजांचे समग्र जीवनचरित्र अत्यंत प्रेरणादायी असे आहे. मिळालेल्या सत्तेचा उपयोग समाजाच्या दुर्बल व उपेक्षित घटकांसाठी कसा करावा याचा ते वस्तुपाठ आहेत. समाजातील सर्व लोकांप्रति अंत:करणात प्रेम व जिव्हाळा असेल, तर योग्य त्या धोरणांची अंमलबजावणी करून सामाजिक कल्याण करता येते हे त्यांनी दाखवून दिले. यांच्या आड येणाऱ्या सर्व विरोधकांशी संघर्ष करून त्यांनी वाटचाल केली; पण घेतलेला वसा टाकून दिला नाही. अशा या अलौकिक राजर्षी शाहू महाराजांना मनोभावे वंदन!

(ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते, जळगाव)

**चातुर्वर्ण्य समाजरचना मोडून तिथे समताप्रधान समाजरचना, लोकशाही आणि समाजवाद प्रस्थापित करून भारताच्या विविधतेला एक राष्ट्रीयत्व प्राप्त करून देणे, हे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे अंतिम उद्दिष्ट होते आणि हे उद्दिष्ट प्राप्त करण्यासाठी त्यांनी सर्व पातळ्यांवर प्रयत्न केले. त्यांनी आपल्या संस्थानात अनेक क्रांतिकारक निर्णय घेऊन सामाजिक बदल घडवून आणले.**

# समाजसुधारणेची भूमिका

**रवींद्र गोळे**

सामाजिक बदल हे धिम्या गतीने होत असले तरी ते राजाश्रय देऊन स्थिर करण्यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी प्रयत्न केला. जातिनिहाय वसतिगृह आणि शिक्षणाची सोय उपलब्ध करून देणे हा त्यापैकी एक महत्त्वाचा घटक होता. शिक्षणाचा लाभ समाजातील सर्वात शेवटच्या घटकाला झाला पाहिजे, या उद्देशाने सुरू केलेल्या शैक्षणिक क्षेत्रातील क्रांतिकारक प्रयोग काही काळात फलद्रूप झाला. या साऱ्या बदलाच्या मागे राजर्षी शाहू महाराजांच्या सामाजिक जाणिवा व सामाजिक धोरणाची कल्याणकारी भूमिका आधारभूत होती.

## राजसत्तेचा उपयोग

कोल्हापूर संस्थानाचे अधिपती म्हणून राज्यकारभार हाती घेतल्यापासून ते जीवनाच्या शेवटच्या क्षणापर्यंत राजर्षी शाहू महाराज यांनी आपल्या कृती व विचाराने सामाजिक बदल घडवून आणण्यासाठी सदैव प्रयत्न केले. सामाजिक सुधारणेबाबत त्यांचे धोरण हे स्पष्ट होते. आणि म्हणूनच त्यांच्या कृतीला विचारांची जोड लाभलेली होती. सामाजिक सुधारणा करण्याचा शिक्षण हा एक मार्ग असला तरी तेवढ्यापुरते मर्यादित नाही, याची जाणीव राजर्षी शाहू महाराजांना होती. शिक्षण घेतलेल्या व्यक्तीला संधी दिली पाहिजे, तरच सुधारणा प्रत्यक्षात येतील. यासंदर्भात राजर्षी शाहू महाराजांनी आपली भूमिका मांडली आहे, ते म्हणतात. 'ज्या (वकिलीच्या) सनदा मी वंचित, उपेक्षित, बहुजन लोकांना दिल्या, त्या देण्यात माझा हेतू एवढाच आहे की, जे धंदे बहुजन वर्गास कायद्याने किंवा दडपशाहीने बंद झालेले आहेत, ते त्यांस मोकळे करून द्यावेत व त्यांची स्थिती सुधारून त्यांच्यात आपण इतर माणसांच्या बरोबरीचे आहोत, असा आत्मविश्वास उत्पन्न करावा.'

'विचाराअंती माझे असे मत झाले आहे की, 'आमची सध्याची जातिबंधने तोडून टाकण्याचा काळ येईल. आमच्या नैतिक आणि सांपत्तिक प्रगतीच्या हिताकडे लक्ष देऊनच वरील स्थिती यावी, अशी माझी इच्छा आहे. जोपर्यंत आमच्यामध्ये जातीजातींतील मतभेद आणि मत्सर जिवंत आहेत, तोपर्यंत आम्ही आपापसात झगडत राहणार आणि आमच्या हितबुद्धीस अपाय करून घेणार. आमच्यातील अंतस्थ कलह नाहीसे करण्यास आणि आम्हाला स्वराज्यास पात्र करून घेण्याकरिता ही अनर्थकारक जातिपद्धती झुगारून देणे आम्हाला अत्यंत अवश्य आहे, हे आमच्या लक्षात आले असेलच.' राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी केवळ वैचारिक भूमिका मांडली नाही. तर त्याला कृतीची जोड देऊन सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यासाठी आपल्या राजसत्तेचा उपयोग केला.



## सामाजिक सुधारणा कार्याचे स्वरूप

तत्कालीन समाजाची मानसिकता आणि देशभरातील विविध संस्थाने, संस्थानिक यांचा अभ्यास केला असता आपल्या असे लक्षात येईल की, सामाजिक कळवळा असणाऱ्या संस्थानिकांमध्ये राजर्षी शाहू महाराज यांचा वरचा क्रमांक लागतो. आपल्या छोट्या संस्थानात सामाजिक सुधारणा घडवून आणताना राजर्षी शाहू महाराजांनी वेगवेगळे प्रयोग केले होते. शेती, शिक्षण, आरक्षण, सामाजिक सन्मानाचे विषय इत्यादी गोष्टींचा विचार करता राजर्षी शाहू महाराज हे काळाच्या पुढे जाऊन विचार व कृती करणारे

होते, हे सहजपणे लक्षात येते. राजर्षी शाहू महाराज यांच्या या सामाजिक सुधारणा कार्याचे स्वरूप हे दोन प्रकारचे आहे. ज्यांना समतेचा अनुभव नाही, अशांना स्वजागृत करून त्यांना सन्मानाने उभे करणे आणि ज्यांनी धर्मभावना, अहंकार, अंधरूढी यामुळे या सामाजिक सुधारणांना विरोध केला, त्यांचे हरप्रकारे मत व मनपरिवर्तन घडवून आणणे. अस्पृश्यतेचा व्यवहार व समर्थन करणाऱ्या आपल्या नातेवाईकाला शिक्षा करताना राजर्षी शाहू महाराज डगमगले नाहीत. समतेचे कृतिरूप प्रकटीकरण करताना चोर दरोडेखोर ठरवलेल्या पारधी समाजाला गस्ती पथकात नोकऱ्याही दिल्या. कोणत्याही चळवळीचा मूळ उद्देश हा सकारात्मक परिवर्तन हाच असतो. पण ते परिवर्तन घडवून आणण्यासाठी कधी मायेची थाप तर कधी चाबकाचे फटके मारावे लागतात. हे राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले आहे. सामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठी कधी टीका करावी लागते. जुन्या परंपरा मोडून टाकाव्या लागतात. आजच्या परिभाषेत सांगायचे तर प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध विद्रोह करावा लागतो. असे असले तरी सामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठी सुरू असलेल्या आपल्या कामाचे अधिष्ठान काय असावे? राजर्षी शाहू महाराजांनी सांगितले आहे- ऐक्य, परस्पर प्रेम, विश्वास व चिकाटी न सोडता अव्याहत प्रयत्न हीच आमची या झगड्यातील शस्त्रे आहेत. हे राजर्षी शाहू महाराजांच्या जीवनचरित्राचा अभ्यास करताना वरील सूत्रे आपणास सर्वत्र आढळतात.



राजर्षी शाहू महाराज कोणत्या एका समूहाच्या विरोधात नव्हते, तर समाजाला जडलेल्या व्याधीच्या विरोधात होते, हे आपण लक्षात घेतले पाहिजे. संस्थानातील सर्व नागरिकांना समतेची अनुभूती घेता यायला हवी आणि त्यासाठी आवश्यक असणारे पोषक वातावरण निर्माण करण्याची जबाबदारी राजा म्हणून आपली आहे, अशी राजर्षी शाहू महाराजांची मनोभूमिका होती.

## आरक्षणाची सुरुवात

राजर्षी शाहू महाराजांच्या क्रांतिकारी निर्णयात सर्वात महत्त्वाचा निर्णय म्हणजे संस्थानाने सुरू केलेले आरक्षण होय. सरकारी नोकऱ्या आणि खासगी नोकऱ्या (राजघराण्यातील विविध पदे व नोकऱ्या) यामध्ये राजर्षी शाहू महाराजांनी ५० टक्के आरक्षणाची घोषणा केली. त्यानुसार नोकऱ्यांमध्ये समावेश सुरू केला. आरक्षण लागू करताना आरक्षणाची तरतूद कशासाठी करण्यात येते आहे, यासंबंधी राजर्षी शाहू महाराज यांच्या मनात स्पष्टता होती. आपल्या संस्थानातील उपेक्षित, मागास बांधवांना समतेचा अनुभव घेण्याची संधी प्राप्त करून देण्याचा आरक्षण हा एक मार्ग आहे, अशी राजर्षी शाहू महाराज यांची धारणा होती. ते म्हणतात, 'ज्याप्रमाणे एखादा डॉक्टर किंवा महिला डॉक्टर अगदी अशक्त व दुबळ्या मुलाला पौष्टिक अन्न व औषधे देऊन त्याची जोपासना करून त्याला इतर मुलांच्या जोडीला आणून बसवतात, त्याप्रमाणे आम्ही वंचित लोकांना वर आणले पाहिजे.'

संस्थानाचे अधिपती म्हणून प्रजेचे पालकत्व राजर्षी शाहू महाराजांकडे होते; पण त्यापलीकडे जाऊन प्रचंड दयाभाव आणि आपल्या प्रजेविषयी आपुलकी त्यांच्या मनात होती. राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या कामाची प्रेरणा सांगताना म्हटले आहे. 'दया धरम का मूल है, नरक मूल अभिमान' यावरून पाहता देशाची म्हणजे देशबंधूंची सेवा करणे, जनी जनार्दन शोधणे व पाहणे, हाच खरा धर्म आहे. या बाबतीत सर्व धर्मांचे ऐक्य आहे. परोपकार हा पुण्य मार्ग आहे व परपीडा हे पाप आहे, असेच सर्व प्रतिपादन करतात. याप्रमाणे विचार केल्यास धर्मभेदाच्या किंवा जातिभेदाच्या सबबीवर एकमेकांचा मत्सर करणे अगदी चुकीचे आहे.

राजर्षी शाहू महाराज यांच्या वरील विचारांचा विसर आपल्याला पडला आहे का? असा प्रश्न उपस्थित करणाऱ्या आजच्या सामाजिक वातावरणात आपण राजर्षी शाहू महाराजांचे स्मरण करत आहोत. राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या छोट्या संस्थानात पारतंत्र्याच्या काळात जे सामाजिक सुधारणांचे प्रयत्न केले, ते आजही आपल्याला मार्गदर्शन करणारे आहेत. राजर्षी शाहू महाराजांच्या विचार आणि कृतीचा अभ्यास, अनुसरण करताना हे आपण कशासाठी करत आहोत, यांची जाणीव कायम आपण आपल्या मनात जागृत ठेवणे आवश्यक आहे. आपला समाज भेदरहित, सबळ, सक्षम आणि एकात्मतेचे ध्येय डोळ्यासमोर ठेवून पुढे जात आहोत. या वाटचालीत राजर्षी शाहू महाराज आपल्याला कायम मार्गदर्शक ठरणार आहेत. समाजपरिवर्तन म्हणजे काय हे एकदा लक्षात आले की, अन्य गोष्टी गौण होतील. आपला कृती आराखडा राजर्षी शाहू महाराजांनी तयार केलेला आहे. ते म्हणतात, 'समाजाची नीतिमत्ता वाढणे हे सामाजिक सुधारणेचे एक महत्त्वाचे अंग आहे. वाईट रीतीभाती व धर्मभोळेपणा यांच्या योगाने आमच्यामध्ये मद्यपान, बालविवाह, जुलुमाचे वैधव्य, देवास मुली वाहणे हे असे घातक प्रकार रूढ होऊन त्यापासून शारीरिक, मानसिक व बौद्धिक अवनती झाली आहे. ही अवनती दूर करण्यास आपण उपाययोजना करावी. या बाबतीत शील बनवणे हेच मुख्य कर्तव्य आहे. शीलवान नागरिकांशिवाय राष्ट्र बनणे अगर उदयास येणे, या गोष्टी शक्यच नाहीत. शारीरिक उन्नतीकडेही आपण लक्ष दिले पाहिजे, परंतु केवळ शारीरिक शौर्य कितीही अंगात असले तरी नीतिमत्तेची अवनती झाल्याबरोबर रोमसारखी बलाढ्य राष्ट्रेही कशी रसातळाला मिळाली, हे आपण विसरता कामा नये.' राजर्षी शाहू महाराजांनी सांगितलेल्या या मार्गावर पाऊल टाकत पुढे जाणे हीच त्यांना आदरांजली ठरेल.

(पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, विश्वस्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर फाऊंडेशन, दिल्ली)

१९व्या शतकातील प्रबोधनाच्या चळवळीने खऱ्या अर्थाने आजच्या भारताची पायाभरणी केली आहे. अनिष्ट परंपरा आणि कुंठित झालेल्या धर्माच्या तावडीतून समाजसुधारकांनी समाजाला बाहेर काढण्यासाठी चळवळी केल्या. त्यातील अनेक चळवळींच्या मागे ठामपणे उभे राहणारे राजे म्हणून राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची नोंद इतिहासाने घेतली आहे. या लोककल्याणकारी राजाच्या चरित्रावर अनेकांनी लिखाण, विवेचन, चिकित्सा केली आहे. असे असले तरी संशोधकांकडून राजर्षी छत्रपती शाहू महाराज आणि आर्य समाज या संबंधावर दुर्लक्ष झालेले आहे. राजर्षी शाहू महाराजांच्या बरोबरीने फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव सतत जोडल्यामुळे या तिघांच्या तात्त्विक भूमिकेत काही मूलभूत मतभेद आहेत, याचे भान राहत नाही.[१] या लेखातून राजर्षी शाहू महाराजांच्या वैचारिक आणि धार्मिक सुधारणेचा पाया कोणता होता, याचा आढावा घेणार आहोत.

# शाहू छत्रपती आणि आर्य समाज

**प्रणव पाटील**

छत्रपती शाहू महाराजांचे पहिले चरित्रकार अण्णासाहेब लठ्ठे यांनी १९१० साली त्यांच्या आयुष्यातील ब्राह्मणेतर चळवळीचे पर्व संपले असं म्हटलं आहे.[२] या चळवळीच्या पहिल्या पर्वात वेदोक्त प्रकरण घडले होते. या वादाच्या वेळी सत्यशोधक समाजाच्या अनुयायांनी ब्राह्मण पुरोहितशाहीविरोधात शाहू महाराज यांची बाजू उचलून धरली. त्यानंतर सत्यशोधक चळवळीला शाहू महाराजांकडून वेळोवेळी मदत मिळत गेली. १९११ साली महाराजांच्या प्रेरणेनेच कोल्हापुरात सत्यशोधक समाजाचे काम सुरू झाले होते. या कामात महाराजांचे निकटवर्तीय भास्करराव जाधव, अण्णासाहेब लठ्ठे, महादेवराव डोंगरे होते. १९१४ साली मुंबईच्या सत्यशोधक समाजापुढे बोलताना भास्करराव जाधव म्हणाले, 'कोल्हापूर संस्थानाचे काम कशा प्रकारे चालले आहे हे आपणास माहीत आहेच. त्याचे सर्व श्रेय श्रीमन्महाराज शाहू छत्रपतींस दिले पाहिजे. कारण त्यांनी उदार बुद्धीने आम्हास मदत देऊन धर्मविधी शिक्षणाचा वर्ग सुरू केला आहे.'[३]

त्यामुळे तत्कालीन पत्रकार छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांचा उल्लेख 'सत्यशोधकी विचारवंत' असा करत असत. 'विजयी मराठा' पत्राचे श्रीपतराव शिंदे म्हणतात, 'गौतम बुद्धांना जसा त्यांच्या समता आणि शांती तत्त्वज्ञानाचा प्रसार करण्यासाठी सम्राट अशोक भेटला, तसा महात्मा फुले यांना त्यांच्या सत्यशोधकी विचारांचा प्रसार करण्यासाठी छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या रूपाने राजा भेटला,'[४] याविषयी खुद्द राजर्षी शाहू महाराज यांचे काय मत होते, याचाही धांडोळा घेऊ या.

गुजरातच्या भावनगर शहरात ६ ते ८ मार्च १९२० साली अखिल हिंदुस्थान आर्य धर्मपरिषदेचे अधिवेशन भरले होते. या अधिवेशनात शाहूंनी जे भाषण केले, ते या परिषदेच्या इतिहासात छत्रपतींचा समाजास दिव्य संदेश म्हणून नोंदलेले आहे. या भाषणात महाराज म्हणतात, 'जरी 'सत्यशोधक समाजा'दि समाजांनी काहीशी सुधारणा केली आहे, तथापि या संस्थांनी विशेष अधिक काही होऊ शकणार नाही. कारण त्या 'शठं प्रति शाठ्यं' या तत्त्वावर चालत आहेत; परंतु देशाला जागृत करणारी रामबाण मात्रा वैदिक धर्मच आहे. कारण हिंदूमात्राच्या अंतःकरणात वेदाभिमान वसत आहे व आर्य समाज वेदानुकूल राहण्यातच आपला धर्म समजत आहे. आर्य समाजाचा धर्म जगावर उपकार करण्याचा आहे.



सज्जनांनो! वैदिक धर्माचे महत्त्व अन्य मतांपेक्षा अधिक आहे हे समजूनच मी या

धर्माचा स्वीकार केला आहे.'[५]

या भाषणात राजर्षी शाहू महाराज यांनी आपण आर्य समाजी आहोत हे स्पष्ट केले आहे, परंतु पुढे त्यांना अनेकदा आपण सत्यसमाजिस्ट नाही हे सांगावे लागले आहे. १९२१ साली बडोद्याच्या 'जागृती' पत्राने त्यांचे एक पत्र प्रसिद्ध केलं, ज्यात शाहू महाराज म्हणतात, 'माझ्या मतासंबंधाने बराच गैरसमज करण्यात येत आहे असे दिसून आल्यावरून माझे मत जनतेपुढे मांडण्याकरिता पाठवत आहे. ते प्रसिद्ध कराल अशी अशा आहे. सत्यशोधक समाजिस्टांचा माझ्यावर हल्ला का? मी सत्यसमाजिस्ट केव्हाही नव्हतो, नाही. तसे मी माझ्या सार्वजनिक भाषणात स्पष्टपणे बोलूनही दाखवले आहे. हुबळीस ब्राह्मणेतर समाजाची कॉन्फरन्स झाली, तेव्हा तेथील सत्यसमाजाने मला पानसुपारीस बोलवले. मी त्यांना सांगितले की, मी सत्यसमाजिस्ट नाही व सत्यसमाजिस्ट म्हणून येणार नाही. मी इतर संस्थांना जसा पाहुणा म्हणून जातो तसा मी येईन. असे असता मला सत्यसमाजाचे का म्हणतात ते कळत नाही. कोल्हापुरात आर्य समाज, थिऑसॉफी वगैरे पुष्कळ पंथ आहेत. त्यापैकीच सत्यसमाज हा एक आहे. मला वेद मान्य असून मी वेदांस चिकटून राहणारा आहे. असे असता माझ्यावर हल्ला का?'[६]

या पत्राद्वारे आणि इतर अनेक ठिकाणी महाराजांनी जाहीर भाषणांतून वेदांच्या विषयीची त्यांची मते स्पष्ट केली आहेत. या मतांशी आर्य समाजाची शिकवण जुळणारी होती. आर्य समाज वेद सोडून इतर पुराणोक्त कर्मकांडावर, अंधश्रद्धा, चमत्कार यांवर टीकेची झोड उठवणारा पंथ होता. तसेच आर्य समाजाच्या शिकवणुकीनुसार वेदांमध्ये जातिभेद नाही. त्यामुळे जातिवाद पाळणे मूळ धर्माच्या विरोधात आहे. आर्य समाजाची ही मते राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या सार्वजनिक धोरणांशी समांतर आणि अनुकूल होती. त्यामुळेच आर्य समाजाने आपल्याला नवा विचार दिला, नवी दृष्टी दिली आणि सामाजिक आणि धार्मिक परिवर्तन घडवून आणण्यासाठी नवा मार्ग दाखवला, असे शाहू महाराजांनी अनेकदा म्हटले आहे.

## आर्य समाजाशी संबंध

शाहू छत्रपतींचा आर्य समाजाशी खूप पूर्वीपासून संबंध आला असावा असे वाटते. अवघ्या अठराव्या वर्षी १८९२ च्या अखेरीस राजर्षी शाहू महाराज आपल्या सहकाऱ्यांसह उत्तर भारतात प्रवासासाठी गेले होते. कुशाग्र बुद्धीचे छत्रपती जेव्हा अलाहाबादला पोहोचले, तेव्हा तिथल्या आर्य समाजाच्या लोकांनी त्यांना मोठ्या आदरानं मानपत्र अर्पण केले. या आर्य समाज लोकांशी त्यांचा संबंध दीर्घकाळ टिकला.[७]

आर्य समाजाचे तत्कालीन प्रसिद्ध प्रचारक नित्यानंद यांच्या करवीर यात्रेसंबंधी जी माहिती मिळते ती अशी.-२६ सप्टेंबर १९०२ च्या 'मुंबई समाचार' मधील संपादकीयाचा हवाला देऊन नित्यानंदांच्या चरित्रकारांनी म्हटले आहे की, स्वामी नित्यानंदजी आणि स्वामी विश्वेश्वरानंदजी काल २५ सप्टेंबर १९०२ रोजी २ वाजताच्या गाडीने कोल्हापूरला रवाना झाले. कोल्हापूर स्टेशनवर वेदधर्मप्रचारिणी सभा, आर्य समाज, तसेच कोल्हापुरातील इतर अनेक सज्जनांनी दोन्ही स्वामींना पुष्पहार घालून त्यांचे उत्साहाने स्वागत केले. कोल्हापुरात स्वामीजी छत्रपती शाहू महाराजांचे अतिथी म्हणून शाही पाहुणे म्हणून राहतील. महाराजांच्या वतीने रावबहादूर शिरगावकरांनी त्यांना निमंत्रित केले आहे.

कोल्हापुरात उघड्या मैदानात, लायब्ररीत, थिएटरात आणि खुद्द राजवाड्यातही नित्यानंदांची व्याख्याने झाली. या सर्व व्याख्यांनाचे श्रवण करण्यासाठी स्वतः राजर्षी छत्रपती शाहू महाराज आपल्या राजकीय परिवारासह उपस्थित राहत होते. कोल्हापुरातील सनातनी मंडळींनी छत्रपतींचा वेदाधिकार वेदोक्त मंत्रांनी धार्मिक विधी करविण्याचा अधिकार नाकारला होता. या पार्श्वभूमीवर नित्यानंदस्वामींनी सर्व हिंदूंना जातिपातीचा भेद छेदून वेदाधिकार राबवता-गाजवता यायलाच हवा, असे आपल्या व्याख्यानात ठणकावून सांगितले होते.[८]

पुन्हा एकदा १९०२ सालीच शाहू महाराजांचा आर्य समाजाशी निकटचा संबंध आला. याविषयी २४ नोव्हेंबर १९१८ रोजी मुंबईत झालेल्या जाहीरसभेत सांगताना महाराज म्हणाले, 'मी आर्य समाज मताचा कसा झालो, हे थोडक्यात सांगतो. क्षत्रियकुलावतंस महाप्रतापी महाराज प्रतापसिंह हे युद्धाच्या आरंभापासून फ्रान्समध्ये लढत आहेत. ते व मी एका स्टीमरने राज्यारोहण समारंभाकरिता विलायतेस गेलो, तेव्हा त्यांनी मला ही मते समजावून दिली. त्यानंतर बऱ्याच वर्षांनी पंडित आत्माराम यांची गाठ पडली. तेव्हापासून मी अलीकडे या समाजाचा झालो.'[९]

या भाषणात राजर्षी शाहू महाराज ज्या प्रतापसिंह महाराजांचा उल्लेख करीत आहेत ते जोधपूरच्या प्रसिद्ध राठोड राजघराण्यातील होते. १९०१ साली त्यांना इदार या संस्थानाच्या गादीवर इंग्रजांनी बसवलं होतं. इदारचे राजे होण्यापूर्वी प्रतापसिंह जोधपूरला असताना त्यांना आर्य समाजाचे संस्थापक स्वामी दयानंद सरस्वती यांचा निकटचा सहवास घडला होता. प्रतापसिंहांनी स्वामी दयानंदांच्या मुखाने आर्य समाजाची विचारसरणी समजावून घेतली होती आणि तीच त्यांनी राजर्षी शाहू महाराजांना १९०२ साली सातव्या एडवर्डच्या राज्यारोहण समारंभास हजर राहण्यासाठी विलायतेस जात असताना सांगितली होती. शाहू महाराज त्या वेळी वेदोक्ताच्या प्रश्नावर संघर्ष करीत असल्याने सर्वांना वेदांचे अध्ययन करण्याचा आणि वेदोक्त मंत्र म्हणून धर्मकृत्ये करण्याचा अधिकार देणाऱ्या आर्य समाजाकडे त्यांचं आकृष्ट होणं साहजिक होतं.[१०]

आर्य समाजाचा १९०२ साली शाहू महाराजांना परिचय झाला असला, तरी त्यांनी १९१६-१७ नंतर उघडपणे या पंथाच्या विचारांचा पुरस्कार केलेला दिसतो. कारण आर्य समाजाची शिकवण त्यांनी घाई घाईने स्वीकारलेली नव्हती. आर्य समाजाबरोबर त्यांचा सत्यशोधक, ब्राम्हो समाज, प्रार्थना समाज, थिऑसॉफिकल चळवळ यांच्याशीही संबंध आला होता. तत्कालीन सर्व वैचारिक आणि धार्मिक चळवळींच्या मधून त्यांच्या लक्षात आलं की, सत्यशोधक विचारांनी सर्वसामान्य माणसाची धार्मिक गरज भागू शकत नाही. ब्राम्हो समाज आणि प्रार्थना समाजाचे विचार फक्त समाजातील बुद्धिमान आणि वरच्या वर्गापुरते मर्यादित राहू शकतात. तसेच थिऑसॉफिकल चळवळीचा समाजाच्या धार्मिक आणि सामाजिक सुधारणांची गरज भागवण्यात मर्यादा आहेत. यात आर्य समाज मात्र राजर्षी शाहू महाराजांच्या धार्मिक चळवळीला पाठिंबा देणाऱ्या विचारांचा होता तसाच तो धार्मिक अधिष्ठान देणाराही होता. स. मा. गर्गे याचे अचूक

विश्लेषण करताना म्हणतात, 'आर्य समाजाचे कार्य प्रोटेस्टंट पंथाच्या कार्यासारखे होते. प्रोटेस्टंट पंथाने पोपच्या धार्मिक वर्चस्वाविरुद्ध बंड उभारले, रोमन चर्चची सत्ता नाकारली व कॅथॉलिकांच्या धार्मिक आज्ञा पाळण्याचे अमान्य केले. या सर्वांवरच कर्मठ चर्चची उभारणी झालेली होती. त्याचा पायाच उखडून टाकण्याची मोहीम प्रोटेस्टंट पंथाने हाती घेतली होती. त्यासाठी या पंथाचा संस्थापक मार्टिन ल्यूथर आणि इतर धर्मसुधारक यांनी युरोपात धर्मसुधारणा घडवून आणली. पोपचे वर्चस्व झुगारून देण्याचा आटोकाट प्रयत्न केला; पण हे सर्व करत असताना प्रोटेस्टंटांना धर्माची आणि धर्मसंघटनेची सर्व पाळेमुळे खणून काढावयाची नव्हती. त्यांना चर्चमध्ये सुधारणा घडवून आणावयाची होती. रूढीग्रस्त धार्मिक विचारात शुद्धीकरण हवे होते. आर्य समाजाची भूमिका अशीच धर्मसुधारणावादी होती. राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांशी त्याचे साधर्म्य अनेक दृष्टींनी लक्षात येण्यासारखे आहे. म्हणूनच त्यांना आर्य समाजाच्या भूमिकेत अधिक सुसंवाद जाणवत होता, त्याच्याविषयी आत्मीयता वाटत होती. राजर्षी शाहू महाराज प्रोटेस्टंटांप्रमाणे हिंदू धर्मातील रूढींची जळमटे काढून टाकू इच्छित होते. धर्माचे ते शुद्धीकरण करू इच्छित होते. त्यांना धर्मकल्पनांत नव्या पायावर बदल घडवून आणावयाचा होता. युरोपात धर्मगुरूंच्या वर्चस्वामुळे ख्रिश्चन धर्मात जसे दोष निर्माण झाले होते, तसे या देशात हिंदू धर्मातही विषमता, अस्पृश्यता, धार्मिक कर्मकांड इत्यादी अनेक दोष वाढले होते. ते नष्ट करण्यासाठी त्यांना प्रोटेस्टंटांप्रमाणे आर्य समाजाच्या वेदप्रणित धार्मिक विचारांची मदत घेणे उपयुक्त वाटत होते त्यांनी धर्माचा निषेध केला नाही. त्यांना धर्म हवा होता; पण ब्राह्मण वर्चस्वाचा नव्हे तर शुद्ध वैदिक स्वरूपाचा. त्यांनी त्या दृष्टीने प्रयत्न केले. म्हणूनच खऱ्या अर्थाने राजर्षी शाहू महाराज हे हिंदू धर्मसुधारणावादी प्रोटेस्टंट होते, असेच म्हणावे लागेल.[११]



## आर्य समाजाला राजाश्रय

राजर्षी शाहू महाराजांच्या उदार आश्रयाखाली १९१८ मध्ये कोल्हापुरात आर्य समाजाची स्थापना झाली; पण तत्पूर्वीच आर्य समाजाचे एक कार्यकर्ते स्वामी प्रमानंद यांनी १९१७ सालीच कोल्हापूरजवळ केर्ले या गावी 'गुरुकुला'ची स्थापना केली होती. महाराजांनी या गुरुकुलातील ३० विद्यार्थ्यांसाठी दरबारकडून ५,००० रुपये मंजूर केले होते. त्या संबंधीच्या आदेशात त्यांनी म्हटले होते, विद्यार्थ्यांचे अन्न व पोशाख साधा असावा व शिक्षणाचे ध्येय उच्च राहून उत्तम नागरिक सदर बोर्डिंगातून निपजतील, अशी आशा आहे. पुढे लवकरच कोल्हापुरात महाराजांच्या आज्ञेने आर्य समाजाचे एक 'फर्स्ट ग्रेड अँग्लो व्ह. स्कूल' व त्याला जोडूनच एक 'गुरुकुल' स्थापन करण्यात आले (मे १९१८). त्यासाठी जागा व इमारतीही दिल्या गेल्या. गुरुकुलातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सर्व व्यवस्था मोफत करण्यात आली. केर्ले येथील शाळा व गुरुकुलही या संस्थेस जोडण्यात आले.

गुजरातमध्ये १९१८ साली नवसारीत भरलेल्या ११व्या आर्य समाजाच्या अधिवेशनाला शाहू महाराज उपस्थित होते. या अधिवेशनात त्यांनी आर्य समाजाची शिकवण दक्षिणेत प्रसारित करणे का महत्त्वाचे आहे हे सांगताना पार्श्वभूमीही सांगितली आहे. या भाषणात शाहू महाराज म्हणतात, दक्षिण हिंदुस्थानसारखे उत्तर हिंदुस्थानातही ब्राह्मणत्व जन्मावर येऊन बसले आहे. पण तेथे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र हे चारही वर्ण अस्तित्वात आहेत, असे मानण्यात येत असल्याने ब्राह्मणाखेरीज बऱ्याच इतर लोकांस वेदाध्ययनाचा व इतर विद्यासंपादनाचा अधिकार आहे असे समजण्यात येते. दक्षिणेत जर 'कलौ अद्यंतपो स्थिति' यावर जोर देऊन क्षत्रिय व वैश्यांचा पूर्ण अभाव असे प्रतिपादण्यात ब्राह्मण वर्गास मोठा आवेश येत असतो. त्यामुळे इकडील ब्राह्मणेत्तर वर्गात वेदविद्या तर बंद झालीच, पण त्या योगाने इतर विद्येचीही जवळजवळ बंदी झाली.' अशा रितीने दक्षिण हिंदुस्थानाच्या परिस्थितीत फार मोठा फरक पडला आहे. तिकडे ब्राह्मण वर्गाचे वर्चस्व मुख्यत्वे धार्मिक बाबतीत आहे. बाकींच्या बाबतीत इतर वर्णाचे लोक परतंत्र नाहीत. यामुळे समाजाचे पारडे समतोल आहे. दक्षिणेत ब्राह्मणेतरांची विद्या बंद झाल्याने सर्वच बाबतीत ब्राह्मणांच्या हाती श्रेष्ठपणा गेला आहे. धार्मिक, राजकीय, सामाजिक, शिक्षणविषयक वगैरे सर्वत्र प्राबल्य ब्राह्मणांचे, यामुळे इतर स्थिती फार परावलंबी व केविलवाणी झाली आहे.'[१३] याच भाषणात पुढे ते म्हणतात, 'आर्य समाजाचे प्रयत्न याच प्रांतात विशेष झाले पाहिजेत. बनावटी धर्मगुरूंचा सुळसुळाट नाशिक, पंढरपूर या क्षेत्रांतच असतो. तेव्हा त्या त्या ठिकाणी आपल्या शाळा, गुरुकुले, उपदेश मंदिरे झाली पाहिजेत व खऱ्या धर्माचे ज्ञान वाढवले पाहिजे.'[१४]

या भाषणात शाहू महाराजांनी शाळा, कॉलेज यांचा उल्लेख यासाठी केला आहे की, आर्य समाज जातिभेदाचा कट्टर विरोधक होता. स्वाभाविकच त्यांच्या गुरुकुलांत सर्व जातींच्या मुलांना प्रवेश दिला जात असे. बहुजन समाजातील मुलांना इतरांच्या बरोबरीने वैदिक शिक्षणही दिले जात होते. शाहू महाराजांनी त्यांच्या उत्तर भारतातील दौऱ्यात आर्य समाजाने चालवलेली शाळा आणि कॉलेजेस पाहिली होती. त्या

काळी राजाराम कॉलेजसारख्या उच्च शैक्षणिक संस्थांचे प्रशासन करणाऱ्या व्यक्ती आर्य समाजातच मोठ्या संख्येने होत्या. डॉ. बाळकृष्णांसारखा विद्वान आणि समर्थ प्रशासक आर्य समाजाकडे होता. त्यामुळेच त्यांनी या संस्था आर्य समाजाला सांभाळण्यासाठी दिल्या.[१५]

१५ मार्च १९१९ साली राजाराम कॉलेज आणि राजाराम या संस्था आर्य प्रतिनिधी सभेकडे सोपवताना काढलेल्या जाहीरनाम्यात नमूद केले आहे.

गेल्या वर्षी येथील पुढारी लोकांचे एक बोर्ड करून त्या बोर्डाकडे राजाराम कॉलेजची सर्व व्यवस्था सोपविलेली होती; पण सदर बोर्डाकडून या संस्थेसंबंधाने होण्याची ती व्यवस्था झाली नाही, असे हुजूर निदर्शनास आल्यावरून राजाराम कॉलेज ही संस्था व त्याचप्रमाणे राजाराम हायस्कूल, अशा दोन्ही संस्था १ जून १९१९ इसवीपासून पाच वर्षांच्या मुदतीने आर्य प्रतिनिधी सभा यू.पी. या सोसायटीच्या ताब्यात देण्याबद्दल हुजुरून आज्ञेत आले आहे व हल्लीच्या बोर्डास दिलेली ग्रँट, इमारत वगैरे सर्व आर्य प्रतिनिधी सभा या सोसायटीस देण्यात याव्या, अशी आज्ञा झाली आहे.' हुजूर आज्ञेवरून या जाहीरनाम्यामागची भूमिका शाहू महाराज यांनी १९२० च्या भावनगरच्या भाषणात स्पष्ट करताना म्हटले आहे, राजाराम कॉलेज, हायस्कूल, गुरुकुल, अनाथालय, सरदार बोर्डिंग वगैरे सर्व संस्था मी आर्य प्र. सभा संयुक्तप्रांत हिच्या आधीन एवढ्याच उद्देशाने केल्या आहेत की, लोकांची मानसिक सुधारणा व्हावी व ती सुधारणा विद्येच्या द्वाराच शक्य आहे. म्हणून विद्येची सूत्रे मी आर्य समाजाच्या हाती देऊन टाकली आहेत. मला जे काही शक्य झाले ते मी केले आहे. माझी अंतःकरणपूर्वक इच्छा आहे की, माझ्या जोतिबा व पंढरपूर वगैरे क्षेत्रांमध्येदेखील आपण गुरुकुले, हायस्कूले, समाज स्थापन करावेत.'[१७]

आर्य समाजाचे संस्थापक महर्षी दयानंद स्वामींनी लिहिलेला 'सत्यार्थ प्रकाश' हा ग्रंथ या समाजाच्या शिकवणुकीचा मूळ स्रोत मानला जातो. शाहू महाराजांनी १० ऑगस्ट १९१८ साली तलाठ्यांच्या नेमणुकीसंदर्भात काढलेल्या जाहीरनाम्यात प्रत्येक तलाठ्याने 'सत्यार्थ प्रकाश' या पुस्तकाचा अभ्यास करून त्याची परीक्षा दिली पाहिजे असा हुकूम काढला होता.[१८]

याच्या बरोबरीने १९१९ साली कोल्हापूर संस्थानात कसायाला गायी विकण्यावरती बंदी घालण्यात आली. ही बंदी मोडणाऱ्यांसाठी केलेली जबर दंडाची तरतूद आर्य समाजाच्या विचारांशी जुळणारी होती. असे असले तरी आर्य समाजाला मान्य नसणारी मूर्तिपूजा शाहू महाराजांनी सोडली नाही. त्यांची शेवटपर्यंत करवीर नगरीची अधिष्ठात्री देवी श्रीमहालक्ष्मी आणि कुलदेवता श्रीभवानीवर श्रद्धा होती. आपल्या अखेरच्या चार-पाच वर्षांत आर्य समाजाला उत्तेजन देण्यामागची आपली भूमिका कर्नल वूडहाऊस या राजनैतिक प्रतिनिधीला विशद करून सांगताना शाहू महाराज यांनी लिहिले की, 'सत्यशोधक समाजाला कसलाच पाया नाही. मात्र आर्य समाजाला वेदांचे अधिष्ठान आहे. इतर जातींना वेद शिकवण्याचा म्हणजेच ब्राह्मणांना जो आवडत नाही तो त्यांचा धर्म शिकवण्याचा माझा विचार आहे. सर प्रतापसिंहाप्रमाणे माझीही वेदांवर श्रद्धा आहे आणि मी आर्य समाजाच्या तत्त्वांचा चाहता आहे. प्रतापसिंह जेव्हा युद्ध आघाडीवरून परत येतील, तेव्हा ते ताबडतोब मला मदत करतील म्हणून मी त्यांच्या येण्याची वाट पाहत आहे. आर्य समाज राजकारणात ढवळाढवळ करत नसल्याने सरकार त्यास साहाय्य करत आहे. आर्य समाज ही एक धार्मिक व सामाजिक संस्था आहे आणि जहाल अतिरेक्यांना शह देण्यात सरकारला तिची मदत होते. म्हणूनच येथे कोल्हापुरातही आर्य समाजाचे लोक मला हवे आहेत.'[१९]

या पत्रात शाहू महाराज म्हणतात त्याप्रमाणे आर्य समाजाने राजकारणात ढवळाढवळ केली नाही. आर्य समाजाच्या प्रचारकांच्या कार्यामुळे अनेक शिक्षण संस्था करवीर संस्थानात टिकून राहिल्या. जातीभेदाला विरोध आणि शिक्षण प्रसारासाठी संस्थांची उभारणी यात आर्य समाजाचे कार्यकर्ते चिवट होते. त्यामुळे एकीकडे धर्मातील कर्मकांड विरोधातला लढा, दुसरीकडे समाजसुधारणेचे व्रत अशा अवस्थेत राजर्षी शाहू महाराजांच्या कार्याला दिशा देण्याचे काम आर्य समाजाने केले, असे म्हणता येईल.

**संदर्भ :**


१) फडके य. दि. – शाहू छत्रपती आणि लोकमान्य, पान क्र. १८९, श्रीविद्या प्रकाशन, पुणे १९८६.
२) Latthe -. B. - Memoirs of His Highness Shri Shahu Chhatrapati Maharaja of Kolhapur, Volumes 2, Page No. 371, Times Press, Bombay 1924.
३) वरीलप्रमाणे, फडके य. दि., पान क्र. १९७.
४) जाधव रमेश – राजर्षी शाहू छत्रपती : वाद आणि वास्तव, पान क्र. ४७, सुरेश एजन्सी, पुणे.
५) जाधव भगवानराव – (संपादन–संकलन) आधुनिक भारतीय पुरोगामी राष्ट्रवादाचे जनक: राजर्षी श्रीशाहू महाराजांची भाषणे, पान क्र. ४७, लोकवाङ्मय गृह, मुंबई २००९.
६) वरीलप्रमाणे, फडके य. दि., पान क्र. १८६.
७) ढेरे रा. चिं. – राजर्षी श्री शाहू छत्रपती, आर्य समाज आणि नित्यानंदस्वामी (राजर्षी शाहू गौरव ग्रंथ) पान क्र. ६५५, राजर्षी शाहू चरित्र साधने प्रकाशन समिती, मुंबई २०१६.
८) वरीलप्रमाणे, ढेरे रा. चिं, पान क्र. ६६१–६२.
९) पवार जयसिंगराव (संपा) – राजर्षी शाहू छत्रपतींची भाषणे, पान क्र. १७, मेहता पब्लिशिंग हाउस, पुणे २०२३.
१०) वरीलप्रमाणे, फडके य. दि., पान क्र. १८७.
११) गर्गे स. मा. – शाहू महाराज आणि आर्य समाज, पान क्र. ३८७,३८८. (राजर्षी शाहू गौरव ग्रंथ) राजर्षी शाहू चरित्र साधने प्रकाशन समिती, मुंबई २०१६.
१२) पवार जयसिंगराव – राजर्षी शाहू छत्रपती जीवन व कार्य, पान क्र. १०९, ताराराणी बुक सर्व्हिस, कोल्हापूर २०१४.
१३) वरीलप्रमाणे, पवार जयसिंगराव (संपा) – राजर्षी शाहू छत्रपतींची भाषणे, पान क्र. २७.
१४) वरीलप्रमाणे, पान क्र. ३१.
१५) वरीलप्रमाणे, ढेरे रा. चिं. , पान क्र.६६५
१६) पवार जयसिंगराव (संपा) – राजर्षी शाहू छत्रपतींचे जाहीरनामे व हुकूमनामे, पान क्र. १०१, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे २०१८.
१७) वरीलप्रमाणे, पान क्र.९४, ११७.
१८) वरीलप्रमाणे, फडके य. दि., पान क्र.१८८.
१९) वरीलप्रमाणे, जाधव भगवानराव – (संपादन–संकलन) पान क्र. ४७.


**(इतिहास संशोधक, सदस्य, महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य समिती)**

मराठा समाजातील विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी स्थापन छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था, पुणे अर्थात 'सारथी' ही खऱ्या अर्थाने मराठा समाजातील युवकांच्या आकांक्षांची सारथी बनली आहे. स्पर्धा परीक्षांची तयारी, उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, परदेश शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, संशोधनासाठी अधिछात्रवृत्ती, कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम आदी अनेक उपक्रमांच्या माध्यमातून मराठा समाजातील विद्यार्थी, युवकांच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक उन्नतीसाठी संस्थेकडून प्रयत्न सुरू आहेत.

# युवकांच्या आकांक्षांची 'सारथी'

**सचिन गाढवे**

'सारथी' ही महाराष्ट्र शासनाची नियोजन विभागाच्या आधिपत्याखालील २५ जून २०१८ रोजी कंपनी कायदा २०१३ च्या कलम ८ अन्वये स्थापन करण्यात आलेली 'नॉन-प्रॉफिट' कंपनी तसेच स्वायत्त संस्था आहे. राज्यातील मराठा, कुणबी, मराठा - कुणबी व कुणबी - मराठा या लक्षित गटातील समाजाच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक विकासाकरिता या संस्थेची स्थापना करण्यात आली. सारथीच्या माध्यमातून राज्यातील मराठा समाजाच्या आर्थिक, शैक्षणिक आणि सामाजिक प्रगतीसाठी विविध कल्याणकारी उपक्रम, योजना व्यापक स्वरूपात राबवण्यात येतात. आतापर्यंत राज्यातील २ लाख १२ हजार ६७९ विद्यार्थी, समाजघटकांनी या संस्थेच्या विविध योजनांचा लाभ घेतला आहे.

## शासनाकडून आर्थिक पाठबळ

शासनाकडून या संस्थेस अनेक योजना राबवण्यासाठी भरीव निधी प्राप्त होत आहे. संस्थेच्या पुणे मुख्यालयाच्या इमारतीचे बांधकाम गतीने सुरू आहे, यासाठी राज्य शासनाने ८७ कोटी ४७ लाख रुपयांच्या खर्चास प्रशासकीय मान्यता दिली आहे. पुणे मुख्यालय, कोल्हापूर उपकेंद्रासह खारघर, नवी मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, लातूर, अमरावती व नागपूर या आठ विभागीय कार्यालयांसाठी शहरांमध्ये मोक्याच्या ठिकाणी अकृषिक १९ एकर ३० गुंठे जमीन उपलब्ध करून देण्यासह, बांधकामांसाठी १ हजार १८८ कोटी ३३ लाख रुपये खर्चास शासनाने प्रशासकीय मान्यता दिली आहे.

## छत्रपती राजाराम महाराज सारथी शिष्यवृत्ती योजना

केंद्र शासनाच्या 'मीन्स कम मेरीट' शिष्यवृत्तीसाठी पात्र असलेल्या मात्र राज्य शासनासाठीच्या कोट्यामुळे शिष्यवृत्ती अप्राप्त असलेल्या विद्यार्थ्यांसाठी सारथीने छत्रपती राजाराम महाराज सारथी शिष्यवृत्ती सुरू केली आहे. या योजनेंतर्गत दरमहा ८०० रुपयांप्रमाणे वार्षिक ९,६०० रुपये शिष्यवृत्ती देण्यात येते. ही योजना २०२१-२२ मध्ये ९वीच्या विद्यार्थ्यांपासून सुरू केली असून, जसजसे विद्यार्थी १०वी, ११वीपर्यंत जातील, तशी ही शिष्यवृत्ती मिळणार आहे. २०२१-२४ पर्यंत ९वी ते ११वीच्या एकूण ७३,००५ लाभार्थ्यांना ७० कोटी ७ लाख रुपये वितरित करण्यात आले आहेत.

## महाराणी ताराराणी स्पर्धा परीक्षा विभाग

या उपक्रमांतर्गत सारथीमार्फत केंद्रीय लोकसेवा आयोग, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परीक्षांच्या पूर्व, मुख्य तसेच मुलाखत या तिन्ही टप्प्यांवर; तसेच बँकिंग कर्मचारी निवड परीक्षा (आयबीपीएस), विद्यापीठ अनुदान आयोगाची राष्ट्रीय पात्रता चाचणी (युजीसी-नेट), महाराष्ट्र राज्य पात्रता चाचणी (एमएच-सेट) आदी परीक्षांच्या तयारीसाठी प्रशिक्षणास साहाय्य करण्यात येते, यासाठी महाराणी ताराराणी स्पर्धा परीक्षा विभागातर्फे विशेष प्रयत्न करण्यात येतात.

या उपक्रमांतर्गत युपीएससीच्या पूर्व परीक्षेसाठी १ हजार विद्यार्थी दरवर्षी निवडण्यात येतात. नवी दिल्ली येथील प्रशिक्षणासाठी विद्यार्थांना प्रशिक्षण संस्थेच्या शुल्क आणि दरमहा १३ हजार रुपये विद्यावेतन याप्रमाणे ३ लाख २३ हजार रुपये, मुख्य परीक्षेसाठी ५० हजार आणि मुलाखतीसाठी २५ हजार रुपये याप्रमाणे एकूण ३ लाख ९८ हजार रुपये दिले जातात.

आतापर्यंत मागील ४ वर्षांत १ हजार ४७९ विद्यार्थ्यांना पूर्व परीक्षेसाठी २१ कोटी रुपयांचा लाभ डीबीटीद्वारे देण्यात आला आहे. 'सारथी' मुख्यालयातून विद्यार्थ्यांना दूरदृश्यप्रणालीद्वारे मार्गदर्शन करण्यासोबत त्यांच्या अडचणी, समस्या सोडवण्यात येतात. ६५० विद्यार्थ्यांना मुख्य परीक्षेसाठी ३ कोटी २५ लाख रुपयांचा लाभ देण्यात आला आहे. गेल्या ४ वर्षांत २०६ विद्यार्थ्यांना मुलाखतीसाठी ५१ लाख रुपयांचा लाभ देण्यात आला आहे.

## युपीएससीत गुणवंतांचे यश

मागील ३ वर्षांत 'सारथी' संस्थेमार्फत ८४ विद्यार्थी केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा स्पर्धा परीक्षेत यशस्वी झाले. या वर्षी प्रशिक्षण देण्यात आलेल्या ४५ विद्यार्थ्यांपैकी २० विद्यार्थी केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (युपीएससी) नागरी सेवा स्पर्धा परीक्षा २०२३ मध्ये यशस्वी झाले असून, आतापर्यंत 'सारथी' संस्थेमार्फत १२ विद्यार्थी भारतीय प्रशासकीय सेवा, १८ विद्यार्थी भारतीय पोलीस सेवा, ८ विद्यार्थी भारतीय महसूल सेवा, १ विद्यार्थी भारतीय परराष्ट्र सेवा, ७ विद्यार्थी भारतीय वन सेवा, ५ विद्यार्थी सीएपीएफ, १ भारतीय अभियांत्रिकी सेवा आणि १२ विद्यार्थी इतर केंद्रीय सेवा परीक्षांमध्ये यशस्वी झाले आहेत.

## राज्यसेवा प्रशिक्षण मार्गदर्शन

सारथीकडून महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोग अर्थात एम.पी.एस.सी. प्रशिक्षणासाठी ७५० विद्यार्थ्यांची निवड दरवर्षी करण्यात येते, यासाठी पुणे येथील विद्यार्थ्यांना दरमहा १० हजार रुपये विद्यावेतन दिले जाते. प्रशिक्षण संस्थेचे शुल्क 'सारथी'मार्फत भरण्यात येते.

मागील ४ वर्षांत ९,०५८ विद्यार्थ्यांना पूर्व परीक्षा, मुख्य परीक्षा; तसेच मुलाखतीसाठी एकूण १९ कोटी ८२ लाख रुपयांचा लाभ देण्यात आला आहे. मुख्य परीक्षेसाठी सर्व विद्यार्थ्यांना १५ हजार रुपये एकरकमी, तर मुख्य परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना मुलाखतीसाठी १० हजार रुपये दिले जातात.

सारथीच्या मार्गदर्शनातून सन २०२१ पासून वर्ग एक श्रेणीमध्ये १६६, तर वर्ग दोन श्रेणीत ३८५ अशा एकूण ५५१ विद्यार्थ्यांनी यश मिळवलेले आहे. उल्लेखनीय म्हणजे नुकत्याच निकाल जाहीर झालेल्या २०२३-२४ राज्यसेवा परीक्षेत वर्ग एक पदासाठी ७५ आणि वर्ग दोन पदासाठी १०० अशा १७५ उमेदवारांची निवड झाली आहे.

यु.पी.एस.सी. आणि एम.पी.एस.सी. नव्हे, तर युजीसी-नेट, एमएच-सेट परीक्षांची तयारी, बँकिंग कर्मचारी निवड (आयबीपीएस) अशा इतर अनेक नोकरीची संधी देणाऱ्या क्षेत्राच्या तयारीसाठीही युवकांना प्रशिक्षण देण्यात येत आहे. महाराणी ताराराणी स्पर्धा परीक्षा विभागामार्फत सर्व परीक्षांच्या २०,१८८ प्रशिक्षणार्थी लाभार्थ्यांना ७५ कोटी रुपये अनुदान वितरित करण्यात आले आहे.

अत्यंत गुणवंत असलेल्या मात्र आर्थिक स्थितीमुळे प्रगतीस अडथळा येत असलेले ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थी सारथीचा मदतीचा हात मिळाल्याने आज यु.पी.एस.सी. आणि एम.पी.एस.सी.च्या परीक्षेत भरीव यश मिळवून कुटुंबाचे, तसेच समाजाचे ऋण फेडत आहेत.

## पायाभूत प्रशिक्षण योजना

सरदार सूर्याजी काकडे सारथी सनदी लेखापाल पायाभूत प्रशिक्षण योजनेंतर्गत ४०० विद्यार्थ्यांना ६ महिन्यांसाठी सनदी लेखापाल पायाभूत परीक्षेसाठी प्रशिक्षण देण्यात येईल. हे प्रशिक्षण पुणे, नवी मुंबई, कोल्हापूर, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, लातूर, अमरावती, नागपूर व अकोला येथे प्रस्तावित करण्यात येत आहे. या विद्यार्थ्यांना दरमहा १० हजार रुपये विद्यावेतन देण्यात येणार आहे.

## उच्च शिक्षण देशांतर्गत शिष्यवृत्ती

देशातील नामवंत २०० विद्यापीठांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना डॉ. पंजाबराव देशमुख 'सारथी' उच्च शिक्षण देशांतर्गत शिष्यवृत्ती देण्यात येते. याद्वारे शिक्षण शुल्क, ग्रंथालय शुल्क, परीक्षा शुल्क, वसतिगृह शुल्क व भोजन शुल्काची १०० टक्के प्रतिपूर्ती करण्यात येते. तसेच पुस्तकांसाठी अतिरिक्त ५ हजार रुपये देण्यात येतात. २०२२-२३ पासून ४३७ विद्यार्थ्यांना ही अधिछात्रवृत्ती देण्यात आली आहे.

## परदेश शिक्षणासाठी शिष्यवृत्ती

गुणवंत मुलामुलींना परदेश शिक्षणासाठी २०२३-२४ पासून महाराजा सयाजीराव गायकवाड 'सारथी शिष्यवृत्ती योजना' सुरू करण्यात आली आहे. क्यूएस रँकिंग २०० पेक्षा कमी असलेल्या परदेशातील विद्यापीठात एमएससाठी प्रवेश घेतलेल्या ५० आणि पी.एचडीसाठी २५ विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती देण्यात येते. दोन वर्षांच्या एमएस अभ्यासक्रमासाठी प्रतिवर्ष ३० लाख रुपये याप्रमाणे ६० लाख रुपये, तर चार वर्षांच्या पी.एचडीसाठी प्रतिवर्ष ४० लाख याप्रमाणे १ कोटी ६० लाख रुपये अनुदान देण्यात येते. २०२३-२४ मध्ये ५० विद्यार्थ्यांना या शिष्यवृत्तीचा लाभ देण्यात आला आहे.

## राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती

लक्षित गटातील उच्चशिक्षित विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण, विकसित करण्याच्या उद्दिष्टाने छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती देण्यात येते. यामध्ये ज्युनियर रिसर्च फेलोज (जे.आर.एफ.) यांना तीन वर्षांपर्यंत १५ लाख ७५ हजार १२०, तर चार वर्षांपर्यंत २१ लाख १६० रुपये लाभ देण्यात येतो. सिनियर रिसर्च फेलोज (एस.आर.एफ.) यांना तीन वर्षांपर्यंत १६ लाख ५९ हजार ७२६, तर चार वर्षांपर्यंत २२ लाख ६९ हजार ३६६ रुपये लाभ देण्यात येतो. दिव्यांगांना विशेष प्रोत्साहन म्हणून प्रतिमाह २ हजार प्रमाणे २४ हजार रुपये अतिरिक्त देण्यात येतात.

आतापर्यंत २०१९ ते २०२३ या कालावधीत एकूण २,१०९ विद्यार्थांना ही अधिछात्रवृत्ती देण्यात आली असून २०२३-२४ मध्ये २०० विद्यार्थ्यांना लाभ देण्याची प्रक्रिया सुरू आहे. याशिवाय उमेदवारांमध्ये वैज्ञानिक आणि चिकित्सक दृष्टिकोन वाढवण्यासाठी मुख्यमंत्री विशेष संशोधन अधिछात्रवृत्ती योजनादेखील राबवण्यात येत आहे.

## कौशल्य विकास

आताचा काळ कौशल्यांचा आहे. कोणतीही कंपनी, सेवा संस्था आता उमेदवारांची निवड करून कौशल्य प्रशिक्षण देण्याऐवजी संस्थेला आवश्यक कौशल्य आधीच प्राप्त केलेल्या उमेदवारांना प्राधान्य देते. ही बाब ओळखून सारथीने विविध कौशल्य कार्यक्रम हाती घेतले आहेत. तसेच राज्यात करिअर मार्गदर्शन व समुपदेशन शिबिरांचेही विविध जिल्ह्यांत आयोजन केले जाते.

## 'सीएसएमएस–दीप'

छत्रपती संभाजी महाराज सारथी युवा व्यक्तिमत्त्व विकास व संगणक कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत इंग्रजी भाषा, संवाद कौशल्य; तसेच संगणक कौशल्यांतर्गत एमएस-सीआयटी आणि त्यातील उमेदवाराच्या इच्छेनुसार आवडीचा डाटा मॅनेजमेंट, फायनान्सिअल अकाऊंटिंग विथ टॅली, डीटीपी, मोबाईल ॲप डिझायनिंग आदी अभ्यासक्रमाचे ५०,२७२ विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण सुरू आहेत. २०२३-२४ पर्यंत प्रशिक्षण पूर्ण झालेल्या १०,९८१ विद्यार्थ्यांपैकी १,८५८ विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रात नोकऱ्या मिळाल्या आहेत.

## 'शिकता शिकता कमवा' योजना

सरसेनापती वीर बाजी पासलकर सारथी संगणक प्रशिक्षण योजनेंतर्गत ४,४८४ विद्यार्थ्यांनी संगणक प्रशिक्षण घेत असतानाच आपल्या निवासाच्या परिसरात माफक शुल्क आकारून नागरिकांचे ऑनलाइन आधार कार्ड, ऑनलाइन पॅन कार्ड, मतदान कार्ड, विविध ऑनलाइन अर्ज भरणे आदींच्या माध्यमातून आर्थिक कमाई करत कुटुंबाला हातभार लावला आहे.

## सामाजिक उपक्रम

छत्रपती शिवाजी महाराज राज्याभिषेकाच्या ३५० व्या वर्षपूर्ती निमित्त छत्रपती शिवाजी महाराज स्मृतिग्रंथाच्या ५० हजार प्रतींचे वितरण, राज्याभिषेक अभियानांतर्गत विद्यार्थ्यांकडून वृक्षसंवर्धनासाठी सीडबॉल तयार करणे, छत्रपती शाहू महाराज यांच्या स्मृतिशताब्दी वर्षानिमित्त त्यांचे विचार आणि कार्यकर्तृत्व नवी पिढी, विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी निबंधस्पर्धेचे आयोजन आदी उपक्रम राबवण्यात येत आहेत.

अशा विविध पद्धतीने 'सारथी'मार्फत मराठा समाजातील विद्यार्थ्यांसोबतच समाजातील सर्व घटकांच्या प्रगतीसाठी, आर्थिक सक्षमीकरणासाठी व्यापक स्वरूपात उपक्रम, योजना राबवण्यात येत आहे. सर्व घटकांचे कल्याण, सामाजिक न्यायाच्या तत्त्वाचा अंगीकार ही या योजनांची वैशिष्ट्ये आहेत. त्यातूनच मराठा समाजाचा आर्थिक आणि सामाजिक विकास साध्य होणार आहे.

सारथीला जास्तीत जास्त समाजाभिमुख करण्याचा प्रयत्न असून या वर्षी सारथीकडून सीए फाऊंडेशन अभ्यासक्रम; तसेच मोडी लिपी प्रशिक्षण वर्ग सुरू करण्यात येणार आहेत. छत्रपती शाहू महाराज यांचे अप्रकाशित साहित्य प्रकाशित करण्यात येणार आहे. तसेच राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृतिग्रंथांच्या ५५ हजार प्रती छापण्यात येणार आहेत.

**- अशोक काकडे,** व्यवस्थापकीय संचालक, सारथी

## कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम

'राजमाता जिजाऊ सारथी, कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम' अंतर्गत महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी (एमएसएसडीएस), मुंबईमार्फत राबवण्यात येणारे स्थानिक पातळीवर रोजगार, स्वयंरोजगारास उपयोगी पडतील, असे सर्व अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण एम.एस.एस.डी.एस.वर देणे प्रस्तावित आहे. संपूर्ण राज्यातून सारथीच्या लक्षित गटातील २० हजार उमेदवारांना कौशल्य विकास प्रशिक्षण देण्याचे उद्दिष्ट आहे.

## महिला कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम

महिलांसाठी 'महाराणी सईबाईसाहेब महिला कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम'अंतर्गत ५९ अभ्यासक्रमांत प्रत्येकी ३० महिलांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. सीईओपी पुणेमार्फत ११ अभ्यासक्रमांचे प्रत्येकी ३० महिलांना प्रशिक्षण, २ हजार व्यक्तींना मधुमक्षिका पालन प्रशिक्षण, मुरघास व जनावरांच्या संगोपनाबाबत प्रशिक्षण देणे असा कार्यक्रम हाती घेण्यात येत आहे.

## उद्योजकता विकास उपक्रम

युवा पिढीत उद्योजकतेला चालना देण्यासाठी २०२३-२४ पासून 'सरसेनापती संताजी घोरपडे सारथी उद्योजकता विकास (इन्क्युबेशन) उपक्रम' हाती घेण्यात आला आहे. विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालय, नवी दिल्ली यांच्याकडील मान्यताप्राप्त संस्थांमध्ये सारथीमार्फत स्टार्टअपवर काम करणाऱ्या आयडीयेटर यांना यशस्वी उत्पादने विकसित करण्यासाठी सारथीमार्फत साहाय्यक काम करण्यात येते आहे. त्याअनुषंगाने प्रत्येक विद्यार्थ्याला १ वर्षांसाठी दरमहा २५ हजार रुपये विद्यावेतन, तर संबंधित संस्थेला व्यवस्थापन खर्च म्हणून दरमहा ५ हजार रुपये देण्यात येत आहेत.

## इंडो-जर्मन टुल रुम प्रशिक्षण कार्यक्रम

श्रीमंत मालोजीराजे भोसले सारथी व इंडो-जर्मन टुल रुम (आयजीटीआर) प्रशिक्षण कार्यक्रम ही एक सारथीची महत्त्वाकांक्षी योजना असून श्रीमंत मालोजीराजे भोसले सारथी व केंद्र शासनाच्या एमएसएमई सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग मंत्रालयांतर्गतच्या इंडो-जर्मन मशीन टूल रुम यांच्या संयुक्त भागीदारीतून छत्रपती संभाजीनगर, नागपूर, पुणे व कोल्हापूर येथे औद्योगिक प्रशिक्षण संस्था, पदविका व अभियांत्रिकी पदवी प्राप्त विद्यार्थ्यांना विशेष कौशल्यांचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. ७४१ विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेतला असून, यापैकी ३३४ विद्यार्थ्यांनी प्रशिक्षण पूर्ण केले आहे. त्यापैकी १७१ विद्यार्थ्यांना चांगल्या वेतनाच्या नोकऱ्या मिळाल्या आहेत. शिवाय स्वयंरोजगाराच्या संधी प्राप्त झाल्या आहेत.

विद्यार्थ्यांना औद्योगिक तंत्रज्ञान क्षेत्रातील अद्ययावत, आधुनिक कौशल्य उपलब्ध करून देत उद्योगांना आवश्यक 'रेडी टू वर्क' मनुष्यबळ उपलब्ध करणे हा कौशल्य विकास प्रशिक्षणाचा उद्देश आहे. यामध्ये २४ वेगवेगळ्या अभ्यासक्रमांचा समावेश आहे. इंडो-जर्मन टूल रूम प्रशिक्षण संस्थेचे शुल्क सारथी संस्थेमार्फत अदा करण्यात येते. यापैकी काही विद्यार्थ्यांना चांगल्या पगाराची नोकरीदेखील आहे.

## मोडी लिपी योजना

शिवकालीन दस्ताऐवज हे मोडी लिपीत उपलब्ध आहेत. त्यामुळे मोडी भाषेचे प्रशिक्षण दिल्यास अप्रकाशित इतिहास लोकांसमोर येण्यास मदत होईल, यासाठी सारथी संस्थेमार्फत सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर येथे २०२४ पासून 'सरसेनापती हंबीरराव मोहिते सारथी मोडी लिपी योजना' हा अभ्यासक्रम सुरू करण्यात येत आहे.

## ड्रोन पायलट प्रशिक्षण कार्यक्रम

'सेनापती धनाजी जाधव सारथी-ड्रोन पायलट प्रशिक्षण कार्यक्रम' हा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम राबवण्यात येत आहे. महात्मा फुले विद्यापीठ राहुरी येथे ड्रोन पायलट प्रशिक्षण देण्यात येत आहे, यासाठी प्रतीउमेदवार ४० हजार रुपये खर्च सारथीतर्फे देण्यात येतो. ११५ उमेदवारांना हे प्रशिक्षण देण्यात आले आहे. याशिवाय तळेगाव दाभाडे येथील राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था येथे फलोत्पादन तंत्रज्ञानाचे अद्ययावत प्रशिक्षण, वसंतदादा साखर संस्था, मांजरी येथील अभ्यासक्रमाच्या खर्चाची प्रतिपूर्ती, महाराष्ट्र सहकार विकास परिषदेकडून शेतकरी कंपन्यांना प्रशिक्षण असे उपक्रमही राबवण्यात येत आहेत.

**(माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, पुणे)**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) अनुसूचित जातींच्या घटकांकरिता प्रशिक्षण व संशोधनाचे कार्य करत आहे. या संस्थेची स्थापना २२ डिसेंबर १९७८ रोजी झाली असून संस्थेस स्वायत्त संस्था म्हणून शासनाकडून मान्यता मिळालेली आहे. २००८ मध्ये स्वायत्त संस्था म्हणून शासनाकडून मान्यता मिळाल्यानंतर अनेक योजना तयार करून राबवण्यात आल्या. हळूहळू योजनांची संख्या वाढत गेली. त्याचबरोबर योजनांचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांचीही संख्या वाढत गेली. दिवसेंदिवस अनेक नवीन योजनांची त्यात भर पडत आहे. या नवीन योजना कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक ते नियोजन सुरू आहे.**

# संशोधन व प्रशिक्षण संस्था

**स्नेहल भोसले**

संशोधन, मूल्यमापन, प्रशिक्षण, कौशल्य विकास, योजना, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी, समतादूत, प्रकाशन व प्रसिद्धी आदी विभागांच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेचे कामकाज पार पाडले जाते. या सर्व विभागांची माहिती या लेखात वाचणार आहोत.

## संशोधन विभाग

संशोधन विभागामार्फत महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातींचे सामाजिक, आर्थिक शैक्षणिक मानववंश शास्त्रीयदृष्ट्या संशोधन करून अहवाल शासनास सादर करण्यात येतो. अनुसूचित जातीच्या प्रतिनिधींसाठी कार्यशाळेचे आयोजन, चर्चासत्र, तज्ज्ञांच्या मार्गदर्शनातून माहिती संकलन, विश्लेषण व अहवाल तयार करण्यात येतो.

**पूर्ण झालेले प्रकल्प :**

- कैकाडी समाजाचे क्षेत्रबंधन उठवून विमुक्त जातीतील कैकाडी समाजाचा समावेश अनुसूचित जातीमध्ये करण्याबाबत.
- हिंदू खाटिक समाजाची सद्य:स्थिती.
- रहाटेनगर नागपूर येथील अनुसूचित जाती-जमाती, गारुडी समाजाचे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक स्थितीचे सर्वेक्षण.
- महाराष्ट्र राज्यातील धोबी समाजाचा अस्पृश्यतेसंबंधी सामाजिक स्थितीचा अभ्यास.
- सफाई कर्मचाऱ्यांचा वास्तववादी विश्लेषणात्मक अभ्यास.
- पुणे जिल्ह्यातील अनुसूचित जाती-जमाती, गारुडी समाजाचे सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक सर्वेक्षण.
- मादिगा समाजाचे सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक सर्वेक्षण.
- होलार समाजाची सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक सद्य:स्थिती.
- गोसावी समाजाचे सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक सर्वेक्षण.

**सद्य:स्थितीत सुरू असलेले प्रकल्प :**

- महाराष्ट्रातील बंगाली नम:शूद्र समाजाच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक स्थितीचे सर्वेक्षण.
- मेदार-बुरुड समाजाचे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक अभ्यासबाबत सर्वेक्षण.
- मेहतर वाल्मिकी आणि वडार समाजाचे सामजिक, आर्थिक व शैक्षणिक सर्वेक्षण.



- महाराष्ट्र राज्यातील ५९ अनुसूचित जातींच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक विकासाबाबत पथदर्शी बेंचमार्क सर्वेक्षण.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घेतलेल्या मातंग परिषदांचे संशोधन व दस्तऐवजीकरण करणे.
- अनुसूचित जातीतील डक्कलवार समाजाचे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व सांस्कृतिक विकासाबाबत संशोधन करण्याबाबत.
- क्रांतिवीर लहुजी साळवे व मुक्ता साळवे आणि साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्यावर ऐतिहासिक संदर्भ शोधून संशोधन करणे.

**प्रस्तावित प्रकल्प :**

- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय वास्तव्याचे / भेटी दिलेल्या ठिकाणांचे संशोधन करून दस्तऐवज स्वरूपात तयार करण्याबाबत.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कायदेमंडळातील कार्यावर संशोधन करणे.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महिलाविषयक कार्य, महिला परिषद यांवर संशोधन.
- आंबेडकरी चळवळीचा चरित्रकोश संपादन प्रकल्प.

## मूल्यमापन विभाग

सामाजिक न्याय विभागामार्फत मागासवर्गीय दुर्बल घटकांसाठी राबवण्यात येणाऱ्या विविध योजनांपैकी महत्त्वाच्या योजनांचे मूल्यमापन बार्टी संस्थेमार्फत करण्यात येते. मूल्यमापन अहवाल शासनास सादर करण्यात येतो. मूल्यमापन अहवालाच्या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करणे, योजनेचे निकष, अटी व शर्ती यामध्ये आवश्यक बदल करण्याबाबत शासनास धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी उपयोग होतो.

विभागामार्फत एकूण १३ योजनांचे मूल्यमापन करून अहवाल शासनास सादर करण्यात आलेले आहेत. त्यापैकी काही योजनांच्या शिफारशी शासनाने स्वीकारल्या असून, त्यानुसार शासन निर्णयात महत्त्वपूर्ण बदल करण्यात आले आहेत.

## प्रशिक्षण विभाग

२३ सप्टेंबर २०११ च्या शासन निर्णयाप्रमाणे सामाजिक न्याय विभागांतर्गत विविध खात्यांमध्ये कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येते. सन २०१२-१३ ते २०२२-२३ या वर्षात उजळणी व पायाभूत प्रशिक्षणाच्या कार्यशाळेत समाज कल्याण, दिव्यांग कल्याण, इतर बहुजन कल्याण यांच्या आस्थापनेवरील कनिष्ठ लिपिक, वरिष्ठ लिपिक, गृहपाल, समाज कल्याण निरीक्षक, साहाय्यक शिक्षक व मुख्याध्यापक, स्वीय साहाय्यक, उच्च श्रेणी लघुलेखक, वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता व सहा. सल्लागार तसेच मतिमंद बालगृह कर्मचारी, चालक व शिपाई यांना प्रशिक्षण दिले आहे. तसेच समाज कल्याण विभागाच्या आस्थापनेवरील गट अ, ब व क संवर्गातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या विभागीय परीक्षा प्रशिक्षण विभागामार्फत घेतल्या जातात.

- सन २०१२-२०१३ ते २०२२-२३ या १० वर्षांत एकूण १५२ उजळणी व पायाभूत कार्यशाळा घेण्यात आल्या असून, ७२३६ कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले आहे.
- सन २०१२-१३ ते २०२२-२३ या वर्षात समाज कल्याण आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील कनिष्ठ व वरिष्ठ लिपिक, गृहपाल समाज कल्याण निरीक्षक आणि वरिष्ठ समाज कल्याण निरीक्षक या पदांसाठी एकूण १,९४९ कर्मचाऱ्यांच्या १० खातेनिहाय परीक्षा घेण्यात आल्या आहेत.
- सन २०१४-१५ ते सन २०२२-२३ या कालावधीत बार्टी संस्थेमार्फत एकूण १९९ ट्रोसिटी प्रशिक्षण कार्यशाळा घेण्यात आल्या असून प्रशिक्षण कार्यशाळेतील एकूण प्रशिक्षणार्थी संख्या ३०७६१ इतकी आहे.

## कौशल्य विकास विभाग

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी, पुणे कौशल्य विभागामध्ये मा. नियामक मंडळाच्या ७ डिसेंबर २०१२ च्या निर्णयानुसार सन २०१३ पासून बार्टी, पुणे अंतर्गत कौशल्य शाखेमार्फत अनुसूचित जातीतील युवक-युवतींना रोजगाराभिमुख विविध प्रकारचे कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देण्यात येते. तसेच युवा उद्योजकांना प्रोत्साहन देण्याकरिता उद्योजकता विकासाचे प्रशिक्षण देण्यात येते.



कौशल्य विकास विभागामार्फत अनुसूचित जातीतील बेरोजगारांना कौशल्य विकासाच्या माध्यमातून रोजगारक्षम बनवण्यासाठी सन २०१२-२०१३ ते २०१९-२०२० पर्यंत १९०४२ अनुसूचित जातीतील उमेदवारांना प्रशिक्षण देण्यात आले. तसेच सन २०२१-२०२२ मध्ये कोविडच्या प्रादुर्भावामुळे बार्टी ऑनलाइन या युट्यूब चॅनलच्या माध्यमातून एम.पी.एस.सी., पोलीस भरती, उद्योजकता, ताणतणाव व्यवस्थापन इत्यादींवर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच सन २०२२-२०२३ मध्ये महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र यांच्यामार्फत उद्योजकता विकास प्रशिक्षण ३१८० प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देण्यात आले.

## कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम

- रोजगाराभिमुख कौशल्य विकास प्रशिक्षण (ग्रुप-१)
- बाध्य मनुष्यबळासाठी कौशल्य विकास प्रशिक्षण (ग्रुप-२)
- औद्योगिक क्लस्टरद्वारे कौशल्य विकास प्रशिक्षण.
- शासकीय प्रशिक्षण संस्थांद्वारे प्रशिक्षण.
- सीएसआर Corporate Social Responsibility अंतर्गत कौशल्य विकास.

## प्रशिक्षणाचे स्वरूप

ऑफलाइन, ऑनलाइन, निवासी, प्रशिक्षण अनिवासी, सॉफ्ट स्किल आदी कार्यक्रमांसह, जिल्हास्तरीय मेळावे असे स्वरूप आहे.

## सद्य:स्थितीत सुरू असलेले उपक्रम

**लर्नेट स्किल्स लिमिटेड :** पुणे, छत्रपती संभाजीनगर, रायगड, ठाणे, अंधेरी, कल्याण या ठिकाणी अनिवासी प्रशिक्षण - प्रस्तावित १००० प्रशिक्षणार्थी, सद्य:स्थितीत १९६ प्रशिक्षणार्थ्यांनी प्रशिक्षण घेतले आहे.

**इंडो-जर्मन टूल रूम, छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगर व पुणे, नागपूर, कोल्हापूर आणि वाळुज या ठिकाणी निवासी/अनिवासी प्रशिक्षण - प्रस्तावित ८५० प्रशिक्षणार्थी, सद्य:स्थितीत २८९ प्रशिक्षणार्थ्यांनी प्रशिक्षण घेत आहेत.

**टाटा स्ट्राईव्ह :** पुणे, नाशिक, नागपूर, ठाणे, मुंबई येथे मोफत अनिवासी प्रशिक्षण - १८०० प्रशिक्षणार्थी सद्य:स्थितीत २२८ प्रशिक्षणार्थ्यांनी प्रशिक्षण घेतले आहे.

**राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था :** तळेगाव दाभाडे येथे निवासी प्रशिक्षण, प्रस्तावित २०० प्रशिक्षणार्थी, सद्य:स्थितीत ८० प्रशिक्षणार्थ्यांनी प्रशिक्षण घेतले आहे.

**नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी छत्रपती संभाजीनगर :** प्रस्तावित ३००० प्रशिक्षणार्थी, सद्य:स्थितीत ६० प्रशिक्षणार्थींनी प्रशिक्षण घेत आहेत.

**महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळ :** मुंबई येथे मोफत अनिवासी प्रशिक्षण प्रस्तावित ५३८० प्रशिक्षणार्थी, सद्य:स्थितीत ७१३ प्रशिक्षणार्थींनी प्रशिक्षण घेतले आहे.

**आयसीआयसीआय स्किल ॲकॅडमी :** मुंबई, छत्रपती संभाजीनगर, धाराशिव (उस्मानाबाद) येथे मोफत अनिवासी प्रशिक्षण - १००० प्रशिक्षणार्थी, सद्य:स्थितीत ५५ प्रशिक्षणार्थींनी प्रशिक्षण घेतले आहे.

**सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी पार्क पुणे -** पुणे, सातारा येथे मोफत अनिवासी प्रशिक्षण-प्रस्तावित २४० प्रशिक्षणार्थी, सद्य:स्थितीत ६० प्रशिक्षणार्थींनी प्रशिक्षण घेत आहेत.

## नावीन्यपूर्ण योजना –
## बार्टी ओव्हरसीज प्लेसमेंट प्रोग्राम

परदेशातील अनेक देशांतील कुशल मनुष्यबळासाठी नियुक्त्यांच्या वाढत्या मागणीचा विचार करून बार्टी विविध देशांतील कुशल मनुष्यबळाच्या मागणीचे मूल्यांकन करून त्यांना योग्य कौशल्य प्रशिक्षण देऊन, कुशल मनुष्यबळाचा पाठपुरावा करून त्या देशांमधील मनुष्यबळाच्या मागणीची पूर्तता करण्याचा प्रयत्न करत आहे.

जीसीसीअंतर्गत संयुक्त अरब अमिराती सौदी अरेबिया, बहरिन, उमान, कुवेत आणि कतार इत्यादी देशांमध्ये बार्टीमार्फत रोजगारांच्या संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती विभाग

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आर्थिक, सामाजिक प्रतिकूल परिस्थितीवर मात करून उच्च शिक्षणासाठी सन १९१३ मध्ये कोलंबिया येथे प्रस्थान केले होते. या ऐतिहासिक घटनेच्या स्मरणार्थ बार्टीमार्फत सन २०१३ पासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती सुरू करण्यात आली. त्याअंतर्गत महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीतील एम.फिल. व पीएच.डी करणाऱ्या विद्यार्थ्यांना संशोधनाकरिता प्रोत्साहन व आर्थिक साहाय्याच्या स्वरूपात अधिछात्रवृत्तीचा लाभ देण्यात येतो.

सन २०१२ ते २०२१ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृतींतर्गत एकूण लाभार्थी संख्या २२०८ त्यापैकी एम.फिल; तसेच पीएच. डी. अभ्यासक्रमांचा कालावधी पूर्ण झालेल्या एकूण १०३५ विद्यार्थ्यांपैकी ५९८ (५७.७७%) विद्यार्थ्यांनी यशस्वीरीत्या त्यांचे संशोधन शोध प्रबंध सादर केले आहेत.

## योजना विभाग

यु.पी.एस.सी., एम.पी.एस.सी., पोलीस व मिलिटरी, बँक, रेल्वे, एल.आय.सी. इत्यादी तत्सम पदाच्या परीक्षेकरिता पात्र उमेदवारांना मोफत (निवासी व अनिवासी) प्रशिक्षण देण्यात येते. कोविड-१९ प्रादुर्भावाच्या कालावधीतही बार्टी संस्थेमार्फत ऑनलाइन पद्धतीने प्रशिक्षण देऊन ही योजना अखंड सुरू ठेवली.

एम.पी.एस.सी. मुख्य परीक्षा व मुलाखत चाचणीकरिता आर्थिक साहाय्य योजना, महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीमधील आर्थिक

**बार्टींतर्गत योजना विभागामार्फत खालीलप्रमाणे योजना राबवण्यात येत आहेत.**

| अ.क्र. | योजना | वर्षे | लाभार्थी संख्या |
|---|---|---|---|
| १ | बँक, रेल्वे इत्यादी परीक्षांचे अनिवासी पूर्व प्रशिक्षण | २०११ ते २०२३ | ३४६५० |
| २ | आयबीपीएस - निवासी प्रशिक्षण मातंग समाजाकरिता | २०१३ ते २०१३ | १७५० |
| | | | |
| ३ | एम.पी.एस.सी. राज्यसेवा पूर्व प्रशिक्षण | २०१९ ते २०२३ | १९५० |
| ४ | यु.पी.एस.सी. पूर्व प्रशिक्षण | २००७ ते २०२३ | १८४७ |
| ५ | यु.पी.एस.सी. नागरी सेवा मुख्य परीक्षा आर्थिक साहाय्य | २०१६ ते २०२३ | १०३२ |
| ६ | यु.पी.एस.सी. वनसेवा मुख्य परीक्षा आर्थिक साहाय्य | २०२३ | २८ |
| ७ | यु.पी.एस.सी. अभियांत्रिकी मुख्य परीक्षा आर्थिक साहाय्य | २०२२ | १० |
| ८ | यु.पी.एस.सी. नागरी सेवा व्यक्तिमत्त्व चाचणी मख्य आर्थिक साहाय्य | २०१४ ते २०२२ | २७१ |
| ९ | यु.पी.एस.सी. वनसेवा व्यक्तिमत्त्व चाचणी | २०२१ ते २०२२ | ८ |
| १० | यु.पी.एस.सी. अभियांत्रिकी व्यक्तिमत्त्व चाचणी | २०२३ | ५ |

दुर्बल घटकातील गुणवत्ताधारक १४०० विद्यार्थ्यांना जेईई व नीट परीक्षांचे निशुल्क प्रशिक्षण नागपूर, लातूर, येथे सुरू असून, पुणे मुंबई व छत्रपती संभाजीनगर येथे सुरू होत आहे.

लवकरच जर्मन, जापानीज, फ्रेंच, रशियन व स्पॅनिश भाषेचे प्रशिक्षण सुरू करण्यात येत आहे. ज्यामुळे परदेशी जाणाऱ्या विद्यार्थ्यांना त्या देशात गेल्यानंतर भाषेची अडचण येणार नाही. तसेच परदेशी विद्यापीठात प्रवेश घेताना व परदेशात नोकरी करताना या योजनेचा लाभ विद्यार्थ्यांना होणार आहे. तसेच एन.डी.ए. प्रशिक्षण वर्ग प्रस्तावित आहे.

अनुसूचित जातीच्या वस्त्यांवर प्रत्यक्षात भेट देऊन माहिती देण्याचे काम समतादूत यांच्यामार्फत केले जाते.

## प्रकाशन व प्रसिद्धी विभाग

प्रकाशन व प्रसिद्धी विभागामार्फत सामाजिक विषयाशी निगडित विविध पुस्तकांची खरेदी करून ती सवलतीच्या दरात जनतेस उपलब्ध करून देण्यात येते. येत्या काही महिन्यांतच महाराष्ट्र शासनाच्या साहित्य संस्कृती मंडळ, भाषा संचालनालय उच्च व तंत्रशिक्षण विभाग, विश्वकोष मंडळ व काही महत्त्वाची पुस्तके

## जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी विभाग

जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे, मुख्य समन्वयक म्हणून महासंचालक बार्टी आहेत. महाराष्ट्र राज्यातील ३६ जिल्हा जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी समित्यांची प्रक्रिया १ ऑगस्ट २०२० पासून संपूर्णपणे ऑनलाइन करण्यात आली आहे.

अर्जदारांना अर्ज डाऊनलोड करणे, अर्ज ट्रॅक करणे, त्रुटींची ऑनलाइन पूर्तता करणे, अर्जदारास डिजिटल स्वाक्षरीचे वैधता प्रमाणपत्र ई-मेलद्वारे उपलब्ध करून देण्याची सुविधा सुरू करण्यात आली आहे. अर्जदारांना येणाऱ्या अडचणी / मार्गदर्शन यासाठी हेल्प डेस्क सुविधा सुरू केली आहे. सर्व समित्यांमार्फत प्राप्त प्रकरणांवर नियमानुसार गुणवत्तेवर निर्णय देऊन जास्तीत जास्त जात वैधता प्रमाणपत्रे निर्गमित करण्याबाबतची वेळोवेळी मोहीम राबवण्यात येत आहे. तसेच सर्व जिल्ह्यांमध्ये महसूल विभाग व शिक्षण विभागाच्या सहकार्याने शालेय स्तरावरील विद्यार्थ्यांना जात प्रमाणपत्राचे वाटप करण्याबाबतची मोहीम सुरू आहे. अर्जदारास डिजिटल स्वाक्षरीतील वैधता प्रमाणपत्र ई-मेलद्वारे प्राप्त होण्याची सुविधा सुरू करण्यात आली आहे.



**बार्टीमार्फत आयोजित संघ लोकसेवा आयोग -** नागरी सेवा प्रशिक्षण अंतर्गत सन २०२३ -२४ मध्ये संघ लोकसेवा आयोगाकडून घेतल्या जाणाऱ्या - नागरी सेवा या परीक्षेत बार्टी या संस्थेतील एकूण १६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत, याकरिता बार्टीमार्फत विद्यार्थ्यांना मुख्य परीक्षा व मुलाखत चाचणी परीक्षेकरिता पात्र झालेल्या उमेदवारांना आर्थिक साहाय्य दिले जाते. तसेच या १६ विद्यार्थ्यांची निवड झाली असून विद्यार्थ्यांना उत्कृष्ट रँक मिळाला आहे.

## समतादूत विभाग

समतादूत विभागामार्फत संपूर्ण महाराष्ट्रात तालुकास्तरावर समतादूत नेमण्यात आलेले आहेत. समतादूत हे बार्टी व सामाजिक न्याय विभागाच्या विविध योजना समाजामध्ये पोहोचवण्याचे काम करतात. सामाजिक सलोखा, बंधुभाव निर्माण करण्यासाठी समतादूत अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतात. तसेच समतादूतामार्फत अनुसूचित जाती व वंचित/दुर्बल घटकांतील युवक-युवतींचा आर्थिक, सामाजिक व वैचारिक विकास साधून आदर्श नागरिक घडवणे, याकरिता स्वयंसहायता, युवागट अंतर्गत युवक-युवतींना स्व:विकास व समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी उद्योग व्यवसाय सुरू करण्याकरिता रोजगाराभिमुख प्रशिक्षण दिले जातात. तसेच सामाजिक न्याय विभागाच्या कार्यान्वित योजनांची माहिती प्रत्यक्षात

खासगी प्रकाशकांकडून खरेदी करण्यात येणार आहे.

भारतीय संविधान या ग्रंथास मोठी मागणी आहे. विविध संस्था, शाळा, कॉलेज, लोकप्रतिनिधी व सामान्य नागरिक यांच्याकडून विशेष मागणी होत असते. दिवसेंदिवस मागणी वाढत आहे. हा पुरवठा मागणीनुसार होण्यासाठी व येणाऱ्या प्रत्येक नागरिकास संविधान देता येईल. त्यामुळे प्रत्येक घरात संविधान ही मोहीम राबवण्यासाठी बार्टीमार्फत संविधान कक्ष निर्माण करण्यात आला.

## ग्रंथालय

संस्थेमार्फत सामाजिक समतेच्या तत्त्वाचा प्रचार व प्रसार; तसेच सामाजिक क्षेत्रात मूलभूत संशोधन व्हावे असे अपेक्षित आहे. बार्टी मुख्यालयात, पुणे या ठिकाणी सुसज्ज व वाचन साहित्याने समृद्ध अशा ग्रंथालय व अभ्यासिकेची निर्मिती करण्यात आली आहे. बार्टी कार्यालयाच्या मुख्य कार्यालयात सुसज्ज, अत्याधुनिक वातानुकूलित ग्रंथालय आहे. ग्रंथालयात १०,००० ग्रंथाचा संग्रह आहे. वातानुकूलित ग्रंथालयात स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता व्यवस्था करण्यात आली आहे. ग्रंथालयात १४,९८८ ग्रंथांचा संग्रह आहे.

(अतिरिक्त जिल्हाधिकारी तथा विभागप्रमुख, बार्टी)

# राजर्षी शाहू महाराज यांचा जीवनपट

- **२६ जून १८७४ :** कोल्हापूर येथील लक्ष्मी-विलास पॅलेस (कसबा बावडा ता. करवीर) येथे जयसिंगराव घाटगे आणि राधाबाई घाटगे यांच्या पोटी यशवंतराव उर्फ बाबासाहेब (राजर्षी शाहू छत्रपती) यांचा जन्म झाला.
- **१८७७ :** राजर्षी शाहू छत्रपतींची जन्मदाती आई राधाबाईसाहेब यांचा मृत्यू.
- **मार्च १८८२ :** जयसिंगराव उर्फ आबासाहेब घाटगे यांना कोल्हापूर संस्थानचे रिजन्सी पदाचे अधिकार मिळाले.
- **२५ डिसेंबर १८८३ :** शाहू छत्रपतींचे दत्तक वडील, चौथे छत्रपती शिवाजी महाराज यांचा अहमदनगर येथील किल्ल्यामध्ये कैदेत असताना मृत्यू.
- **१७ मार्च १८८४ :** जयसिंगराव उर्फ आबासाहेब घाटगे यांचे थोरले पुत्र यशवंतराव ऊर्फ बाबासाहेब यांना कोल्हापूरच्या छत्रपती घराण्यात चौथ्या शिवाजी महाराजांच्या पत्नी आनंदीबाई राणीसाहेब यांना दत्तक देण्यात आले.
- **१२ ऑगस्ट १८८४ :** मि. फिटझिराल्ड यांची शाहू छत्रपतींचे पालक आणि प्रमुख राजनैतिक प्रतिनिधीला साहाय्यक म्हणून नेमणूक.
- **जानेवारी १८८६ :** राजकोट येथील राजकुमार कॉलेजमध्ये शाहू छत्रपती यांचा शिक्षणासाठी प्रवेश.
- **२० मार्च १८८६ :** शाहू छत्रपतींचे जनक वडील (कोल्हापूरचे राजनैतिक अधिकारी) जयसिंगराव उर्फ आबासाहेब घाटगे यांचे वयाच्या ३० व्या वर्षी निधन.
- **१८८८ :** कोल्हापूर-मिरज रेल्वे मार्गाची शाहू छत्रपतींच्या हस्ते पायाभरणी.
- **१८८९ एप्रिल :** शाहू छत्रपती आणि त्यांचे सांगाती राजकोटहून शिक्षण घेऊन कोल्हापुरात परत.
- **२२ मे १८८९ :** स्टुअर्ट मिडफोर्ड फ्रेझर यांची शाहू छत्रपती, (कागल संस्थान) बापूसाहेब महाराज, कुँवरसाहेब (भाऊसिंगजी महाराज भावनगरचे) यांचे पालक आणि शिक्षक म्हणून नेमणूक.
- **१८८९ जून :** धारवाड येथे शाहू छत्रपती आणि त्यांचे सांगाती यांच्या शिक्षणास गुरुवर्य फ्रेझर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रारंभ.
- **१६ नोव्हेंबर १८९० :** गुरुवर्य फ्रेझर यांच्या मार्गदर्शनाखाली उत्तर हिंदुस्थानचा अभ्यासदौरा.
- **१ एप्रिल १८९१ :** शाहू यांचा बडोद्याचे गुणाजीराव खानविलकर यांची कन्या लक्ष्मीबाई यांच्याशी विवाह.
- **५ नोव्हेंबर :** गुरुवर्य फ्रेझर यांच्याबरोबर शाहू छत्रपती आणि त्यांचे सहाध्यायी यांचा दक्षिण हिंदुस्थान दौरा.
- **२८ ऑक्टोबर १८९२ :** शाहू छत्रपती आणि त्यांचे सहाध्यायी यांची गुरुवर्य फ्रेझर यांच्यासह उत्तर हिंदुस्थानचा दुसरा दौरा.
- **जानेवारी १८९३ :** धारवाडहून शिक्षण संपवून राजर्षी शाहू छत्रपती कोल्हापुरात परत आले.
- **३ एप्रिल १८९३ :** राजाराम हायस्कूलच्या वार्षिक बक्षीस समारंभाचे अध्यक्ष म्हणून पहिले सार्वजनिक भाषण.
- **१ जुलै १८९३ :** कर्नल सी. वुडहाऊस कोल्हापूरचे ब्रिटिश राजनैतिक प्रतिनिधी यांचे मुंबईच्या राजकीय विभागाच्या सचिवांना पत्र. या पत्रात शाहू छत्रपतींना कोल्हापूर संस्थानचे पूर्ण अधिकार देण्याची आणि त्यादृष्टीने शिक्षण देण्याची मागणी.
- **नोव्हेंबर १८९३ :** शाहू छत्रपतींनी गुरुवर्य फ्रेझर, रघुनाथ सबनीस आणि बापूसाहेब महाराज यांच्यासह करवीरचे छत्रपती या नात्याने राज्यकारभारास सुरुवात करण्यापूर्वी कोल्हापूर संस्थानातील हातकणंगले, इचलकरंजी, शिरोळ, कुरुंदवाड, निपाणी, गडहिंग्लज, आजरा, गारगोटी, दाजिपूर, धनगरमाळ, आंबोली, मलकापूर इ. अनेक गावांना भेटी देऊन तेथील प्रजेच्या सर्वांगीण परिस्थितीचे अवलोकन केले.
- **१० मार्च १८९४ :** शाहू छत्रपतींचे पहिले अपत्य कन्या राधाबाई उर्फ आक्कासाहेब यांचा जन्म.
- **२ एप्रिल १८९४ :** शाहू छत्रपतींनी जुना राजवाडा येथे राज्य कारभाराची पूर्ण सूत्रे हाती घेऊन पहिला लोककल्याणकारी जाहीरनामा प्रसिद्ध केला.
- **२ एप्रिल १८९४ :** शाहू छत्रपतींनी पेशवाईत बंद पडलेले शिवशक नव्याने चालू केले,
- **३ एप्रिल १८९४ :** कोल्हापूर इलाखा आणि कोल्हापूर नगरपालिकेने शनिवार वेशीजवळ खास शामियाना उभारून शाहू छत्रपतींच्या सन्मानार्थ मानपत्र अर्पण केले.
- **१४ एप्रिल १८९४ :** रघुनाथ व्यंकाजी सबनीस यांची श्रीमान महाराज शाहू छत्रपती सरकार करवीर यांच्या हुजूर कचेरीत हुजूर चिटणीस म्हणून नेमणूक करण्यात आली.
- **१४ एप्रिल १८९४ :** शाहू छत्रपती आणि इतर सरकारी अधिकारी यांनी शिकारीसाठी फिरत असताना पाळावयाचे नियम, या संदर्भातील जनहिताचा पहिला जाहीरनामा प्रसिद्ध.
- **१० ऑगस्ट १८९४ :** शाहू छत्रपतींच्या हस्ते कागल जहागिरीची सूत्रे बंधू बापूसाहेब महाराज यांना बहाल करण्यात आली.
- **१७ सप्टेंबर १८९४ :** पुण्यातील जनतेच्या वतीने हिराबाग टाऊन हॉल या ठिकाणी सार्वजनिक सभेमार्फत शाहू छत्रपतींना मानपत्र. त्या सभेत त्या मानपत्राचे वाचन तत्कालीन नेते गोपालकृष्ण गोखले यांनी केले.
- **जानेवारी १८९५:** भागाची पाहणी करण्याकरिता शाहू छत्रपतींची शिरोळला भेट.
- **मार्च १८९५ :** शाहू छत्रपतींची पन्हाळा पेट्याच्या पाहणीसाठी भेट.
- **२७ मार्च १८९५ :** फर्ग्युसन कॉलेजच्या इमारतीचे उद्घाटन करण्यासाठी पुण्यास भेट.
- **३१ मे १८९५ :** शाहू छत्रपतींना त्यांच्या संस्थानातील गुन्हेगारांना फाशी देण्याचा अधिकार परत करण्यात आला.
- **१ जून १८९५ :** भास्करराव विठोबा जाधव यांची 'प्रोबेशनरी असिस्टंट सरसुभे' म्हणून नेमणूक करण्यात आली.

- **२६ ऑगस्ट १८९५ :** शिवछत्रपतींच्या समाधीची दुरुस्ती शाहू छत्रपतींनी करावी म्हणून पुण्यातील प्रमुख प्रतिष्ठित व्यक्तींचे एक शिष्टमंडळ त्यांना भेटले.
- **१ सप्टेंबर १८९५ :** रखमाबाई केळवकर यांची 'लेडी सुपरिटेंडेंट ऑफ दि विमेन्स स्कूल' म्हणून कोल्हापूर संस्थानातील मुलींच्या शाळेवर देखरेख करण्यासाठी नेमणूक.
- **१८ सप्टेंबर १८९५ :** पुणे येथे मुंबईचे गव्हर्नर लॉर्ड सॅण्डहर्स्ट यांच्या हस्ते शाहू छत्रपतींना जी.सी.एस.आय. हे सन्मानचिन्ह प्रदान.
- **नोव्हेंबर १८९५ :** शाहू छत्रपती हे शिवाजी निधी समितीचे अध्यक्ष झाले.
- **१ ते ४ फेब्रुवारी १८९६ :** चिंचली येथे घोडे आणि जनावरांच्या प्रदर्शनाला शाहू छत्रपतींची भेट.
- **१५ फेब्रुवारी १८९६ :** कोल्हापुरातील रेल्वे स्थानकानजीकच्या जागेवर रहिवासी आणि व्यापारी यांच्यासाठी मोकळ्या जागा देण्यास आरंभ. (याच वसाहतीचे नंतर 'शाहूपुरी' असे नामकरण करण्यात आले.)
- **२६ मार्च १८९६ :** जे.डब्ल्यू. रे यांची कोल्हापूरचे राजनैतिक प्रतिनिधी म्हणून नेमणूक.
- **सप्टेंबर १८९६ :** कोल्हापूर संस्थानचे कार्यकारी अभियंता म्हणून दाजीराव अमृतराव विचारे यांची नेमणूक.
- **१५ ऑक्टोबर १८९६ :** शाहू छत्रपतींनी अहिल्याबाई राणीसाहेबांच्या स्मरणार्थ देशी दवाखाना सुरू केला.
- **जानेवारी १८९७ :** भुदरगड (गारगोटी) व पन्हाळा पेटा दुष्काळग्रस्त भागांना भेटी.
- **२० फेब्रुवारी १८९७ :** कोल्हापुरातील प्लेगच्या साथीबाबत जाहीर निवेदन.
- **२२ जून १८९७ :** व्हिक्टोरिया डायमंड ज्युबिली लेपर असायलम या महारोग्यांसाठी बांधावयाच्या इमारतीची पायाभरणी.
- **३१ जुलै १८९७ :** पहिले सुपुत्र राजाराम महाराज यांचा जन्म.
- **२३ ऑक्टोबर १८९७ :** कोल्हापुरातील प्लेगच्या साथीबाबत जाहीर निवेदन.
- **१ सप्टेंबर १८९८ :** कोल्हापूर संस्थानचे दिवाण म्हणून रघुनाथ व्यंकाजी सबनीस यांची नेमणूक.
- **९ डिसेंबर १८९८ :** प्लेगच्या साथीबाबत उपाययोजनेसंबंधीचा सविस्तर जाहीरनामा प्रसिद्ध.
- **१५ एप्रिल १८९९ :** दुसरे पुत्र प्रिन्स शिवाजी महाराज यांचा जन्म.
- **५ ऑगस्ट १८९९ :** पोलिटिकल एजंट कर्नल रे यांच्याबाबतचा तथाकथित विषप्रयोग. शाहू महाराजांना या प्रकरणात गोवण्याचा प्रयत्न.
- **ऑक्टोबर १८९९ :** पंचगंगेच्या घाटावर कार्तिक महिन्यातील पवित्र स्नान करण्यास शाहू महाराज गेले असताना भटजीचे बेमुर्वतखोर वर्तन -प्रसिद्ध वेदोक्त प्रकरणास प्रारंभ.
- **१३ जानेवारी १९०० :** कोल्हापूर संस्थानात गोवधबंदी कायदा लागू.
- **२० जानेवारी १९०० :** दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या जनावरांसाठी छावणी.
- **२४ मे १९०० :** इंग्लंडची महाराणी व्हिक्टोरिया हिने आपल्या वाढदिवसानिमित्त शाहू छत्रपतींना 'महाराजा' ही पदवी बहाल केली.
- **५ जून १९०० :** रस्त्याच्या कडेस असणाऱ्या सरकारी वृक्षांची जोपासना करणारा कायदा.
- **१२ जून १९०० :** लाकडी वजने बंद करून लोखंडी काटे व वजन मापे वापरण्याचा जाहीरनामा.
- **१ मार्च १९०१ :** कोल्हापूर संस्थानची जनगणना.
- **१८ एप्रिल १९०१ :** 'व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग हाऊस'चे उद्घाटन.
- **एप्रिल १९०१ :** दिगंबर जैन बोर्डिंगची सुरुवात.
- **३१ मे १९०१ :** मराठा एज्युकेशन सोसायटीची स्थापना.
- **१८ ऑगस्ट १९०१ :** बाळ गंगाधर टिळक यांनी शाहू महाराजांची कोल्हापूर येथे भेट घेतली.
- **सप्टेंबर १९०१ :** मुंबई येथील ताडदेव या ठिकाणी असणाऱ्या जैन विद्यार्थी वसतिगृहास राजर्षी शाहू छत्रपतींची भेट.
- **७ ऑक्टोबर १९०१ :** राजवाड्यातील सर्व धार्मिक विधी वेदोक्त पद्धतीने करण्यास राजपुरोहित नारायण राजोपाध्ये यांना समज देणारे शाहू छत्रपतींचे पहिले पत्र.
- **८ नोव्हेंबर १९०१ :** धार्मिक विधी वेदोक्त पद्धतीने करण्यास राजपुरोहित नारायण राजोपाध्ये यांना समज देणारे शाहू छत्रपतींचे दुसरे पत्र.
- **२३ जानेवारी १९०२ :** कोल्हापूर संस्थानातील शेतजमिनींना पाणीपुरवठा करण्याच्या हेतूने सर्वेक्षण करण्याचा आदेश.
- **जानेवारी १९०२ :** अल्बर्ट एडवर्ड मेमोरिअल हॉस्पिटलमध्ये डॉ. कृष्णाबाई केळवकर यांची नेमणूक.
- **३ फेब्रुवारी १९०२ :** पाणीपुरवठा अधिकारी म्हणून शंकर सीताराम गुप्ते यांची नेमणूक आणि दुष्काळग्रस्त भागातील शेतजमिनींना करावयाच्या पाणीपुरवठ्याबाबत सर्वेक्षण करण्याचा आदेश.
- **१ मे १९०२ :** राजपुरोहित राजोपाध्ये यांना वेदोक्त विधीबाबत समज देणारे तिसरे पत्र.
- **५ मे १९०२ :** राजपुरोहित राजोपाध्ये यांचे शाहू छत्रपतींच्या पत्रांना उत्तर.
- **६ मे १९०२ :** राजपुरोहित नारायण राजोपाध्ये यांना बडतर्फ केले व त्यांच्या इनामी जमिनी जप्त करून त्यांचे इतर अधिकारही काढून घेण्यात आले.
- **११ मे १९०२ :** मिरज येथे शाहू छत्रपतींना दक्षिणेतील मराठा संस्थानिकांकडून मानपत्र अर्पण.
- **१४ मे १९०२ :** सातवे एडवर्ड यांच्या राज्याभिषेक समारंभाला हजर राहण्यासाठी महाराजांचे कोल्हापुरातून इंग्लंडला प्रस्थान.
- **१० जून १९०२ :** केंब्रिज विद्यापीठाकडून शाहू छत्रपतींना एल.एल.डी. ही सन्माननीय पदवी बहाल.
- **११ जुलै १९०२ :** रॉयल कोलोनियल इन्स्टिट्यूट, लंडन येथे राज्याभिषेकानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या मेजवानीत भारतीय संस्थानिकांच्या वतीने शाहू छत्रपतींचे भाषण.
- **२६ जुलै १९०२ :** कोल्हापूर संस्थानातील मागासलेल्या जाति-जमातींसाठी संस्थानच्या नोकरीत ५० टक्के जागा राखीव ठेवण्याचा जाहीरनामा प्रसिद्ध.
- **२८ जुलै १९०२ :** जप्त केलेले इनाम परत मिळावे म्हणून राजपुरोहित नारायण राजोपाध्ये यांचे विनंतीपत्र.
- **१ सप्टेंबर १९०२ :** मागासवर्गीयांसाठी ५० टक्के राखीव जागा

ठेवण्याच्या जाहीरनाम्यासाठी हातकणंगले नगरपालिकेकडून शाहू छत्रपतींचा सत्कार.

- **१० सप्टेंबर १९०२ :** वतन व जप्तीसंबंधी फेरविचार करण्यासाठी राजपुरोहित नारायण राजोपाध्य यांनी पाठवलेल्या विनंतीपत्रास नकार.
- **१४ सप्टेंबर :** शाहू छत्रपतींची दत्तक आई आनंदीबाई राणीसाहेब यांचे निधन आणि त्याच रात्री जुन्या राजवाड्याला आग.
- **जानेवारी १९०३ :** शाहू छत्रपतींची कन्या आक्कासाहेबमहाराज आणि देवासचे राजे तुकोजीराव पवार यांचा विवाह ठरला.
- **१ जानेवारी १९०३ :** दिल्लीतील राज्यारोहण समारंभास हजर.
- **३ जानेवारी १९०३ :** 'नाईट ग्रँड कमांडर ऑफ द स्टार ऑफ इंडिया' ही मानाची पदवी शाहू छत्रपतींना मिळाली.
- **९ जानेवारी १९०३ :** शाहू छत्रपतींना ड्युक ऑफ कॅनॉट यांच्या हस्ते जी.सी.व्ही.ओ. (ग्रँड क्रॉस ऑफ दि व्हिक्टोरिअन ऑर्डर) ही पदवी बहाल.
- **९ जानेवारी १९०३ :** जप्त केलेले वतन आणि काढून घेण्यात आलेले अधिकार परत मिळण्याबाबत राजपुरोहित नारायण राजोपाध्ये यांचा कोल्हापूरच्या ब्रिटिश राजनैतिक प्रतिनिधीला अर्ज.
- **१९ फेब्रुवारी १९०३ :** ब्रिटिश राजनैतिक प्रतिनिधी फेरीस यांनी राजपुरोहित नारायण राजोपाध्ये यांचा वतनजप्ती प्रकरणाच्या फेरविचाराचा अर्ज फेटाळला.
- **१ एप्रिल १९०३ :** कोल्हापूर नगरपालिकेतील गंभीर गैरकारभार नष्ट करण्यासाठी प्रमुख प्रशासक म्हणून भास्करराव जाधव यांची खास नेमणूक.
- **२३ मे १९०३ :** मुंबईचे राज्यपाल लॉर्ड नॉर्थकोट यांना राजपुरोहित राजोपाध्ये यांनी वेदोक्त प्रकरणासंबंधी सविस्तर अर्ज दिले.
- **१५ ऑगस्ट १९०३ :** जैन विद्यार्थी वसतिगृहाच्या इमारतीची शाहू छत्रपतींच्या हस्ते पायाभरणी.
- **१६ ऑक्टोबर १९०३ :** मुंबईच्या राज्यपालांनी राजपुरोहित नारायण राजोपाध्ये यांचा अर्ज फेटाळला.
- **२२ ऑगस्ट १९०४ :** सत्य उर्फ तात्या शिंदे या दरोडेखोराला फाशी दिली.
- **२० सप्टेंबर १९०४ :** कोल्हापूर नगरपालिकेच्या नवीन बाजारस्थळाला ले. कर्नल फेरीस यांचे नाव दिले.
- **जानेवारी १९०५ :** शाहू छत्रपतींचे धाकटे बंधू पिराजीराव उर्फ बापूसाहेब महाराज (कागल) यांना सी.आय.इ. किताब आणि दिवाण रघुनाथ व्यं. सबनीस यांना रावबहादूर किताब जाहीर.
- **जानेवारी १९०५:** माहुआ येथे बांधलेल्या नवीन राजवाड्याचे उद्घाटन शाहू छत्रपतींनी केले. त्या राजवाड्याचे 'शाहू पॅलेस' असे नामकरण करण्यात आले होते.
- **५ जानेवारी १९०५ :** लॉर्ड कर्झन महाराज्यपाल, भारत सरकार यांच्याकडे राजपुरोहित राजोपाध्ये यांनी वेदोक्त प्रकरणासंबंधी मुंबई सरकारने दिलेल्या निर्णयासंबंधी दाद मागितली.
- **१८ जानेवारी १९०५ :** शाहू छत्रपतींचे साताऱ्याचे राजे आण्णासाहेब भोसले यांना कोणत्याही प्रकारची मदत करण्याची हमी दिली. यासंबंधी लिहिलेले कळकळीचे पत्र.
- **फेब्रुवारी १९०५ :** चिंचलीच्या जत्रेत शाहू छत्रपती घोड्यावरून पडून जखमी.
- **३१ मार्च १९०५ :** संस्थानामधील नोकरवर्गास त्यांचे निवृत्तिवेतन निवृत्त होताच ताबडतोब मिळण्यासंबंधीचा जाहीरनामा.
- **१० एप्रिल १९०५ :** लॉर्ड कर्झन महाराज्यपाल भारत सरकार यांच्याकडे राजपुरोहित राजोपाध्ये यांचा वेदोक्त प्रकरणासंबंधी पुन्हा दाद मागणारा पुरवणी अर्ज.
- **९ मे १९०५ :** राजपुरोहित राजोपाध्ये यांचा फेर दाद मागणारा अर्ज भारत सरकारने फेटाळला.
- **१७ मे १९०५ :** शाहू छत्रपतींच्या हस्ते शिरोळ स्टेशन रोड येथील सूतगिरणीचे उद्घाटन. नृसिंहवाडी येथे एक धर्मशाळा उघडली.
- **२६ जून १९०५ :** श्रीमंत बापूसाहेब महाराज (कागल) यांना सी.आय.इ. ही पदवी आणि दिवाण रघुनाथराव सबनीस यांना रावबहादूर ही पदवी देण्यासाठी ले. कर्नल फेरिस यांनी कोल्हापूर येथे दरबार भरवला.
- **१० जुलै १९०५ :** करवीरपीठाचे जगद्‌गुरू शंकराचार्य यांनी शाहू छत्रपती आणि त्यांच्या परिवाराचे वेदोक्ताचे धार्मिक अधिकार मान्य केले.
- **९ ऑगस्ट १९०५ :** शाहू छत्रपतींच्या हस्ते दिगंबर जैन बोर्डिंगचे उद्घाटन.
- **१९ ऑक्टोबर १९०५ :** कोल्हापूर येथे 'शाहू छत्रपती मिल' या नावाने सुरू होणाऱ्या स्पिनिंग आणि विव्हिंग मिलला मान्यता.
- **२० डिसेंबर १९०५ :** कोल्हापुरातील २२० हून अधिक ब्रह्मवृंदाकडून एका जाहीर सभेत शाहू छत्रपती आणि त्यांच्या परिवाराचे वेदोक्त धर्माधिकार लेखी स्वरूपात मान्य करण्यात आले.
- **१ एप्रिल १९०६ :** राज्यात लागण झालेल्या कॉलरा निवारण उपाय म्हणून नदीचे पाणी इंजिनने काहिलीत घेऊन लोकांना वाटप करण्याचा हुकूम.
- **१५ नोव्हेंबर १९०६ :** दि किंग एडवर्ड मोहमेडन एज्युकेशन सोसायटीची स्थापना.
- **डिसेंबर १९०६ :** मराठा समाजातील पहिले शिवचरित्रकार कृष्णाजी अर्जुन केळुसकर यांना शिवचरित्र लिहिण्यासाठी २,००० रुपयांची मदत.
- **फेब्रुवारी १९०७ :** जगप्रसिद्ध इंजिनीयर सर विश्वेश्वरय्या यांची कोल्हापूर संस्थानला भेट.
- **१ मार्च १९०७ :** डेक्कन एज्युकेशन सोसायटी आणि फर्ग्युसन कॉलेजला मदत करण्याचे सर्व संस्थानिकांना आवाहन.
- **१३ मार्च १९०७ :** प्रा. आण्णासाहेब लठ्ठे यांची इंग्रजीचे व्याख्याते म्हणून राजाराम कॉलेजमध्ये नेमणूक.
- **सप्टेंबर १९०७ :** शाहू छत्रपतींनी प्लेगची लस स्वतः टोचून घेतली.
- **२५ फेब्रुवारी १९०८ :** कोल्हापूर आणि दक्षिण मराठा संस्थान यांचे रेसिडेंट आणि राजनैतिक प्रतिनिधी म्हणून मेजर एफ. डब्ल्यू. वुडहाऊस यांची नेमणूक.
- **२१ मार्च १९०८ :** देवासचे तुकोजीराव महाराज आणि शाहू छत्रपतींची कन्या राधाबाई उर्फ आक्कासाहेब महाराज यांचा विवाह संपन्न. त्यानिमित्त भवानी मंडपाची उभारणी. या विवाहानिमित्त अनेक कैद्यांना मुक्त केले.

- **मार्च १९०८ :** 'राधानगरी' या नवीन शहराच्या निर्मितीस प्रारंभ.
- **१४ एप्रिल १९०८ :** 'मिस क्लार्क' या मागासलेल्या जातीच्या विद्यार्थ्यांसाठी सुरू केलेल्या वसतिगृहाचे उद्घाटन.
- **मे १९०८ :** बंगालचे प्रसिद्ध क्रांतिकारक अरविंद घोष यांना ५,००० रुपयांची मदत.
- **२५ जून १९०८ :** धार्मिक दहशतवाद्यांचा शाहू छत्रपतींना बॉम्बस्फोट घडवून ठार मारण्याचा अयशस्वी प्रयत्न.
- **२३ जुलै १९०८ :** लोकमान्य टिळकांना ६ वर्षांची शिक्षा जाहीर होताच कोल्हापूर बंद ठेवण्यात आले.
- **१ जानेवारी १९०९ :** शाहू छत्रपतींची १९ तोफांची मानवंदना २१ तोफांची झाली.
- **९ जानेवारी १९०९ :** रायबाग येथे श्री शाहू विव्हर्स असोसिएशनची स्थापना.
- **मे १९०९ :** बडोद्याचे सजायीराव गायकवाड यांची कोल्हापूर भेट. त्यांनी राधानगरी धरण योजना प्रत्यक्ष स्थळावर जाऊन पाहिली.
- **४ एप्रिल १९१० :** शाहू छत्रपतींची कन्या आक्कासाहेब महाराज यांना पुत्रलाभ. त्यांचे नाव विक्रमसिंह ठेवण्यात आले. तेच पुढे करवीरच्या गादीवर शहाजीराजे म्हणून दत्तक आले.
- **२९ जून १९१० :** दहशतवादी दामू जोशी याला ७ वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा व ५०० रुपये दंड.
- **११ जानेवारी १९१० :** कोल्हापुरात सत्यशोधक समाजाची स्थापना.
- **२ एप्रिल १९१० :** नामदेव बोर्डिंगचा आरंभ.
- **१ सप्टेंबर १९१० :** मुलीचा मुलगा दत्तक घेण्यास हिंदूंना परवानगी देणारा हुकूम.
- **१२ डिसेंबर १९१० :** 'पाटील शाळा' सुरू करण्याचा संकल्प.
- **९ फेब्रुवारी १९१२ :** 'कराड' येथील आगपेटीच्या देशी उद्योगास प्रोत्साहन.
- **१ मे १९१२ :** संस्थानचे प्रमुख न्यायाधीश म्हणून व्ही. बी. गोखले यांची नेमणूक.
- **१५ मे १९१२ :** पाटील शाळा सुरू.
- **१ जून १९१२ :** कोल्हापूर नगरीस स्वस्त दराने वीजपुरवठा करण्यास एका वीज पुरवठा कंपनीस मान्यता
- **१५ जुलै १९१२ :** को.ऑप. क्रेडिट सोसायटी कायदा मान्य.
- **१४ नोव्हेंबर १९१२ :** संस्थानामध्ये मोटार वाहन सेवेला मान्यता दिली.
- **१६ नोव्हेंबर १९१२ :** फासेपारध्यांच्या घरबांधणी प्रकल्पास मान्यता.
- **डिसेंबर १९१२ :** कोल्हापुरात राष्ट्रीय पातळीवरचे कुस्त्यांचे सामने भरवले.
- **२३ मे १९१३ :** इनाम जमिनीच्या तुकडीकरणाचा प्रतिबंध कायदा.
- **१ जून १९१३ :** हिंदुस्थान सरकारचा सहकारी संस्थांचा कायदा संस्थानात लागू.
- **२८ जून १९१३ :** प्रत्येक गावात शाळा स्थापनेचा जाहीरनामा.
- **जुलै १९१३ :** सत्यशोधक शाळेची स्थापना.
- **जुलै १९१३ :** दीनमित्रकार मुकुंदराव पाटील यांचे 'कुळकर्णी लीलामृत' हे आधुनिक मराठीतील पहिले विडंबन काव्य शाहू छत्रपतींच्या मदतीने प्रकाशित.
- **२ ऑगस्ट १९१३ : :** कुलकर्णीपदाच्या परीक्षेस बसण्यास मराठा विद्यार्थ्यांना परवानगी.
- **१४ ऑगस्ट १९१३ :** दरवर्षी शेतकी आणि शास्त्रीय प्रदर्शन भरवण्याचा निर्णय.
- **३० सप्टेंबर १९१३ :** अर्बन को. ऑप. सोसायटी म्हणजेच आजच्या दि कोल्हापूर अर्बन को. ऑप. बँकेची स्थापना.
- **ऑक्टोबर १९१३ :** कायस्थ प्रभू विद्यार्थी वसतिगृहाची सुरुवात. शाहू छत्रपतींनी त्यासाठी २,००० रुपयांची देणगी दिली.
- **डिसेंबर १९१३ :** खासबाग कुस्त्यांच्या मैदानाचे उद्घाटन.
- **१९ जानेवारी १९१४ :** युवराज राजाराम आणि प्रिन्स शिवाजी हे परदेशातून सुखरूप परत येण्याप्रीत्यर्थ 'महाराणी ताराबाई राणीसाहेब' (करवीर संस्थापिका) आणि 'शिव छत्रपती' यांचे रथोत्सव सुरू केले.
- **एप्रिल १९१४ :** शिवछत्रपती आणि महाराणी ताराबाई यांच्या पादुकांची मंदिरात स्थापना.
- **८ ते १६ एप्रिल १९१४ :** खासबाग मैदानात पहिले शेतकी औद्योगिक प्रदर्शन भरवले.
- **एप्रिल १९१४ :** पॅलेस थिएटरची पायाभरणी. (सध्याचे केशवराव भोसले नाट्यगृह)
- **१६ जुलै १९१४ :** १८५७ च्या स्वातंत्र्य लढ्यातील स्वातंत्र्यवीर चिमासाहेब महाराज यांचे कराची येथे स्मारक उभे करण्यासाठी जमीन खरेदी.
- **ऑगस्ट १९१४ :** डॉ. ॲनी बेझंट यांची कोल्हापूर भेट.
- **२ ते ८ मे १९१५ :** गव्हर्नर लॉर्ड विलिंग्डन यांची राधानगरी धरणाला भेट.
- **मे १९१५ :** सरस्वतीबाई गौड सारस्वत ब्राह्मण वसतिगृह, कोल्हापूर या वसतिगृहासाठी जागेची देणगी आणि शाहू छत्रपतींच्या हस्ते उद्घाटन.
- **२० सप्टेंबर १९१५ :** रावबहादूर रघुनाथ व्यंकाजी सबनीस यांच्या नावे चांद्रसेनीय कायस्थ प्रभू विद्यार्थी वसतिगृह सुरू करण्याचा ठराव करून त्या वसतिगृहाला ६,००० रुपये रोख दिले. तसेच जमीन आणि वार्षिक अनुदान बहाल केले.
- **१० ऑक्टोबर १९१५ :** युवराज राजाराम आणि प्रिन्स शिवाजी इंग्लंडहून परतले.
- **९ डिसेंबर १९१५ :** युवराज राजाराम आणि प्रिन्स शिवाजी यांना शेती शिक्षण घेण्यास अलाहाबादला पाठवले.
- **६ जून १९१६ :** कोल्हापूर येथे प्रिन्स शिवाजी यांचा विवाह संपन्न.
- **१० जून १९१६ :** 'स्वयंघोषित' पुरोगामीची करवीरपीठाचे शंकराचार्य म्हणून डॉ. कुर्तकोटी यांची नियुक्ती.
- **२७ जून १९१६ :** उचगाव येथे छत्रपती संस्कृत महाविद्यालयाचा प्रारंभ.
- **२७ जून १९१६ :** 'जयसिंगपूर' या नावाने बाजारपेठ वसाहत (शहर) निर्मितीस प्रारंभ करण्याचा आदेश.
- **१९ जुलै १९१७ :** वालचंद कोठारी यांच्या 'जागरूक' पत्रकाचा आरंभ.
- **२५ जुलै १९१७ :** प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले.
- **२७ जुलै १९१७ :** विधवा पुनर्विवाहाचा कायदा व विवाह नोंदणी कायदा लागू केला.

- **३० सप्टेंबर १९१७ :** चिखली (करवीर) येथे गणेश चतुर्थी दिवशी सक्तीच्या मोफत प्राथमिक शिक्षण शाळेचे उद्‌घाटन.
- **२५ ऑक्टोबर १९१७ :** बडोदा येथे भगवंतराव पाळेकर यांनी 'जागृती' पत्रक सुरू केले.
- **१ नोव्हेंबर १९१७ :** कोल्हापुरात नर्सिंग वर्ग सुरू केले.
- **१० नोव्हेंबर १९१७ :** पुणे येथे उभा करावयाच्या शिवस्मारक प्रकल्पाचा संकल्प केला.
- **२७ डिसेंबर १९१७ :** खामगाव येथील ११ व्या मराठा शिक्षण परिषदेचे अध्यक्ष.
- **२८ डिसेंबर १९१७ :** शाहू छत्रपतींची भारताचे व्हॉईसरॉय लॉर्ड चेम्सफोर्ड आणि भारत मंत्री मॉंटेग्यू यांच्याशी जातवार प्रतिनिधी, मतदार संघ इ. संबंधी चर्चा.
- **५ जानेवारी १९१८ :** भारताचे व्हॉईसरॉय आणि गव्हर्नर जनरल लॉर्ड चेम्सफोर्ड यांच्याशी शाहू छत्रपतींची मागासलेल्या जाती आणि अस्पृश्यांना जातवार प्रतिनिधित्व मतदार संघ देण्यासंबंधी चर्चा.
- **१९ जानेवारी १९१८ :** कोल्हापुरातील आर्य समाज आणि सत्यशोधक समाज यांना प्रोत्साहन देण्याचे धोरण स्वीकारले.
- **४ व ५ फेब्रुवारी १९१८ :** कोल्हापूर संस्थानात हिंदू-जैन समाजात आंतरजातीय विवाहास मान्यता देणारा कायदा लागू केला.
- **२२ फेब्रुवारी १९१८ :** बलुतेदारी पद्धत नष्ट करण्याची घोषणा.
- **२३ फेब्रुवारी १९१८ :** कुलकर्णी वतने नष्ट करून त्याऐवजी तलाठी पद्धत सुरू.
- **२३ फेब्रुवारी १९१८ :** मोफत आणि सक्तीच्या प्राथमिक शिक्षण योजनेसाठी शैक्षणिक कर लागू करण्यात आला.
- **२८ फेब्रुवारी १९१८ :** मोफत आणि सक्तीच्या प्राथमिक शिक्षणासाठी वेगळे खाते निर्माण केले.
- **४ मार्च १९१८ :** युवराज राजाराम आणि प्रिन्स शिवाजी यांना प्रशासनाचे काही अधिकार बहाल करण्यात आले.
- **१२ मार्च १९१८ :** सावकारी नियंत्रण कायदा मान्य केला.
- **२५ मार्च १९१८ :** सर्व जातीतील गरीब विद्यार्थ्यांना विशिष्ट परिस्थितीत मॅट्रिकपर्यंत मोफत शिक्षणाची व्यवस्था केली.
- **१ एप्रिल १९१८ :** बडोदा येथे युवराज राजाराम यांचा महाराज सयाजीराव गायकवाड यांच्या नातीशी विवाह संपन्न.
- **१० मे १९१८ :** राजाराम कॉलेज बंद करण्याचा निर्णय बदलून ते पुन्हा चालू करण्याचा निर्णय घेतला.
- **२२ मे १९१८ :** आर्य समाजाच्या शैक्षणिक कार्याला कोल्हापूर संस्थानामध्ये शासनाची आर्थिक मदत.
- **२९ मे १९१८ :** लोखंड वितळण्याच्या किर्लोस्कर बंधूंच्या कोल्हापूर संस्थानातील प्रयोगाला मदत व प्रोत्साहन.
- **१० जून १९१८ :** मुंबई इलाख्यात इंग्लंडमधील सॅण्डहर्स्ट कॉलेजच्या धर्तीवर मिलिटरी कॉलेज सुरू करा, अशी भारत सरकारकडे शाहू छत्रपतींची मागणी.
- **१२ जून १९१८ :** प्रिन्स शिवाजी यांचा कुंभोजजवळ असणाऱ्या जंगलात शिकार करताना घोड्यावरून पडून अपघाती मृत्यू.
- **२९ जून १९१८ :** कुलकर्णी वतन कायद्याने बंद करून त्याजागी तलाठी नियुक्ती ही नवीन पद्धत प्रत्यक्ष अमलात आणली आणि बलुतेदारी पद्धत कायद्याने बंद केली.
- **१३ जुलै १९१८ :** कोल्हापूर संस्थानमध्ये प्रायोगिक तत्त्वावर ग्रामपंचायती सुरू केल्या.
- **१३ जुलै १९१८ :** मोफत आणि सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाच्या अंमलबजावणीसाठी अधिकाऱ्यांच्या नेमणुका.
- **१ ऑगस्ट १९१८ :** तथाकथित गुन्हेगारी जमातीची हजेरी पद्धत कायद्याने बंद केली.
- **८ ऑगस्ट १९१८ :** संस्थानच्या हुकुमाप्रमाणे
  (अ) तलाठी म्हणून नेमणूक करताना अस्पृश्यांना प्राधान्य.
  (ब) त्यांना दरबारात योग्य प्रकारे बढती देण्याचा आदेश.
  (क) जातीच्या कारणास्तव अस्पृश्य व्यक्तीला शासकीय नोकरी नाकारता येणार नाही असा आदेश.
- **३ ऑक्टोबर १९१८ :** 'डेक्कन रयत' हे इंगजी साप्ताहिक सुरू संपादक - वालचंद कोठारी.
- **१४ डिसेंबर १९१८ :** ११ व्या आर्य धर्म परिषदेचे अध्यक्ष म्हणून नवसारी (गुजरात) येथे भाषण.
- **२६ डिसेंबर १९१८ :** सर्वांसाठी एकच शाळा सुरू करण्यासंबंधीचा हुकूम.
- **१ जानेवारी १९१९ :** अस्पृश्यांना वैद्यकीय सेवा देताना सामाजिक समतेचे तत्त्व पाळले पाहिजे अशी वैद्यकीय खात्याला शाहू छत्रपतींची आज्ञा.
- **१५ जानेवारी १९१९ :** अस्पृश्य विद्यार्थ्यांना समतेची वागणूक देण्याची शिक्षण खात्याला राजाज्ञा.
- **५ फेब्रुवारी १९१९ :** करवीर पीठाच्या शंकराचार्यपदावरून डॉ. कुर्तकोटी यांची हकालपट्टी.
- **१५ मार्च १९१९ :** राजाराम हायस्कूल आणि राजाराम कॉलेज या संस्था आर्य प्रतिनिधी सभेकडे पाच वर्षांसाठी सुपूर्द करण्याचे जाहीर केले.
- **२८ मार्च १९१९ :** पंचांगावर शिवशक नोंदवण्याचा हुकूम.
- **१९ एप्रिल १९१९ :** कानपूर येथे भरलेल्या १३व्या अखिल भारतीय कुर्मी क्षत्रिय महासभेने शाहू छत्रपतींना 'राजर्षी' ही बिरुदावली सन्मानपूर्वक बहाल केली. राजर्षींनी अध्यक्षीय भाषण हिंदीत केले.
- **१३ जुलै १९१९ :** शाहू छत्रपतींचे जिवलग मित्र आणि भावनगरचे भाऊसिंहजी महाराज यांचे निधन, शाहू छत्रपतींची भावनगरला भेट.
- **२ ऑगस्ट १९१९ :** स्त्रियांना संरक्षण देण्याच्या हेतूने स्त्री छळवणूक प्रतिबंध कायदा आणि घटस्फोट कायदा मान्य करण्यात आला.
- **२१ सप्टेंबर १९१९ :** शाहू छत्रपतींनी कौन्सिल ऑफ रॉयल कोलनियल इन्स्टिट्युटचे उपाध्यक्षपद स्वीकारले.
- **२८ सप्टेंबर १९१९ :** सरकारी शाळेत अस्पृश्य आणि स्पृश्य मुलांना समान वागणूक दिली जावी म्हणून कायदा.
- **६ ऑक्टोबर १९१९ :** सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यता पाळली जाऊ नये म्हणून कायदा.
- **८ ऑक्टोबर १९१९ :** मागासलेल्या जातीतील विद्यार्थिनींना मोफत शिक्षण आणि मोफत वसतिगृहाची सोय केली जाईल, असा जाहीरनामा.
- **३ नोव्हेंबर १९१९ :** व्हॉइसरॉय लॉर्ड चेम्सफोर्ड यांनी दिल्ली येथे

भरवलेल्या संस्थानिकांच्या परिषदेत शाहू छत्रपतींचा सहभाग.

- **२० नोव्हेंबर १९१९ :** वंशशास्त्राच्या आधारे हिंदू जातींचे वर्गीकरण आणि भारतातील प्राचीन मानव यांचा अभ्यास करणारा संशोधन प्रकल्प आराखडा तयार केला.
- **१ डिसेंबर १९१९ :** श्रीपतराव शिंदे यांनी पुणे येथून 'विजय मराठा' नावाचे साप्ताहिक सुरू.
- **डिसेंबर १९१९ :** शाहू छत्रपतींनी केलेला संस्थानिकांच्या संघटनेच्या घटनेचा मसुदा १९२० मध्ये होणाऱ्या संस्थानिकांच्या परिषदेसाठी सादर.
- **१७ जानेवारी १९२० :** औरस आणि अनौरस ही मालमत्तेच्या वारसासंबंधी असणारी तफावत नष्ट करणारा नवीन हिंदू वारसा कायदा मान्य केला. हा कायदा देवदासी जोगिणी यांच्यासंबंधीही लागू केला.
- **३१ जानेवारी १९२० :** शाहू छत्रपतींनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या 'मूकनायक' पत्रकाला भरघोस आर्थिक मदत केल्यामुळे त्या पत्रकाचा प्रारंभ.
- **७ मार्च १९२० :** आर्य समाज परिषद भावनगर येथे अध्यक्ष म्हणून शाहू छत्रपतींचे भाषण.
- **१७ मार्च १९२० :** 'युनायटेड इंडिया ॲण्ड इंडियन स्टेट्स' या मद्रास येथून प्रकाशित होणाऱ्या इंग्रजी पत्रकात शाहू छत्रपतींच्या शैक्षणिक, सामाजिक सुधारणांवर अग्रलेख प्रसिद्ध.
- **२२ मार्च १९२० :** माणगाव (कोल्हापूर) येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या अस्पृश्य परिषदेत जाणीवपूर्वक हजर राहून डॉ. आंबेडकरांचे कौतुक करणारे शाहू छत्रपतींचे भाषण.
- **१५ एप्रिल १९२० :** नाशिक येथील श्री. उदाजी मराठा विद्यार्थी वसतिगृहाची पायाभरणी.
- **१६ एप्रिल १९२० :** नाशिक येथील सोमवंशीय समाजाच्या सभेत शाहू छत्रपतींचे व्याख्यान आणि वंजारी समाजासाठी काढलेल्या वसतिगृहाचे उद्घाटन.
- **३ मे १९२० :** अस्पृश्य लोकांची वेठबिगारी बंद करण्याची राजाज्ञा.
- **३० मे १९२० :** नागपूर येथील अखिल भारतीय अस्पृश्यता निवारण परिषदेचे शाहू छत्रपतींनी अध्यक्षस्थान भूषवले.
- **१५ जून १९२० :** राजवाड्यातील सर्व धार्मिक विधी मराठा पुरोहिताच्या हस्ते करण्याची राजाज्ञा.
- **२२ जून:** नाशिक येथील श्री उदाजी मराठा विद्यार्थी वसतिगृहास १५,००० रुपयांची देणगी दिली.
- **१ जुलै १९२० :** प्रिन्स शिवाजी फ्री मराठा बोर्डिंग हाऊसची स्थापना.
- **६ जुलै १९२० :** शिवाजी क्षत्रिय वैदिक स्कूलचे उद्घाटन.
- **२० जुलै १९२० :** नाशिक येथील अस्पृश्य वसतिगृहास ५,००० रुपयांची देणगी.
- **२० जुलै १९२० :** नागपूर येथील चोखामेळा वसतिगृहास ५,००० रुपयांची देणगी.
- **२७ जुलै १९२० :** हुबळी येथील सामाजिक परिषदेचे अध्यक्ष म्हणून भाषण व प्रचंड मिरवणूक.
- **२५ सप्टेंबर १९२० :** कोल्हापुरातील प्रसिद्ध सत्यशोधक रामचंद्र बाबाजी जाधव उर्फ दासराम यांनी अंबाबाई मंदिर परिसर येथे ब्राह्मण लोकांसाठी खास राखीव असणाऱ्या मोठ्या हौदात जाणीवपूर्वक स्नान केले.
- **२५ सप्टेंबर १९२० :** ब्राह्मण ब्राह्मणेतर संघर्ष अधिक तीव्र झाला. त्याचा परिणाम म्हणून शाहू महाराजांनी अंबाबाई मंदिर परिसरातील हौद सर्वांना खुला केला.
- **३ ऑक्टोबर १९२० :** पुण्यातील शिवाजी मेमोरिअल सोसायटीची वार्षिक सभा छत्रपती शाहू महाराजांच्या अध्यक्षतेखाली सुरू असताना लो. टिळकांच्या अनुयायांनी सभेत गोंधळ घातला.
- **८ ऑक्टोबर १९२० :** पुणे येथील छत्रपती मराठा बोर्डिंग इन्स्टिट्युशन यास दरसाल १,००० रुपयांचे अनुदान मंजूर केले.
- **१२ ऑक्टोबर १९२० :** पाटगाव येथील क्षात्रजगद्गुरूपदी सदाशिव लक्ष्मण पाटील यांची नेमणूक केली.
- **११ नोव्हेंबर १९२० :** सदाशिव लक्ष्मण पाटील यांचा वैदिक पद्धतीने पट्टाभिषेक झाला.
- **३ जानेवारी १९२१:** कोल्हापुरात मॅट्रिक परीक्षेचे केंद्र सुरू व्हावे, म्हणून शाहू छत्रपतींनी मुंबई सरकारकडे अर्ज केला.
- **२६ एप्रिल १९२१ :** अहमदनगर येथे शाहू छत्रपतींचे दत्तक पिता चौथे शिवाजी महाराज यांच्या स्मरणार्थ मराठा बोर्डिंगची स्थापना.
- **१२ जुलै १९२१ :** गावोगावच्या सभेमध्ये रेड्यांचा बळी देण्याची अमानुष प्रथा बंद करण्याचा हुकूम दिला.
- **२१ ऑगस्ट १९२१ :** पुणे येथील शनिवारवाड्याच्या दुरुस्तीसाठी शाहू छत्रपतींची २,००० रुपयांची देणगी.
- **१८ नोव्हेंबर १९२१ :** पुणे येथे पहिली पाटील परिषद आयोजित केली.
- **१९ नोव्हेंबर १९२१ :** पुणे येथे प्रिन्स ऑफ वेल्स यांच्या हस्ते शाहू छत्रपतींनी शिवस्मारकाची पायाभरणी केली.
- **६ फेब्रुवारी १९२२ :** मुरगूड येथील बापूसाहेब महाराजांनी बांधलेल्या तलावाचे शाहू छत्रपतींच्या हस्ते उद्घाटन.
- **१६ फेब्रुवारी १९२२ :** दिल्ली येथे भरलेल्या अस्पृश्यांच्या परिषदेत शाहू छत्रपतींचे भाषण.
- **२७ फेब्रुवारी १९२२ :** कुरुक्षेत्र येथे महात्मा गांधी व शाहू छत्रपतींची भेट.
- **३१ मार्च १९२२ :** राजाराम कॉलेजला कायमची मान्यता मिळवली.
- **३० एप्रिल १९२२ :** सयाजीराव गायकवाड यांची नात लक्ष्मीबाई यांच्या विवाहास शाहू छत्रपती बडोदा येथे हजर.
- **३ मे १९२२ :** शाहू महाराजांचे बडोद्याहून मुंबईकडे प्रस्थान.
- **४ मे १९२२ :** मुंबई येथे शाहू छत्रपतींचे आगमन व पन्हाळा लॉजमध्ये मुक्काम.
- **४ मे १९२२ :** शाहू छत्रपतींना हृदयविकाराचा झटका.
- **५ मे १९२२ :** रात्री शाहू छत्रपतींच्या छातीत भयानक वेदना होत असताना प्रबोधनकार ठाकरे यांची भेट व त्यांच्याकडून साताऱ्याच्या प्रतापसिंह महाराजांचा इतिहास लिहून देण्याचे वचन घेतले.
- **६ मे १९२२ :** मुंबई येथील पन्हाळा लॉज येथे पहाटे ५ वाजून ५५ मिनिटांनी शाहू छत्रपतींचे हृदयविकाराने निधन.
- **७ मे १९२२ :** कोल्हापूर येथील पंचगंगेच्या घाटावर वैदिक पद्धतीने अंत्यसंस्कार.

('राजर्षी शाहू गौरवग्रंथ' मधून साभार)

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या आठवणींना उजाळा देणाऱ्या वास्तूंपैकी एक महत्त्वपूर्ण वास्तू म्हणजे कोल्हापुरातील न्यू पॅलेस आणि येथील संग्रहालय होय. शाहू महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या त्यांच्या वापरातील अनेक वस्तूंचा संग्रह असणारे शहाजी छत्रपती म्युझियम हे शाहू महाराजांच्या आठवणींना उजाळा देणारे आहे.

# प्रेरणादायी समृद्ध वारसा

**वृषाली पाटील**

वंचित, बहुजन समाजाच्या उन्नती आणि सामाजिक परिवर्तनासाठी जीवनभर झटणाऱ्या लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराजांची जन्मभूमी आणि कर्मभूमी म्हणून कोल्हापूरची वेगळी ओळख आहे. इथल्या मातीला लोकराजा शाहू महाराजांच्या विचारांचा व महान कार्याचा वारसा लाभला आहे. जसजसे आपण शाहू महाराजांच्या कार्याविषयी जाणून घ्यायला लागतो, तसतशी त्यांच्या कार्याची महती उलगडत जाते आणि आपण शाहूमय होऊ लागतो. कोल्हापूर शहरातील मध्यवर्ती बस स्थानकाकडून रमणमळ्याकडे जाताना अवघ्या ३ कि.मी. अंतरावर लक्षवेधक नवा राजवाडा आहे. अगदी दिमाखात उभा असणारा हा नवा राजवाडा न्यू पॅलेस म्हणून सर्वपरिचित आहे. राजवाड्याच्या वैभवात भर घालते ते ऐतिहासिक वस्तूंच्या माध्यमातून अनेक राजांच्या आठवणी जपणारे शहाजी छत्रपती म्युझियम. याठिकाणी असणारी छत्रपती शिवाजी महाराजांसह अनेक राजांची, महाराणींची व त्यांच्या काळातील घटनांची साक्ष देणारी छायाचित्रे व वस्तू लक्ष वेधून घेतात.

राजवाड्याच्या मुख्य प्रवेशद्वाराच्या उजव्या बाजूला दिसतो तो नयनरम्य तलाव. तलावाच्या काठी सांबर, हरीण, नीलगाय, शहामृग मोर, लांडोरसह विविध पक्षी आणि प्राणी अबालवृद्धांना आकर्षित करतात. प्राणीसंग्रहालयापासून काही पावलांवर दिसते ते नव्या राजवाड्याचे विलोभनीय दृश्य. या भव्य आणि दिमाखदार राजवाड्याकडे पाहिले की, राजघराण्याच्या वैभवाची प्रचिती येते. शाहू महाराजांचे कार्यकर्तृत्व जसे आभाळाएवढे, तसा राजवाडादेखील भव्य-दिव्य आणि आकर्षक आहे.

राजवाड्याच्या तळमजल्यावर असणाऱ्या शहाजी छत्रपती



म्युझियमचे उद्घाटन करवीर संस्थानच्या महाराणी हर हायनेस श्रीमंत अ.स.सौ. सं.प्रमिलाराजे छत्रपती महाराणी यांच्या हस्ते श्रीमंत शाहू महाराजांच्या जन्मशताब्दीनिमित्त ३० जून १९७४ रोजी झाले. हे म्युझियम दररोज सकाळी ९. १५ ते सायंकाळी ५.३० या वेळेत खुले राहत असून माफक प्रवेश शुल्कामध्ये ते पाहता येते.



## प्रवेश दालन

राजवाड्याच्या प्रवेशद्वारातून आत गेल्यावर उजव्या बाजूला राजर्षी शाहू महाराजांचे मोठे चिरंजीव छत्रपती राजाराम महाराज (दुसरे) यांचे भव्य अश्वारुढ रेखाचित्र लक्ष वेधून घेते. बाजूलाच शाहूकालीन कोरीव काम केलेल्या वस्तू ठेवण्यात आल्या आहेत. शिसव लाकडाचे कोरीव काम केलेली कपाटे, आकर्षक शोकेस ठेवण्यात आली आहेत. राजर्षी शाहू महाराजांना दोन पुत्र व एक मुलगी. त्यांचे थोरले चिरंजीव छत्रपती राजाराम महाराज व प्रिन्स शिवाजी यांचे पुतळे सुबक कामाचा उत्कृष्ट नमुना असलेल्या टेबलावर ठेवण्यात आले आहेत.

## हत्ती दालन

दरवाजातून आत गेल्यावर हत्तीचे दालन दिसून येते. पूर्वीच्या काळी राजांची हत्तीवरून चांदीच्या अंबारीतून मिरवणूक निघत असे. या मिरवणुकीच्या भव्यतेचे स्मरण करून देणारा हत्तीचा पुतळा. त्यावर भरजरी झूल (घाशा).. दागिन्यांनी मढवलेल्या हत्तीवर चांदीची अंबारी त्या काळच्या मिरवणुकीची भव्यता विशद करते. बाजूला चांदीचा हौदा, दंडातील वाक्या, वस्त्रे, तुरा, शिरपेच, शिवकालीन जरीपटका, जुनी नाणी आणि विविध घराण्यांच्या पगड्या, चांदीच्या तोफा, हत्तीच्या दातावर लावण्याचे दिवे हेही अनोखेच आहे.

## लाकडी वस्तूंचे दालन

पुढे उजव्या बाजूच्या दालनामध्ये सांबराच्या शिंगापासून तयार केलेले मेज, टेबल लॅम्प, शोकेस, छत्रपती घराण्याचा वंशपरंपरागत पाळणा दिसून येतो. करवीर संस्थानात विविध स्पर्धातील विजेत्यांना पारितोषिक देऊन प्रोत्साहन देण्याकडे महाराजांचा कल होता हे या ठिकाणी ठेवण्यात आलेल्या विविध

### शाहू महाराजांचे विचार पथदर्शी ठेवून वाटचाल करू या..



लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या नावाने कोल्हापूरला जगभरात ओळखले जाते. शाहू महाराजांनी आपल्या दूरदृष्टीने करवीर संस्थानात अनेक उपक्रम आणि योजना राबवून या भागाचा विकास केला, जो आजही समाजाला पथदर्शी आहे. राजर्षी शाहू महाराजांचे आचार, विचार, कार्यातून समाजाची उन्नती साधणार असल्याने प्रत्येकाने राजर्षी शाहू महाराजांचे विचार आत्मसात करण्याची गरज आहे. समाजसुधारणा कार्यात तत्कालीन प्रतिगामी विचारांचा विरोध त्यांना सहन करावा लागला, तरीही न डगमगता त्यांनी समाजसुधारणेचे कार्य सुरूच ठेवले. शाहू महाराजांना त्यांच्या कार्यातून जाणून घेऊन त्यांनी घालून दिलेला पुरोगामी विचारांचा वारसा आपण जतन करायला हवा.

शाहू महाराजांच्या विचारांत मोठी ताकद आहे. या लोकराजांनी सर्वसामान्यांच्या कल्याणासाठी, बहुजनांच्या न्यायासाठी लढा दिला. शाहू महाराजांचे कार्य प्रत्येक पिढीला मार्गदर्शक आहे. अतुलनीय दूरदृष्टी असलेल्या शाहू महाराजांनी कृषी, उद्योग, शिक्षण, व्यापार, जलसंपदा, पत्रकारिता, वन, क्रीडा यांसारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांत केलेले कार्य आजही प्रेरणादायी व दिशादर्शक आहे. समाजात समता नांदावी, यासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. मूल शिकावे यासाठी मुलांना शाळेत न पाठवणाऱ्या पालकांना १ रुपये दंड आकारण्याची तरतूद केली. समाजाच्या विकासासाठी शैक्षणिक संस्थांची उभारणी, वसतिगृहे उभारून विविध धर्मीयांच्या विद्यार्थ्यांच्या राहण्याची सोय, रुग्णालयात विविध आरोग्य सेवासुविधा, खेळाडूंना प्रोत्साहन, वृत्तपत्रे, नियतकालिके सुरू होण्यासाठी अर्थसाहाय्य अशी कितीतरी कामे महाराजांनी केली. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी जयंतीनिमित्त या वर्षभरात राजर्षी शाहू महाराजांच्या कार्याला उजाळा देण्यात येत आहे. शाहू महाराजांच्या विचारांनी प्रेरित होऊन त्यांच्या संकल्पनेतील विकास घडवण्यासाठी आपण सर्वजण मिळून प्रयत्नशील राहू या, हीच या जयंती उत्सवानिमित्त लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांना आदरांजली ठरेल.

**- खासदार श्री शाहू छत्रपती (छत्रपती शाहू महाराज यांचे वंशज)**

साहित्यातून दिसून येते. याच दालनात ऐतिहासिक लाकडी वस्तूंची आकर्षक पद्धतीने सजावट केल्याचे दिसते. डाव्या भिंतीवर करवीर संस्थापिका महाराणी ताराराणी यांचे अश्वारूढ रेखाचित्र आहे. हे रेखाचित्र ताराराणींच्या शालीन, घरंदाजपणाबरोबरच खंबीरतेची साक्ष देते.

वस्तुसंग्रहालयातील पुस्तके ठेवण्याचे भलेमोठे काचेचे कपाट शाहू महाराजांची वाचनाची आवड अधोरेखित करते. प्रत्येक कोपऱ्यात ठेवण्यात आलेल्या संगमरवरी कॉर्नर पीसचे रेखीव काम अवर्णनीय असेच आहे. बैठक व्यवस्था आणि सोफ्याची रचना पाहिली की त्या काळी युद्धनीती, गुप्त बाबींची खलबते होण्याच्या दृष्टीने सोफ्यांची रचना केल्याचे दिसते. पूर्वी दूरच्या प्रवासासाठी राजे-रजवाडे घोड्याचा अथवा माणसांचा वापर करत, तर राजघराण्यातील स्त्रिया आणि लहान मुलांच्या प्रवासासाठी सुरक्षित असा मेण्याचा वापर करत असत. राजघराण्यातील प्रवासासाठीचा मोठा मेणा या ठिकाणी ठेवण्यात आला आहे. पुढे काचेच्या पेटीत ठेवलेली सुबक भरतकाम व मण्यांचे काम केलेली वस्त्रेदेखील आकर्षक आहेत.







## छत्रपती शाहू दालन

म्युझियममधील महत्त्वपूर्ण दालन म्हणजे छत्रपती शाहू दालन. या दालनात डावीकडे शाहू महाराज यांची शिकार कँपमधील खुर्ची, कार्यालयीन खुर्ची, उजवीकडे महाराजांची दिल्ली दरबारची खुर्ची ठेवण्यात आली आहे. तत्कालीन डेक्कन स्टेट संस्थानिकांसोबत शाहू महाराजांचे छायाचित्र अन्य विविध छायाचित्रांसह येथे लावण्यात आले आहे.

त्या काळी शाहू महाराजांनी इंग्लंडसह अनेक देशांना भेटी दिल्या होत्या. राजांच्या विदेश भेटींची छायाचित्रे येथे लावण्यात आली आहेत. भोला घराण्याच्या पैलवानांचे (सध्या पाकिस्तानच्या लाहोर येथील) छायाचित्र पाहिले की, राजांनी कुस्ती खेळाच्या विकासासाठी केलेले प्रयत्न अधोरेखित होतात. महाराजांच्या विविध टप्प्यातील म्हणजेच अकराव्या, बाराव्या आणि पंधराव्या वर्षातील शाहू महाराज, १८९४ मधील शाहू महाराजांची छायाचित्रे त्यांचे बालपण, युवा काळाचे स्मरण करून देतात. पुणे येथील शिवाजी मेमोरिअल फाऊंडेशनच्या उद्‌घाटनप्रसंगी प्रिन्स ऑफ वेल्स समवेत महाराजांचे छायाचित्र, लेडी व लॉर्ड विलिंग्डन यांच्यासमवेत महाराजांचे छायाचित्रही येथे पाहावयास मिळते. त्याचबरोबर खासबाग मैदानातील कुस्त्यांसाठीची गर्दी, कोल्हापूर व राधानगरी येथे महाराजांनी बांधलेले साठमारी मैदान, शाहू महाराजांचा भैऱ्या, महाराजांनी शिकवून तयार केलेल्या शिकारी कुत्र्यांकडून जंगली वाघाची शिकार केल्यानंतरचे छायाचित्र, हत्तीची झुंज, १८९४ मध्ये छत्रपती शाहू महाराजांचे अधिकार ग्रहण प्रसंगीची चित्रे लक्ष वेधून घेतात. बाजूला कपाटात गिंडी, जग, तोटी असलेला तांब्या, पितळेचा खलबत्ता अशी मोठाली भांडी आकर्षक आहेत.

राजर्षी शाहू महाराज धारवाड येथे शिक्षणासाठी गेल्याचे दाखले संग्रहालयात पाहावयास मिळतात. पहिले राजाराम महाराज यांच्या इटलीमधील फ्लॉरेन्स येथील स्मारकालाही महाराजांनी भेट दिली होती. महाराजांच्या विविध ठिकाणांच्या भेटींची आठवण करून देणारी छायाचित्रे येथे आहेत. भावनगरचे महाराज श्रीमंत भाऊसिंगजींच्या सोबतचे तसेच महाराजांच्या फ्लॉरेन्स येथील स्मारकाच्या भेटीचे छायाचित्र येथे लावण्यात आले आहे. शाहू राजांचे जीसीआयई रोब, केंब्रिज एलएलडी रोब यासह राजघराण्याची भरजरी उंची वस्त्रे आपल्या नजरेत भरतात.

पुढच्या खुल्या दालनात करवीर संस्थानकालीन दिमाखदार दसरा मिरवणुकीचे छायाचित्र आहे. शाहू महाराजांच्या पत्नी महाराणी लक्ष्मीबाई उर्फ आईसाहेब महाराज यांचा येथील संगमरवरी पुतळा लक्ष वेधून घेतो. एक हजार इंडियन गिनीज ही शर्यत जिंकल्यानंतरचे घोडींचे छायाचित्र आहे. त्या काळच्या चांदीच्या वस्तू, हस्तिदंतापासून तयार केलेला पिंजरा, साळींदरांच्या पिसापासून तयार केलेला पिंजरा येथे आहे. समोर खुल्या दालनात गेंड्याच्या पायापासून, तसेच विविध



प्राण्यांच्या अवशेषांपासून तयार केलेल्या उपयोगी वस्तू, लँपस्टँडसह अन्य उपयोगी वस्तू ठेवण्यात आल्या आहेत.

## भव्य दरबार हॉल

म्युझियमचे मुख्य आकर्षण म्हणजे भव्य शाही दरबार हॉल. दरबार हॉलमध्ये समोरच्या बाजूला प्रशस्त आसन व दोन्ही बाजूला दोन मोठी आसने आणि राजदरबारातील सदस्यांना बसण्यासाठी साधारण १५० आसनव्यवस्था पाहिली की, राजांच्या राजदरबाराची भव्यता कळून येते. या दरबार हॉलच्या खिडक्यांवर स्टेन ग्लास पेंटिंगमध्ये चित्रमय शिवचरित्र कोरण्यात आले आहे.

## शस्त्रास्त्र दालन

शस्त्रास्त्र दालनात प्रवेश केला की, समोरच दोन तोफा ठेवलेल्या दिसतात, त्या सलामी देण्यासाठी उभ्या असल्याचा भास होतो. राजांनी वापरलेल्या विविध शस्त्रास्त्रांची मांडणी आकर्षक पद्धतीने करण्यात आली आहे. यात तलवारी, बंदुका, भाला, ढाल अशी शस्त्रास्त्रे आहेत. या दालनात निमचा, पेश कब्ज, सकेला, सुरा, तेगा मराठा पट्टनी आलेमानी, धोप कर्नाटकी, कट्टी (कर्तिक), पट्टा (दुधारी), तेगा हिंदुस्थानी, तलवार सुराऊ, धोप (व्दिपल्ल), फिरंगी, सकेला (सखेलक), तलवार मुग्राबी, किरच, क्रिस, जंबिया आदी विविध प्रकारची हत्यारे पाहिली की शस्त्रास्त्र साठ्याची विपुलता लक्षात येते. बाहेरच्या बाजूला शाहू महाराजांनी तयार करून घेतलेली साठमारीची हत्यारे, तेगा इराणी, खांडा मछेली-मत्स्य खड्ग, मत्स्य खड्ग दुधारी, तेगा मराठा, किरच पट्टा पान, धोप कर्नाटकी यासह अनेकविध हत्यारे आकर्षक पद्धतीने मांडण्यात आलेली आहेत.

दरबार हॉल व शस्त्रास्त्र दालनामध्ये खुल्या दालनात छत्रपती संभाजी पहिले यांच्या कारकिर्दीतील करवीर आरमारातील लढाऊ जहाजे (१७१४ ते १७६०) मागे सिंधुदुर्ग किल्ल्याची कलाकृती असून समोर जहाजांच्या प्रतिकृती आहेत. समोरच्या बाजूला आकर्षक आणि लक्षवेधक तैलरंगातील चित्रे आहेत. तसेच छत्रपती राजाराम (दुसरे) यांची आवडती घोडी शिवगंगाची कलाकृती, भरजरी कापडावर तैलरंगाने चितारलेली चित्रे आहेत. छत्रपती घराण्याचा वंशवृक्ष, भोसले, खानवटकर, पवार घराण्याची वंशावळ, मेवाड घराण्याच्या वंशावळीची माहिती लावण्यात आली आहे. पुढच्या दालनात हत्तीवर घालण्याचे चांदीचे मोर ठेवण्यात आले आहेत. याच दालनात श्रीमंत शहाजी महाराजांची विविध छायाचित्रे आहेत.

## शिकार दालन

शाहू महाराजांना शिकारीची खूप आवड असल्याचे अनेक दाखले आहेत. वाघ, हरीण, चित्त्याची, तसेच रानडुकराची शिकार करण्यात ते तरबेज होते. याचबरोबर चित्ते आणि शिकारी कुत्र्यांना प्रशिक्षण देऊन शिकार करण्यासाठी त्यांना तयार करण्याचे नवे तंत्र त्यांनी राबवले होते. शिकारीसाठी रानावनात भटकंती करत जाताना तेथील



लोकांच्या अडचणी ते सोडवत असल्याचे दिसते. मुंबईचे तत्कालीन गव्हर्नर जॉर्ज लॉईड व लेडी लॉईड यांच्यासह अन्य तत्कालीन मान्यवरांनी देखील राजर्षी शाहू महाराजांसोबत एप्रिल १९२१ मध्ये दाजीपूरच्या जंगलात शिकार दौरा केला होता. या म्युझियममध्ये शाहू महाराजांनी केलेल्या विविध प्राण्यांच्या शिकारीचे नमुने प्रक्रिया करून ठेवण्यात आले आहेत. शिकारीचे दाखले देणारी अनेक छायाचित्रे या ठिकाणी लावण्यात आली आहेत. महाराजांनी केलेल्या जंगली प्राण्यांच्या शिकारीचे येथील नमुने बघितले की, महाराजांच्या धैर्याचा अंदाज येतो.

## नक्कीच पाहण्यासारखे संग्रहालय

'A State of India' च्या 'Maharashtra' या पुस्तकात वस्तुसंग्रहालय व दरबार हॉलच्या छायाचित्रांचा समावेश करण्यात आला आहे. राजर्षी शाहू महाराजांच्या कार्याची, त्यांच्या पुरोगामी विचारांची ओळख करून देणारे हे संग्रहालय प्रत्येकाने पाहावे असे आहे. लोकराजा शाहू महाराजांच्या काळातील वस्तू, शस्त्रास्त्रे, नाणी, राजदरबार यासह त्यांनी वापरलेल्या वस्तूंचा संग्रह या ठिकाणी करण्यात आला आहे. राजर्षी शाहू महाराजांच्या पुनीत स्पर्शाने पावन झालेल्या या ऐतिहासिक वास्तूमधील एक-एक वस्तू राजर्षी शाहू महाराजांच्या कार्याचे स्मरण करून देते. कोल्हापुरातील न्यू पॅलेसमधील हे ऐतिहासिक शहाजी छत्रपती म्युझियम नक्कीच भेट देण्यासारखे आहे.

(माहिती अधिकारी, कोल्हापूर)

**महाराष्ट्राचा अभिमान, स्वाभिमान उंचावणाऱ्या अशा अनेक निर्णयांचा समावेश असलेल्या, शेतकरी, कष्टकरी, विद्यार्थी, युवक, महिला, मागासवर्गीय, आदिवासी, अल्पसंख्याक अशा सर्व घटकांना न्याय, शेती, उद्योग, शिक्षण, व्यापार, आरोग्य, पर्यटन अशा विविध क्षेत्रांच्या विकासाला बळ देणारा वर्ष २०२४–२५ चा अतिरिक्त अर्थसंकल्प उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री अजित पवार यांनी विधानसभेत सादर केला.**

# महाराष्ट्राचा अतिरिक्त अर्थसंकल्प २०२४–२५

***उदंड पाहिले , उदंड ऐकिले***
***उदंड वर्णिले, क्षेत्रमहिमे ।***
***ऐसी चंद्रभागा , ऐसे भीमातीर***
***ऐसा विटेवर , देव कोठे ।।***
***ऐसे संतजन , ऐसे हरिचे दास***
***ऐसा नामघोष , सांगा कोठे ।***
***तुका म्हणें , आम्हां अनाथाकारणें***
***पंढरी निर्माण, केली देवें.....***

उपमुख्यमंत्र्यांनी आपल्या अर्थसंकल्पीय भाषणाची सुरुवातच जगद्‌गुरू संत तुकाराम महाराजांच्या या अभंगाने केली. महाराष्ट्राचे आराध्यदैवत श्री विठ्ठलाच्या दर्शनाला अवघ्या महाराष्ट्रातून वैष्णवांच्या दिंड्या निघाल्या, असे उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले. साधारण हजार वर्षांची परंपरा असलेल्या या वारीशी, वारकरी भक्तिमार्गाशी महाराष्ट्राची नाळ जोडलेली आहे, याची जाणीव या सरकारला आहे. महाराष्ट्राची ओळख म्हणून जिची जगभर दखल घेतली जाते, त्या पंढरपूरच्या वारीचा म्हणूनच आपण जागतिक वारसा नामांकनासाठी युनेस्कोकडे प्रस्ताव पाठवतो आहोत.



## वारकऱ्यांविषयी कृतज्ञता

आपल्या परंपरेची पताका खांद्यावर घेऊन जाणाऱ्या लाखो वारकऱ्यांविषयी कृतज्ञता म्हणून सरकारने यावर्षीपासून प्रति दिंडी २० हजार रुपये निधी देण्याचा निर्णय घेतला आहे. निर्मल वारीसाठी ३६ कोटी ७१ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. मुख्यमंत्री वैद्यकीय साहाय्यता कक्षाच्या माध्यमातून देहू-आळंदी ते पंढरपूर या दोन्ही मुख्य पालखी मार्गावरील सर्व वारकऱ्यांची आरोग्य तपासणी केली जाणार आहे. आवश्यकतेनुसार मोफत औषधोपचारही केले जाणार आहेत.

कीर्तनकार, वारकरी, भजनीमंडळ यांना सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी; तसेच पालखी मार्गांचे व्यवस्थापन करण्यासाठी, मुख्यमंत्री वारकरी संप्रदाय महामंडळ स्थापन करण्यात येईल.

## पंतप्रधानांचे अभिनंदन

लोकसभेच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीला बहुमत प्राप्त झाले आहे. केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सलग तिसऱ्यांदा सरकार स्थापन झाले आहे. पंतप्रधानांचे मी त्यासाठी आपल्या सर्वांच्यातर्फे मन:पूर्वक अभिनंदन करतो.

महाराष्ट्राला सहकार्य करण्याबाबत केंद्र शासनाने नेहमीच सकारात्मक भूमिका घेतली आहे. केंद्र शासनाच्या पहिल्याच मंत्रिमंडळ बैठकीत राज्यातील ७६ हजार २०० कोटी रुपये किमतीच्या वाढवण बंदर प्रकल्पाला मंजुरी देण्यात आली. त्यामुळे राज्याच्या आर्थिक विकासाला चालना मिळणार असून, त्याद्वारे १० लाखांहून अधिक रोजगार निर्माण होणार आहेत. यापुढील पाच वर्षातही केंद्र शासनाचे असेच भक्कम पाठबळ राज्याला लाभेल, याची खात्री मी बाळगतो.

२७ फेब्रुवारी २०२४ रोजी मी सभागृहाला राज्याचा २०२४-२५ या आर्थिक वर्षाचा अंतरिम अर्थसंकल्प सादर केला होता. पायाभूत सुविधांवरील खर्चात वाढ करून राज्याची

अर्थव्यवस्था एक ट्रिलिअन डॉलर करण्याचा निर्धार त्यात व्यक्त करण्यात आला होता. रेल्वे, रस्ते, मेट्रो मार्ग, विमानतळ, बंदरे व उद्योग अशा विविध क्षेत्रांतील गुंतवणुकीबाबतही मी त्यावेळी सविस्तर उल्लेख केला होता. अर्थव्यवस्थेचे आकारमान वाढल्यानंतर सरासरी दरडोई उत्पन्नात वाढ होणार आहेच; पण त्याचबरोबर राज्याच्या आर्थिक प्रगतीचे पुरेसे लाभ न होणाऱ्या घटकांच्या वैयक्तिक उत्पन्नात लक्षणीय वाढ कशी होईल, यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. महिला, शेतकरी, युवा, मागासवर्ग आणि सर्व समाजातील गरिबांना भरीव आर्थिक मदत आणि प्रगतीच्या संधी उपलब्ध करून देणे हा अतिरिक्त अर्थसंकल्पाचा मुख्य हेतू आहे.

## महिलांसाठी विविध योजना

शिव-शाहू-फुले-आंबेडकरांच्या विचारांच्या पुरोगामीत्वाचा वारसा जपत महाराष्ट्राने महिलांना केंद्रस्थानी ठेवून विकासाची वाटचाल केली आहे. शिक्षण, नोकरी आणि राजकीय क्षेत्रात महिलांना आरक्षण देणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. राज्याने १९९४ मध्ये पहिले महिला धोरण जाहीर केले. त्यात वेळोवेळी कालसुसंगत सुधारणा करण्यात आल्या. नुकतेच राज्याचे चौथे अष्टसूत्री महिला धोरण जाहीर करण्यात आले आहे. महिला व मुलींना सामाजिक, प्रशासकीय आणि राजकीय क्षेत्रात समान हक्क व दर्जा प्राप्त होण्याकरिता पोषण आहार, स्वास्थ्य, शिक्षण, उद्योजकता; तसेच कौशल्य विकास आणि रोजगारासाठी विविध योजना प्रभावीपणे राबवण्यात येतील.



मुलीच्या जन्माचे स्वागत करणारी आणि तिला वय वर्षे १८ पर्यंत अर्थसाहाय्य करणारी लेक लाडकी योजना, गर्भवती मातांचे आरोग्य व संस्थात्मक प्रसूतीकरिता जननी सुरक्षा योजना, प्रधानमंत्री मातृवंदना योजना, बचतगटांच्या माध्यमातून ग्रामीण महिलांचे सक्षमीकरण, बस प्रवासात सवलत, महिलांसाठी विशेष बस, घर खरेदीसाठी मुद्रांक शुल्कात सवलत, कौटुंबिक समस्याग्रस्त महिलांसाठी शक्ती सदन योजना, नोकरी करणाऱ्या महिलांसाठी व्यवसायकरातून सूट, महिला वसतिगृहे, महिलाकेंद्रित पर्यटन धोरण अशा विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे.

**मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना :** स्त्री ही कुटुंबाचा आधार असते. आता ती एकूण समाजाचाच केंद्रबिंदू होते आहे. कुटुंबाचे व्यवस्थापन आणि अर्थार्जन अशा दोन्ही आघाड्यांवर ती लढते आहे. एकहाती कुटुंब सांभाळणाऱ्या, कर्तबगार मुले घडवणाऱ्या महिलाही आपल्याला पाहायला मिळतात. वेगवेगळ्या परीक्षांच्या निकालाच्या वेळी मुलींची आघाडी हा तर आता नियमच होऊ पाहतो आहे. अशा आपल्या कर्तृत्ववान मायभगिनींना संधीची कवाडे आणखी खुली करून देणे, त्यांना प्रोत्साहन देणे हे सरकार म्हणून आपले कर्तव्यच आहे. म्हणून आमच्या लेकी बहिणींसाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना ही महत्त्वाकांक्षी आणि व्यापक योजना मी घोषित करतो आहे.

महिलांचे आर्थिक स्वातंत्र्य व स्वावलंबन, आरोग्य व पोषणासहित सर्वांगीण विकासासाठी या योजनेंतर्गत २१ ते ६५ वर्ष वयोगटातील पात्र महिलांना शासनामार्फत दरमहा दीड हजार रुपये प्रदान करण्यात येतील. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी दरवर्षी सुमारे ४६ हजार कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्यात येईल. योजनेची अंमलबजावणी जुलै २०२४ पासून करण्यात येईल.

**लेक लाडकी :** शासनाने सन २०२३-२४ पासून लेक लाडकी ही योजना सुरू केली आहे. मुलीच्या जन्मापासून ती १८ वर्षांची होईपर्यंत तिला टप्प्याटप्प्याने एकूण एक लाख एक हजार रुपये प्रदान करण्यात येतात. पिवळ्या आणि केशरी शिधापत्रिकाधारक कुटुंबात १ एप्रिल २०२३ रोजी किंवा त्यानंतर जन्म झालेल्या कन्येला हे अर्थसाहाय्य करण्यात येते.

**शासकीय दस्तऐवजावर आईचे नाव बंधनकारक :** १ मे २०२४ नंतर जन्माला आलेल्या व्यक्तीच्या नावाची नोंद शासकीय दस्तऐवजांमध्ये त्याचे नाव, आईचे नाव, वडिलांचे नाव व आडनाव या क्रमाने करण्याचे बंधनकारक करण्यात आले आहे.

**पिंक ई-रिक्षा :** यावर्षीच्या अंतरिम अर्थसंकल्पात महिलांसाठी स्वयंरोजगार निर्मिती; तसेच सुरक्षित प्रवासासाठी पिंक ई-रिक्षा योजनेची घोषणा केली होती. योजनेच्या पहिल्या टप्प्यात राज्यातील १७ शहरांतील १० हजार महिलांना रिक्षा खरेदीसाठी अर्थसाहाय्य करण्यात येईल. या योजनेसाठी ८० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

**शुभमंगल सामूहिक नोंदणीकृत विवाह :** शुभमंगल सामूहिक नोंदणीकृत विवाह योजनेत लाभार्थी मुलींना देण्यात येणारे अनुदान १० हजार रुपयांवरून २५ हजार रुपये करण्यात आले आहे.

**कर्करोग तपासणीकरिता साधनसामग्री :** राज्यातील सर्व आरोग्य उपकेंद्रात स्तन व गर्भाशय मुखाच्या कर्करोग तपासणीसाठी उपकरणे व साहित्य उपलब्ध करून देण्यात येईल, त्यासाठी ७८ कोटी रुपये निधीची तरतूद करण्यात येईल.

**नवीन रुग्णवाहिका :** रुग्णांची, विशेषतः गरोदर माता व बालकांची आरोग्यसंस्थेत मोफत ने-आण करण्यासाठी ३,३२४ रुग्णवाहिका कार्यरत आहेत. त्यातील जुन्या रुग्णवाहिकांच्या जागी नव्या रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्यात येतील.

**जलजीवन मिशन :** महिलांची पाण्यासाठी होणारी पायपीट थांबवण्यासाठी हर घर नल, हर घर जल संकल्पनेंतर्गत जलजीवन मिशन कार्यक्रमातून ग्रामीण भागातील १ कोटी २५ लाख ६६ हजार ९८६ घरांना नळजोडणी देण्यात आली आहे. राहिलेल्या २१ लाख ४ हजार ९३२ घरांसाठीचे काम प्रगतिपथावर आहे.

**मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना :** स्वयंपाकासाठी वापरल्या जाणाऱ्या इंधनाचा आणि महिलांच्या आरोग्याचा फार जवळचा संबंध असतो. महिलांच्या आरोग्याच्या नेहमीच्या तक्रारी कमी करायच्या असतील, तर त्यांना स्वच्छ इंधन पुरवणे ही आपली जबाबदारी आहे. एलपीजी गॅसचा वापर यादृष्टीने सर्वात सुरक्षित असल्याने या इंधनाचा वापर वाढवला पाहिजे. गॅस सिलेंडर प्रत्येक घराला परवडेल, यासाठी वर्षाला प्रत्येक पात्र कुटुंबाला तीन गॅस सिलेंडर मोफत देणारी 'मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना' मी जाहीर करत आहे. ही योजना पर्यावरण संरक्षणाला साहाय्यभूत ठरेल आणि ५२ लाख १६ हजार ४१२ लाभार्थी कुटुंबांना या योजनेचा लाभ देण्यात येईल.

**अंगणवाडी कर्मचाऱ्यांना लाभ :** अंगणवाडी सेविका, मदतनीस व मिनी अंगणवाडी सेविका यांना सध्या सेवानिवृत्ती, मृत्यू, राजीनामा इत्यादी प्रकरणी एक लाख रुपयांपर्यंतचा लाभ देण्यात येत आहे.

**लखपती दिदी :** महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत ६ लाख ४८ हजार महिला बचतगट कार्यरत असून ही संख्या ७ लाख करण्यात येणार आहे. बचतगटांच्या फिरत्या निधीच्या रकमेत १५ हजार रुपयांवरून ३० हजार रुपये वाढ करण्यात आली आहे. उलवे, नवी मुंबई येथे युनिटी मॉल बांधण्यात येत असून, त्यातून महिला बचतगट व कारागिरांना उत्पादनांच्या प्रदर्शन व विक्रीसाठी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध होईल. महिला बचतगटांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना सध्या उमेद मार्ट आणि ई-कॉमर्स ऑनलाइन प्लॅटफॉर्म; तसेच प्रदर्शनांच्या माध्यमातून बाजारपेठ उपलब्ध करून दिली जाते. याद्वारे आतापर्यंत १५ लाख महिलांना लखपती दिदी होण्याचा मान मिळाला असून या वर्षात २५ लाख महिलांना लखपती करण्याचे उद्दिष्ट आहे.

**महिला स्टार्टअप :** महिला लघुउद्योजकांसाठी या आर्थिक वर्षापासून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप योजना सुरू करण्यात येणार आहे. स्टार्टअपच्या अनुषंगाने अखिल भारतीय स्तरावरील महासंमेलन राज्यात आयोजित करण्यात येईल.

**आई योजना :** पर्यटन क्षेत्रातील महिला लघुउद्योजकांनी १५ लाख रुपयांपर्यंत घेतलेल्या कर्जावरील व्याजाचा परतावा शासनाकडून करण्यासाठी आई योजना सुरू करण्यात आली आहे. त्यातून १० हजार रोजगार निर्माण होणार आहेत.

**विशेष जलदगती न्यायालये :** महिला व बालकांविरुद्धच्या अत्याचारांचे खटले चालवण्यासाठी १०० विशेष जलदगती न्यायालयांना आवश्यक तो निधी राज्य शासन उपलब्ध करून देत आहे.

**मुलींना मोफत उच्च शिक्षण :** राज्यामधील व्यावसायिक शिक्षणामध्ये मुलींचे प्रमाण वाढवण्यास शासन कटिबद्ध आहे. अभियांत्रिकी, वास्तुशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र, वैद्यकीय; तसेच कृषी विषयक सर्व व्यावसायिक पदवी-पदविका अभ्यासक्रमांसाठी प्रवेशित ८ लाख रुपयापर्यंतच्या वार्षिक कौटुंबिक उत्पन्न असणाऱ्या इतर मागासवर्ग; तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील मुलींना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्कामध्ये १०० टक्के प्रतिपूर्ती करण्यात येईल. या निर्णयाचा लाभ सुमारे २ लाख ५ हजार मुलींना होणार आहे. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून ही योजना सुरू करण्यात येणार असून सुमारे २ हजार कोटी रुपयांचा भार दरवर्षी राज्य शासन उचलणार आहे.

## शेतकऱ्यांसाठी विविध योजना

स्वावलंबी शेतकरी, संपन्न शेतकरी हे ब्रीद जपत शेतकऱ्यांना विविध पातळ्यांवर साहाय्य करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. बी-बियाणांसाठी थेट अनुदान, सिंचन सुविधा, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, शेतीपूरक उद्योगांना प्रोत्साहन, शेतमालाचे मूल्यवर्धन, शेतमाल साठवणूक, बाजारपेठेची उपलब्धता इत्यादींबाबत विविध योजना राबविण्यात येत आहेत. शासनाने सन २०२३-२४ या आर्थिक वर्षापासून शेतकऱ्यांना आर्थिक साहाय्य करण्यासाठी नमो शेतकरी महासन्मान निधी, एक रुपयात पीक विमा, गोपीनाथ मुंडे शेतकरी सुरक्षा सानुग्रह अनुदान अशा विविध योजना सुरू केल्या आहेत. शेती आणि संबंधित क्षेत्रांच्या ठळक बाबी पुढीलप्रमाणे:-

**नैसर्गिक आपत्तीमध्ये शेतकऱ्यांना मदत :** नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या शेतपिकांच्या नुकसानापोटी शेतकऱ्यांना जुलै २०२२ पासून १५ हजार २४५ कोटी ७६ लाख रुपयांची मदत करण्यात आली आहे. नोव्हेंबर-डिसेंबर २०२३ मधील अवकाळी पावसामुळे बाधित झालेल्या २४ लाख ४७ हजार शेतकऱ्यांना २ हजार २५३ कोटी रुपयांची मदत देण्यात आली आहे. नुकसानाच्या क्षेत्राची मर्यादा दोनऐवजी तीन हेक्टर करण्यात आली आहे. राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या निकषापेक्षा अधिक दराने ही मदत करण्यात आली आहे. खरीप हंगाम २०२३ करिता ४० तालुक्यांमध्ये दुष्काळ, तर १ हजार २१ महसूल मंडळांमध्ये दुष्काळसदृश परिस्थिती जाहीर करण्यात आली असून तिथे विविध सवलती लागू करण्यात आल्या आहेत. नुकसानाचे पंचनामे जलद व पारदर्शी होण्यासाठी नागपूर विभागामध्ये घेतली गेलेली ई-पंचनामा प्रणालीची चाचणी यशस्वी झाल्याने ही प्रणाली आता संपूर्ण राज्यात लागू करण्यात येणार आहे.

**नमो शेतकरी महासन्मान निधी :** नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेंतर्गत आजतागायत एकूण ९२ लाख ४३ हजार शेतकरी कुटुंबांना ५ हजार ३१८ कोटी ४७ लाख रुपये अनुदान देण्यात आले आहे.



**एक रुपयात पीक विमा :** एक रुपयात पीक विमा योजनेंतर्गत ५९ लाख ५७ हजार शेतकऱ्यांना ३ हजार ५०४ कोटी ६६ लाख रुपये रक्कम अदा करण्यात आली आहे.

**गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना :** गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेंतर्गत २ हजार ६९४ शेतकरी कुटुंबांना ५२ कोटी ८२ लाख रुपयांचे अनुदान वाटप करण्यात आले आहे.

**महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना :** महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेंतर्गत पीक कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या १४ लाख ३३ हजार शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर रक्कम म्हणून ५ हजार १९० कोटी रुपये अदा करण्यात आली आहे. उर्वरित रकमेचे वाटप त्वरित करण्यात येईल.

**नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प :** नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात विदर्भ आणि मराठवाड्यातील १६ जिल्ह्यांसाठी ५ हजार ४६९ कोटी रुपयांच्या विविध योजना यशस्वीपणे पूर्ण करण्यात आल्या आहेत. या प्रकल्पाचा ६ हजार कोटी रुपये किमतीचा दुसरा टप्पा २१ जिल्ह्यांत राबवण्यात येणार आहे.

**मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प :** मा.बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्पांतर्गत १ हजार ५६१ कोटी ६४ लाख रुपये किमतीच्या ७६७ उपप्रकल्पांना मंजुरी देण्यात आली आहे. त्याचा लाभ सुमारे ९ लाख शेतकऱ्यांना होणार आहे.

**शिधापत्रिकाधारकांना अन्नधान्याऐवजी रोख रक्कम :** विदर्भ आणि मराठवाड्यातील १४ विपत्तीग्रस्त जिल्ह्यातील केशरी शिधापत्रिकाधारक शेतकऱ्यांना अन्नधान्याऐवजी दरमहा रोख रक्कम अदा करण्यात येते. मे २०२४ अखेर या पद्धतीने ११ लाख ८५ हजार लाभार्थींना ११३ कोटी

३६ लाख रुपये अदा करण्यात आले आहेत.

**कृषी यांत्रिकीकरण :** राष्ट्रीय कृषी विकास योजना आणि राज्यपुरस्कृत कृषी यांत्रिकीकरण योजनेतून गेल्या तीन वर्षांत २ लाख १४ हजार शेतकऱ्यांना ट्रॅक्टर, पॉवर टिलर आदी यांत्रिक शेती उपकरणांच्या खरेदीसाठी १ हजार २३९ कोटी रुपये अनुदान देण्यात आले आहे.

**गाव तेथे गोदाम :** शेतमालाच्या स्थानिक पातळीवर साठवणुकीसाठी गाव तेथे गोदाम ही योजना राबवण्यात येणार आहे. या योजनेत पहिल्या टप्प्यात १०० नवीन गोदामांचे बांधकाम; तसेच अस्तित्वातील गोदामांची दुरुस्ती केली जाणार आहे.



**कापूस, सोयाबीन व तेलबिया उत्पादन :** कापूस, सोयाबीन तसेच अन्य तेलबियांच्या उत्पादकतेत वाढ आणि मूल्यसाखळी विकासासाठी विशेष कृती योजना राबवण्यात येत आहे. या योजनेसाठी सन २०२४-२५ मध्ये ३४१ कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. आधारभूत किमतीनुसार खरीप व रब्बी हंगामातील कडधान्य व तेलबियांच्या नाफेडमार्फत खरेदीसाठी १०० कोटी रुपयांचा फिरता निधी स्थापन करण्यात येईल.

**कापूस व सोयाबीन उत्पादकांना साहाय्य :** कापूस व सोयाबीन पिकांचा राज्याच्या शेती उत्पन्नामध्ये मोठा वाटा आहे. मागील वर्षी आंतरराष्ट्रीय घडामोडी व अन्य कारणांमुळे झालेल्या किमतीतील घसरणीमुळे शेतकऱ्यांना नुकसान सोसावे लागले. शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी खरीप पणन हंगाम २०२३-२४ मध्ये कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना दोन हेक्टरच्या मर्यादेत प्रतिहेक्टरी ५ हजार रुपयांचे अर्थसाहाय्य देण्याची घोषणा करत आहे.

**कांदा उत्पादक शेतकऱ्यांना मदत :** कांदा उत्पादक शेतकऱ्यांना साहाय्य करण्यासाठी सन २०२३-२४ या वित्तीय वर्षात ३५० रुपये प्रति क्विंटलप्रमाणे ८५१ कोटी ६६ लाख रुपये अनुदान देण्यात आले आहे. कांदा आणि कापसाची हमीभावाने खरेदी करण्यासाठी प्रत्येकी २०० कोटी रुपयांचा फिरता निधी निर्माण करण्यात येत आहे.

**धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रोत्साहन :** खरीप पणन हंगाम २०२३-२४ मध्ये ६ लाख धान उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिहेक्टरी २० हजार रुपयांप्रमाणे १ हजार ३५० कोटी रुपये प्रोत्साहन रक्कम प्रदान करण्यात आली आहे.



**दुग्धव्यवसाय उद्योजकता प्रकल्प :** शासन नवीन दुग्धव्यवसाय उद्योजकता प्रकल्प सुरू करणार आहे. पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय, पशुचारा आणि पशुखाद्य उत्पादन या क्षेत्रात नव उद्योजक निर्माण करणे, रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या माध्यमातून शेतकऱ्यांची आर्थिक उन्नती साधणे, पशुंची उत्पादकता वाढवणे हा या प्रकल्पाचा उद्देश आहे.

**दूध उत्पादकांना अनुदान :** नोंदणीकृत २ लाख ९३ हजार दूध उत्पादकांना प्रतिलिटर ५ रुपयांप्रमाणे २२३ कोटी ८३ लाख रुपये अनुदान वितरित करण्यात आले आहे. राहिलेले अनुदानही त्वरित वितरित करण्यात येईल. तसेच दूध उत्पादक शेतकऱ्यांना आधार देण्याकरिता प्रतिलिटर पाच रुपयांप्रमाणे अनुदान देण्याची योजना जुलै २०२४ पासून पुढे चालू ठेवण्यात येईल, असे जाहीर करण्यात येत आहे.

**मेंढी-शेळी व कुक्कुटपालन :** शेळी-मेंढीपालन व्यवसायातील संख्यात्मक व गुणात्मक वाढीसाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळाच्या भागभांडवलात लक्षणीय वाढ करण्यात आली आहे. शेळी-मेंढीपालन आणि कुक्कुटपालनाला प्रोत्साहन देण्यासाठी दोन नवीन प्रकल्प राबवण्यात येणार आहेत.

**मत्स्यव्यवसाय विकास :** राज्याच्या मत्स्य उत्पादनात गेल्या दोन वर्षात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. मत्स्यबाजार स्थापना; तसेच मासळी विक्री सुविधांसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

**अटल बांबू समृद्धी योजना :** अटल बांबू समृद्धी योजनेतून १० हजार हेक्टर खासगी क्षेत्रावर बांबूची लागवड करण्यात येणार आहे. त्यासाठी शेतकऱ्यांना बांबू रोपे तसेच इतर आवश्यक बाबींकरिता प्रतिरोपासाठी १७५ रुपये अनुदान देण्यात येणार आहे. राज्यातील पडीक जमिनीवर मोठ्या प्रमाणात बांबूची लागवड करण्यात येणार आहे. नंदुरबार जिल्ह्यात १ लाख २० हजार एकर क्षेत्रावर बांबूंची लागवड करून या योजनेची सुरुवात करण्यात येणार आहे.

**वन्य प्राण्यांपासून होणाऱ्या नुकसानाची भरपाई :** वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात जीवितहानी झाल्यास द्यावयाच्या नुकसानभरपाईच्या रकमेत २० लाख रुपयांवरून २५ लाख रुपये, त्यात कायमचे अपंगत्व आल्यास ५ लाख रुपयांवरून ७ लाख ५० हजार रुपये, गंभीर जखमी झाल्यास १ लाख २५ हजारांवरून ५ लाख रुपये, किरकोळ जखमी झाल्यास २० हजार रुपयांवरून ५० हजार रुपये अशी वाढ करण्यात आली आहे. शेती पिकाच्या नुकसानभरपाईकरिता देय रकमेच्या कमाल मर्यादेतही २५ हजार रुपयांवरून ५० हजार रुपये वाढ करण्यात आली आहे. पशुधन हानीच्या नुकसानभरपाईतही भरीव वाढ करण्यात आली आहे.

**सिंचन प्रकल्प :** विविध कारणांमुळे अपूर्ण राहिलेले सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी गेल्या दोन वर्षांपासून विशेष मोहीम राबवण्यात येत आहे. आतापर्यंत १०८ प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून, येत्या दोन वर्षांत ६१ प्रकल्प पूर्ण होणे अपेक्षित आहे. या प्रकल्पांतून सुमारे ३ लाख ६५ हजार हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होणार आहे.

राज्यातील कार्यान्वित प्रकल्पांच्या अपेक्षित आणि प्रत्यक्ष सिंचन क्षमतेतील तफावत दूर करण्यासाठी महाराष्ट्र सिंचन सुधारणा कार्यक्रम हाती घेण्यात येत आहे. या कार्यक्रमातून १५५ प्रकल्पांच्या कालवे वितरण प्रणालीची सुधारणा करण्यात येणार आहे. येत्या तीन वर्षांत त्यामुळे सुमारे ४ लाख २८ हजार हेक्टर वाढीव क्षेत्राला प्रत्यक्ष सिंचनाचा लाभ होणार आहे.

विविध अपूर्ण सिंचन प्रकल्प पूर्ण करणे तसेच प्रकल्पाच्या वितरण प्रणालीतील सुधारणांसाठी नाबार्डकडून १५ हजार कोटी रुपयांचे दीर्घ मुदतीचे अर्थसाहाय्य घेण्यात येणार आहे.

**उपसा सिंचन योजनांसाठी सौरऊर्जा वापर :** उपसा सिंचन


योजनांना वापरल्या जाणाऱ्या विजेचा खर्च कमी करणे; तसेच शाश्वत वीजपुरवठ्यासाठी म्हैसाळ जिल्हा सांगली येथे पथदर्शी सौर ऊर्जा प्रकल्प राबवण्यात येणार आहे. या प्रकल्पाची अंदाजित किंमत एक हजार ५९४ कोटी रुपये असून त्याचा लाभ सांगली आणि सोलापूर जिल्ह्यातील सुमारे ७५ हजार शेतकरी कुटुंबांना होणार आहे. स्वच्छ व हरित ऊर्जेचे ध्येय साध्य करण्यासाठी सर्व शासकीय उपसा जलसिंचन योजनांचे सौर ऊर्जीकरण करण्यात येणार आहे. त्यामध्ये जनाई-शिरसाई, पुरंदर या उपसा सिंचन योजनांचाही समावेश आहे. या योजनांसाठी ४ हजार २०० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

**वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प :** विदर्भातील नागपूर, वर्धा, अमरावती, यवतमाळ, अकोला व बुलडाणा या जिल्ह्यांतील ३ लाख ७१ हजार २७७ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ देण्यासाठी वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्पाद्वारे गोसीखुर्द प्रकल्पातून ६२.५७ टीएमसी पाणी वळवण्याचे नियोजित आहे.

**महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रम :** कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यातील पुरामुळे होणारी जीवित व वित्तहानी टाळावी आणि अतिरिक्त पाणी दुष्काळग्रस्त भागात वळवता यावे, यासाठी जागतिक बँकेच्या साहाय्याने ३ हजार २०० कोटी रुपये किमतीचा महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रम राबवण्यात येणार आहे.

**जलयुक्त शिवार अभियान-२ :** गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार, जलयुक्त शिवार अभियान-२ अंतर्गत मार्च २०२४ अखेर ४९ हजार ६५१ कामे पूर्ण झाली असून, या वर्षी ६५० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार योजनेंतर्गत राज्यातील एकूण ३३८ जलाशयातून गाळ काढण्याचे काम सुरू आहे. लोकसहभागातून आतापर्यंत ८३ लाख ३९ हजार ८१८ घनमीटर गाळ काढण्यात आला आहे.

**मागेल त्याला सौरऊर्जा पंप :** शेतकऱ्यांना दिवसा अखंडित वीजपुरवठा करण्यासाठी कृषीवाहिन्यांचे विलगीकरण आणि सौर ऊर्जीकरण करण्याचा १५ हजार कोटी रुपयांचा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. शेतकऱ्यांना मोफत वीज उपलब्ध व्हावी, यासाठी मागेल त्याला सौरऊर्जा पंप या योजनेंतर्गत एकूण ८ लाख ५० हजार शेतकऱ्यांना सौरऊर्जा पंप उपलब्ध करून देण्याचे जाहीर करत आहे.



## युवा वर्गासाठी विविध योजना

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारच्या दूरदर्शी धोरणांमुळे २०४७ पर्यंत भारत विकसित देश म्हणून उदयाला येईल. भारत ही जगातील तिसरी मोठी अर्थव्यवस्था होण्याच्या वाटेवर आहे. अर्थव्यवस्थेच्या या वाढीमध्ये तरुण उद्योजकांचा वाटा मोठा असणार आहे. युवा वर्गाला अधिक सक्षम, कुशल आणि तंत्रस्नेही करण्यासाठी कौशल्य, उद्योजकता विकासाच्या; तसेच आर्थिक पाठबळ देण्याबाबतच्या योजना सुरू आहेत. त्या अधिक परिणामकारकपणे राबवण्याचा; तसेच नवीन योजना सुरू करण्याचा शासनाचा मानस आहे.

**मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजना :** राज्यातील विविध शैक्षणिक संस्थांमधून दरवर्षी सुमारे ११ लाख विद्यार्थी पदविका, पदवी आणि पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण होतात. प्रमाणपत्र व अल्प मुदतीचे अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्यादेखील मोठी असते. औद्योगिक आणि बिगर औद्योगिक आस्थापनांमध्ये प्रत्यक्ष कामाद्वारे प्रशिक्षण घेतल्यास गरजू युवकांना रोजगाराची संधी; तसेच उद्योगांना प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध व्हावे, या उद्देशाने दरवर्षी १० लाख तरुण-तरुणींना प्रत्यक्ष कामावरील प्रशिक्षण देण्यासाठी मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजना जाहीर करत आहे. या योजनेंतर्गत शासनामार्फत प्रति प्रशिक्षणार्थी दरमहा १० हजार रुपयांपर्यंत विद्यावेतन देण्यात येईल, त्यासाठी दरवर्षी सुमारे १० हजार कोटी रुपयापर्यंत खर्च अपेक्षित आहे. शासनाच्या योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी दरवर्षी ५० हजार युवकांना कार्यप्रशिक्षण देण्यात येईल.

**मानवी विकासासाठी उपयोजित ज्ञान आणि कौशल्य विकास :** जागतिक बँक साहाय्यित २ हजार ३०७ कोटी रुपये किमतीच्या मानवी विकासासाठी उपयोजित ज्ञान आणि कौशल्य विकास प्रकल्पांतर्गत ५०० औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची दर्जावाढ; तसेच मॉडेल आय.टी. आय, जागतिक कौशल्य केंद्र, महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ, डेटा सेंटर अशा विविध संस्थांचे बळकटीकरण आणि उद्योजकता विकास कार्यक्रम राबवण्यात येणार आहे.

**सेंटर ऑफ एक्सलन्स :** मुंबई, पुणे, नागपूर, अमरावती, यवतमाळ, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, कराड जिल्हा सातारा, अवसरी खुर्द जिल्हा पुणे, येथील तंत्रशिक्षण संस्थांमध्ये सेंटर ऑफ एक्सलन्स स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

**रोजगार मेळावा :** पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा व नमो महारोजगार मेळाव्यातून रोजगार इच्छुक युवांना नोकरीच्या संधी उपलब्ध करून दिल्या जात आहेत. या माध्यमातून सन २०२३-२४ मध्ये ९५ हजार ४७८ उमेदवारांची नोकरीसाठी निवड झाली आहे.



**कौशल्य विकास :** स्वामी विवेकानंद आंतरराष्ट्रीय कौशल्य विकास प्रबोधिनी मुंबईत गोवंडी येथे कार्यान्वित झाली आहे. राज्याच्या ग्रामीण भागात ५११ प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. या केंद्रांतून १५ ते ४५ वयोगटातील १८ हजार ९८० उमेदवार कौशल्य प्रशिक्षण घेत आहेत.

**प्रशिक्षण व संशोधन संस्था :** विविध समाजघटकांसाठी रोजगाराभिमुख प्रशिक्षण कार्यक्रम; तसेच संशोधनाचे काम करण्यासाठी आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था (टीआरटीआय), डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), छत्रपती शाहू महाराज संशोधन व प्रशिक्षण संस्था (सारथी), महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र संशोधन व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) इत्यादी संस्था कार्यरत आहेत. या संस्थांमार्फत एकूण २ लाख

५१ हजार ३९३ विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख प्रशिक्षण देण्यात आले असून, त्यापैकी ५२ हजार ४०५ विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी प्राप्त झाल्या आहेत.

**संशोधन व नवउपक्रम केंद्र :** शाश्वत ऊर्जा, आरोग्य; तसेच कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापराबाबत संशोधनासाठी राज्यातील विद्यापीठ आणि संशोधक यांच्या संयुक्त विद्यमाने संशोधन व नवउपक्रम केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. त्यासाठी विद्यापीठ व शासनाकडून प्रत्येकी ५० कोटी असा एकूण १०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

**स्वयंरोजगारासाठी कर्ज :** शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत राबवण्यात येणाऱ्या स्वयंरोजगार अर्थसाहाय्याच्या योजनांसाठी १०० कोटी रुपये निधीची तरतूद करण्यात आली आहे.



**विदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती :** अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग, विशेष मागास प्रवर्ग; तसेच खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना विदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना राबवण्यात येत आहेत. अल्पसंख्याक समुदायातील विद्यार्थ्यांसाठीदेखील सन २०२४-२५ पासून विदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना लागू करण्यात आली आहे.

**विद्यार्थ्यांसाठी निर्वाहभत्ता :** वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजनेंतर्गत दरवर्षी ३८ ते ६० हजार रुपयांपर्यंत निवासभत्ता देण्यात येत आहे. इतर मागासवर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेंतर्गत दरवर्षी ३८ ते ६० हजार रुपयांपर्यंत निवासभत्ता देण्यात येणार आहे.



**ऊसतोड कामगारांच्या मुलांमुलींसाठी वसतिगृहे :** गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार विकास महामंडळामार्फत ऊसतोड कामगारांच्या मुलामुलींसाठी ८२ शासकीय वसतिगृहे स्थापन करण्यास मंजुरी देण्यात आली आहे.

**शासकीय वैद्यकीय महाविद्यालये :** राज्यात सध्या १ लाख लोकसंख्येमागे ८४ डॉक्टर उपलब्ध आहेत. सन २०३५ पर्यंत हे प्रमाण १०० हून अधिक करण्यासाठी वैद्यकीय महाविद्यालयाची प्रवेश क्षमता वाढवणे आवश्यक आहे. त्यासाठी राज्यात विविध ठिकाणी १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेची नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालये आणि ४३० खाटांची संलग्न रुग्णालये स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यात जालना, हिंगोली, धाराशिव, परभणी, नाशिक, जळगाव, अमरावती, बुलडाणा, वाशिम, वर्धा, भंडारा, गडचिरोली, सातारा, अलिबाग, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर आणि अंबरनाथ, जिल्हा ठाणे या शहरांचा समावेश आहे. मौजे सावर, तालुका म्हसळा, जिल्हा रायगड येथे १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे नवीन शासकीय युनानी महाविद्यालय स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. बुलडाणा जिल्ह्यात नवीन शासकीय आयुर्वेद महाविद्यालय स्थापन करण्यात येणार आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील कनिष्ठ व वरिष्ठ निवासी डॉक्टर यांच्या विद्यावेतनात तसेच मानसेवी अध्यापकांच्या मानधनात भरीव वाढ करण्यात आली आहे.

**थ्रस्ट सेक्टर :** थ्रस्ट सेक्टरमधील उद्योगांना देण्यात येणाऱ्या विशेष प्रोत्साहनांमुळे नजीकच्या कालावधीत राज्यात अंदाजे १ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असून, त्यातून ५० हजार रोजगार निर्माण होणार आहेत.

**हरित हायड्रोजन :** हरित हायड्रोजनच्या उत्पादनासाठी विकासकांसोबत झालेल्या सामंजस्य करारांनुसार २ लाख ११ हजार ४०० कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असून, त्याद्वारे ५५ हजार ९०० रोजगार निर्माण होणार आहेत.

**रत्ने व दागिने :** महापे, नवी मुंबई येथे २५ एकर जागेवर इंडिया जेम्स ॲण्ड ज्वेलरी पार्क नियोजित आहे. त्यात २ हजार सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग घटकांचा समावेश असून, ५० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. त्यातून एक लाख रोजगार निर्माण होतील.

**एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण :** एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३ ते २०२८ जाहीर करण्यात आले आहे. या अंतर्गत पाच वर्षात २५ हजार कोटी रुपयांची भरीव गुंतवणूक आणि ५ लाख रोजगार अपेक्षित आहेत. कॅप्टिव्ह मार्केट योजनेमुळे सूतगिरणी, यंत्रमाग, प्रोसेसिंग, पॅकिंग; तसेच वाहतूक क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण होणार आहेत. खासगी गुंतवणूक वाढवण्यासाठी लघु-वस्त्रोद्योग संकुले; तसेच टेक्निकल टेक्सटाईल पार्क उभारण्याचे शासनाने ठरवले आहे.

**सागरी पर्यटन :** सिंधुदुर्ग जिल्ह्यात आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्कुबा डायव्हिंग केंद्र सुरू करण्यात येणार असून बुडित जहाजावरील प्रवाळाचे दर्शन हे त्याचे विशेष आकर्षण असेल. या प्रकल्पासाठी २० कोटी रुपये खर्च अपेक्षित असून, त्यातून ८०० स्थानिकांना रोजगार उपलब्ध होईल.

## दुर्बल घटकांसाठी विविध योजना

दारिद्र्यनिर्मूलन आणि जनतेचे राहणीमान उंचावण्यासाठी शासन कटिबद्ध असून विविध योजनांच्या माध्यमातून अविरतपणे सामाजिक विकासाचे प्रयत्न सुरू आहेत. अनुसूचित जाती उपयोजनेखाली शाळा, आश्रमशाळा, विद्यार्थ्यांकरिता वसतिगृहे, शिष्यवृत्ती, आरोग्य सेवा, रोजगार इत्यादींकरिता विविध योजना राबवण्यात येतात.

आदिवासी विकास उपयोजनेंतर्गत बालकांच्या पोषणामध्ये वाढ करण्यासाठी 'भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना', शासकीय आश्रमशाळांमध्ये विज्ञान केंद्रांची उभारणी करण्याकरिता 'नमो आदिवासी स्मार्ट शाळा अभियान', वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाकरिता 'पंडित दीनदयाळ उपाध्याय स्वयम् योजना', वस्त्यांना पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी 'ठक्करबाप्पा आदिवासी विकास योजना' आदी योजनांच्या



माध्यमातून पुरेसा निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

इतर मागासवर्ग, विमुक्त जाती भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्गातील घटकांच्या उन्नतीकरिता विविध योजना राबवण्यात येतात. या प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता आश्रमशाळा, ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी आश्रमशाळा, विद्यानिकेतन, धनगर समाजासाठीच्या विविध योजना, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना, डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह योजना, तांडावस्ती मुक्त वसाहत योजना इत्यादी योजनांच्या माध्यमातून पुरेसा निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

राज्यातील सर्व बौद्ध, जैन, शीख, पारसी, ख्रिश्चन व मुस्लीम या अल्पसंख्याक समुदायातील घटकांच्या विकासाकरिता हे सरकार वचनबद्ध आहे. सामाजिक व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी असलेल्या योजना परिणामकारकपणे राबवणे, नवीन विशेष योजना आखणे आणि त्यासाठी पुरेशी आर्थिक तरतूद करणे या धोरणातून सर्व स्वरूपातील सार्वत्रिक दारिद्र्य नाहीसे करणे, हे शाश्वत विकास ध्येय साध्य करण्याचा आमचा निश्चय आहे. त्यादृष्टीने महत्त्वाच्या योजना मी सभागृहासमोर सादर करत आहे.

**विशेष साहाय्य योजनेतील अर्थसाहाय्य वाढ :** संजय गांधी निराधार अनुदान योजना आणि श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तिवेतन योजनेतून आर्थिक दुर्बल घटकांतील निराधार, विधवा, दिव्यांग; तसेच वृद्ध नागरिकांना दरमहा अर्थसाहाय्य देण्यात येते. या अर्थसाहाय्यात एक हजारावरून दीड हजार रुपये अशी वाढ करण्यात आली आहे. सन २०२३-२४ मध्ये ४५ लाख ६० हजार लाभार्थींना या योजनेतून ७ हजार १४५ कोटी रुपये अनुदानाचे वाटप करण्यात आले आहे.

**विविध विकास महामंडळांमार्फत अर्थसाहाय्य :** महिला आर्थिक विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ, श्यामराव पेजे आर्थिक विकास महामंडळ, संत शिरोमणी गोरोबा काका महाराष्ट्र मातीकला मंडळ, महाराष्ट्र राज्य ऑटो रिक्षा व टॅक्सी चालक-मालक कल्याणकारी महामंडळ, मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ अशा महामंडळांच्या माध्यमातून विविध समाजघटकांच्या उन्नतीकरिता योजना राबवण्यात येत आहेत.



वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळांतर्गत राजे उमाजी नाईक आर्थिक विकास महामंडळ आणि पैलवान कै. मारुती चव्हाण-वडार आर्थिक विकास महामंडळ नव्याने निर्माण करण्यात आली आहेत.

महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळांतर्गत संत काशिबा गुरव युवा आर्थिक विकास महामंडळ, जगतज्योती महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळ, संत सेनाजी महाराज केशशिल्पी महामंडळ नव्याने निर्माण करण्यात आली आहेत.

पान, पानपिंपरी आणि मुसळीचे उत्पादन करणाऱ्या बारी समाजाच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक विकासासाठी संत श्री रुपलाल महाराज आर्थिक विकास महामंडळाची स्थापना करण्यात येणार आहे. नव्याने निर्माण करण्यात आलेल्या; तसेच कार्यरत महामंडळांसाठी निधीची पुरेशी तरतूद करण्यात येईल.



**दिव्यांग कल्याण :** १५ डिसेंबर २०२२ पासून दिव्यांग कल्याण विभागाचे कामकाज सुरू झाले आहे. दिव्यांगांसाठी शिक्षण, क्रीडा, कौशल्य विकास, प्रशिक्षण, रोजगार, उद्योग क्षेत्रातील विविध योजना राबवून त्यांना स्वावलंबी व सक्षम बनवण्याचे उद्दिष्ट आहे. दिव्यांग व्यक्तींचे स्वतःचे हक्काचे घर व्हावे, यासाठी धर्मवीर आनंद दिघे घरकुल योजना राबवण्यात येणार असून, पहिल्या टप्प्यात ३४ हजार ४०० घरकुल बांधण्याचे प्रस्तावित आहे. दिव्यांग व्यक्तींना दैनंदिन वापरासाठी इलेक्ट्रिक वाहनाचे वाटप करण्यात येत आहे.

**तृतीयपंथी धोरण-२०२४ :** राज्याने याचवर्षी तृतीयपंथीयांबाबतचे आपले धोरण जाहीर केले आहे. शासन आणि सार्वजनिक प्राधिकरणांकडून होणाऱ्या भरती प्रक्रियेमध्ये; तसेच सर्व शासकीय योजनांमध्ये स्त्री-पुरुषांसोबतच तृतीयपंथी हा लिंग पर्याय उपलब्ध करुन देण्यात आला आहे. यामुळे, तृतीयपंथी समुदायाला राज्य शासनाच्या योजनांचा लाभ घेणे सुलभ होणार आहे.

**धनगर समाजासाठी भूखंड :** धनगर समाजाच्या शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांसाठी खारघर, नवी मुंबई येथे ४ हजार चौरस मीटरचा भूखंड उपलब्ध करून देण्यात आला आहे.

**घरेलू कामगारांचे कल्याण :** महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण महामंडळामार्फत नोंदणीकृत घरेलू कामगारांसाठी विविध कल्याणकारी योजना राबवण्यात येत आहेत.

**मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ :** मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाकडून राबवण्यात येणाऱ्या योजनांकरिता अधिक निधी उपलब्ध करून देण्यासाठी कर्जावरील शासन हमीची मर्यादा ३० कोटी रुपयांवरून ५०० कोटी रुपये करण्यात आली आहे.

**महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजना :** महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजना राज्यातील सर्व कुटुंबांना लागू करण्यात आली आहे. आरोग्य विमा संरक्षणाची रक्कम प्रतिकुटुंब १ लाख ५० हजार रुपयांवरून ५ लाख रुपये करण्यात आली आहे. आतापर्यंत एक हजार रुग्णालयांत उपचारांची सोय होती. त्यात ९०० रुग्णालयांची भर पडणार असून योजनेंतर्गत यापुढे एक हजार ३५६ प्रकारचे उपचार उपलब्ध झाले आहेत.

**मोफत आरोग्य सेवा :** सार्वजनिक आरोग्य विभागाच्या रुग्णालयांमध्ये तपासण्या, चाचण्या आणि उपचार मोफत करण्यात येतात. या निर्णयामुळे बाह्यरुग्ण, आंतररुग्ण, लहान शस्त्रक्रिया, एक्स-रे चाचणी आणि प्रयोगशाळा चाचण्यांमध्ये भरीव वाढ झाली आहे.

**आपला दवाखाना :** शहरी भागातील गरजू जनतेसाठी विनामूल्य तपासणी, वैद्यकीय चाचण्या व उपचारांची सुविधा असलेले हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना ३४७ ठिकाणी कार्यान्वित करण्यात आले आहेत.

**पतसंस्थांचे स्थिरीकरण व तरलता साहाय्य निधी :** महाराष्ट्र राज्य बिगर कृषी सहकारी पतसंस्था नियामक मंडळाला पतसंस्थांच्या स्थिरीकरण व तरलतेसाठी १०० कोटी रुपये निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.



**ग्रामीण गृहनिर्माण :** प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजना, शबरी, पारधी व आदिम आवास योजना, मोदी आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकूल योजना इत्यादींच्या माध्यमातून पुढील ५ वर्षात ३५ लाख ४० हजार ४९१ घरकूल बांधण्यात येणार आहेत. सन २०२४-२५ मध्ये विविध घरकूले योजनांकरिता ७ हजार ४२५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

**गिरणी कामगारांकरिता घरकूल योजना :** बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील गिरणी कामगारांना १२ हजार ९५४ सदनिका वितरित केल्या असून उर्वरित सदनिका उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात आले आहे.




**स्वच्छ भारत अभियान- ग्रामीण टप्पा-दोन :** सन २०२४-२५ साठी स्वच्छ भारत अभियान ग्रामीणच्या दुसऱ्या टप्प्यासाठी १ हजार ८८६ कोटी ८४ लाख निधीची तरतूद करण्यात आली आहे.

**राज्यातील मानसेवी कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ :** राज्यातील अंगणवाडी कर्मचारी, आशा वर्कर, कोतवाल, पोलीस पाटील, ग्रामीण जीवनोन्नती अभियानातील संसाधन व्यक्ती यांच्या मानधनात भरीव वाढ करण्यात आली आहे.

## विविध क्षेत्रातील महत्त्वाच्या योजना

आता मी अर्थसंकल्पातील पायाभूत सुविधा आणि अन्य महत्त्वाच्या योजनांकडे सभागृहाचे लक्ष वेधतो.



**राज्यातील मेट्रोचे जाळे :** मुंबई, पुणे व नागपूर शहरांमध्ये एकूण ४४९ किलोमीटर लांबीच्या मेट्रो मार्गिका उभारण्यास मान्यता देण्यात आली असून १२७ किलोमीटर लांबीच्या मार्गिका वाहतुकीसाठी खुल्या करण्यात आल्या आहेत. तसेच या आर्थिक वर्षात आणखी ३७ किलोमीटर लांबीच्या मार्गिका वाहतुकीसाठी खुल्या करण्यात येणार आहेत.

**शिवडी-न्हावा शेवा प्रकल्प :** शिवडी-न्हावा शेवा प्रकल्पांतर्गत शिवडी-वरळी जोडरस्त्याचे ५७ टक्के काम झाले असून डिसेंबर २०२५ अखेर या प्रकल्पाचे काम पूर्ण करण्यात येणार आहे.

**ठाणे किनारी मार्ग :** बाळकुम ते गायमुख या नियोजित ठाणे किनारी मार्गाची लांबी १३.४५ किलोमीटर असणार असून सुमारे ३ हजार ३६४ कोटी रुपये किमतीचे हे काम मे २०२८ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

**मुंबई किनारी मार्ग :** धर्मवीर स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज मुंबई किनारी मार्गाचे बहुतांश काम पूर्ण झाले असून दोन्ही मार्गिका अंशत: खुल्या करण्यात आल्या आहेत.

**प्रधानमंत्री ग्रामसडक योजना :** प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेच्या तिसऱ्या टप्प्यात सुमारे ६ हजार ५०० किलोमीटर लांबीच्या रस्ते सुधारणांचे उद्दिष्ट आहे. सद्य:स्थितीत २ हजार ३०३ किलोमीटर लांबीच्या रस्त्यांची कामे पूर्ण झाली असून उर्वरित कामे प्रगतिपथावर आहेत.

**मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा-३ :** मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या तिसऱ्या टप्प्यात २३ हजार किलोमीटर लांबीच्या रस्त्यांची कामे आगामी तीन वर्षांत पूर्ण करण्यात येणार आहेत.

**वाडे-पाडे-तांडे-वस्त्या जोडरस्ते योजना :** भगवान बिरसा मुंडा जोडरस्ते योजनेसाठी १ हजार ४०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. संत सेवालाल महाराज जोडरस्ता योजना; तसेच यशवंतराव होळकर जोडरस्ते योजनेची अंमलबजावणी लवकरच सुरू करण्यात येईल.



**पीएम-ई बस सेवा :** परिवहन सेवेमध्ये सुधारणा तसेच हवेतील प्रदूषण कमी करण्यासाठी १९ महानगरपालिकांमध्ये पीएम ई-बस सेवा योजना राबवण्यात येणार आहे. इलेक्ट्रिक बसेस उपलब्ध करणे, बस आगारे आणि विद्युत पायाभूत सुविधा उभारणे आदी बाबींचा या योजनेत समावेश आहे.

**अग्निशमन सेवांचा विस्तार आणि आधुनिकीकरण :** अग्निशमन सेवांचा विस्तार आणि आधुनिकीकरणासाठी ६१५ कोटी रुपयांची योजना राबवण्यात येणार आहे. ही योजना 'ड' वर्ग महानगरपालिका, सर्व नगरपरिषदा व नगरपंचायतींमध्ये राबवण्यात येईल.

**धर्मादाय आयुक्तांच्या कार्यालयीन इमारतींचे बांधकाम :** धर्मादाय आयुक्तांच्या आधिपत्याखालील कार्यालयांच्या मुंबई, नंदूरबार, नांदेड, वर्धा, अमरावती आणि कोल्हापूर येथील इमारतींच्या बांधकामासाठी; तसेच अस्तित्वातील इमारतींच्या नूतनीकरणासाठी १२५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला जाणार आहे.

**ग्रामपंचायत बांधकाम :** मा. बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजनेंतर्गत २ हजार ५६७ ग्रामपंचायत कार्यालयांच्या बांधकामांना मान्यता देण्यात आली आहे.




**जागतिक वारसा नामांकन :** शिवकालीन १२ किल्ल्यांना जागतिक वारसा नामांकन प्राप्त व्हावे म्हणून

युनेस्कोकडे प्रस्ताव पाठवण्यात आला आहे. कोकणातील कातळशिल्पे, पंढरपूर वारी, दहीहंडी उत्सव आणि गणेशोत्सव याबाबतचे प्रस्तावही पाठवण्यात येणार आहेत.

**शिवराज्याभिषेक सोहळा :** शासनाकडून रायगड किल्ल्यावर शिवराज्याभिषेक सोहळा दरवर्षी साजरा करण्याचे ठरवले असून त्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

**पाणबुडी प्रकल्प :** वेंगुर्ला, जिल्हा सिंधुदुर्ग येथे ६६ कोटी रुपये अंदाजित किमतीचा आंतरराष्ट्रीय दर्जाचा पाणबुडी प्रकल्प विकसित करण्यात येणार आहे.



**सातारा एकात्मिक पर्यटन विकास आराखडा :** सातारा जिल्ह्यातील पश्चिम घाट परिसरातील पर्यटनस्थळांच्या विकासासाठी ३८१ कोटी ५६ लाख रुपये किमतीचा एकात्मिक पर्यटन विकास आराखडा मंजूर करण्यात आला आहे. याअंतर्गत श्री क्षेत्र महाबळेश्वर विकास, प्रतापगड किल्ला जतन व संवर्धन, सह्याद्री व्याघ्र पर्यटन आणि कोयना हेळवाक वनक्षेत्रांतर्गत जलपर्यटनाचा समावेश आहे.

**माळशेज घाटातील पर्यटन :** पावसाळ्यात कल्याण-नगर मार्गावरील माळशेज घाटाला भेट देणाऱ्या पर्यटकांची संख्या मोठी आहे. या घाटात सर्व सोयींनीयुक्त अत्याधुनिक व्ह्युईंग गॅलरी उभारण्यात येईल.

**रामटेक विकास आराखडा :** नागपूर जिल्ह्यातील रामटेक हे प्रभू रामचंद्राच्या पदस्पर्शाने पावन झालेले तीर्थस्थळ आहे. रामटेक विकास आराखड्याच्या पहिल्या टप्प्यात १५० कोटी रकमेच्या कामांना मान्यता देण्यात आली असून ही कामे प्रगतीत आहेत. दुसऱ्या टप्प्यात २११ कोटी रुपये किमतीची कामे हाती घेण्यात येणार आहेत.

**बाबा जुमदेवजी यांचे स्मारक :** आध्यात्मिक गुरु तथा समाजसुधारक बाबा जुमदेवजी यांच्या पावडदौना, तालुका मौदा, जिल्हा नागपूर येथील स्मारकासाठी ७७ कोटी रुपये रकमेचा विकास आराखडा तयार करण्यात येणार आहे.

**नेवासा मंदिर परिसर विकास आराखडा :** संत ज्ञानेश्वर महाराजांनी अजरामर ज्ञानेश्वरीची जिथे रचना केली त्या नेवासा येथील मंदिर परिसराचा विकास आराखडा तयार करण्यात येणार आहे.



**कोल्हापूर इंटरनॅशनल कन्व्हेंशन सेंटर :** कोल्हापूर शहरातील राजाराम तलावाकाठी अत्याधुनिक आंतरराष्ट्रीय कन्व्हेंशन सेंटर उभारण्यात येईल.

**शैक्षणिक संस्थांना अनुदान :** बी.जे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, पुणे येथे बहुउद्देशीय सभागृह उभारण्याकरिता; तसेच किसान शिक्षण प्रसारक मंडळ, बोरगाव-काळे तालुका जिल्हा लातूर या शैक्षणिक संस्थेच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त भौतिक व शैक्षणिक सुविधांचा विकास करण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

**छत्रपती संभाजी महाराज स्मारक :** छत्रपती संभाजी महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या शिराळा, जिल्हा सांगली येथे त्यांचे स्मारक उभारण्यात येईल.

**संत श्री रूपलाल महाराज स्मारक :** संत श्री रूपलाल महाराजांचे समाधीस्थळ असलेल्या अंजनगाव सुर्जी, जिल्हा अमरावती येथे त्यांचे स्मारक उभारण्यात येणार आहे.

**आदिवासी कलादालन :** आदिवासी कलांचे प्रदर्शन, वृद्धी आणि कलाकारांना प्रोत्साहन देण्यासाठी हतगड तालुका सुरगाणा जिल्हा नाशिक येथे कलादालन स्थापन करण्यात येईल.

**साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था :** मुंबई येथील साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या ३०५ कोटी रुपये किमतीच्या आराखड्यास मान्यता देण्यात आली आहे.

**महास्ट्राईड प्रकल्प :** जिल्हास्तरावर संस्थात्मक क्षमता वाढवून विकासाला चालना देण्यासाठी महास्ट्राईड हा २ हजार २३२ कोटी रुपये किमतीचा प्रकल्प जागतिक बँकेच्या साहाय्याने राबवण्यात येणार आहे.

**मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजना :** भारतातील शेती मुख्यत: पावसावर अवलंबून आहे, याची आपल्याला जाणीव आहे. मात्र गेल्या काही वर्षांत झालेल्या जागतिक वातावरणीय बदलामुळे मोसमी हवामानात तीव्र बदल होत असून त्याचे दुष्परिणाम शेतकऱ्यांना भोगावे लागत आहेत. अशा अडचणीत आलेल्या राज्यातील माझ्या शेतकरी बांधवांना मदतीच्या हाताची गरज आहे त्यासाठी त्यांना दिलासा देणारी मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजना घोषित करत आहे.

शेतकऱ्यांवर येणाऱ्या वीजबिलाचा भार उचलण्याचे शासनाने ठरवले असून राज्यातील ४४ लाख ६ हजार शेतकऱ्यांच्या ७.५ अश्वशक्ती क्षमतेपर्यंतच्या शेतीपंपांना पूर्णत: मोफत वीज पुरवली जाईल. याकरिता १४ हजार ७६१ कोटी रुपये अनुदान स्वरूपात उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

**योजनांचे सुसूत्रीकरण :** या अर्थसंकल्पात विविध समाजघटकांसाठी महत्त्वाकांक्षी नवीन योजना घोषित केल्या आहेत. राज्यातील सर्व योजनांचे लाभ पात्र लाभार्थींपर्यंत थेट पोहोचावेत, यासाठी योजनांचे मूल्यमापन करून त्यांचे सुसूत्रीकरण करण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याचे ठरवण्यात आले आहे.

**जिल्हा वार्षिक योजना :** सन २०२४-२५ मध्ये जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत १८ हजार १६५ कोटी रुपयांचा नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे. हा नियतव्यय मागील वर्षाच्या तुलनेत २० टक्क्यांनी अधिक आहे.

**वार्षिक योजना २०२४-२५ :** वार्षिक योजना २०२४-२५ मध्ये कार्यक्रम खर्चासाठी एक लाख ९२ हजार कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे. त्यामध्ये अनुसूचित जाती उपयोजनेच्या १५ हजार ८९३ कोटी रुपये आणि आदिवासी विकास उपयोजनेच्या १५ हजार ३६० कोटी रुपये नियतव्ययाचा समावेश आहे.

**अर्थसंकल्पीय अंदाज २०२४-२५ :** सन २०२४-२५ मध्ये एकूण खर्चासाठी ६ लाख १२ हजार २९३ कोटी रुपयांची तरतूद प्रस्तावित केली आहे. महसूली जमा ४ लाख ९९ हजार ४६३ कोटी रुपये आणि महसुली खर्च ५ लाख १९ हजार ५१४ कोटी रुपये प्रस्तावित केला

आहे. परिणामी २० हजार ५१ कोटी रुपये महसुली तूट अपेक्षित आहे.

**राजकोषीय तूट :** राज्याची राजकोषीय तूट आणि महसुली तूट, राजकोषीय उत्तरदायित्व व वित्तीय व्यवस्थापन कायद्याने निश्चित केलेल्या मर्यादेच्या आत ठेवण्यात शासन यशस्वी ठरले आहे. सन २०२४-२५ ची राजकोषीय तूट १ लाख १० हजार ३५५ कोटी रुपये आहे. राज्याच्या आर्थिक विकासासाठी आणि समाजातील सर्व घटकांच्या कल्याणासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करेल, याची खात्री मी देतो.

सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी राज्याचा स्वतःच्या कर महसुलाचा सुधारित अंदाज रुपये ३ लाख २६ हजार ३९७ कोटी आहे.

सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात स्वतःच्या कर महसुलाचे अर्थसंकल्पीय उद्दिष्ट ३ लाख ४३ हजार ४० कोटी रुपये एवढे निश्चित करण्यात आले आहे.



### पेट्रोल व डिझेलवरील मूल्यवर्धित कर राज्यभरात समान करणे

सर्वसामान्य नागरिकांना तसेच उद्योग व व्यापार क्षेत्राला दिलासा मिळावा म्हणून राज्यभरात पेट्रोल व डिझेलवरील मूल्यवर्धित करात समानता आणण्याची आवश्यकता आहे. त्या दृष्टीने बृहन्मुंबई, ठाणे व नवी मुंबई या महानगरपालिका क्षेत्रातील डिझेलवरील सध्याचा कर २४ टक्क्यांवरून २१ टक्के करण्याचे प्रस्तावित करत आहे. तसेच पेट्रोलवर २६ टक्के अधिक प्रतिलिटर ५ रुपये १२ पैसे एवढा कर सध्या आहे; आता तो कमी करून २५ टक्के अधिक प्रतिलिटर ५ रुपये १२ पैसे करण्याचा प्रस्ताव आहे. या बदलामुळे ठाणे, बृहन्मुंबई आणि नवी मुंबई या महानगरपालिका क्षेत्रातील पेट्रोलचा दर अंदाजे ६५ पैसे व डिझेलचा दर अंदाजे दोन रुपये सात पैसे प्रतिलिटर स्वस्त होईल.

### पाच केंद्रीय सशस्त्र दलातील जवानांना करातून सूट

केंद्रीय सशस्त्र पोलीस दलामध्ये सात सशस्त्र सेनादल कार्यरत असून त्यापैकी सीमा सुरक्षा दल व केंद्रीय राखीव पोलीस दल यातील सशस्त्र जवानांना व्यवसाय कर भरण्यापासून सूट देण्यात आली आहे. आता उर्वरित पाच दलातील म्हणजेच आसाम रायफल्स, केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल, भारत-तिबेट व्यवसाय सीमा पोलीस दल, राष्ट्रीय सुरक्षा रक्षक व सशस्त्र सीमा दलातील राष्ट्रीय कर्तव्य बजावणाऱ्या सशस्त्र जवानांना व्यवसाय कर भरण्यापासून सूट देण्याबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे. याचा लाभ अंदाजे १२ हजार जवानांना होईल.

### मुद्रांक शुल्क

नोंदणी झालेल्या दस्तास कमी मुद्रांक शुल्क भरल्याचे निष्पन्न झाल्यास, मुद्रांक शुल्काच्या फरकाच्या रकमेवर दस्त निष्पादित केल्याच्या तारखेपासून आकारण्यात येणारी दंडाची रक्कम दरमहा २ टक्क्यांवरून १ टक्के करण्यात येईल.

मुद्रांक शुल्क परताव्यासाठी ऑनलाइन पद्धतीने अर्ज करता येईल. अर्ज परतावा करण्याची कालमर्यादा मुद्रांक खरेदी केल्यापासून सहा महिन्यांऐवजी एक वर्ष करण्यात येईल.

वरील प्रस्तावांना सन्माननीय सदस्यांचा पाठिंबा मिळेल, असा माझा विश्वास आहे. आतापर्यंत दहा वेळा या राज्यातल्या जनतेने मला अर्थसंकल्प मांडण्याची संधी दिली.

***निंदी कोणी मारी। वंदी कोणी पूजा करी मज हे ही नाही ते ही नाही।***
***वेगळा दोन्हींपासूनी***
***या न्यायाने केलेल्या कामाची ही पावती आहे, असे मी मानतो.***
***तुका म्हणे मज घडो त्यांची सेवा। तरी माझ्या देवा पार नाही...***

## ऋणनिर्देश

*राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या शतकोत्तर सुवर्ण जयंतीनिमित्त माहिती व जनसंपर्क महासंचालनालयनिर्मित 'लोकराज्य'चा जून २०२४ विशेषांक प्रकाशित करण्यात येत आहे. या अंकासाठी कोल्हापूर येथील महाराष्ट्र इतिहास प्रबोधनी यांच्यावतीने डॉ. जयसिंगराव पवार आणि डॉ. मंजुश्री पवार संपादित 'राजर्षी शाहू पंचखंडात्मक स्मारक ग्रंथ' आणि सह्याद्री इतिहास संशोधन केंद्र, कोल्हापूर प्रकाशित 'राजर्षी शाहू छत्रपती : रयतेच्या राजाचे चित्रमय चरित्र' या पुस्तकाचे संपादक, संकलक व लेखक डॉ. इंद्रजित वसंतराव सावंत आणि डॉ. देविकाराणी शिवाजीराव पाटील यांच्या पुस्तकातून काही लेखांसाठी संदर्भ घेण्यात आले आहेत. तसेच राजर्षी शाहू महाराज यांची छायाचित्रे घेण्यात आली आहेत, या सहकार्याबद्दल त्यांचे आभार... आणि नागपूरचे जिल्हा माहिती अधिकारी विनोद रापतवार, नांदेडचे जिल्हा माहिती अधिकारी प्रवीण टाके, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय मंत्रालय मुंबई येथील वरिष्ठ सहायक संचालक रवींद्र राऊत, कोल्हापूरचे जिल्हा माहिती अधिकारी सचिन अडसूळ, माहिती अधिकारी वृषाली पाटील, माहिती सहायक रणजित पवार यांनी या अंकासाठी विशेष सहकार्य केल्याबद्दल त्यांचे आभार...*

– संपादक

# राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांना अभिवादन



राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री हसन मुश्रीफ व जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे जन्मस्थळ 'लक्ष्मी विलास पॅलेस' येथील राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी आमदार जयंत आसगावकर, आमदार जयश्री जाधव, आमदार ऋतुराज पाटील, महानगरपालिका आयुक्त के. मंजुलक्ष्मी, जिल्हा पोलीस अधीक्षक महेंद्र पंडित, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेयन एस., शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार, राजर्षी शाहू महाराज प्रेमी व अन्य मान्यवर उपस्थित होते.

# राजर्षी शाहू पुरस्काराचे वितरण




राजर्षी शाहू छत्रपती मेमोरियल ट्रस्टच्या वतीने राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त देण्यात येणारा 'राजर्षी शाहू पुरस्कार' यावर्षी ज्येष्ठ विचारवंत, पत्रकार, समाजसेवक पन्नालाल सुराणा यांना कोल्हापूरचे जिल्हाधिकारी तथा ट्रस्टचे अध्यक्ष अमोल येडगे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के उपस्थित होते. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेयन एस, माजी सनदी अधिकारी तथा साहित्यिक लक्ष्मीकांत देशमुख, ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार, ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर, जिल्हा पुरवठा अधिकारी तथा ट्रस्टच्या सदस्य सचिव मोहिनी चव्हाण, राजदीप सुर्वे; तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर व शाहूप्रेमी उपस्थित होते.

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2018-20
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 12th to 17th Every Month
Date of Publication : 10th of Every Month


सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# लोकराज्य

## अधिकृत-विश्वासार्ह-वस्तुनिष्ठ




### वाचकांच्या प्रतिक्रियांचे स्वागत!

- राज्याच्या जडणघडणीचा बोलका साक्षीदार ठरलेल्या लोकराज्य मासिकाची गुणवत्ता आणि संदर्भमूल्य अधिक वाढविण्यासाठी वाचकांच्या प्रतिक्रिया अत्यंत मोलाच्या आहेत.
- वाचकांनी विधायक सूचना, लेखांवरील अभिप्राय lokrajya2011@gmail.com या ईमेलवर किंवा खालील पत्त्यावर पाठवावेत.
- निवडक प्रतिक्रियांना अंकात योग्य ती प्रसिद्धी देण्यात येईल.

**अंक ऑनलाइन मोफत उपलब्ध**

संकेतस्थळ : https://dgipr.maharashtra.gov.in
आणि https://mahasamvad.in

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

**पत्ता :** उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, नवीन प्रशासन भवन, १७ वा मजला, मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई ४०००३२.

Visit: www.mahasamvad.in | Follow Us: /MahaDGIPR | Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR


प्रति / TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

*If undelivered, please return to:*

प्रेषक / From

**दयानंद कांबळे**
उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
लोकराज्य शाखा, ठाकरसी हाऊस, २रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊसजवळ, शुरजी वल्लभभाई मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई - ४०० ००१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक दयानंद कांबळे, उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी मे. क्वार्टरफोल्ड प्रिंटेबिलिटीज, प्लॉट क्र. बी-८, तळोजा एमआयडीसी, तळोजा महानगर गॅस, पेंढार फाटा जवळ, नवी मुंबई - ४१० २०८ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.

मुख्य संपादक : ब्रिजेश सिंह